

अंबड औद्योगिक वसाहतीत कंटेनरच्या टायरला आग

शेवटचे पान


रविवार **गांवकरी** उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक




चैत्रोत्सवात एसटीला सुमारे दोन कोटींचे उत्पन्न
शेवटचे पान

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : ३७ ■ नाशिक, रविवार, ४ मे २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १६ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

## महत्त्वाचे ▶▶▶▶

### झेंडे जाळाल तर विरोध : आझमी

**मुंबई :** समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी पुन्हा एकदा गरळ ओकली आहे. पहलगाम हल्ल्याबाबत बोलताना आझमी म्हणाले की, दहशतवादी आरामात आले, पर्यटकांना गोळ्या मारून निघून गेले. यावर सरकारने चिंतन केले पाहिजे. तसेच पॅलेस्टाइनसोबत आमचा धर्म जुळला आहे. फिलिपाइन्सचे झेंडे जाळाल तर विरोध करू, अशी जाहीर भूमिका त्यांनी स्पष्ट केली. जात विचारून साहित्य खरेदी करायला सांगणारेही दहशतवादी आहेत, असा निशाणा त्यांनी भाजपचे आमदार नितेश राणेंवर नाव न घेता साधला. भारतामध्ये माणुसकी शिल्लक राहिली नाही. देशात धर्म विचारून कारवाई होत असल्याचा आरोपदेखील अबू आझमी यांनी केला आहे.

### भारताची निर्यात ८२४.९ अब्ज डॉलर्स

**नवी दिल्ली :** रिझर्व्ह बँकेने मार्च २०२५ साठी सेवा व्यापाराबद्दल जारी केलेल्या आकडेवारीनुसार २०२४-२५ आर्थिक वर्षात भारताची एकूण निर्यात ८२४.९ अब्ज डॉलर्सच्या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचली आहे. मागील वर्षीच्या ७७८.१ अब्ज डॉलर्सच्या निर्यातीच्या आकडेवारीपेक्षा यावर्षीची निर्यात ६.०१ टक्क्याने जास्त आहे. सेवा निर्यात मार्च २०२४ मध्ये असलेल्या ३० अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या तुलनेत मार्च २०२५ मध्ये १८.६ टक्क्याने वाढून ३५.६ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी झाली होती. पेट्रोलियम उत्पादने वगळता व्यापारी मालाची निर्यात २०२३-२४ मध्ये ३५२.९ अब्ज अमेरिकन डॉलर्स होती. त्याच्या तुलनेत २०२४-२५ मध्ये ती ६% वाढून विक्रमी ३७४.१ अब्ज अमेरिकन डॉलर्सवर पोहोचली. ही आतापर्यंतची सर्वाधिक वार्षिक बिगर-पेट्रोलियम माल निर्यात आहे.

### तीनवर्षीय चिमकुलीचे संथाराद्वारे प्राणत्याग

**नवी दिल्ली :** इंदूरमध्ये ब्रेन ट्यूमरग्रस्त एका तीन वर्षांच्या मुलीने संथारा व्रताद्वारे प्राणत्याग केल्याची घटना समोर आली आहे. या मुलीच्या नावावर गोल्डन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने जागतिक विक्रमाचे प्रमाणपत्रही जारी केले आहे. सदर मुलीला एक वर्षापूर्वी ब्रेन ट्यूमर झाल्याचे निदान झाले होते. तिच्यावर मुंबईत उपचारही करण्यात आले. त्यानंतर जैन मुनीश्रींच्या सल्ल्यानंतर, मुलीच्या पालकांनी २१ मार्च रोजी तिला संथारा व्रत दिले. हा धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर काही मिनिटांतच तिचा मृत्यू झाला. त्यासाठी जैन समाजाने मुलीच्या पालकांचा सन्मानदेखील केला. हा सर्वांत लहान वयात केलेले संथारा व्रत असल्याचा दावा करण्यात आला आहे. यामुळे गोल्डन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डनेही याची दखल घेतली.

### साई मंदिर बॉम्बने उडवण्याची धमकी

**अहिल्यानगर :** जगभरात प्रसिद्ध आणि कोट्यवधी लोकांचे श्रद्धास्थान असलेल्या शिर्डी साईबाबा मंदिराला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. धमकीचा हा मेल संस्थानच्या अधिकृत मेल अकाउंट आला आहे. हा मेल मिळताच साईबाबा संस्थानची सुरक्षा यंत्रणा तसेच पोलिस यंत्रणा अलर्ट झाली आहे. संस्थानच्या सुरक्षा अधिकाऱ्यांनी शिर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनीही प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल केला आहे. हा मेल नेमका कोणी केला, याचा पोलीस कसून शोध घेत आहेत. दरम्यान, साईभक्तांनी भीती न बाळगता दर्शनासाठी यावे.

# पाकिस्तानची आर्थिक नाकेबंदी

## केंद्र सरकारकडून वस्तू आयातीवर बंदी

**नवी दिल्ली : पहलगाममध्ये झालेल्या पर्यटकांवरील क्रूर दहशतवादी हल्ल्यानंतर भारताकडून पाकिस्तानची आर्थिक नाकेबंदी सुरूच आहे. भारताने आता पाकिस्तानमधून येणाऱ्या सर्व वस्तूंच्या आयातीवर बंदी घातली आहे. परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाने २ मे रोजी सूचना काढत ही बंदी तत्काळ लागू होईल, असे म्हटले आहे.**

भारत सरकारने परराष्ट्र व्यापार धोरण, २०२३ मध्ये एक नवीन परिच्छेद २.२० अ समाविष्ट केला आहे. त्यानुसार सर्व वस्तूंची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आयात किंवा वाहतूक, मुक्तपणे आयात करता येण्याजोगी असो वा नसो, पुढील आदेशापर्यंत तत्काळ प्रभावाने प्रतिबंधित करण्यात आली आहे. या निर्बंधातील कोणत्याही अपवादासाठी भारत सरकारची पूर्वपरवानगी आवश्यक असेल, असे अधिसूचनेत म्हटले आहे.

व्यापारबंदीमुळे पाकिस्तानच्या निर्यात क्षेत्राला फटका बसणार आहे. सिमेंट, कापड आणि कृषी उत्पादनांसारख्या वस्तूंसाठी पाकिस्तान सीमापार व्यापारावर अवलंबून आहे. औपचारिक व्यापार आधीच मर्यादित असल्याने, या हालचालीमुळे अनौपचारिक व्यापार मार्ग देखील विस्कळित होऊ शकतात आणि आर्थिक दबाव वाढू शकतो.

भारताने पाकिस्तानविरुद्ध आधीच अनेक पावले उचलली आहेत. राजनैतिक संबंध कमी केले आहेत. पाकिस्तानविरुद्धच्या उपाययोजनांमध्ये सिंधू पाणी करार निलंबित आणि पाकिस्तानकडून येणाऱ्या विमानांसाठी त्याचे हवाईक्षेत्र बंद करणे समाविष्ट आहे. प्रत्युत्तरादाखल पाकिस्तानने १९७२ चा सिमला करार रद्द करणे, भारतीय विमानांसाठी त्यांचे हवाई क्षेत्र बंद करणे, वाघा सीमा क्रॉसिंग बंद करणे, व्यापार थांबवणे आणि सिंधू करारांतर्गत पाणी वळवण्याचा भारताचा कोणताही प्रयत्न युद्धाचा प्रयत्न म्हणून पाहिला जाईल, असा इशारा दिला आहे.

दरम्यान, भारताने सिंधू पाणी करार रद्द केल्यानंतर पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांनी पुन्हा एकदा भारताला पोकळ धमकी दिली आहे. भारताने सिंधू नदीवर धरण बांधून पाणी अडवले तर पाकिस्तान हल्ला करेल, असे पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ म्हणाले.

भारतीय आक्रमणाच्या भीतीने पाकिस्तान बिथरला असून, बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची चाचणी घेण्याच्या तयारीत आहे. भारत बदला घेणार या भीतीने पाकिस्तानने याआधीच अरबी समुद्रात युद्धसराव सुरू केला आहे. शिवाय नियंत्रण रेषेवरही पाकिस्तानच्या कुरापती सुरू असून, सातत्याने शस्त्रसंधीचे उल्लंघन केले जात आहे. त्यातच आता बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची चाचणी करून भारताला चिथावणी देण्याचा पाकिस्तानचा निष्फळ प्रयत्न सुरू आहे.

### भारतीय वायुदलाने दाखवली ताकद

उत्तर प्रदेशच्या शाहजहांपूर येथील गंगा एक्सप्रेस-वेवर भारतीय वायुदलाने आपली ताकद दाखवली. साडेतीन किलोमीटर लांबीच्या धावपट्टीवर जॅग्वार, मिराज, राफेल, सुखोई, तेजस यांसारख्या १५ लढाऊ विमानांनी टच अँड गो केले. जवळपास दोन तास हा अभ्यास सुरू होता. याशिवाय एक्सप्रेस-वेवर रात्रीच्या वेळीसुद्धा हा लँडिंगचा सराव करण्यात आला. गंगा एक्सप्रेस-वे हा देशातील चौथा एक्सप्रेस-वे आहे, जिथे भारतीय वायुदलाच्या लढाऊ विमानांसाठी हवाईपट्टी आहे. देशातील हा पहिला असा मार्ग आहे जिथे वायुदलाची लढाऊ विमाने रात्रीही उतरू शकतात.

### दहशतवादी काश्मीरच्या जंगलातच

पहलगाम हल्ल्यातील दहशतवादी हाशिम मुसा त्याच्या साथीदारासह काश्मीरच्या जंगलात लपला असल्याचे समजते. जंगलात रस्ते शोधण्यासाठी दहशतवाद्यांकडून इंटरनेटशिवाय वापरू शकतो अशा ॲल्पाइन क्वेस्ट मोबाईल ॲपचा वापर केला जात आहे. दहशतवाद्यांकडे चिनी बनावटीची अत्याधुनिक कम्युनिकेशन यंत्रणाही आहे. ॲल्पाइन क्वेस्ट नावाचे हे ॲप फ्रान्सचे आहे आणि दहशतवादी नियंत्रण रेषेवर घुसखोरी करण्यासाठी त्याचा वापर करत आहेत. पण हाशिम मुसा आणि त्याचे साथीदार जम्मू आणि काश्मीरच्या जंगलातही याचा वापर करत आहेत. आयएसआयने हे ॲप दहशतवाद्यांना उपलब्ध करून दिले आहे, जे ऑफलाइनदेखील काम करते. ॲल्पाइन क्वेस्ट या ॲपद्वारे ऑफलाइन लोकेशन वापरता येते. कोणत्याही ठिकाणाचे स्थान आणि दिशा जाणून घेण्यासाठी आवश्यक असलेला गुगल मॅप इंटरनेटवर चालतो. पण अशा परिस्थितीत सुरक्षा एजन्सींकडून पकडले जाण्याचा धोका असतो. मात्र, ॲल्पाइन क्वेस्ट हे ॲप इंटरनेटशिवाय वापरता येते. ॲल्पाइन क्वेस्टद्वारे कोणीही सहजपणे पर्वत, जंगल आणि नदीचे मार्ग शोधू शकते. दहशतवाद्यांकडे चिनी बनावटची अत्याधुनिक कम्युनिकेशन यंत्रणादेखील असल्याची माहिती मिळत आहे. चिनी बनावटीची अत्याधुनिक कम्युनिकेशन यंत्रणा चीनने पाकिस्तानला दिली असावी, ती आता दहशतवाद्यांपर्यंत पोहोचली आहे. जगभरातील प्रगत सैन्य युद्धक्षेत्रातून कमांड सेंटरशी संवाद साधण्यासाठी किंवा व्हिडीओ पाठवण्यासाठी या यंत्रणांचा वापर केला जातो. ही यंत्रणादेखील इंटरनेटशिवाय वापरली जाते.

# जम्मू-काश्मीर सरकारचा केंद्राच्या निर्णयाला पाठिंबा

### अब्दुल्ला यांनी घेतली मोदींची दिल्लीत भेट

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी शनिवारी (दि. ३) नवी दिल्लीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास अर्धा तास बैठक सुरू होती. या बैठकीत पहलगाम दहशतवादी हल्ला आणि त्यानंतर निर्माण झालेली सुरक्षेसंदर्भातील स्थिती यासह विविध मुद्यांवर चर्चा झाली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ओमर अब्दुल्ला यांच्या बैठकीपूर्वी नॅशनल कॉन्फरन्सच्या सूत्रांनी बैठकीत काय होऊ शकते, याची माहिती दिली होती. केंद्र सरकार जो निर्णय घेईल त्यात जम्मू-काश्मीरच्या प्रशासनातर्फे पूर्ण सरकार्य करण्याचे धोरण अब्दुल्ला यांचे आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला आणि देशाच्या सुरक्षेच्या मुद्यावर केंद्र सरकारसोबत जम्मू-काश्मीर सरकार राहणार आहे. जम्मू-काश्मीरमध्ये सुरक्षाविषयक आव्हान वाढत आहेत. केंद्र सरकारनं पाकिस्तानविरुद्ध कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ओमर अब्दुल्ला यांची भेट झाली आहे. नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष माजी मुख्यमंत्री फारुक अब्दुल्ला यांनी या हल्ल्याचा निषेध केला होता. दहशतवादावाविरुद्ध लोकांनी एकजूट राहावे, असे आवाहन त्यांनी केले होते. या हल्ल्यात मारला गेलेल्या आदिल हुसैन शाह याच्या घरी भेट देत श्रद्धांजली वाहिली. आदिल हुसैन शाह पहलगाममध्ये पर्यटकांना घोड्यावरून बैसरन भागात सफर घडवायचा.

फारुक अब्दुल्ला यांनी पाकिस्तानविरुद्ध भारताकडून जी कारवाई करण्यात येत आहे त्यावर बोलण्यास नकार दिला. ते म्हणाले, की हा पंतप्रधानांचा अधिकार आहे. मी काही बोलणार नाही. पाकिस्तान पीपल्स पार्टीचे नेते बिलावल भुट्टो यांच्या धमकीवर त्यांनी आक्रमकपणे भूमिका मांडत अशा वक्तव्यांनी प्रश्न सुटणार नाहीत. त्यांच्या वक्तव्यांकडे लक्ष दिले तर काश्मीर पुढे जाणार नाही, असे फारुक अब्दुल्ला म्हणाले.

## दहशतवादाचे समर्थन करणाऱ्यांविरोधात कडक पावले

**नवी दिल्ली :** दहशतवाद हा मानवतेसाठी सर्वात मोठा धोका असल्याबाबत आमचे एकमत आहे. दहशतवादाचे समर्थन करणाऱ्यांविरोधात कडक पावले टाकणार आहोत, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी बिहार येथून पाकिस्तानला थेट मेसेज दिला होता. आता या हल्ल्याच्या दहा दिवसांनंतर पंतप्रधानांनी पुन्हा एकदा थेट इशारा दिला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीत अंगोलाचे राष्ट्रपती जोआओ लौरेंको यांच्यासह एक संयुक्त पत्रपरिषद घेतली. यावेळी त्यांनी पहलगाम हल्ल्याचा विषय घेतला. अंगोला आणि भारत या दोघांचे मत आहे की, दहशतवाद हा मानव जातीसाठी सर्वात मोठा धोका आहे. आम्ही दहशतवाद आणि त्यांच्या समर्थकांविरोधात कडक कारवाईसाठी वचनबद्ध आहोत. सीमापार दहशतवादविरोधातील आमच्या लढाईत अंगोलाने दिलेल्या पाठिंब्याबद्दल त्यांनी राष्ट्रपती जोआओ लौरेंको यांचे आभार मानले. दहशतवादाविरोधात कडक पाऊल टाकण्याची वचनबद्धता त्यांनी पुन्हा उद्धृत केली. भारत अंगोला देशाला सैन्य प्रशिक्षण आणि आधुनिकीकरणासाठी मदत करत आहे. अंगोला लष्कराच्या आधुनिकीकरणासाठी २०० लक्ष डॉलरची मदत करणार आहे. अंगोलाच्या सशस्त्र दलाला प्रशिक्षण देण्यात भारताला मदत करण्यात आनंद होईल, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. दोन्ही देशांच्या संबंधाला आता ४० वर्षे पूर्ण झाली आहेत. अंगोलाच्या स्वातंत्र्य संग्रामात भारताने मदत केली आहे.



## डांगसौंदाणे येथे आढळला बिबट्याचा कुजलेला मृतदेह

### वृद्धापकाळामुळे मृत्यू झाल्याचे निदान

**डांगसौंदाणे : वार्ताहर**

येथील आरम नदीशेजारील गावठाणाते नर जातीचा बिबट्याचा कुजलेला मृतदेह आढळून आला. हा बिबट्या सुमारे १० ते १२ दिवसांपूर्वी मृत पावलेला असावा. प्राथमिक अंदाजानुसार बिबट्याचा मृत्यू वृद्धापकाळामुळे झाल्याचे सांगण्यात येत आहे.

घटनास्थळी तपासणी केल्यानंतर वन विभागाने मृत बिबट्याला दोधेश्वर येथील वन विभागाच्या नर्सरीत नेत तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रुद्रवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर बिबट्याचे दहन करण्यात आले. ही संपूर्ण कारवाई डांगसौंदाणे वन परिमंडळाचे वनरक्षक किशोर मोहिते, नवनाथ मोरे, वनपाल सुदाम पवार तसेच इतर कर्मचारी आणि तालुका वन परिक्षेत्र अधिकारी सोमनाथ आमले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

दरम्यान, बिबट्याचा मृतदेह सापडल्याने परिसरात उलटसुलट चर्चा सुरू असून, त्याच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त केला जात आहे. मात्र वनविभागाकडून बिबट्याचा मृत्यू हा नैसर्गिक कारणामुळेच झाल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## गोव्यातील लैराईदेवी मंदिरात चेंगराचेंगरीत सात जणांचा मृत्यू

**पणजी :** गोव्यातील शिरगाव येथील लैराईदेवी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत सात जणांचा मृत्यू झाला असून, ५० हून अधिक जखमी झाले आहेत. ही घटना शनिवारी (दि. २) पहाटे घडली. गर्दी आणि अयोग्य व्यवस्था यामुळे ही घटना घडल्याचे सांगितले जात आहे.

घटनेनंतर गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी शनिवारी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली. श्री लैराई यात्रा दरवर्षी उत्तर गोव्यात आयोजित केली जाते, ज्यात ५० हजारांहून अधिक भाविक येतात. रस्त्यावरील उतारामुळे गर्दी एकाच वेळी वेगाने पुढे सरकल्याने चेंगराचेंगरी झाली. हे मंदिर उत्तर आणि दक्षिण स्थापत्यशैलीच्या मिश्रणासाठी ओळखले जाते. येथे दरवर्षी मे महिन्यात शिरगाव यात्रेचे आयोजन केले जाते. या उत्सवात पारंपरिक प्रथेनुसार लोक जळत्या निखाऱ्यावर अनवाणी चालतात.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यालयाकडून या चेंगराचेंगरीबाबत दुःख व्यक्त करण्यात आले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही यात्रेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत झालेल्या मृत्यूंबद्दल दुःख व्यक्त केले आणि जखमी लवकर बरे व्हावेत, यासाठी प्रार्थना केली.



## मी दिलगिरी व्यक्त करतो, माफी मागतो : अजित पवार

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने मुंबईत शनिवारी (दि. ३) गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव आयोजित केला आहे. या महोत्सवात राज्याच्या आजी-माजी मुख्यमंत्र्यांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला शरद पवार यांना निमंत्रण नसल्याने ते उपस्थित नव्हते. यावर अजित पवार यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे.

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री नारायण राणे, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण उपस्थित होते. महाविकास आघाडीशी संबंधित शरद पवार, उद्धव ठाकरे, सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण हे उपस्थित राहिले नाहीत. शरद पवार यांच्याकडून निमंत्रण मिळाले नसल्याने /-.. ४

## सामाजिक न्याय खाते बंद केले तरी चालेल

### 'लाडकी बहीण'साठी निधी वळवल्याने आ. शिरसाट संतप्त

**मुंबई :** लाडकी बहीण योजनेचा हप्ता देण्यासाठी सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास खात्याचा निधी वळवण्यात आला असून, दोन्ही विभागांचे अनुक्रमे ४१० कोटी ३० लाख आणि ३३५ कोटी ७० लाख रुपये महिला आणि बालविकास विभागाकडे वळविण्यात आले.

शुक्रवारी (दि. २) यासंबंधीचा शासननिर्णय जारी करण्यात आला आहे. या निर्णयानंतर या खात्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी संताप व्यक्त करत सामाजिक खात्याची आवश्यकता नसेल तर खाते बंद केले तरी चालेल, असे म्हणत शिरसाट यांनी संताप व्यक्त केला आहे.

शिरसाट म्हणाले, की याची मला काहीच कल्पना नाही, याबाबत मी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करेल. अर्थखाते आपली मनमानी चालवत आहे. माझ्या खात्याचा निधी तुम्हाला इतर ठिकाणी वर्ग करता येत नाही, हा नियम आहे. अर्थखात्याते काही जण बसले आहेत. त्यांना आपण हुशार आहोत, असे वाटत असेल तर त्यांनी मला हे दाखवले पाहिजे आणि नियम द्या, मला निधी वर्ग करता येतो म्हणून. जर करता येत असेल तर मी त्यांची माफी मागेन. लाडकी बहीण लाडकी आहे. अर्थखात्यात बसलेले शकुनी आहेत. त्यांनी केलेले हे काम आहे, असे सांगत /-.. ४

# जिल्हा सहकारी बँक कशी वाचवणार?

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला आर्थिक घरघर लागली असून, शेतकऱ्यांची अर्थवाहिनी असलेली बँक वाचविण्याचे आव्हान उभे राहिले आहे. दिलेली कर्जे वसूल होण्याची शक्यता कमी झाल्याने बँक आर्थिक संकटात सापडली असून, याला शासकीय धोरणे कारणीभूत आहेत. शेतकर्यांनी घेतलेली कर्जे वसूल करण्यात अडचणी येत असताना बँकेच्या सर्वपक्षीय संचालकांकडे मोठी थकबाकी असून, ती वसूल करणे जिकरीचे झाल्याने आर्थिक संकटात सापडलेल्या या बँकेचा परवाना रद्द करण्याची नोटीस बजावली होती. या संकटातून बँकेला बाहेर काढण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला, तरी मार्च अखेरपर्यंत कर्ज वसुलीचे अपेक्षित लक्ष्य गाठणे शक्य झाले नाही. महायुतीने विधानसभा निवडणूक जाहीरनाम्यात शेतकर्यांची कर्जे माफ करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, उपमुख्यमंत्री असलेल्या अर्थमंत्री अजित पवार हात वर करुन कर्जमाफी देण्यास स्पष्ट नकार दिला. उलट ३१ मार्चपर्यंत परतफेड करण्याचा सल्ला शेतकऱ्यांना दिला. पण, त्याकडे शेतकऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने बँक आणखी अडचणीत आली. यानंतर अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत थकबाकी वसुलीसाठी नवीन योजनेची मांडणी करण्यात आली. त्यानुसार एक लाखापर्यंत दोन टक्के, दोन ते तीन लाखापर्यंतच्या कर्जास तीन टक्के, आणि पाच ते १० लाखापर्यंत चार टक्के आणि १० लाखाच्या पुढे कर्ज असल्यास पाच टक्के व्याज आकारण्याचा

गांवकरी सण्डे अँकर

निर्णय घेण्यात आला. पण, या योजनेसही शेतकऱ्यांनी विरोध केल्याने वसुलीत बाधा आली. शेतकऱ्यांचे संपूर्ण व्याज माफ होणे आवश्यक आहे. मुद्दलाचे १० हप्ते करून द्यावेत आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे, अशा मागण्या करण्यात आल्या. त्यांचा विचार करण्यात



आला नाही. परिणामी वसुलीवर परिणाम झाला. ही योजना मांडताना कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सक्तीच्या वसुलीस स्थगिती दिल्याने थकबाकी वसुली होणे शक्य नाही आणि झालीच, तर ती फारच कमी होईल, हे लक्षात आल्यानंतर बँकेचे प्रशासक प्रशासक प्रतापसिंह चव्हाण यांनी राजीनामा दिला.

बँकेत १८२ कोटींच्या अनियमिततेचा ठपका असलेले कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंसह चार आमदार आणि एक खासदारांनी बँक वाचविण्यासाठी पुढाकार घेतला. कोकाटेंसह चार आमदार आणि खासदार अशा २५ माजी संचालकांकडील वसुलीसाठी सहकार विभागात सुनावणी सुरू असताना, या थकबाकीदारांनीच वसुलीसाठी सुरू केलेल्या प्रयत्न सुरू केले. माजी संचालकांनी परतफेड करणे आवश्यक असताना तसे काही होताना दिसत नाही. त्यांनीच घेतलेल्या चुकीच्या आर्थिक निर्णयामुळे बँक सापडली. प्रशासकांनी बड्या थकबाकीदारांची यादीच तयार करीत वसुली सुरू केली आहे. या थकबाकीदारांची बँकेने आधीच ट्रॅक्टर, जीपसारखी /-.. ४

## कर्नाटक विरोधात वकिलांची फौज उभी करू

### पालकमंत्री आबिटकरांचा कर्नाटकला इशारा

**कोल्हापूर :** कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणाची उंची वाढवण्यासाठी कायदेशीर हालचाली सुरू केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी कर्नाटक सरकार वकील आणि जलतज्ज्ञांची फौज उभा करीत असेल, तर आम्हीदेखील त्या विरोधात तशीच वकिलांची आणि जलतज्ज्ञांची फौज उभी करू, असा इशारा दिला आहे.

आबिटकर म्हणाले की, अलमट्टी धरणाची उंची वाढविण्याला महाराष्ट्र सरकारचा विरोध आहे. यामुळे सांगली वकोल्हापूरला सर्वाधिक फटका बसणार आहे. धरणाची उंची वाढवण्यासाठी कर्नाटक सरकार वकील व जलतज्ज्ञांची फौज उभी करत असेल, तर आम्हीदेखील त्या विरोधात तशीच वकिलांची आणि जलतज्ज्ञांची फौज उभी करू. कायदेशीरदृष्ट्या जे जे करावे लागेल ते आम्ही करू, असे त्यांनी नमूद केले. दरम्यान, अलमट्टी धरणाची उंची वाढविण्याबाबत सर्व संबंधित राज्यांची १५ दिवसांत बैठक घेण्याचे आश्वासन केंद्र सरकारने कर्नाटकच्या शिष्टमंडळाला दिले आहे. आंध्र प्रदेश, तेलंगणा व महाराष्ट्र या चारही राज्यांचा या धरणाची उंची वाढविण्याला विरोध असल्याने अलमट्टीचा वाद पुन्हा एकदा उफाळून /-.. ४

## महत्त्वाचे

### जुने सिडकोत साई महोत्सव उत्साहात

**सिडको : विशेष प्रतिनिधी** जुने सिडकोतील श्री साईनाथ मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात पार पडला. दोन दिवस विविध कार्यक्रम पार पडले. साई पालखी मिरवणुकीतील २० आगळ्यावेगळ्या पथकांनी भाविकांना मंत्रमुग्ध केले. गुरुवारी महाप्रसादाने साई महोत्सवाचा समारोप झाला. हजारो भाविकांनी साईनाथांचे दर्शन आणि महाप्रसादाचा लाभ घेतला. साईनाथ मंदिरात ट्रस्टचे अध्यक्ष तथा शिवसेना महानगरप्रमुख प्रवीण तिदमे यांच्या हस्ते सपत्नीक साई पालखीची विधिवत पूजा करून मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला. चौकाचौकांत महिलांनी सडारांगोळी काढून पालखीचे स्वागत आणि पूजन केले. सायंकाळी साईनाथ मंदिर परिसरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो साईभक्तांनी साईदर्शन आणि महाप्रसादाचा लाभ घेतला. दोनदिवसीय साई महोत्सवात शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, सहसंपर्कप्रमुख राजू लवटे, सुनील बागूल, माजी नगरसेवक अमोल जाधव, मामा ठाकरे, भागवत आरोटे, मधुकर जाधव, मुकेश शहाणे, माजी नगरसेविका इंदुबाई नागरे, श्यामलाताई दीक्षित, शीतलताई भामरे, छायाताई देवांग, दिलीप देवांग, संजय भामरे, शिव कर्मचारी कामगार सेनेचे प्रदेश सरचिटणीस विक्रम नागरे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमोल सूर्यवंशी आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि साईभक्त हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते. साई महोत्सव यशस्वीतेसाठी ओम साईनाथ ट्रस्ट, राजे छत्रपती मित्र मंडळाचे पदाधिकारी, सदस्य आणि साईभक्तांनी अथक परिश्रम घेतले.




### सीटू भवनात कामगारदिनी टकलेंचे संविधानावर व्याख्यान

**सिडको : विशेष प्रतिनिधी** आंतरराष्ट्रीय कामगार दिन खुटवडनगर, नाशिक येथील सीटू भवनमध्ये साजरा झाला. यानिमित्त पत्रकार निरंजन टकले यांचे संविधान हाच खरा धर्म या विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन सीताराम ठोंबरे यांच्या हस्ते ध्वजवंदनाने करण्यात आले. व्याख्यानात टकले यांनी देशातील आणि महाराष्ट्रातील कामगार वर्गाने धर्मनिरपेक्षतेचे आणि संविधानिक मूल्यांचे भान ठेवून सजग राहणे अत्यावश्यक आहे, असे सांगितले. कार्यक्रमात सीटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व राज्य अध्यक्ष डॉ. डी. एल. कराड, ॲड. वसुधा कराड, ॲड. तानाजी जायभावे यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास दिनेश सातभाई, दगडू व्हडगर, तुकाराम सोनजे, संतोष काकडे, सिंधू शार्दुल, कल्पना शिंदे, आत्माराम डावरे, विजय अहिरे, सचिन मालेगावकर, भिवाजी भावले, मोहन जाधव, हिरामण तेलोरे, युवराज पाटील, विजय टिकल, छाया जाधव, राहुल गायकवाड, गौतम कोंगळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



### केंब्रिज स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन



**नाशिक : प्रतिनिधी** शहरातील केंब्रिज स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात झाला. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजवंदनाने झाली. अशोका शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. आशा ठोके प्रमुख पाहुण्या होत्या. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत दिंडी काढली. त्यानंतर रिंगण करत संतपरंपरेचे दर्शन घडविले. या कार्यक्रमाला शाळेचे विश्वस्त भारती रामचंद्रन, राहुल रामचंद्रन, प्राचार्य सुंदर, उपप्राचार्या डॉ. विजया रहाणे आदी उपस्थित होते.

### माध्यमिक विद्यामंदिरात महाराष्ट्र दिन



**जुने नाशिक : वार्ताहर** शहरातील क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्था संचालित ढकांबे येथील माध्यमिक विद्यामंदिरात महाराष्ट्र व कामगार दिन झाला. यावेळी राजेश दरगोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास संस्थेचे संचालक शरद बोडके, सुभाष आव्हाड, के. के. आव्हाड, सरपंच मनीषा पोटिंदे, उपसरपंच शरद चंद्रकांत बोडके, तंटामुक्ती अध्यक्ष लक्ष्मण गायकवाड, पोलीसपाटील नीलेश बोडके, ग्रामसेवक राख यांच्यासह जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका, अंगणवाडी सेविका, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापक अनिल ताडगे यांनी प्रास्ताविक केले. उगले यांनी आभार मानले.

### प्रमोद महाजन यांना भाजपातर्फे अभिवादन



**नाशिक : प्रतिनिधी** भारतीय जनता पार्टी मध्य मंडलातर्फे प्रमोद महाजन यांना स्मृतिदिनी भाजपा कार्यालय वसंतस्मृती येथे अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ते भारतीय जनता पक्ष असा त्यांचा प्रवास राहिला. मोबाइल क्रांतीचे जनक म्हणूनही त्यांच्याकडे बघितले जाते. त्यांच्या प्रतिमेस हार अर्पण करत अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी भाजपाचे शहराध्यक्ष प्रशांत जाधव, सरचिटणीस सुनील केदार, सुजाता करजगीकर, वसंत उशीर, शैलेश जुन्नरे, सुनील देसाई, अमित घुगे, अजिंक्य साने, राहुल कुलकर्णी, प्रतीक शुक्ल, सचिन मोरे, प्रदीप पाटील, उदय रत्नपारखी, मंगेश पिंगळे, गजानन रणबावळे, उदय जोशी, दत्ता शिंदे, दीपाली भूमकर, रोहिणी रकटे, विजय बनछोडे, मिलिंद भूमकर, पराग शिंत्रे, निखिल सरपोद्दार, रमाकांत बोडके, आदिनाथ नागरगोजे, अक्षय शिंदे, विजय कुलकर्णी उपस्थित होते.

# 'डीएमआयसी'च्या दुसऱ्या टप्प्यात नाशिकचा समावेश करावा

## निमा-आयमाचे कुशवाह यांना साकडे

**नाशिक : प्रतिनिधी**



दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडोर(डीएमआयसी)च्या दुसऱ्या टप्प्यात नाशिकचा समावेश करावा, असे साकडे निमा आणि आयमाच्या पदाधिकाऱ्यांनी उद्योग (विकास) आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह यांना घातले आहे.

निमा व आयमाच्या पदाधिकाऱ्यांनी निमाचे अध्यक्ष आशिष नहार आणि आयमा अध्यक्ष ललित बूब यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे उद्योग (विकास) आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह यांची भेट घेऊन नाशिकच्या विविध प्रलंबित प्रश्नाबाबत चर्चा केली. त्यानंतर त्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.

नाशिकच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडोरच्या दुसरा टप्प्यात नाशिकचा समावेश होण्याबाबत आपण स्वतः आग्रही असून, केंद्र व राज्य स्तरावर या मागणीचा पाठपुरावा केला जाईल, असे कुशवाह यांनी शिष्टमंडळास सांगितले. जिल्ह्यात इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक आणि फूड प्रोसेसिंग क्लस्टर याबाबतही चर्चा झाली. यासंदर्भात आपण जातीने लक्ष घालणार असल्याचे ते म्हणाले. नाशिक-पुणे औद्योगिक कॉरिडोरला चालना देण्याच्या मागणीलाही कुशवाह यांनी सकारात्मक प्रतिसाद दर्शवला.

नाशकात आयटी पार्क उभारण्यात यावे, त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व मूलभूत सुविधा कशा उपलब्ध करता येतील याविषयीही बैठकीत निमा अध्यक्ष आशिष नहार यांनी लक्ष वेधले. नाशिकमध्ये आयटी पार्क झाल्यास येथे तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. पुणे आणि बंगळुरूसारखे नाशिकलाही महत्त्व प्राप्त होईल, असे यावेळी कुशवाह यांना पटवून दिले. त्यावर हा प्रश्न तातडीने मार्गी लावला जाईल, असे त्यांनी नमूद केले.

नाशिक शहरात मेगा प्रोजेक्ट यावेत, मोठी औद्योगिक गुंतवणूक आणण्यासाठी उद्योग खात्याने पाऊले उचलावीत आदी मागण्यासुद्धा यावेळी करण्यात आल्या. नवीन औद्योगिक धोरण, मैत्री ॲप यासंदर्भातही बैठकीत चर्चा झाली. कुशवाह यांना भेटलेल्या शिष्टमंडळात निमाचे उपाध्यक्ष किशोर राठी, मनीष रावल, सचिव राजेंद्र अहिरे, कैलास पाटील आदींचा समावेश होता.

### जम्परोप स्पर्धेत सेंट फ्रान्सिस खेळाडूंचे यश

**नाशिक :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अंतर्गत नंदुरबार येथे महाराष्ट्र राज्यस्तरीय शालेय जम्परोप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नाशिक विभागाचे प्रतिनिधित्व करताना नाशिकच्या सेंट फ्रान्सिस हायस्कूल, तिडके कॉलनीच्या खेळाडूंनी सुंदर खेळाचे प्रदर्शन करून घवघवीत यश मिळवले. यामध्ये ३० सेकंड स्पीड रिले या प्रकारात जिनांग शहा, अद्वैत खैरनार, ओम मराठे आणि प्रतीक मानकर यांनी सुवर्णपदक प्राप्त केले. तर डबल अंडर रिले या प्रकारात आरुष जाधव, देवेश गायधनी, ओम मराठे आणि जिनांग शहा यांनीही सहभाग घेत चांगली कामगिरी नोंदविली. खेळाडूंच्या या यशस्वी कामगिरीबद्दल संस्थेचे चेअरमन डॉ. ए. एफ. पिंटो, डायरेक्टर ग्रेस पिंटो मॅडम, शाळेचे मुख्याध्यापक संजय पाटील, पर्यवेक्षिका आयडा फर्नांडिस, गुरमित शेटे आदींनी खेळाडूंचे कौतुक केले. या सर्व खेळाडूंना क्रीडाशिक्षक विक्रम दुधारे आणि पवन खोडे यांचे मार्गदर्शन मिळाले.

✻ **नाशिक :** शहरात उन्हाचा पारा सातत्याने वाढत असून, उन्हापासून संरक्षण मिळावे म्हणून नागरिक थंडपेयांच्या दुकानांत आइस्क्रीम, ताक, लस्सी, उसाचा रस, फळांचा रस यांचा आस्वाद घेताना दिसत आहे.



# डॉ. गुट्टे महाराज यांचा अभीष्टचिंतन सोहळा

## नवश्या गणपती मंदिरात पूजन

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र व कामगार दिन आणि डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त नवश्या गणपती मंदिरात अभिषेक व पूजन झाले.

याप्रसंगी सकाळी गंगापूर रोड येथील नवश्या गणपती मंदिरात डॉ. गुट्टे महाराजांच्या हस्ते गणपती अथर्वशीर्षाची २१ सामुदायिक आवर्तने करण्यात आली.

गोदावरीचा नयनरम्य तट, सकाळची विलोभनीय शांती व विनायक चतुर्थीचे औचित्य, अशा त्रिवेणी मुहूर्तावर अथर्वशीर्षाच्या स्वरांनी गोदावरीचा आसमंत उजळून निघाला. गणपती मंदिराचे अध्यक्ष राजाभाऊ जाधव, प्रसिद्ध बोडके बिल्डकॉनचे संचालक अशोक बोडके, लीना बोडके, बटू शिंदे, संजीव अहिरे, बबन खाडे, संदेश सांगळे, रमेश अडवाणी उपस्थित होते. पहलगाम येथील दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर वाढदिवस साधेपणाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राण गमावलेल्या निरपराध नागरिकांप्रति संवेदना व्यक्त करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. उपस्थितांनी डॉ. गुट्टे महाराज यांना शुभेच्छा दिल्या. राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तींनी, भक्तांनी शुभेच्छा दिल्या.

# मल्टिमॉडेल ट्रान्स्पोर्ट हब विकसित होणार

## सिंहस्थासाठी रेल्वे सुविधांचा आढावा

**नाशिकरोड : प्रतिनिधी**



आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये रेल्वे आणि स्थानिक प्रशासन यांच्यात प्राथमिक समन्वय बैठक झाली. यात मल्टिमॉडेल ट्रान्स्पोर्ट हब, रेल्वेस्थानक उन्नतीकरण, गर्दी नियंत्रण, प्रवासी सेवा आणि पायाभूत सुविधा या मुद्द्यांवर चर्चा झाली.

या बैठकीला विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, भुसावळ विभागीय रेल्वे व्यवस्थापक इति पांडेय, नाशिक महापालिका आयुक्त मनीषा खत्री, उपविभागीय अधिकारी अर्पित चौहान, राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी आणि मध्य रेल्वेचे प्रतिनिधी उपस्थित होते. नाशिक रोड रेल्वे स्थानकाजवळ प्रस्तावित मल्टिमॉडेल ट्रान्स्पोर्ट हबबाबत सादरीकरण करण्यात आले. हा प्रकल्प रेल्वे, रस्ते व सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांचे एकत्रित संयोजन साधण्याच्या दृष्टीने तयार करण्यात येणार आहे. यामुळे कुंभमेळ्यादरम्यान होणाऱ्या गर्दीवर नियंत्रण ठेवता येणार आहे. बैठकीनंतर नाशिक रोड, ओढा, खेरवाडी व देवळाली या प्रमुख स्थानकांची संयुक्त पाहणी करण्यात आली. यात विद्यमान सुविधा तपासून, कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर कोणत्या अतिरिक्त सुविधांची गरज आहे, हे निश्चित करण्यात आले.

### बैठकीत या विषयांवर चर्चा

- ✻ स्थानक उन्नतीकरण : नाशिक रोड आणि देवळाली स्थानकांचे सर्वांगीण विकास आराखडे, वाढीव प्रवासी संख्येच्या व्यवस्थापनासाठी तयार करण्यात येणार.
- ✻ प्लॅटफॉर्म व क्षमतेत वाढ : ओढा स्थानकावर विशेष आणि वळविलेल्या गाड्यांसाठी प्लॅटफॉर्म वाढविण्यात येणार आहे. क्षमता सुधारण्यात येणार आहे.
- ✻ नवीन पिट लाइन व स्थिरता लाइन : देवळाली कॅम्प स्थानकावर देखभाल सुविधा वाढविण्यासाठी नवीन पिट लाइन व स्थिरता लाइन निर्माण करण्याची योजना आहे.
- ✻ बस टर्मिनल व होल्डिंग क्षेत्र : नाशिक डेपो येथे सार्वजनिक वाहतुकीसाठी विशेष टर्मिनल व मोठ्या यात्रेकरू गटांसाठी थांबा व्यवस्था उभारणीचे नियोजन आहे.
- ✻ खेरवाडी स्थानक विकास : नाशिककडे जाण्यासाठी पर्यायी प्रवेशबिंदू म्हणून निफाड तालुक्यातील खेरवाडी स्थानकाचा विकास केला जाईल. यासाठी भूसंपादन, पार्किंग, स्वच्छता, आपत्कालीन सेवा आणि निवास व्यवस्थेसह आवश्यक पायाभूत सुविधा तयार केल्या जातील.




# कंपोस्ट खड्डा भरा, आपलं गाव स्वच्छ ठेवा!

## नाशिक जिल्ह्यात अभियानास सुरुवात

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या मार्गदर्शनाखाली १ मेपासून नाशिक जिल्ह्यात कंपोस्ट खड्डा भरा, आपलं गाव स्वच्छ ठेवा या राज्यव्यापी विशेष स्वच्छता अभियानाची सुरुवात झाली. ग्रामपंचायतींनी विविध उपक्रम राबवून अभियानाचा शुभारंभ केला.

शासनाच्या पाणी व स्वच्छता विभागाच्या वतीने १ मे ते १५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत कंपोस्ट खड्डा भरा, आपलं गाव स्वच्छ ठेवा! या अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. नाशिक जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागात हे अभियान राबविण्यात येत आहे. १ मे रोजी जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये कंपोस्ट खड्ड्यांची स्वच्छता मोहीम, ग्रामस्थांचे श्रमदान आणि स्वच्छतेबाबत जनजागृतीपर मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली. ओला व सुका कचरा यांचे विलगीकरण कसे करावे, याबाबतही जनजागृती करण्यात आली, तसेच कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि त्यापासून जैविक खत तयार करण्याची प्रक्रिया ग्रामस्थांना समजावून सांगण्यात आली.

कळवण येथे आमदार नितीन पवार यांच्या हस्ते तर निफाड तालुक्यातील शिवडी येथे आमदार दिलीपराव बनकर यांच्या हस्ते या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. तसेच ठिकठिकाणी सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्या उपस्थितीत या मोहिमेस सुरुवात करण्यात आली. खत खड्ड्यांमध्ये कचरा भरून कंपोस्ट तयार करण्यास काही ग्रामपंचायतींनी प्रत्यक्ष सुरुवात केली आहे. स्थानिक महिला बचतगट, युवा मंडळे, शालेय विद्यार्थी आणि स्वयंसेवी संस्था यांचाही उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. हे अभियान केवळ स्वच्छतेपुरते मर्यादित नसून, यामुळे गावपातळीवर नैसर्गिक खतनिर्मितीला चालना मिळणार आहे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली रुजणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली. या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी गटविकास अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या असून, प्रत्येक गावामध्ये तालुकास्तरावरून संपर्क अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) दीपक पाटील यांनी दिली.

# आफरिन फाउंडेशनतर्फे नेशन बिल्डर पुरस्कार प्रदान

**जुने नाशिक : प्रतिनिधी**



येथील स्व. आफरिन फाउंडेशनतर्फे नॅशनल कॅम्पसमध्ये आयोजित कार्यक्रमात शहरातील काही गुणवंत व मेहनती शिक्षकांचा नेशन बिल्डर पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. नॅशनल कॅम्पसचे अध्यक्ष हाजी बबलू पठाण अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे शेख सुहेल, खान गौसनूर, काझी एजाज, काझी अखलाक, ॲड. मिन्हाजुद्दीन काझी, मुझम्मिल कोकणी, सय्यद एहतेशाम जिलानी, मजीद खान, आझाद सय्यद आदी उपस्थित होते. तौसिफ शेख, सईद खान, शाहीन खान, मुसर्रत शेख, शगुफ्ता शेख यांनी स्वागत केले. फाउंडेशनचे उपाध्यक्ष शाहीन खान यांनी फाउंडेशनची माहिती दिली. पुरस्कारार्थींना पुष्पगुच्छ व ट्रॉफी प्रदान करण्यात आली. कार्यक्रमास शेख आसिफ, मौलाना मुफ्ती मोहम्मद अतीक, शेख जुबेर, डॉ. गालिब कुरेशी, सय्यद रोविश, खान अस्लम, आबिद शेख, सय्यद फैज, पठाण अखलाक, नाझिम खान, पोलीस निरीक्षक जाकीर शेख, फारुक मेमन, निहाल मन्सुरी, सय्यद अय्युब उपस्थित होते. शेख झीनत यांनी सूत्रसंचालन केले. नदीम शेख यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी माझ खान, आरिफ खान, शारिक खान, अदनान खान, जावेद शेख, नईम शेख, अबरार पीरजादा यांनी परिश्रम घेतले. स्वप्नील कर्पे, विनोद पानसरे, पवन खोडे, पठाण तरन्नूम, शेख नाझनीन, खान खालेदा, सय्यद शिरीन, शेख सानिया, शहबाज शेख, सौदागर तहसीन, शेख गझाला यांचा गौरव झाला.

# ग्रामीण पर्यटनाला चालना देण्यासाठी हॉटेलची पडताळणी

## केंद्र सरकारचा स्वच्छता ग्रीन लिफ उपक्रम

**नाशिक : प्रतिनिधी**

ग्रामीण पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि स्वच्छतेच्या सुविधांची खात्री करण्यासाठी केंद्र शासनाने स्वच्छता ग्रीन लिफ उपक्रम सुरू केला आहे. नाशिक जिल्ह्यातील हॉटेल, लॉजिंग, धर्मशाळा व न्याहारी निवास या आस्थापनांचे मूल्यांकन करून त्यांना १ ते ५ लिफ रेटिंग देण्यात येत आहे. तालुकास्तरीय पडताळणीत तीन लिफच्या वर रेटिंग मिळालेल्या हॉटलची जिल्हा पथकाकडून पडताळणी करण्यात येत आहे.

स्वच्छता ग्रीन लीफ उपक्रमामुळे पर्यटकांना स्वच्छ, सुरक्षित व पर्यावरणपूरक निवास सुविधा उपलब्ध करणे, तसेच ग्रामीण पर्यटन व्यवसायाला मोठी चालना मिळणार आहे.

या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील ग्रामीण भागातील आस्थापनांनी केलेल्या स्वयंमूल्यांकनानुसार तालुकास्तरीय समितीने पडताळणी करून गुणांकन दिले होते. जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत तीन लिफपेक्षा अधिक रेटिंग मिळालेल्या हॉटेलची जिल्हा पथकाकडून पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार जिल्हास्तरावरून पडताळणी करण्यात येत आहे. जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दीपक पाटील, पर्यटन विभागाचे प्रादेशिक अधिकारी जगदीश चव्हाण, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रशांत पवार, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता अजित सूर्यवंशी, पाणी व स्वच्छता विभागातील सल्लागार यांच्या उपस्थितीत नाशिक व त्र्यंबकेश्वर तालुक्यातील सात आस्थापनांची पडताळणी करण्यात आली. यावेळी पंचायत समितीचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.



### ग्रीन लिफ म्हणजे काय?

जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली, तर तालुकास्तरावर उपविभागीय दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समित्या कार्यरत आहेत. या समित्या आस्थापनांची प्रत्यक्ष तपासणी करतील. ज्या हॉटल व निवास केंद्रांकडे तीन किंवा अधिक खोल्यांची सुविधा आहे, त्यांच्या रेटिंगची पडताळणी केली जाणार आहे. नाशिक व त्र्यंबकेश्वरमधील काही आस्थापनांची पहिली फेरी पूर्ण झाली आहे. अद्याप ज्या हॉटेलनी स्वयंमूल्यांकन तालुका समितीकडे सादर केले नसेल, त्यांनी जिल्हा अथवा तालुकास्तरावर सदर मूल्यांकन सादर करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेकडून करण्यात आले आहे.

### पडताळणी यंत्रणा अन् अंमलबजावणी

'ग्रीन लिफ' हे स्वच्छतेवर आधारित प्रमाणपत्र आहे. यात खालील तीन निकषांवर २०० गुणांची रेटिंग प्रणाली आहे. घनकचरा व्यवस्थापन : ८० गुण, मैलागाळ व्यवस्थापन : ८० गुण सांडपाणी व्यवस्थापन : ४० गुण पुढीलप्रमाणे रेटिंग देण्यात येणार... १ लिफ : १००-१३० गुण (प्रत्येक घटकात किमान गुण आवश्यक) ३ लिफ : १३१-१८० गुण ५ लिफ : १८१-२०० गुण.

## महत्त्वाचे

### भिवंडीत एकाच कुटुंबातील चौघांचे मृतदेह

**शहापूर : प्रतिनिधी** मृतांमध्ये आईसह तीन मुलींचा समावेश भिवंडी येथील फेणे गावात शनिवारी सकाळी एका घरात एक महिना आणि तिच्या तीन मुली अशा चौघांचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला. या महिलेचा पती सकाळी कामावरून घरी परतला त्यावेळी हा प्रकार उघडीस आला. या चौघांचे मृतदेह स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत. या महिलेने आत्महत्या करीत असल्याचे मृत्यूपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत म्हटले असले तरी त्यामागचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. भिवंडी येथील फेणे गावातील एका चाळीत लालजी बनवारी लाला भारती हे आपल्या कुटुंबासोबत राहतात. त्यांच्या पत्नी पुनिता (३२), मुलगी नंदिनी (१२), नेहा (७) आणि अनु (४) असा परिवार होता. लालजी भारती हे यंत्रमाग कामगार असून, शहरातील एका यंत्रमाग कारखान्यात काम करतात. लालजी हे शुक्रवारी रात्री कारखान्यात कामावर गेले होते. त्यांच्या घरी पत्नी आणि तीन मुले होते. लालजी सकाळी कामावरून घरी परतले. त्यांनी घराचा दरवाजा ठोकला पण पत्नी किंवा मुलीने दार उघडले नाही. त्यामुळे त्यांनी घराची खिडकी उघडली आणि या डोकावून पाहिले त्यावेळी त्यांना पत्नी आणि तिन्ही मुलींचे मृतदेह घरातील छताच्या लोखंडी अँगलला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. याबाबत माहिती मिळताच भिवंडी शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि घराचा दरवाजा उघडला. भिवंडी शहर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आणि त्यानंतर चौघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात पाठवले आहेत. घटनास्थळी पोलिसांना महिलेने लिहिलेले चिठ्ठी त्यात स्वतःच्या मर्जीने करीत असून, आत्महत्यास कोणाला जबाबदार धरू नये असे लिहिले होते. असे असले तरी या महिलेने मुलीसह आत्महत्या करण्यामागचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. त्याचा तपास पोलीस करत आहे तसेच या चिठ्ठीनुसार महिलेने आत्महत्या केली असली तरी तिच्या मुलींनी आत्महत्या केली की त्यांची महिलेने हत्या केली या दिशेने पोलीस तपास करत आहे, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

# राष्ट्रीय अप्रेंटिस योजनेत महाराष्ट्र प्रथम स्थानावर

## केंद्रीय मंत्र्यांनी केले मंगलप्रभात लोढा यांचे अभिनंदन



**मुंबई :** राष्ट्रीय शिकाऊ (अप्रेंटिस) उमेदवारी प्रोत्साहन योजनेत महाराष्ट्र देशात अव्वल राहिल्याबद्दल केंद्रीय कौशल्य विकास मंत्री जयंत चौधरी यांनी राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे अभिनंदन करून महाराष्ट्र दिनाच्याही शुभेच्छा दिल्या. केंद्रीय मंत्री श्री. चौधरी यांनी मंत्रालयात कौशल्य विकास विभागाला भेट दिली. यावेळी त्यांनी राज्यातील कौशल्य विकासाच्या उपक्रमांचा आढावा घेऊन विभागाच्या कामाबाबत समाधान व्यक्त केले.

कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या दालनात झालेल्या बैठकीला कौशल्य विभागाचे आयुक्त नितीन पाटील, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधुरी सरदेशमुख, रतन टाटा कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेचा सध्या राज्यातील २ लाख ७८ हजार प्रशिक्षणार्थी उमेदवार लाभ घेत असून, आयटीआयमधील तब्बल ५२ हजार विद्यार्थ्यांचा या योजनेत समावेश आहे. या योजनेत महाराष्ट्राचे काम चांगले असल्याचे गौरवोद्गार केंद्रीय मंत्री श्री. चौधरी यांनी यावेळी काढले.

केंद्रीय मंत्री चौधरी यांनी राज्यातील कौशल्य आणि रोजगार विषयक विविध धोरणांबाबत राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासोबत चर्चा केली. आयटीआयमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे, केंद्रीय राष्ट्रीय शिकाऊ योजना आणि महाराष्ट्राची शिकाऊ योजना यांच्यात समन्वय साधणारी यंत्रणा विकसित करावी, अशी मागणी कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी यावेळी केंद्रीय मंत्री चौधरी यांच्याकडे केली.

ग्रामीण अथवा शहरातील झोपडपट्टी परिसरात युवक-युवतींना नव्याने प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यासाठी दीड हजार चौरस फुटांच्या जागेमध्ये नवीन कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यासाठी केंद्रीय निकष आहेत. त्या निकषात शिथिलता आणून तीनशे चौरस फुटांच्या जागेत नवीन कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यास मान्यता द्यावी, राष्ट्रीय कौशल्य विकास मंडळ आणि केंद्रीय कामगार विभागांतर्गत असलेले नॅशनल करिअर सर्व्हिस पोर्टलमध्ये समन्वय केल्यास रोजगाराच्या दृष्टीने युवकांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करू शकतो, असेही लोढा यांनी यावेळी नमूद केले.

## मुंबई-विरारचा प्रवास लवकरच सागरी सेतूमुळे होणार सुसाट

**मुंबई :** उत्तन ते विरारदरम्यान सागरी सेतू उभारण्यास राज्य सरकारने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास मंजुरी दिली आहे. तर, त्यापुढील विरार ते पालघर दरम्यानच्या टप्पा २ चा व्यवहार्यता अभ्यास करण्यात येत आहे. हा सेतू आठ मार्गिकेचा असून, उत्तर-दक्षिण प्रवास सहज करणे शक्य होणार आहे. पुढे हा सेतू थेट दिल्ली-मुंबई द्रुतगती महामार्गाला जोडला जाणार आहे. त्याचबरोबर पश्चिम द्रुतगती महामार्ग, एस. व्ही. रोड व लिंक रोडवरील वाहतुकीचा ताण कमी होण्यासह विरार आणि मुंबई काही मिनिटांत जोडणाऱ्या या कॉरिडॉरमुळे प्रवास वेगवान होईल.

निशाणी **जाहीर नोटीस** प्रोसेस जमा

**दिवाणी चौकशी अर्ज नं.१६१/२०२५** **ॲड.निता व्हि.सोनवणे**

**नाशिक येथील मे.सिव्हील जज्ज साहेब,सिनिअर डिव्हीजन,नाशिक**

**(श्रीमती रुपाली नरवाडिया साहेब)**यांचे कोर्टात ...

**श्रीमती वंदना रविंद्र बारटक्के,** वय - ६० वर्षे, धंदा - गृहिणी, )
रा.प्लॉट नं.१९, द्वारकामाई बंगला, सुंदरबन कॉलनी, )
लेखानगर, सिडको, नाशिक. ) **अर्जदार**

**विरूध्द**

**कोणीही नाही.** ) **सामनेवाले**

ज्याअर्थी रविंद्र द्वारकानाथ बारटक्के हे दि.०३/११/२०२३ रोजी **नाशिक** येथे मयत झालेले आहेत. त्याबाबतचा त्यांचा मृत्युचा दाखला अर्जासोबत दाखल केलेला आहे. कै.रविंद्र द्वारकानाथ बारटक्के यांचे अर्जदार ह्या पत्नी आहे. कै.रविंद्र द्वारकानाथ बारटक्के यांनी त्यांचे मृत्युपुर्वी अर्जदार यांचे लाभांत दि.०८/०२/२०२३ रोजी इच्छापत्र/मृत्युपत्र लिहुन व ॲड.व नोटरी श्री.अतुल एस.सानप यांचे कार्यालयात अ.क्र.०२/२०२३ अन्वये नोंदविलेले आहे. कै.रविंद्र द्वारकानाथ बारटक्के यांचे मृत्युपश्यात त्यांचे नावे असलेली स्थावर अगर जंगम मालमत्ता तसेच फिक्स्ड डिपॉझिटस, दागदागिने, वाहने, बँकेतील शिल्लक रक्कम, म्युच्युअल फंडाची रक्कम, शेअर्सची रक्कम व इंतर सर्व गुंतवणुक हे मृत्युपत्राद्वारे अर्जदारांना दिलेली आहे. अर्जदार हे कै.रविंद्र द्वारकानाथ बारटक्के यांचे कायदेशीर वारस म्हणुन दाखला मिळणेकामी भारतीय वारसा अधिनियम १९२५ चे कलम २२२ अन्वये प्रोबेट/दाखला मिळणेकामी अर्जदाराने अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांना वारस दाखला देणेस कोणाची हरकत असल्यास त्यांनी मे.कोर्टात स्वत: अगर त्यांचे वकीलांमार्फत **दिनांक १९/०७/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता** हजर होवून आपले म्हणणे मांडावे. अन्यथा कोणीचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही,असे गृहीत धरुन अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम **VIII** अन्वये वारस दाखला देण्यात येईल. प्रस्तुतची जाहीर नोटीस मे.कोर्टाच्या आदेशान्वये प्रसिध्द केली असे. ही जाहीर नोटीस.

सही/- **लिपिक,** सि.ज.सि.डी.साहेब,नाशिक (कोर्टाचा शिक्का) सही/- **अधिक्षक,** सि.ज.सि.डी.साहेब,नाशिक

# महात्मानगरच्या पाणीपुरवठ्यात बदल नको

## राष्ट्रवादी काँग्रेसचा विरोध

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून महात्मानगर, कामगारनगर, पारिजातनगर, सुयोजितनगर या परिसरात पाणीपुरवठ्याच्या वेळा बदलास राजकीय पक्षांसह नागरिकांनी विरोध केला आहे. सायंकाळी पाच ते आठ ही सुधारित वेळ केली असून, पूर्वीप्रमाणेच वेळ ठेवावी, अशी मागणी नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहराध्यक्ष रंजन ठाकरे यांनी महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्याकडे केली आहे.

शहरात सहाही विभागांतील वेगवेगळ्या भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारींचा पाऊस पडत आहे. त्यातच महापालिका प्रशासनाने महात्मानगर परिसरासह कामगारनगर व आजूबाजूच्या भागातील पाणीपुरवठ्याच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय घेतला. प्रभाग क्रमांक १२ मधील पश्चिम विभागातील तिडके कॉलनी परिसरातील स्त्री मंडळ जलकुंभ, लव्हाटेनगर जलकुंभ व महात्मानगर जलकुंभ या टाक्या सातपूर विभागातील ६०० मिलिमीटर व्यासाची पाइपलाइनवरून शिवाजीनगर जलशुद्धीकरण केंद्र येथून भरल्या जातात. सद्यःस्थितीत या जलकुंभावरून होणारा पाणीपुरवठा कमी दाबाने होत आहे. त्यामुळे पुरेशा प्रमाणात जलकुंभ भरले जात नाहीत.

या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री यांच्या निर्देशानुसार जलशुद्धीकरण केंद्रावरून उपलब्ध पाण्याचे फेरनियोजन करण्याचा निर्णय पाणीपुरवठा विभागाने घेतला. या जलकुंभावरून होणारा पाणीपुरवठा वितरणात सुधारणा करण्याकरिता या जलकुंभाची भरण्याची वेळ व परिसरात पाणीपुरवठा वितरणाची वेळ यात प्रायोगिक तत्त्वावर बदल करण्यात येऊन या जलकुंभावरून होणारा पाणीपुरवठा परिसरातील नागरिकांना पुरेशा प्रमाणात व योग्य दाबाने होऊ शकेल, असे महापालिका प्रशासनाने म्हटले होते. पण महात्मानगर परिसरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून, वेळेत बदल न करता पाणीटंचाईची अडचण दूर करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष ठाकरे यांनी महापालिका आयुक्तांकडे केली.

| जलकुंभाचे नाव | स्त्री मंडळ जलकुंभ | लव्हाटेनगर जलकुंभ | महात्मानगर जलकुंभ |
|---|---|---|---|
| जलकुंभाची क्षमता : | २० लाख लिटर | १५ लाख लिटर | ६० लाख लिटर |
| सद्यस्थितीत वितरणाची वेळ | सायं. ६ ते ८ | ५.३० ते ७.३० | स. ६ ते ८ संध्या. ६ ते ८ |
| नवीन वितरणाची वेळ | वेळेत बदल नाही | वेळेत बदल नाही | सायं. ५ ते ८ सुधारित वेळ |

## नागेश्वर मंदिरात देवीच्या मूर्तीची विटंबना

**पुणे :** पौड (ता. मुळशी) येथील नागेश्वर मंदिरातील देवीच्या मूर्तीची विटंबना केल्याचा दुर्दैवी प्रकार घडला असून, या घटनेनंतर दोन व्यक्तींवरती पौड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तरी हा सर्व प्रकार शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडला असल्याची माहिती समोर येत आहे. या प्रकारामुळे संपूर्ण गावामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यावेळी ग्रामस्थांच्या वतीने गाव बंदची हाक देण्यात आली. या दुर्दैवी घटनेबाबत शिवाजी मारुती वाघवले (वय ३४) यांनी पौड पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली असता त्यांच्या तक्रारीनुसार चांद नौशाद शेख (वय १९) आणि नौशाद शादाब शेख (वय ४४) यांच्यावर पौड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या घटनेबाबत पौड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चांद नौशाद शेख याने मंदिरात प्रवेश करून मंदिराचे गेट बंद केले. त्यानंतर त्याने अन्नपूर्णा देवीच्या मूर्तीला खाली पाडून मूर्तीची विटंबना केली. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली असून, या घटनेनंतर आरोपी चांद नौशाद शेख आणि नौषाद शादाब शेख यांच्यावर पौड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## जातनिहाय जनगणनेचे सिडको भाजपकडून स्वागत

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जातनिहाय जनगणनेचा घेतलेला निर्णय ऐतिहासिक असून, देशातील विविध सामाजिक घटकांची खरी परिस्थिती समोर येणार आहे. यामुळे समाजातील वंचित घटकांना न्याय देण्यास मदत होईल, असा विश्वास आमदार सीमा हिरे यांनी व्यक्त केला. जातनिहाय जनगणना करण्याच्या निर्णयाचे सिडको मंडल भारतीय जनता पार्टीच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज चौक, शॉपिंग सेंटर भाजी मार्केट, सिडको येथे आमदार सीमा हिरे यांच्या उपस्थितीत मंडलाध्यक्ष राहुल गणोरे यांच्या नेतृत्वाखाली फटाक्यांची आतषबाजी करून व पेढे वाटून आनंदोत्सव करण्यात आला. रवी पाटील, माजी नगरसेविका छाया देवांग, प्रकाश चकोर, परमानंद पाटील, तेजस निरभवणे, राजेंद्र जडे, बाळासाहेब घुगे, दशरथ गांगुर्डे, प्रवीण मोरे, राजपूत, विलास सानप, अमित चव्हाण, दत्ता पंडित, अर्चना दिंडोरकर, विठाबाई पगारे, जयश्री बारी यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन सिडको मंडल अध्यक्ष राहुल गणोरे यांनी केले.

**जाहीर नोटीस** निशाणी - ८

**दि.चौ.अ.नं.१०/२०२५** **ॲड.टी.पी.घुमरे**

**निफाड येथील मे.सिव्हील जज्ज सो, सिनियर डिव्हीजन,**

यांचे कोर्टात ...

१) **शशांक अशोक दोंदे** )
२) **अक्षय अशोक दोंदे** ) **अर्जदार**
३) **अंकिता अशोक दोंदे** )

**विरूध्द**

**कोणीही नाही** ) **सामनेवाले**

**अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट viii १८२७ चे कलम २ अन्वये वारस दाखला (Heirship certificate) मिळणेबाबत .....**

ज्याअर्थी अर्जदार यांची आई **लता उर्फ लताबाई मुरलीधर गांगुर्डे** ह्या दि.११/११/१९९७ रोजी मयत झालेल्या आहेत. मयताचे नावे **मिळकत वर्णन :-** जिल्हा नाशिक, **तालुका निफाड**, पैकी **उंबरखेड** गावाचे शिवारातील शेतजमीन मिळकत **गट नं. ५८४, ५९२, ६३९, ५७९** पैकी ह्या मिळकतींना **लता उर्फ लताबाई मुरलीधर गांगुर्डे** यांचे नाव दाखल आहे. त्यांचे पश्चात सदर मिळकतीस अर्जदार हे मयताचे वारस आहेत, त्या व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नव्हते व नाही म्हणुन वारस दाखला मिळणेकामी अर्जदारांनी **दि.चौ.अर्ज क्र.१०/२०२५** मे.न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदरचे अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास त्यांनी या न्यायालयात **दिनांक २०/०६/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता** अथवा तत्पुर्वी स्वतः अथवा वकीलांचे मार्फत हजर राहून योग्य ती हरकत नोंदवावी. मुदतीत हरकत न आल्यास मे.न्यायालय वारस दाखला देणेबाबत योग्य आदेश करतील.सदरची नोटीस प्रसिध्द करणेकामी आज दि.३०/०४/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- **कनिष्ठ लिपिक,** दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर निफाड, ता.निफाड, जि.नाशिक (कोर्टाचा शिक्का) सही/- **सहायक अधिक्षक,** दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर निफाड, ता.निफाड, जि.नाशिक

## दर्शन सूर्यवंशीला ४ सुवर्णपदके

**नाशिक : प्रतिनिधी**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे नुकताच ३८ वा पदवीप्रदान समारंभ पार पडला. यात के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचा विद्यार्थी दर्शन नंदलाल सूर्यवंशीने कृषी अभियांत्रिकी शाखेत राहुरी विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावत ४ सुवर्णपदकांना गवसणी घातली.

यामध्ये आदरणीय कै. बाळासाहेब (भाऊ) वाघ सुवर्णपदक, बन्सीलाल मुलचंद दायमा सुवर्णपदक, आय.एस.ए.ई. मेमोरियल सुवर्णपदक व दिवंगत डॉ. टी. जी. पाटील मेमोरियल सुवर्णपदक अशा चार सुवर्णपदकांचा समावेश हौय. तसेच प्रा. ए. ए. मेनॉन यांचे नावे रोख रक्कम असलेल्या पारितोषिकाने देखील सन्मानित करण्यात आले. समारंभावेळी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, कृषी वैज्ञानिक निवड मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय कुमार व राहुरी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख हे मान्यवर उपस्थित होते. दर्शन सूर्यवंशी हा बागलाण तालुक्यातील शेमळी या गावातील शेतकरी कुटुंबातील होतकरू तरुण आहे. त्याने बुद्धी, कष्ट व शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाने यश संपादन केले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एच. व्ही. देशमुख यांनी दिली. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. समीर बाळासाहेब वाघ, संचालक मंडळ, संचालक जनसंपर्क अजिंक्य बाळासाहेब वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, समन्वयक डॉ. सेवलीकर, प्राचार्य डॉ. देशमुख यांनी दर्शनचे अभिनंदन केले.

# खतासोबत लिंकिंग आढळल्यास कायदेशीर कारवाई

## कृषिमंत्री कोकाटे यांचे निर्देश



**मुंबई:** कोणत्याही स्वरूपात खतासोबत लिंकिंग केल्याचे निदर्शनास आल्यास तत्काळ कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे घाऊक व किरकोळ खत विक्री करणाऱ्या राज्यातील सर्व विक्रेत्यांच्या 'माफदा' या संघटनेमार्फत पुकारलेल्या खत खरेदी बंद आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बैठक झाली. या बैठकीला कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषी संचालक सुनील बोरकर, खत पुरवठादार, उत्पादक कंपन्या व 'माफदा' संघटनेचे सदस्य यांसह कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. कृषिमंत्री कोकाटे म्हणाले की, खत विक्रते यांनी लिंकिंगचे कोणतेही खत खरेदी करू नये व सक्ती झाल्यास कृषी विभागाकडे तक्रार करावी. तालुका व जिल्हा पातळीवर देखील याबाबत कृषी विभागाने सक्तपणे पाहणी करावी, असे निर्देश यावेळी कृषिमंत्री यांनी दिले. खत उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींनी देखील यापुढे कोणत्याही स्वरूपात लिंकिंग न करण्याचे आश्वासन बैठकीत उपस्थित विक्रेता संघटना व विभागाला दिले.'माफदा' संघटनेमार्फत कृषिमंत्री यांचे आभार मानण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र खते, कीटकनाशके बियाणे विक्रेते संघटनेने (माफदा) खत खरेदी बंदचे आंदोलन मागे घेण्याचा निर्णय जाहीर केला. 'माफदा' संघटनेच्या वतीने अध्यक्ष विनोद तराळ व सचिव बिपिन कासलीवाल यांनी संघटनेचे म्हणणे मांडले. विनोद तराळ यांनी सांगितले की, कंपन्यांच्याद्वारे लिंकिंगमध्ये खतपुरवठा होत असल्यास त्यावर शासनाने कठोर भूमिका घ्यावी. याअनुषंगाने खत उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच फर्टिलायझर असोसिएशन ऑफ इंडिया या उत्पादकांच्या संघटनेचे सचिव डी. रामाकृष्ण व महाराष्ट्र शाखेचे प्रतिनिधी सुरेश शेटे यांनी खत उत्पादक कंपन्यांची बाजू मांडली. अनुदानित खतांबाबतची स्थिती तसेच जमिनीची सुपीकता राखण्यासाठी सेंद्रिय, जैविक, नॅनो खते वापरण्यासंदर्भातील धोरणाबाबत माहिती दिली.

**डांग सेवा मंडळ, नाशिक**

**प्रधान कार्यालय :- २१७, स्वामी समर्थ अपार्टमेंट, महात्मानगर, नाशिक, पिन-४२२००७ फोन नं. ०२५३-२३५२०५७**

**निविदा**

डांग सेवा मंडळ, नाशिक संचलित आश्रमशाळा, वसतिगृहे, विद्यालये, महाविद्यालये यांना सन- २०२५-२६ या वर्षाकरिता खालील मालाचा पुरवठा करण्याकरिता संबंधित व्यापाऱ्याकडून निविदा मागवीत आहे. सशुल्क निविदा फॉर्म डांग सेवा मंडळाच्या मुख्य कार्यालयात सुट्टीचे दिवस सोडून **दुपारी १२ ते ४** वाजेच्या दरम्यान मिळतील.

*** मालाचे नाव***

**१) किराणा व धान्य पुरवठा**
**२) पुस्तके व स्टेशनरी साहित्य**
**३) क्रिडा साहित्य**
**४) सायन्स साहित्य**
**५) फर्निचर (टेबल, बॅचेस)**
**६) शालेय गणवेश**
**७) सरपण/घरगुती स्वयंपाकाचा गॅस**

वरीलप्रमाणे निविदा फॉर्म मा. अध्यक्ष, डांग सेवा मंडळ, २१७, स्वामी समर्थ अपार्टमेंट, महात्मानगर, (केशवलाल नथुभाई ज्वेलर्सच्या मागे) नाशिक- ७ येथील कार्यालयात **दि. १०/०५/२०२५, वार- शनिवारपर्यं**त पाठवाव्यात. कुठलीही निविदा स्विकारण्याचे अगर नाकारण्याचे सर्व अधिकार **मा. अध्यक्ष, डांग सेवा मंडळ, नाशिक** हयांचे राहतील.

(शिक्का) **सही /-**
**अध्यक्षा, डांग सेवा मंडळ, नाशिक**

**डांग सेवा मंडळ, नाशिक**
**२१७, स्वामी समर्थ अपार्टमेंट, महात्मानगर, नाशिक- ७**

## दुचाकीस्वाराचा मृत्यू

**बंगळुरू :** पुणे महामार्गावर वडगाव पुलावरील विशाल हॉटेलजवळ काल (०३ मे २०२५) पहाटे भरधाव मर्सिडीज कारने दुचाकीस्वारला धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वारचा जागीच मृत्यू झाला. तर, त्याच्या मागे बसलेल्या एका व्यक्तीला गंभीर दुखापत झाली. जखमीवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी पोलिसांनी कारचालकाविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपासाला सुरुवात केली आहे. कुणाल हुशार (वय, २३) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव असून तो बीसीएचा विद्यार्थी होता. कुणाल हा रात्री धनकवडी येथील श्री सद्गुरु शंकर महाराज समाधी मठात कीर्तन ऐकायला गेला होता. कीर्तन ऐकून घरी परतत असताना बेंगळुरू-पुणे महामार्गावर वडगाव पुलावरील विशाल हॉटेलजवळ मर्सिडीजने त्याच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात कुणाल जागीच ठार झाला.

# आदिवासी विकासच्या धानाला फुटले पाय

## गुजरातच्या काळ्या बाजारात सर्रासपणे विक्री

**सुरगाणा : प्रतिनिधी**

आदिवासी विकास महामंडळाच्या धान खरेदी योजनेच्या धानाची परस्पर गुजरात राज्यात विक्री होत असल्याचा प्रकार सुरगाणा तालुक्यातील काही जागरूक नागरिकांनी उघडकीस आणला आहे.

आदिवासी भागातील सुरगाणा, काठीपाडा, हातरुंडी, अलंगुण, बाऱ्हे, कोटंबी, बोरगाव, खेड खोबळा, भवानदगड, चिंचपाडा, भोरमाळ या अकरा खरेदी केंद्रांवर आधारभूत किमतीनुसार सरासरी एक लाख तीन हजार क्विंटल धान खरेदी प्रतिक्विंटल दोन हजार तीनशे रुपयांप्रमाणे २३ कोटी ६९ लाख रुपयांची धान खरेदी करण्यात आली. या धानाच्या भरडाईसाठी मे. रेणुका राइस मिल पांढुर्ली यांच्याबरोबर महामंडळाने करारनामा केलेला आहे. भरडाई केल्यानंतर एफआरके मिश्रित तांदूळ जिल्हा शासकीय पुरवठा गोदामात जमा करावा लागतो. धान उचल केल्यानंतर मिलपर्यंत पोहोच करण्याची जबाबदारी राइस मिलधारकांवर निश्चित करण्यात आली होती. मात्र, हे लाखो क्विंटल



धान्य रेणुका राइस मिलपर्यंत न पोहोचता परस्पर गुजरात राज्यात ते विक्रीसाठी पाठविले जात असल्याचे स्थानिक पातळीवरील सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेल्या तपासात आढळून आले आहे.

यापूर्वी सुरगाणा येथील केंद्रावरील धान्याची परस्पर वाहतूक गुजरात राज्यात झाली होती. आताही या धानाची वाहतूक सुरगाणा, उंबरठाण, बर्डीपाडा, खांबला, सीतापूर, वासदा या मार्गावरून उनाई सोनगढकडे होत असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे. खातरजमा करण्यासाठी काही सामाजिक कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र ते गुजरात राज्यापर्यंत या वाहनांचा पाठलाग केला असता धानाची वाहने वासदा गुजरात येथे दोन ते अडीच वाजता आढळून आली. याबाबत कार्यकर्त्यांनी जिओ टॅगचे फोटो व व्हिडिओ चित्रीकरण केले आहे. राइस मिलमध्ये भरडाई करून निघालेला तांदूळ शासकीय धान्य पुरवठा गोदामात जमा करावा लागतो.

सेंद्रिय पद्धतीने पिकवलेले धान (भात) परस्पर गुजरात राज्यात पाठवले जाते तर नाशिक येथील जिल्हा पुरवठा गोदामात भरडाई केलेला तांदूळ कोठून आणून जमा केला जातो? हा संशोधनाचा विषय आहे. याबाबत चौकशी करण्याची मागणी होत आहे.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**ई-निविदा सुचना**

| ई-निविदा क्र. | ई-निविदा तपशील | अंदाजपत्रकाची किंमत | निविदा शुल्क व बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| ३००००५७१२८ | नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प, पुणे अंतर्गत विविध विभागीय कार्यालयांत दैनंदिन कामासाठी कुशल बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांची भाडेत्त्वावर नियुक्ती करणे. | रु. २४,५०,४४८/- | रु. ११८०/- रु. २८,००४/- |
| | निविदा विक्री कालावधी व सादर करण्याची अंतिम तारीख ०३.०५.२०२५ (स. १२.००) पासून २०.०५.२०२५ (दु. १२.००) पर्यंत. | | |
| ३००००५७१३१ | नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प, पुणे अंतर्गत विविध विभागीय कार्यालयांत चालक, इंधन आणि दैनंदिन देखभालीसह भाडेतत्वावर महिंद्रा बोलेरो वाहन पुरवण्याचे वार्षिक कंत्राट | रु. ३३,५५,२४८/- | रु. ११८०/- रु. ३७,०५२/- |
| | निविदा विक्री कालावधी व सादर करण्याची अंतिम तारीख ०३.०५.२०२५ (स. १२.००) पासून २७.०५.२०२५ (दु. १५.००) पर्यंत. | | |

अधिक माहितीकरीता आमच्या "https://eprocurement.mahagenco.in/" या संकेतस्थळावर भेट द्यावी.

**संपर्क : -**
**मुख्य अभियंता (नवीकरणीय ऊर्जा - प्रकल्प)**
**पुणे विभाग, महानिर्मिती**
प्रशासकीय इमारत, ९२५, पहिला मजला, कसबापेठ पुणे - ४११०११
ई-मेल - cespgdprojpune@mahagenco.in दुरध्वनी क्र. - ०२०-२९५२७८८७, ८३०८५२२९६३

**Sd/-**
मुख्य अभियंता
(नवीकरणीय ऊर्जा - प्र.) पुणे विभाग, महानिर्मिती

# शौर्या कुटेचा योगा स्पर्धेत विश्वविक्रम

## 'नोबेल वर्ल्ड रेकॉर्ड'कडून प्रमाणपत्र प्रदान

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाचे औचित्य साधून नाशिक येथे जीएस फाउंडेशनच्या वतीने 'योग विश्वविक्रम' पार पडला.

यात १५० किलो वर्फाच्या लादीवर ११ वर्षी शौर्या कुटे हिने तब्बल ३५ मिनिटे ४२ सेकंद योगाभ्यास करत विश्वविक्रम रचला. तिला 'नोबेल वर्ल्ड रेकॉर्ड'कडून प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. योगाचा प्रचार-प्रसार व्हावा याकरीता जीएस फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत योग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महिलांनी पारंपरिक पोशाखात सहभागी होत आपली कला सादर करत इतिहास घडवला. पारंपरिक नऊवारी साडीत १४५ महिलांनी एकत्रितपणे वीरभद्रासन करत ३ मिनिटे ५० सेकंद होल्डिंग करून विक्रम प्रस्थापित केला. या स्पर्धेचे मुख्य आकर्षण ठरली ती शौर्या कुटे. शौर्याने १५० किलो वर्फाच्या लादीवर ३० मिनिटे १२ सेकंद 'योग निद्रासन' तर ३० मिनिटे आणि ४५ सेकंद 'केसरीसुतासन' करत विश्वविक्रम प्रस्थापित केला. इयत्ता सातवीत शिक्षण घेणाऱ्या शौर्या वयाच्या आठव्या वर्षापासून योगाभ्यास करते. शौर्याला योगामध्ये आवड असल्याने वयाच्या आठव्या वर्षापासून तिच्या आईच्या लक्षात आले होते. त्यामुळे त्यांनीही शौर्याला योग शिकविण्याचे ठरविले. शौर्या दररोज न चुकता योगासने करत आहे. तिने आजपर्यंत अनेक राज्य, जिल्हा आणि राज्य स्तरावर अनेक योग स्पर्धांमध्ये सहभागी होत नेत्रदीपक अशी कामगिरी केली आहे. यावेळी सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र, तुळशीचे रोप देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी जीएस फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गोविंद झा, उद्योजक धनंजय बेळे, योगिता अहिरे, सुधाकर शिंदे, श्रीलाल पांडे, हर्षद बेळे उपस्थित होते. कमिटी चेअरमन अमोल कुटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



बर्फावर योगासने करणे एक मोठे आव्हान असते, परंतु तरीही सततच्या सरावामुळे शौर्याला हे शक्य झाले. यामध्ये सकारात्मकता, सातत्य ठेवून सराव करावा लागत होता. त्यासाठी शौर्याची आई आणि वडिलांनी तिचा आत्मविश्वास वाढवला. तिच्या या सातत्यामुळेच विश्वविक्रमावर तिने मोहोर उमटवली. 'नोबेल वर्ल्ड रेकॉर्ड'चे मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मीनारायण यांनी स्वतः उपस्थित राहत शौर्याला प्रमाणपत्र देत तिचा सन्मान केला.

# युनिव्हर्सल फाउंडेशनतर्फे स्पर्धा परीक्षांसाठी उद्यापासून कार्यशाळा

**नाशिक : प्रतिनिधी**

सनदी अधिकारी होण्याचे स्वप्न अनेक जण बघत असतात. त्यांच्या या स्वप्नाला दिशा मिळावी तसेच दहावी व बारावीनंतर स्पर्धा परीक्षांची तयारी कशा पद्धतीने करावी, वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांसाठी पात्रता, अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती, मुलाखती, सकारात्मक दृष्टिकोन, राज्य लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या मार्फत घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षा.. या सर्वांची माहिती स्पर्धा परीक्षांची तयारी करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने युनिव्हर्सल फाउंडेशनतर्फे ५ ते १५ मे या कालावधीत दहा दिवसीय मोफत कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवायचे असेल तर एक सकारात्मक दृष्टिकोन विकसित होणे गरजेचे आहे. दरवर्षी लाखो विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची तयारी करत असतात. मात्र, काहीच विद्यार्थ्यांना यश मिळते. स्पर्धा परीक्षांविषयीची सर्व माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, जेणेकरून स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांचा मार्ग सुकर होईल, या हेतूने युनिव्हर्सल फाउंडेशनतर्फे मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. अधिकाऱ्यांकडून स्पर्धा विश्व या विषयावर मार्गदर्शन केले जाणार आहे. यात पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव, सहकार विभाग उपायुक्त माधव थैल, उपजिल्हाधिकारी दुर्गा देवरे, जिल्हा कोषाधिकारी भाग्यश्री जाधव, तहसीलदार संघमित्रा बाविस्कर, फाउंडेशनचे प्रमुख प्रा. राम खैरनार आदी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. सोमवार दि. ५ मे रोजी कॅनडा कॉर्नर परिसरातील बीएसएनएल ऑफिसच्या समोर असलेल्या युनिव्हर्सल फाउंडेशन येथे सकाळी ९.३० वाजता कार्यशाळा सुरू होईल. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी नोंदणी आवश्यक असून इच्छुक विद्यार्थ्यांनी +९१९०२८९३९२८६/+९१८७८८१९५०५७ या क्रमांकावर नोंदणी करण्याचे आवाहन प्रा. दीपक वडजे यांनी केले आहे.

पान १ वरून....

## सामाजिक न्याय खाते बंद ..

शिरसाट यांनी संताप व्यक्त केला. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी निधी वळवल्याच्या निर्णयावर हल्लाबोल केला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागासाठी मंजूर ३,९६० कोटींपैकी ४१० कोटी ३० लाख रु. तसेच आदिवासी विकास खात्याला दिलेल्या ३,४२० कोटींच्या सहाय्यक अनुदानातून तब्बल ३३५ कोटी ७० लाख रुपये लाडकी बहिण योजनेसाठी खेचले. अशा प्रकारे आदिवासी विभागाच्या वाट्याचे एकूण ७४६ कोटी रुपये पैसे सरकारने वळवले आहे.

## वकिलांची फौज उभी करू

येण्याची चिन्हे आहेत. अलमट्टीची उंची वाढविण्याला कृष्णा पाणी वाटप लवादाने परवानगी दिली आहे. त्यामुळे धरणाची उंची ५१९ मीटरवरून ५२४ मीटरपर्यंत वाढविण्याबाबतची अधिसूचना जारी करावी, अशी मागणी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची भेट घेऊन केली आहे.

## माफी मागतो : अजित पवार

उपस्थित राहण्याचा प्रश्न नाही असे सांगण्यात आले. याचाच धागा पकडत अजित पवार यांनी आपण माजी मुख्यमंत्री यांना बोलावल होते. यदा कदाचित आमच्याकडून चुकून कुणाला माजी मुख्यमंत्री यांना निमंत्रण देण राहिले असेल तर माफी मागतो दिलगिरी व्यक्त करतो, असे सांगताना शरद पवार यांचे नाव घेणे टाळले. अजित पवार म्हणाले, रेशीम ३५ वर्ष काम करण्याची संधी मिळाली. राजीव गांधी यांच्या काळात बारामती लोकसभा मतदारसंघातून पहिली संधी मिळाली. सुधाकर नाईक यांच्या मंत्रिमंडळात काम केले. शरद पवारांच्या मुख्यमंत्री म्हणून कार्यकाळ पाहिला. मी अशोक चव्हाण यांचा कार्यकाळ पाहिला. विदर्भाला चांगल्या प्रकारे संधी मिळाली मराठवाड्यात देखील मान्यवरांना संधी मिळाली पश्चिम महाराष्ट्रात देखील संधी मिळाली.

कोकणालाही संधी मिळाली. ६५ वर्षानंतर महिला मुख्यमंत्री झाली नाही. आम्हालाही वाटत महिला मुख्यमंत्री व्हायला हवी. केवळ उत्तर महाराष्ट्राला मुख्यमंत्री पदाची संधी मिळाली नाही. २००४ साली ती संधी आली होती मात्र काय झाले हे प्रफुल पटेल यांना माहिती आहे, असे अजित पवार म्हणाले.

विरोधी पक्षनेता म्हणून नारायण राणे यांनी सभागृहात नुसते मागे पाहिले तरी सगळे शिवसेना आमदार चिडीचूप होऊन जायचे. अशोक चव्हाण आणि मी एकाच बँचचे आहोत, त्यांना कमी कार्यकाळ मिळाला. एकनाथ शिंदे यांचा ४ वाजता फोन आला त्यांनी ते दरे गावात असल्याचे सांगितले असल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले.

## पान १ वरून

## जिल्हा सहकारी बँक कशी वाचवणार?

वाहनेजप्तीसह शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर नावे लावण्याचे काम सुरू आहे. परंतु, या कारवाईत लोकप्रतिनिधींकडूनच खोडा आणला गेला. त्यामुळे प्रशासकांचेच अडचण झाली. तब्बल २१०० कोटींच्या थकीत कर्जामुळे अडचणीत सापडलेल्या बँकेच्या सक्तीच्या वसुलीस कृषिमंत्री माणिक कोकाटे यांनी स्थगितीची केलेली सूचना आणि सरकारकडून सामोपचार कर्ज परतफेड योजनेत व्याजात केलेली कपात यामुळे वसुली कमी होऊन तोटा आणखी वाढण्याची शक्यता लक्षात प्रशासक चव्हाण यांनी राजीनामा दिला. आता या बँकेचे भवितव्य काय? सरकार, सरकारमधील मंत्री, थकबाकीदार लोकप्रतिनिधी आणि माजी संचालक ही बँक कशी वाचवणार? हा प्रश्न आहे.

---

**ग्रामपंचायत हस्तेदुमाला ता.दिंडोरी**

**जाहीर दरपत्रक मागणी निविदा दि. ०३/०५/२०२५**

तमाम साहित्य/ सेवा पूरवठादार यांना सूचित करण्यात येते कि, ग्रामपंचायत हस्तेदुमाला ता.दिंडोरी यांना ग्रामपंचायत स्वनिधी (ग्रामनिधी, पेसानिधी, १५ वित्त आयोग) अंतर्गत खालीलप्रमाणे कामे करून देणे वस्त पुरवठा करणेसाठी, दरपत्रक (बंद लिफाफा कोटेशन) मागवित आहोत. १) ग्रा.पंपा.पु. साहित्य व टँकर खरेदी करणे २) ग्रा. पं.शाळा यांसाठी फर्निचर खरेदी करणे. ३) जि.प. शाळेसाठी ईलर्निंग साहित्य खरेदी करणे ४) वंचित घटक व महिला यांसाठी व्यवसाय प्रशिक्षण देणे. ५) ग्रापंसाठी संगणक प्रिंटर खरेदी करणे. ६) वॉलपेंटिंग रंग खरेदी करणे. ७) शाळा अंगणवाडी स्मशानभूमीसाठी सोलर संयंत्र बसविणे. ८) पा.पु.सौर पंप बसविणे. ९) ग्रा.प.गावना वबोर्ड बनविणे. १०) स्वच्छता विषयक साहित्य खरेदी व उपक्रम करणे. ११) दिवाबत्ती साहित्य खरेदी करणे. १२) सरकारी कार्यालये कॅमेरे खरेदी करणे. १३) ग्रीन जिम साहित्य खरेदी करणे. १४) प्राथमिक शाळेला पोषण आहारकामी भांडी पुरवणे करणे.

**टीप:-** १) जाहिरातीत मागणी केलेल्या कामाचे दरपत्रक हे मजुरी व वस्तूसह सादर करण्यात यावे. सदरचे दर हे सन २०२३-२४, २०२४-२५, २०२५-२६ व इतरयाआर्थिकवर्षाकरिताबंधनकारकराहतील. ०२) एका नगास येणारी किंमत दरपत्रक सादर करावे. त्या अनुषंगाने ग्रामपंचायतीला आवश्यकते नुसार खरेदी करता येईल. दरपत्रक व त्या बाबतीत सर्व अधिकार ग्रा.प. यांचे अंतिम असतील. जाहिरात प्रसिद्धी दिनांक पासून ०५ दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत बंद लिफाफे सादर करावेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**

**ग्रामपंचायत हस्तेदुमाला ता. दिंडोरी जि. नाशिक**

---

**ग्रामपंचायत कार्यालय, दुगाव ता. जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सुचना क्र.०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत दुगाव ता. जि. नाशिक येथे विविध विकास कामासाठी महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत पुरवठादार यांच्याकडून साहित्यासाठी ई निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर इ निविदा शासनाचा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून दि. ०३/०५/२०२५ ते १०/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. इ निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**

**ग्रामपंचायत दुगाव ता. जि. नाशिक**

---


# गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क : ९२७२०९९४२५**

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क- ९६९००१३१३६**

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. **८२३७३११२११**

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

### पाहिजेत

पंचवटीत कापड दुकानाकरिता पंचवटीतील स्थानिक मुले पाहिजेत. सकाळी ९ ते ९. ७५८८६६४४९१

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-९८६०१३६५३६**

### महिला व पुरुष पाहिजेत

Draftsman part time आर्टेक्चर नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाउंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१ **एन.एन. असोसिएट्स**, तिसरा मजला, आय. डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी.रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५. संपर्क- 8668862801

### Name change

My Old Name is Gokul Dattatrey Kale has been changed to My New Name **Gokul Dattaray Kale** as per Aadhar

### विकणे आहे

शरदचंद्र पवार फ्रुट मार्केट यार्डच्यामागे, विबगोर शाळा रोड, नाशिक येथील 2BHK फर्निचरनी सुसज्ज फ्लॅट त्वरित विकणे आहे. **संपर्क- ७२०८४९८५२३**

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क: ९९७००३९०४६**

**जाहिरात छोटी किमया मोठी!**


## मालेगावी टायफॉइडच्या रुग्णसंख्येत वाढ

**मालेगाव :** शहरात वाढते तापमान अनेकांना डोकेदुखी ठरत आहे. त्यात तापमानामुळे रस्त्यावर अनेक शीतपेयांच्या हातगाड्या लागल्या आहेत. उन्हापासून बचावासाठी नागरिक शीतपेय पितात. शीतपेय प्यायल्यानंतर अनेकांना खोकला, सर्दी, ताप यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्याचे पर्यवसान टायफॉइडमध्ये होताना दिसत आहे. येथील सामान्य रुग्णालयात रुग्णसंख्या वाढल्याने अनेक जण रुग्णालयात दाखल होऊन उपचार घेत आहेत. महापालिकेचा आरोग्य विभाग व अन्न भेसळ विभागातर्फे अन्नपदार्थांचे नमुने घ्यावेत. पाण्याची तपासणी करावी, अशी मागणीदेखील होत आहे. गेल्या दोन आठवड्यापासून सामान्य रुग्णालयात रुग्णसंख्येत वाढ झाली आहे. नागरिकांना सर्दी, खोकला, व्हायरल फिवर, डायरियाचे रुग्ण काही प्रमाणात वाढले आहेत.

---

**ग्रामपंचायत कार्यालय, दुगाव ता. जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सुचना क्र.०२/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत दुगाव ता. जि. नाशिक येथे Construction of Internal Cement Concrete Road at Dugaon Tal Dist Nashik विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार यांच्याकडून ई निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर इ निविदा शासनाचा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून दि. ०३/०५/२०२५ ते १९/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. इ-निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**

**ग्रामपंचायत दुगाव ता. जि. नाशिक**

---

**ग्रामपंचायत कार्यालय, शिलापूर ता. जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सुचना क्र. ०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत शिलापूर ता. जि. नाशिक येथे विविध विकास कामासाठी महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत पुरवठादार यांच्याकडून साहित्यासाठी ई निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर इ निविदा शासनाचा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून दि. ०३/०५/२०२५ ते १०/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. इ-निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत..

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**

**ग्रामपंचायत शिलापूर ता. जि. नाशिक**

---

## टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यांत येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी, नाशिक महानगरपालिका हद्दीतील **मौजे अंबड** या गांवचे शिवारांतील व एम.आय. डी. सी. हद्दीतील औद्योगिक प्लॉट नंबर इ-२९, यांसी **क्षेत्र १०००.०० चौ.मी** ची मिळकत दरोबस्त.

सदरची मिळकत ही **मे. मृण्मयी प्रेस कॉम्प, तर्फे प्रोप. श्रीमती नेहा नरेंद्र पाटील** यांचे लिजहोल्ड मालकीची व कब्जे वहिवाटीतील मिळकत आहे त्यांनी सदर मिळकतीबाबतचे त्यांचे मालकी हक्क संपूर्णपणे निर्वेध असल्याचे सांगितलेले आहे. सबब सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा (वसई विकास सहकारी बँक लिमिटेड व्यतिरिक्त), लिज, लिन, गहाणखत, विसार पावती, साठेखत, खरेदीखत, जनरल मुखत्यारपत्र, मृत्यूपत्र, इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार असल्यास त्या व्यक्तींनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ दिवसांचे आत आपली हरकत लेखी स्वरुपात व साक्षांकीत कागदोपत्री पुराव्यासह नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत संपूर्णपणे निर्वेध असल्याचे समजण्यात येईल त्या नंतर कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. तसेच ती सदर मिळकतीवर व मिळकत मालकांवर बंधनकारक राहाणार नाही. कळावे, ही टायटल व्हेरीफिकेशन कामी जाहीर नोटीस. **नाशिक, दि. ०३/०५/२०२५.**

**सही /- किरण बाळकृष्ण चांदवडकर, ॲडव्होकेट व नोटरी**
**चेंबर नंबर ३२२/१, मारुती चेंबर्स, जिल्हा न्यायालय आवार, नाशिक**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका इजिप्तपुरी मौजे माणिकखांब ता. इगतपुरी जिल्हा. नाशिक येथील गट क्रमांक व उपविभाग ६७६ यांसी क्षेत्र २९ आर पो.ख.० हे.०१ आर असे एकूण क्षेत्र ३० आर तीचा आकार २.२७ ही शेतजमीन मिळक १. श्रीमती. होसाबाई दिगंबर शिंदे, २. सत्यभामा दत्तात्रय उर्फ दत्ता कौदरे (गुरव) ३. राहुल दत्तात्रय उर्फ दत्ता कौदरे (गुरव) ४. सुरज दत्तात्रय उर्फ दत्ता कौदरे (गुरव) ५. रंघवीर रमेश भालेकर अ.पा.क. ६. सुप्रिया रमेश भालेकर अ.पा.क. ७. शीतल संजय शिंदे अ.पा.क. यांच्या वारस मालकी हक्काची व प्रत्यक्ष कब्जातील मिळकत क्षेत्र ३० आर मिळकत असुन उपरोक्त वरील नमुद मिळकती यांसी चतुसिमा रेकॉर्ड ऑफ राईट प्रमाणे. सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाचे असल्याचे सांगुन टायटल व्हेरीफिकेशन सर्टीफिकीटची मागणी केली या कामी जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

तथापि, सदर मिळकतीत कुणाचे कसलेही गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षीस पत्र, विसार पावती, साठेखत करारनामा, विकसन करारनामा, जनरल मुखत्यार पत्र, बँकेचा, संस्थेची, अगर कोणतेही प्रकारची करार मदार इत्यादी सारखे हक्क, अधिकार, बोजे, वगैरे असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे दिवसापासून ०७ दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी कळवावे, व लेखी हरकत नोदवावी. परस्पर वर्तमान पत्रात घेतली जाणारी हरकत विचारात घेतली जाणार नाही. किंवा मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत कुणाचीही हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध आहे असे समजून ना हरकत दाखला देण्यात येईल. याची नोंद घ्यावी. कळावे, दि. ०३.०५.२०२५

आमचे मार्फत प्रसिद्ध

**सही/– भावना डी गटणे–खिस्ती, ॲडव्होकेट**
पी ॲण्ड टी कॉलनी, शरणपूर–त्र्यंबक लिंक रोड, नाशिक – ४२२००५. मो. ८६००१२९५२४

---

## श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डुबेरे, शाखा-नाशिकरोड, ता. जि.नाशिक.

**- गहाण घेणेच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस -**

तमाम लोकांस या गहाण घ्यावयाच्या मिळकतीच्या संबंधाने जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**१) मिळकतीचे वर्णन - तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे आडगांव-१ या गांवचे शिवारातील बिनशेती मिळकत यांसी भूमापन क्रमांक व उपविभाग ४९२/१/१/प्लॉट/६९ यांसी क्षेत्र ६३९.७८ चौ.मी. यावरील गणेश विहार अपार्टमेंट या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं, ८ यांसी बांधीव क्षेत्र ७७८.५६ चौ. फुट म्हणजेच ७२.३३ चौ.मी. (सदर इमारतीस उदवाहक सुविधा नाही) यांसी चतुःसिमा रे. ऑ. रा. प्रमाणे.**

२) कर्जदाराचे नांव :- **श्री. रामदास जालिंदर धात्रक,** फ्लॅट नं. ८, गणेश विहार अपार्टमेंट, गणेश मार्केट, कोणार्क नगर, आडगाव शिवार, ता. जि.नाशिक.

३) कर्जाचा प्रकार :- **जमिन गृहतारण**

४) पतसंस्थेचे नांव :- **श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डुबेरे,** शाखा नाशिकरोड, ता. जि. नाशिक.

**५) नोटीसचा उद्देश :- टायटल व्हेरिफिकेशन**

**६)** वर कलम २ मध्ये नमूद केलेल्या कर्जदार यांनी वर कलम ४ यांत नमूद पतसंस्थेकडे वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत तारण ठेवून कर्जाची मागणी केलेली आहे. सदर कर्जासाठी वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत या मिळकतीचे मालक यांचे संमतीने पतसंस्थेकडे गहाण देण्याचे मान्य व कबुल केले असून सदर कर्जास उपरोक्त नमूद मिळकत तारण देण्यास मिळकतीचे मालक यांनी संमती दिलेली आहे.

**७)** वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या मालकी, टायटल बाबत अगर मिळकत मालक यांचे मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास तसेच सदरची मिळकत इतर कोणाकडे गहाण, दान, लिन, लिज, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, करार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र व वित्तीय संस्थेचा बोजा, साठेखत, विसारपावती, विकसन करारनामा, जामिनकी, कोर्ट, दावा इ. कारणाने बोजा असल्यास अगर कोणाचाही काही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **५ (पाच)** दिवसाचे आंत आमचे कार्यालयांत तसेच पतसंस्थेचे कार्यालयांत लेखी साक्षांकित पुराव्यासह हरकती नोंदवाव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून कर्ज देणेकामी तारण/गहाण घेतली जाईल व कर्ज वितरण करण्यात येईल. सदर मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा तसेच परस्पर वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी. सदर जाहीर नोटीस कर्जदार यांचे सांगणेवरुन प्रसिध्द करणेकामी पतसंस्थेमार्फत जाहीर नोटीस,

स्थळ-सिन्नर,दिनांक-०३/०५/२०२५ **आमचे मार्फत प्रसिध्द**

**श्री. प्रदिप लक्ष्मण वारुंगसे (ॲडव्होकेट)**
ऑफीस-लहामगे बिल्डींग, सिन्नर न्यायालयासमोर, सिन्नर, जि. नाशिक.

---

## पब्लिक समन्स

निशाणी क्र.८ प्रोसेस जमा — **ॲडव्होकेट सौ. गायत्री उदगीरकर**

**दिवाणी चौकशी अर्ज नं.२०/२०२५**
**नाशिक येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब वरीष्ठ स्तर नाशिक यांचे कोर्टात**
**श्री. गौतम अनंतराव वारे वै. १,** **अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही** **सामनेवाले**

**मिळकतीचे परिशिष्ट-**

**कै. अनंतराव रामदास वारे दि. १०-०७-२०२४**, ते आपल्या हयातीत सदनिका क्र. ०३, शांती स्वरूप अपार्टमेंट, शरणपूर रोड, नवीन पंडित कॉलनी, नाशिक-४२२००२ येथे मुलगा **श्री धनंजय वारे** यांचे सोबत राहत होते, यांनी शेवटचे मृत्यूपत्र करून ठेवलेल्या पत्रातील मिळकतीचा तपशील खालीलप्रमाणे:

**१. सदनिका क्र. १, शांती स्वरूप अपार्टमेंट, प्लॉट नं. १४/२, स.न. ६५६/१/१बी / १७ / २ (सीटीएस नं. ७४७१), शरणपूर रोड, नाशिक** हे अनंतराव रामदास वारे आणि श्री गौतम अनंतराव वारे यांचे नावाने विकत घेतलेला होता व आहे, तसेच अनंतराव रामदास वारे यांचा ५०% हिस्सा हा **श्री गौतम अनंतराव वारे** यांचे नावाने मृत्यूपत्राद्वारे तबदील करण्यात आला आहे.

**२. सदनिका क्र.३, शांती स्वरूप अपार्टमेंट, प्लॉट नं. १४/२, स.न. ६५६/१/१बी /१७/२ (सीटीएस नं. ७४७१), शरणपूर रोड, नाशिक** हे अनंतराव रामदास वारे आणि श्री धनंजय अनंतराव वारे यांचे नावाने विकत घेतलेला होता व आहे, तसेच अनंतराव रामदास वारे यांचा ५०% हिस्सा हा **श्री धनंजय अनंतराव वारे** यांचे नावाने मृत्यूपत्राद्वारे तबदील करण्यात आला आहे.

**३. शॉप क्र.५, प्लॉट नं. २९ अ स. नं. ६४९/अ/१/१/१, शरणपूर रोड, कुलकर्णी कॉलनी, नाशिक** हे शॉप अनंतराव रामदास वारे आणि श्री धनंजय अनंतराव वारे यांचे नावाने विकत घेतलेला होता व आहे, तसेच **अनंतराव रामदास वारे** यांचा ५०% हिस्सा हा **श्री. धनंजय अनंतराव वारे** यांचे नावाने मृत्यूपत्राद्वारे तबदील करण्यात आला आहे.

४. सदरचे मृत्यूपत्र दुयाम्म निबंधक साो. नाशिक यांचे कार्यालयात अनु. क्र. ६९२३/२०२१ हे दिनांक २२-०७-२०२१ रोजी नोंदणीकृत केलेला आहे.

ज्याअर्थी मजकूर अर्जदार **श्री. गौतम अनंतराव वारे** व **श्री धनंजय अनंतराव वारे** यांनी त्यांचे मयत वडील **कै. अनंतराव रामदास वारे** यांचे नांवे असलेल्या मिळकती मधील ५० हिस्सा वरील प्रमाणे दोन्ही मुलांना त्यांचे हयातीत मृत्यूपत्रान्वये दिलेला आहे. सदर मृत्यूपत्राचे प्रोबेट मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी कुणाचेही काही हक्क, हितसंबंध व हरकत असल्यास योग्य त्या कागदपत्रांसह समक्ष अगर वकीलांमार्फत **दि.१७/६/२०२५** रोजी **सकाळी ११.०० वा.** मे. कोर्टात हजर रहावे. वरील तारखेस हजर न राहीलेस मे.कोर्ट पुढील आदेश करील याची नोंद घ्यावी. सदरचा जाहिरनामा आज **दि.२/५/२०२५** रोजी मे. न्यायालयाचे आदेशावरुन आमचे सही शिक्क्यानिशी जारी केले असे. **हुकूमावरून**

**सही/- कनिष्ठ लिपिक** (शिक्का) **सही/- अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, नाशिक**

---

## जाहीर नोटीस

**ॲड. शुभम विलास कुलकर्णी** नि.०६

**दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक २६४/२०२५**
**नाशिक येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो, वरिष्ठ स्तर, नाशिक**
**(मे. के. एच. पाटील साहेब) यांचे कोर्टात...**
**१. श्रीमती वनिता प्रशांत गुरव, २. श्रीमती. कल्याणी अभिषेक गुरव,**
**३. अ.पा.क राघव अभिषेक गुरव** तिघे रा. फ्लॅट नं ए-१८, रामराज्य संकुल, काळाराम मंदिराजवळ, पंचवटी, नाशिक ४२२००३ **अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही** **सामनेवाले**

अर्ज : वारस प्रमाणपत्र (SUCCESSION CERTIFICATE) मिळणेकामी

ज्याअर्थी अर्जदार क्र. १ यांचा मुलगा, अर्जदार क्र. २ यांचे पती व अर्जदार क्र ३ यांचे वडील नामे अभिषेक प्रशांत गुरव हे दि. १३/०१/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. तसेच **कै. अभिषेक प्रशांत गुरव** यांना त्यांचे मृत्यू पश्चात अर्जदार क्र. १ ते ३ यांचे शिवाय कोणीही इतर कायदेशीर वारस नाही. मयताच्या नावे १अ. भारतीय आयुर्विमा महामंडळ, एल. आय. सी ऑफिस सांगली, शाखा २, दावा विभाग, जीवन ज्योती पहिला मजला, आमराई रोड, शिवाजी स्टेडियम समोर सांगली ४१६४१६ येथील एल. आय. सी पॉलिसि क्रं. ९४३५८९०६८ मधील मयत **कै. अभिषेक प्रशांत गुरव** यांच्या नावे असलेली रक्कम रु.८,००,०००/- (अक्षरी- आठ लाख रुपये मात्र) १ ब. मयत **कै. अभिषेक प्रशांत गुरव** यांचे नावे असलेली स्कोडा ऑटो इंडिया प्रा.ली कंपनीची पांढऱ्या रंगाची रॅपिड अम्बिशन (77KW TDI CR) मॉडेल असनारी गाडी नं MH14DF7775 असलेली चेससी नं TMBBLANA9CG011050 इंजिन नं. .CLN 185426 अंदाजे रक्कम रु २,००,०००/- (अक्षरी - दोन लाख रुपये मात्र) हि मिळकत आहे. मयताचे मृत्यू पश्चात अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी वरील अर्जदार यांना दाखला देण्यास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी मे. कोर्टात दिनांक १६/०६/२०२५ रोजी सकाळी १०.३० स्वतः अगर वकीलामार्फत हजर होऊन लेखी म्हणणे द्यावे. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांना तसा वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे, हि जाहीर नोटीस. नाशिक. दिनांक ०२/०५/२०२५

**सही/- कनिष्ठ लिपिक** **सही/- अधीक्षक**
**दि. न्या. व स्तर, नाशिक** **दि. न्या. व स्तर, नाशिक**

---

## जाहीर नोटीस

नि.नं:०६ प्रोसेस जमा — **ॲड.रुपाली आर.पाठक (पंडीत) सटाणा, जि.नाशिक**

**जा.क्र.११३४/२५ दि.०३/०५/२०२५ वारस दाखला अर्ज नंबर ८०/२०२५**

**सटाणा येथील मा.दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात.....**

**सौ. अक्षरा हेमंत पगार**, वय- १९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. फोफीर, ह.मु. विरगाव ता. बागलाण, जि.नाशिक **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** **सा.वाला**

ज्याअर्थी, प्रस्तुत अर्जातील अर्जदार हिची आई नामे **पुष्पाबाई अरुण भामरे** ही **दिनांक २१/०४/२०१६** रोजी मयत झालेली असून तिचे मृत्यूनंतर अर्जदार ही एकमेव कायदेशीर मुलगी वारस असल्याचे कथन करुन अर्जदाराने मे. कोर्टाकडून लिगल हे अरशिप प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी, प्रस्तुत अर्जातील अर्जदार ही मयत पुष्पाबाई अरुण भामरे यांचे मृत्यूनंतर कायदेशीर वारस आहे/नाही याबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्दीपासून **३०** दिवसांचे आत अगर **दिनांक १०/६/२०२५** रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर होऊन आपले लेखी म्हणणे दाखल करावे. वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदाराचा योग्य तो पुढील पुरावा घेऊन आदेश करेल. मग त्यानंतर कोणाचे काहीही म्हणणे ऐकले जाणार नाही, आज **दिनांक २९/०४/२०२५** रोजी माझी सही व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

**सही/- कामगिरी लिपिक** (शिक्का) **सही/- सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, सटाणा, नाशिक** **दिवाणी न्यायालय, सटाणा, नाशिक**

---

## जाहीर नोटीस

नि.नं:०६ प्रोसेस जमा — **ॲड. श्री. पंडीतराव मोतीराम भदाणे सटाणा कोर्ट, सटाणा ता. सटाणा, जि. नासिक.**

**जा.क्र.११३२/२५ दि.०२/०५/२०२५ वारस दाखला अर्ज नंबर ७९/२०२५**

**सटाणा येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात...**

**१) श्रीमती वैशाली सुधीर महाजन**, वय ३४ वर्ष **२) चि. हार्दिक सुधीर महाजन**, वय ६ वर्ष अर्जदार नं. २ ची अ. पा. क. अर्जदार नं. १ **३) श्रीमती मिराबाई पंढरीनाथ महाजन,** ६० वर्ष सर्वाचा धंदा शेती सर्व रा. निकवेल ता. बागलाण, जि. नासिक. **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** **सा. वाला.**

कारणे सदरचे जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ चे वडील तसेच अर्जदार नं. ३ चा मुलगा नामे **सुधीर पंढरीनाथ महाजन** हे **दि. २७/२/२०२५** रोजी **मौजे निकवेल**, ता. बागलाण, जि. नाशिक येथे मयत झालेले आहेत. मयत **सुधीर पंढरीनाथ महाजन** यांचे मृत्यू पश्चात अर्जदार नं. १ ही पत्नी तसेच अर्जदार नं. २ हा मुलगा आणि अर्जदार नं. ३ ही आई असे कायदेशीर वारस असून अर्जदारांशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांना ते मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे लिगल हेअरशिप सर्टीफिकेट (वारस दाखला) मे. कोर्टाकडून मिळणेकामी दाखल केला आहे. त्याअर्थी वरील अर्जदारांचे मागणी प्रमाणे अर्जदार हे मयत सुधीर पंढरीनाथ महाजन यांचे कायदेशीर वारस अल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्दीनंतर **३०** दिवसांचे आत अगर **दि.२०/६/२०२५** रोजी आपण स्वतः अगर वकीलांमार्फत मे. कोर्टात हजर आपले लेखी म्हणणे दाखल करावे. या मुदतीत कोणाचे काहीएक म्हणणे न आल्यास मे. न्यायालय अर्जदाराचा राहुन योग्य तो पुरावा घेवुन पुढील आदेश करतील व मग त्यानंतर कोणाचे काहीएक ऐकुन घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी. आज **दि.२९/४/२०२५** रोजी माझीसही व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे. (शिक्का)

**सही/- कामगिरी लिपिक** **सही/- सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, प्रथम वर्ग, सटाणा, नाशिक**

---

## चौकशीची जाहीर नोटीस

जावक क्रमांक/०४६/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक, जानकी प्लाज़ा, नाशिक-पुणे रोड, द्वारका सर्कल जवळ, नाशिक. दि.१९/०३/२०२५

एस.आर.एन.क्रमांक NSK/011399/1860/25
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक गोदावरी तीर्थ चॅरिटेबल, नाशिक बाबत।**
**न्यासाचा पत्ता :-** द्वारा- डॉ.जान्हवी मधुकर झांजे, मीथीला, फ्लॅट नं.५, आकाश ब्लॉसम अपार्टमेंट, रामेश्वरनगर, पाईपलाईन रोड, आनंदवली, गंगापूर रोड, नाशिक.
**अर्जदार- जान्हवी मधूकर झांजे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील १ | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | MEMBERSHIP FEE | ७०००.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. ७०००/- मात्र
(अक्षरी रुपये सात हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किवा सर्वेक्षण क्र | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

ब) स्थावर मिळकत: रोख रु.०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १९-०३-२०२५ रोजी दिली.

**सही/-अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक**

---

## टायटल व्हेरीफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक, नाशिक महानगरपालिका हद्दीतील रहिवासी विभागातील समाविष्ट असलेली मौजे **नाशिक शहर** या गांवचे शिवारातील पंचवटी शनिचौक गावठाण परिसरातील स्थावर मिळकत यांसी **सिटी सर्व्हे नंबर ५४०४ ब यांसी क्षेत्र १७०.०६ चौ.मी.** यापैकी खरेदी मालकीचे **क्षेत्र ६६.०० चौ.मी.** व त्यावर सुमारे ३१ वर्षे जुने विटा, माती, दगड, लाकुड यांच्यामध्ये बांधकाम असलेली बांधीव मिळकत यांसी एकुण बांधीव क्षेत्र **१२६.०० चौ. मी.** यांसी म्युनिसिपल **घर नंबर ३०१/४३०३/ओ,** यांसी **इंडेक्स क्रमांक ३०१००४४९** चतुः सिमा रेकॉर्ड ऑफ राईटस् प्रमाणे हि मिळकत **तुषार प्रभाकर मैंद** यांचे मालकीची व कब्जा उपभोगातील असून त्यांनी सदर मिळकतींबाबत आमचे पक्षकारांबरोबर व्यवहार ठरवुन इसार पोटी व्यवहाराची रक्कम स्विकारलेली आहे, त्यामळे सदर मिळकतींचे टायटल तपासणीकामी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द करत आहोत. सबब सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा गहाण, दान, लिन, लिज, मृत्युपत्र, बक्षिसपत्र, अन्नवस्त्र, विसार पावती, साठेखत, करारनामा, विकसन करारनामा, जनरल मुखत्यारपत्र, जामीनकी, जप्ती अगर अन्य प्रकारे हक्क अधिकार, हितसंबंध असल्यास त्यांनी आमचे खालील पत्यावर साक्षांकीत कागदपत्रांनिशी **१० (दहा)** दिवसांचे आत लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून व मिळकतीचा पुढील व्यवहार करण्यात येईल याची नोंद घ्यावी. मुदतीनंतर व परस्पर वर्तमानपत्रात घेतल्या जाणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी, ही टायटल व्हेरिफिकेशन करिता जाहिर नोटीस.

**नाशिक तारीख : ३/०५/२०२५**

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**इकबाल बी. खान, ॲडव्होकेट**
**ऑफिस-बीजे-५, ठक्कर बाजार, बेसमेंट, सिबीएस, नाशिक. मो.नं. ९८२२३९५७१८**

## महत्त्वाचे

### भाजपा शहराध्यक्षपदासाठी अर्धा डझन पदाधिकारी इच्छुक

**नाशिक :** भाजपाच्या नाशिक शहराध्यक्षपदासाठी निवडप्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. पक्षाच्या कोअर कमिटीने अर्धा डझन इच्छुकांची नावे लिफाफ्यात बंद करून प्रदेश नेतृत्वाकडे सुपूर्द केली आहेत. गुरुवारी (दि.१) झालेल्या बैठकीत ही प्रक्रिया पार पडली. पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आणि पर्यवेक्षक विजय चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला सहनिरीक्षक माजी मंत्री सुभाष भामरे, गिरीश पालवे, विजय साने, लक्ष्मण सावजी, आमदार देवयानी फरांदे, सीमा हिरे, आमदार ॲड. राहुल ढिकले आदी पदाधिकारी उपस्थित होते. प्रदेश नेतृत्वाच्या सूचनेनुसार, प्रत्येक कोअर कमिटी सदस्याला तीन इच्छुकांची नावे सुचविण्याचे निर्देश देण्यात आले होते. यानुसार सर्व सदस्यांनी आपापल्या शिफारशी बंद लिफाफ्यात सादर केल्या. आता प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते अंतिम नावाची घोषणा होईल. शहराध्यक्षपदावर कोणाची वर्णी लागते याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

**हे आहेत प्रमुख इच्छुक**

विद्यमान शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांच्यासह अनिल भालेराव, नाना शिलेदार, सुनील केदार, निखिल पवार व पवन भगूरकर ही नावे शहराध्यक्षपदासाठी आघाडीवर असल्याचे समजते. मात्र, ऐनवेळी पक्षश्रेष्ठींनी इच्छुकांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही नावाचा विचार करण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.




### वयाची पन्नास वर्षे पूर्ण झालेल्या पन्नास दाम्पत्यांचा सत्कार

**नाशिक :** सुख-दुःखात एकमेकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत पन्नास वर्षे सुखी संसार केलेल्या ज्येष्ठ दाम्पत्यांचा सत्कार करण्यात आला. लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंच (नाशिक) व अपेक्स वेलनेस हॉस्पिटल, गोविंदनगर यांच्यातर्फे आयोजित या कार्यक्रमात पन्नास दाम्पत्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आयएमए नाशिक शाखेचे अध्यक्ष डॉ. नीलेश निकम, अपेक्स वेलनेस हॉस्पिटलचे पोटविकारतज्ज्ञ डॉ. नितीन बोरसे, कॅन्सर विकारतज्ज्ञ डॉ. शैलेश बोंदर्डे, मंचाचे उपाध्यक्ष बाळकृष्ण दंडगावकर, रमेश डहाळे, देवराम सैंदाणे, जितेंद्र येवले, डॉ. प्रतिभा बोरसे, उषा बोंदर्डे, बी. व्ही. कापडणीस यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. बोरसे म्हणाले, की ज्येष्ठ नागरिक हे समाजासाठी मार्गदर्शकाची भूमिका बजावत असतात. वाढत्या वयासोबत एकमेकांना आधाराची आवश्यकता असते. अशा वेळी सत्कारार्थी दाम्पत्यांचा आदर्श समाजाने घेतला पाहिजे. यावेळी सत्करार्थी ५० दाम्पत्यांना अपेक्स वेलनेस हॉस्पिटलतर्फे विशेष डिस्काउंट कूपन देण्यात आले. जितेंद्र येवले यांनी स्वागत केले. लोकज्योतीचे पदाधिकारी रमेश डहाळे, देवराम सैंदाणे, जितेंद्र येवले, बाळकृष्ण दंडगावकर, भा. रा. सूर्यवंशी, डी. एम. कुलकर्णी, प्रकाश महाजन, बापू अमृतकर, विनोद दशपुते, उत्तमराव कडलग, वैशाली पिंगळे आदींनी विशेष परिश्रम घेतले. आरजे भूषण यांनी सूत्रसंचालन केले. जितेंद्र येवले यांनी प्रास्ताविक केले.

### निफाड होरायझन अकॅडमीत भेटवस्तू वाटप

**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाज संचलित निफाड येथील होरायझन अकॅडमीत महाराष्ट्र व कामगार दिन अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका स्नेहल सोनवणे यांच्या हस्ते सर्व शिक्षकेतर कर्मचारी व सेविकांना भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ शिक्षकेतर कर्मचारी कैलास कोटकर यांनी ध्वजवंदन केले. यावेळी शालेय सेविका रंजना वडघुले व राजू बेंडकुळे यांनी कामगार दिनाचे महत्त्व विशद केले. प्रत्येक आस्थापनांमध्ये सेवकांचा वाटा किती महत्त्वाचा आहे व त्यांना सर्वांनी सन्मानपूर्वक वागणूक दिली पाहिजे हे मुख्याध्यापिका स्नेहल सोनवणे यांनी सांगितले. जयेश ढोमसे यांनी सूत्रसंचालन केले.

# मखमलाबाद रोडवर टोळक्याचा युवकावर हल्ला

## जुन्या वादातून प्रकार; हल्लेखोरांचा शोध सुरू

**पंचवटी : वार्ताहर**

**मखमलाबाद रोडवरील वडजाई मातानगर येथील पेट्रोल पंपावर शुक्रवारी (दि.२) रात्री पाच ते सहा जणांच्या टोळक्याने एका अल्पवयीन युवकावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. मारहाणीत युवक गंभीर जखमी झाला असून, जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.**



रूपेश सुनील काळे (वय १८, रा. स्वामी विवेकानंदनगर, मखमलाबाद रोड, पंचवटी) याने दिलेल्या फिर्यादीवरून रूपेश आणि त्याचा मित्र कृष्णा सुरेश धात्रक (१७) हे दोघे युगंधर पेट्रोल पंपाजवळ येताच भोला रायकर, अभी वाघ, अनिकेत भरत तिडके आणि गणेश सोनवणे तेथे आले. जुन्या भांडणाचा राग मनात धरून या चारही संशयितांनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. भोला रायकर याने त्याच्याकडील तीक्ष्ण हत्याराने कृष्णा धात्रक याच्या उजव्या डोळ्याच्या वर मारून दुखापत केली. कृष्णा धात्रक तेथून आपला जीव वाचवून पळत असताना अनिकेत तिडके आणि गणेश सोनवणे यांनी त्याला खाली पाडून दगडाने मारहाण केली. संपूर्ण घटना पेट्रोल पंपाच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. या मारहाणीत कृष्णा धात्रक गंभीर जखमी झाला आहे. जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार घेत आहे. याप्रकरणी पंचवटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस हवालदार दत्तात्रय शेळके करत आहे.

**टवाळखोरांचा उपद्रव**

गेल्या काही दिवसांपासून मखमलाबाद रोडवरील शांतीनगर, घाडगे मळा, रामकृष्णनगर, स्वामी विवेकानंदनगर आदी भागात टवाळखोरांचा उपद्रव वाढला आहे. तसेच याच भागात चेनस्नॅचिंगच्या घटना नित्याच्याच झाल्या आहेत.

टवाळखोरांकडून भरधाव वेगाने दुचाकी चालवणे, दुचाकीला सायरन बसवून तो वाजवत दुचाकी दामटणे, गाडी रेस करत सायलेन्सरमधून फटाके फोडणे यांसारख्या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तसेच परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

टवाळखोरांचा बंदोबस्त करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

**शांतीनगरला अशा घटना नित्याच्याच**

शांतीनगर परिसरात मार्केट तयार झाले आहे. या भागात भाजीपाला विक्री, नाश्त्याच्या गाड्या, चायनीज गाड्या, फळविक्रेत्यांमुळे या भागात रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. या भागात हाणामारीच्या घटना, गाड्यांची नासधूस आदी प्रकारदेखील अनेकदा घडले आहेत. तसेच चेनस्नॅचिंगच्यादेखील घटना याच ठिकाणी घडल्या असून, या भागातील टवाळखोरांवर वेळीच अंकुश बसविणे गरजेचे आहे. वर्चस्वाच्या वादातून अघटित घटना घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**दहशत माजविण्याचा प्रकार**

शांतीनगर भागात अनेकांकडून वेळोवेळी दहशत माजविण्याचा प्रकार यापूर्वीही घडले आहेत. या भागात मखमलाबाद कॉलनी भागातील काही नागरिक पोटापाण्यासाठी हातगाडे लावून व्यवसाय करतात. त्यामुळे येथील काही टवाळखोरांकडून हातगाडीवर चायनीज तसेच विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांच्या गाड्यांवर जाऊन दादागिरी करण्याचा प्रकारदेखील नित्याचाच झाला आहे. गाड्यांवर खाऊन त्यांना पैसे न देणे, तसेच दर महिन्याला पैसे उकळणे असे प्रकारदेखील घडत असल्याचे काही व्यावसायिकांनी सांगितले.

**स्वामी विवेकानंदनगरमध्येही अशीच परिस्थिती**

मखमलाबाद परिसरातील स्वामी विवेकानंद परिसरात पाण्याची टाकी असून, याठिकाणी परिसरातील काही टवाळखोर मद्यपान करत असतात. त्यांना कोणी बोलायला गेले तर शिवीगाळ, हाणामारी असे प्रकारदेखील घडले आहेत. त्यामुळे या परिसरात पोलिसांनी गस्त वाढविण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# युवकाच्या खूनप्रकरणी संशयिताला पोलिस कोठडी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

नाशिक रोड परिसरातील जेल रोड येथील मोरे मळा भागात मंगळवारी (दि. ३० एप्रिल) रात्री उशिरा दोन तडीपार गुंडांमध्ये झालेल्या भांडणातून एकाचा जागीच मृत्यू झाला आहे. किरकोळ कारणावरून सुरू झालेला वाद क्षणातच हिंसक वळण घेऊन जीवघेण्या हाणामारीत रूपांतरित झाला. धारदार शस्त्राने केलेल्या हल्ल्यामुळे परिसरात खळबळ उडाली असून, याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले आहे.

या घटनेत मृत व्यक्तीचा घटनास्थळीच मृत्यू झाला असून, अजून एक व्यक्ती गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर सध्या स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या हाणामारीमागे जुन्या वादातून वाढलेले मतभेद कारणीभूत ठरले. या प्रकरणात संशयित आरोपी नीलेश पेखळे हा स्वतःहून पोलिसांना शरण गेला. पोलिसांनी त्याला अटक करून बुधवारी (दि. १ मे) न्यायालयात हजर केले. तपासासाठी अधिक वेळ आवश्यक असल्याचे सांगत पोलिसांनी आरोपीची पोलीस कोठडी मागितली. त्यावर न्यायालयाने त्याला ८ मे पर्यंत सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

या घटनेमुळे जेलरोड परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, अधिक तपास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

### मुक्त विद्यापीठात कामगार दिन

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात १ मे हा आंतरराष्ट्रीय कामगार दिन व महाराष्ट्र दिन म्हणून साजरा करण्यात आला. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी बोलताना कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी आंतरराष्ट्रीय कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे महत्त्व विशद केले.

जगाच्या प्रगतीचा प्रत्येक टप्पा हा कामगारांच्या घामाने व रक्ताने सजला असून, महाराष्ट्राने भारत देशाच्या प्रगतीत व वाटचालीत नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सचिव डॉ. संजीवनी महाले, कुलसचिव दिलीप भरड, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, डॉ. जयदीप निकम, डॉ. प्रकाश देशमुख, डॉ. मधुकर शेवाळे, डॉ. सुरेंद्र पाटोळे उपस्थित होते.



# क्रिकेट संघटनेवर खेळाडू पॅनलचा झेंडा

## धनपाल शहा सातव्यांदा चेअरमन

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा क्रिकेट संघटनेच्या चेअरमन व कार्यकारिणी सदस्यांच्या दहा पदांसाठी झालेल्या त्रैवार्षिक निवडणुकीत विद्यमान चेअरमन धनपाल शहा यांच्या नेतृत्वाखालील खेळाडू पॅनलचे सर्व अकरा उमेदवार मोठ्या मताधिक्क्याने विजयी झाले. ३,११२ सभासद व ७६ क्लब मधून एकूण १,३७७ मतदारांनी मतदान केले.

खेळाडू पॅनलचे नवनिर्वाचित चेअरमन व कार्यकारिणी सदस्य. कंसात मिळालेली मते: चेअरमन धनपाल मोतीलाल शहा (१२४३), कार्यकारिणी सदस्य महेंद्र कारभारी आहेर (१२२२), राघवेंद्र जयंतकुमार जोशी (१२११), हेतल खेमचंदभाई पटेल (११६९), जगन्नाथ चंदू पिंपळे (११०३), शिवाजी भीमाजी उगले (१०६४), अनिरुद्ध विनायक भांडारकर (१२३३), निखिल रामनारायण टिपरी (११९७), विक्रांत प्रकाश मते (१२५५), बाळासाहेब उमाजी मंडलिक (१२०५), नितीन सदाशिव धात्रक (१२२४) एकूण सात पदाधिकारी यापूर्वीच बिनविरोध निवडून आले होते. निवडणूक अधिकारी म्हणून मनीष लोणारी आणि असोसिएट्स यांनी काम बघितले.

# गोंदियात आयटकचे राज्य अधिवेशन

## आशा, गटप्रवर्तक संघटनेच्या अध्यक्षपदी राजू देसले

**नाशिक :** आशा, गटप्रवर्तक संघटनेच्या (आयटक) अध्यक्षपदी राजू देसले यांची, तर कार्याध्यक्षपदी वैशाली खंदारे (नंदुरबार) यांची निवड झाली आहे. गोंदिया येथील राज्य अधिवेशनात ही निवड करण्यात आली.

आयटकसह केंद्रीय कामगार संघटनांनी कामगारविरोधी श्रम संहिता कायद्यांविरोधात २० मेस देशव्यापी संप पुकारला आहे. गोंदिया येथील अधिवेशनात कार्यकारिणीची निवड करण्यात आली. त्यानुसार उपाध्यक्षपदी शालूताई कुथे (गोंदिया), ज्योत्स्ना राऊत (वर्धा), विनोद झोडगे (गडचिरोली), सुधीर टोकेकर (अहिल्यानगर), शिवकुमार गणवीर (भंडारा), मुगाजी बुरूड (वाशीम) यांची निवड करण्यात आली. सरचिटणीस मंदा डोंगरे (नागपूर), विजय बचाटे (सांगली) यांची निवड झाली. संघटकपदी प्रफुल्ल देशमुख (अमरावती), नयन गायकवाड (अकोला), रामचंद्र पाटील (गोंदिया) यांची निवड करण्यात आली. सचिवपदी सोनू कोकसे (नागपूर), निकिता नीर (चंद्रपूर), गुली पावरा (नंदुरबार), वसंत पाटील (धुळे), भूमिका वंजारी (भंडारा), विद्यादेवी मंडलवार (गडचिरोली) यांची, तर राज्य कौन्सिल सदस्यपदी दिलीप उटाणे व श्याम काळे यांची निवड झाली.

**अधिवेशनातील ठराव असे**

आशा व गटप्रवर्तकांना शासकीय कर्मचारी दर्जा द्या, आशा कर्मचाऱ्यांना किमान वेतन २४ हजार रुपये द्यावे, गटप्रवर्तकांना ३४ हजार रुपये किमान वेतन द्यावे, आशा व गटप्रवर्तकांना दहा लाखांपर्यंत मदत द्यावी, आशा व गटप्रवर्तकांना राज्यभर एकच गणवेश असावा. दिवाळीला आशा व गटप्रवर्तकांना बोनस द्यावा, १० टक्के जागा जिल्हा परिषद सेवेत रिक्त ठेवा.

प्लास्टिक कचरा संकलन स्पर्धेत

### उत्तमनगर अभिनव बालविकास मंदिर तृतीय

**नाशिक :** महापालिकेच्या वतीने आयोजित स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत कचरा संकलन स्पर्धेत मविप्र संचलित सिडकोतील अभिनव बालविकास मंदिर या शाळेने तिसरा क्रमांक पटकावला.

शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी व पालक यांच्यात प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. तसेच शाळेच्या विद्यार्थ्यांना प्लास्टिक कचरा संकलन. तसेच प्लास्टिक जमा करण्यास सांगण्यात आले होते.

# ईडीची भीती अन् सत्य परिस्थितीत तफावत

## ॲड. उज्ज्वलकुमार चव्हाण : नाशिक वसंत व्याख्यानमाला

**नाशिक : प्रतिनिधी**

मनी लॉन्ड्रिंग म्हणजे काळा पैसा पांढरा करणे. मात्र, हा काळा पैसा ज्यांच्याकडे आहे त्यांना सोडून केवळ सरकार बदलण्यासाठी केलेल्या ईडीच्या कारवाया या कायद्याला धरून नाहीत. कायद्याला धरून जमवलेला पैसा हा मनी लॉन्ड्रिंगमध्ये येत नाही, असे प्रतिपादन ॲड. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी केले.

गोदाघाटावर सुरू असलेल्या वसंत व्याख्यानमालीतील आजच्या (दि. ३) तिसऱ्या दिवशीच्या ज्ञान सत्रात स्व. अशोकराव देशमुख स्मृती व्याख्यानात 'ये ईडी ईडी क्या हैं?' या विषयावर ते बोलत होते.

व्यासपीठावर एम. एस. एल. ड्राइव्ह लाइनचे कार्यकारी संचालक भूषण श्रीधर पटवर्धन, जनरल मॅनेजर हेमंत राख, कुणाल कुलकर्णी आदी उपस्थित होते

ॲड. चव्हाण पुढे म्हणाले की,




ईडी हा शब्द उच्चारल्यावर अनेकांना भीती वाटते. मात्र, पैसा जवळ बाळगणे म्हणजे ईडीची कारवाई होते, हा भ्रम असून, गैरमार्गाने जवळ बाळगलेला पैसा हा ईडीच्या कारवाईला पात्र ठरतो यावर उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, काही मोठ्या शेतकऱ्यांकडे त्यांच्या शेतीतून येणारा पैसा हा प्रचंड मात्र ते जर वेळच्यावेळी इन्कम टॅक्स अर्थात कर भरत असती तर त्यांच्यावर ईडीचे शस्त्र कुणीही उभारणार नाही. मात्र, गैरमार्गाने आलेला पैसा जर कोणी पांढरा करण्याचा प्रयत्न करत असेल तर त्यावर कारवाई करण्याचा अधिकार ईडीचा आहे, असेही त्यांनी सांगितले. या कायद्याची पार्श्वभूमी सांगताना हा कायदा प्रथम अमलीपदार्थ विरोधी कायदा होता असे सांगून अनेक उदाहरणे यावेळी त्यांनी दिली. हा कायदा केवळ हत्यार म्हणून वापरला गेल्याचे अनेक उदाहरणे त्यांनी यावेळी दिली.

व्याख्यानमालेच्या प्रारंभी स्व. अशोकराव देशमुख यांच्यावर आधारित चित्रफीत दाखवण्यात आली.

माजी नगरसेवक तानाजी जायभावे यांच्या हस्ते ॲड. उज्ज्वलकुमार चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. ॲड. चव्हाण यांचा परिचय ॲड. अजय निकम यांनी करून दिला. व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीकांत बेणी यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. आभार प्रदर्शन भूषण काळे यांनी केले.

ॲड चव्हाण यांच्या व्याख्यानानंतर एम.एस.एल. ड्राइव्ह लाइन प्रस्तुत हिंदी गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमात पंकज उधास, गाता रहे मेरा दिल यांसारखी बहारदार गाणी सादर झाली.

**आजचे व्याख्यान**

रविवार, दि. ४ मे रोजी १) सिंहस्थ कुंभमेळा त्र्यंबकेश्वर– नाशिक सन २०२७–२०२८ परिसंवाद. २) कलानंद कथक नृत्य संस्था प्रस्तुत भक्तिधारा, संचालिका संजीवनी कुलकर्णी, डॉ. सुमुखी अथनी.

# जीवनात अध्यात्म महत्त्वाचे

## महंत मानसशास्त्री : व्यापारी बँक वसंत व्याख्यानमाला

**नाशिक रोड : वार्ताहर**

जीवनात धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांची सांगड घालत जीवन व्यतीत करणारा पुरुषार्थी ठरतो. आपण पैसा खूप कमावतो, पण त्याला आध्यात्मिकतेची जोड नसेल तर पैसा ही संपत्ती होईल, पण ती लक्ष्मी होणार नाही. धर्मासोबत अर्थ आणि अर्थासोबत धर्म गरजेचा आहे. त्याची सांगड आयुष्यात योग्य पद्धतीने घालता आली पाहिजे. अन्यथा ते जीवन भरकटत जाते, असे प्रतिपादन सिन्नरचे महंत मानसशास्त्री यांनी केले. नाशिक रोड-देवळाली व्यापारी बँकेतर्फे मुक्तिधाममागील मनपा शाळा क्र.१२५ च्या मैदानावर आयोजित वसंत व्याख्यानमालेत दुसरे पुष्प गुंफताना 'आध्यात्मिक बँकिंग' या विषयावर ते बोलत होते. यावेळी राष्ट्रपती पदकविजेते पोलिस निरीक्षक मधुकर कड, सायकलपटू नलिनी कड प्रमुख पाहुणे होते. महंत मानसशास्त्री म्हणाले, की पैसा गरजेचा असून, तो व्यवहाराचा भाग आहे. पैसा म्हणजे अर्थ हा अध्यात्माचा भाग नाही. अर्थाच्या मदतीने तुम्ही शॉर्टकटने मंदिरातील गर्दी टाळून मूर्तीपर्यंत पोहोचू शकता, पण देवापर्यंत नाही. धार्मिकतेने माणसं उपद्रवी होतात, पण आध्यात्मिक माणूस शांत असतो. धर्म नंतर आहे. पहिला तो माणूस आहे. माणूस जगत आला तर अध्यात्माकडे तो प्रवास करू शकतो. कलियुगात अर्थासाठी मन व मानसिकता विकली गेली आहे, हे दुर्दैव आहे, असेही ते म्हणाले.



सोशल मीडियावर ट्रोल करणारी माणसे ही जास्त करून अर्धवट ज्ञान असलेली असतात. त्याबाबतचे पूर्ण ज्ञान असलेली माणसे जास्त बोलत नाहीत, असेही त्यांनी सांगितले.

# जिल्हा बँक प्रशासकांचा राजीनामा

## राज्य बँकेकडून नवीन प्रशासक नियुक्तीची शक्यता

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा बँकेचे प्रशासक प्रतापसिंह चव्हाण यांनी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा वरिष्ठांकडे पाठविला असून, तो अद्याप मंजूर झालेला नाही. तथापि, त्यांच्या जागी राज्य बँकेचे निवृत्त अधिकारी बाळासाहेब देशमुख यांची प्रशासक म्हणून नियुक्तीची चर्चा आहे.

जिल्हा बँक आर्थिक अडचणीत सापडल्याने शासनाने प्रतापसिंह चव्हाण यांची २० फेब्रुवारी २०२२ रोजी प्रशासक म्हणून नियुक्ती केली. नियुक्तीनंतर त्यांनी वसुलीसाठी प्रयत्न केले. त्यांच्या कार्यकाळात साधारणतः वीस ते पंचवीस टक्के वसुलीचे प्रमाण असल्याचे सांगितले जात आहे. वास्तविक पाहता वसुलीचे हे प्रमाण अनेक अडचणींमुळे अपेक्षेइतके नसल्याची चर्चा आहे. असे असले तरी चव्हाण यांनी आपल्या कार्यकाळात कर्मचाऱ्यांबाबत मात्र काही कठोर निर्णय घेतले. सक्तीच्या कर्ज वसुलीबाबत शेतकरी संघटनांचा चव्हाण यांच्या भूमिकेला विरोध राहिला. त्यामुळे काही दिवसांपूर्वी चव्हाण यांनी प्रशासक पदाचा राजीनामाही देऊ केला होता. मात्र, तो स्वीकारण्यात आला नव्हता. तो यावेळी स्वीकारला जाईल का? याकडे लक्ष लागले आहे. यावर्षी त्यांच्या कार्यकाळात २३५ कोटी रुपयांची वसुली झाली.

चव्हाण यांच्या पूर्वी प्रशासक म्हणून अरुण कदम यांच्या सहा महिन्याच्या कार्यकाळात त्यांनी कर्ज वसुलीबाबत कठोर निर्णय घेतल्याने त्यांच्या कार्यकाळात वसुलीचे प्रमाण ३० टक्के इतके होते. मात्र, कर्मचाऱ्यांच्या वाढत्या तक्रारीनंतर प्रशासक पदावरून त्यांना दूर करण्यात आले. चव्हाण यांनी २४ एप्रिल रोजी ईमेलद्वारे आपल्या प्रशासक पदाचा राजीनामा पाठवल्याचे सांगितले जात आहे. त्यांच्या जागेवर बाळासाहेब देशमुख यांची प्रशासक म्हणून नियुक्ती होणार असल्याची चर्चा आहे. ते राज्य बँकेच्या सेवेतून निवृत्त झाले आहेत.




**वसुलीला स्थगितीमुळे बँक आणखी अडचणीत**

जिल्हा बँकेने कर्ज वसुलीला तीन महिने स्थगिती दिली आहे. यामुळे बँकेची वसुली पूर्णपणे ठप्प झाली आहे. त्यातच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतलेल्या बैठकीत कर्ज व्याजाचे जे प्रमाण ठरवून दिले त्यामुळे बँकेला ८०० कोटींचा तोटा होणार असल्याचे बोलले जात आहे. अशा परिस्थितीत बँक वाचणे अवघड आहे, त्यामुळे भविष्यात बँक जर बुडाली तर आपल्यावर ठपका येऊ नये, यामुळे चव्हाण यांनी राजीनामा दिल्याची चर्चा आहे. तर अजित पवार यांनीच चव्हाण यांच्या एकूणच कामकाजाच्या पद्धतीवर नाराजी व्यक्त केली होती.

# अंजनेरीत साकारतेय ध्यान केंद्र

**नाशिक :** आत्मा ते परमात्मा या अंतर्मुख प्रवासात ध्यान, मौन आणि आत्मचिंतन यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या आत्मिक साधनेचा अनुभव अधिक सखोल व प्रभावी व्हावा, यासाठी नाशिकजवळील अंजनेरी येथे पासग विहार फाउंडेशनतर्फे भव्य ध्यान केंद्र उभारले जात आहे.

साडेबारा एकराच्या विस्तीर्ण परिसरात साकार होणाऱ्या या केंद्राचा शिलान्यास सोहळा नुकताच झाला. जैन समाजाच्या पुढाकाराने साकारत असलेले हे केंद्र सर्वधर्मीयांसाठी खुले आहे. सर्वसामान्यांनाही आत्मशांती व अंतर्मुखता साधता यावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. पौराणिक काळापासून अंजनेरीला ध्यानासाठी विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. श्री हनुमानाच्या जन्मापूर्वी त्याची माता अंजनी यांनी याच स्थळी तपश्चर्या केली होती. अंजनेरीच्या डोंगररांगांमध्ये अनेक प्राचीन गुहा असून, त्या ध्यानधारणेची साक्ष देतात. विशेष म्हणजे, येथील एका गुहेत अडीच लाख वर्षे जुनी भगवान शांतिनाथांची मूर्ती आजही अस्तित्वात आहे. या ऐतिहासिक, धार्मिक व नैसर्गिक वारशामुळे अंजनेरीची निवड ध्यान केंद्रासाठी करण्यात आली आहे.

# सामाजिक बदलाची सुरुवात स्वत:पासून करा : वालावलकर

**नाशिक रोड : वार्ताहर**

सोशल मीडिया हा समाजाचा आरसा आहे. समाजातील चांगल्या-वाईट घटना यातून आपल्याला बघायला मिळतात. चांगले-वाईट परिणाम आपल्या निदर्शनास येतात.

आज तंत्रज्ञानाच्या युगात माणूस मात्र तंत्रज्ञानाचा गुलाम बनत आहे. तंत्रज्ञान आपल्यासाठी आहे; आपण त्याच्यासाठी नाही. पैशाचा हव्यास वाढल्याने पैसा मिळविण्यासाठी व श्रीमंतीचे



प्रदर्शन करण्याची स्पर्धा निर्माण झाल्याने जीवनात पैसा असूनही मनुष्य आज समाधानी नाही. त्यातूनच गुन्हेगारी वाढत आहे, असे प्रतिपादन नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर यांनी केले.

नाशिक रोड- देवळाली व्यापारी सहकारी बँकेच्या मुक्तिधाममागील मनपा शाळा क्र. १२५ च्या मैदानावर वसंत व्याख्यानमालेत 'बदलते सामाजिक भान' या विषयावर त्या बोलत होत्या.

आज एकत्र कुटुंबपद्धती राहिलेली नसल्याने कुटुंबात होणाऱ्या संस्कारास आजोबा-आजींच्या गप्पांतून बालमनावर होणारे संस्कार लुप्त पावत आहेत. माता-पित्यांना मुलाशी बोलण्यास, संवाद साधण्यास वेळ नाही. त्यामुळे मुले एकाकी पडली आहेत. ज्येष्ठ व्यक्ती वृद्धाश्रमात गेले आहेत. तेही एकाकी जीवन जगत आहेत.

सामाजिक भान बदलण्यासाठी स्वत:पासूनच सुरुवात करायला हवी, असेही त्यांनी सांगितले. स्व. उत्तमचंद चोरडिया स्मरणार्थ उपस्थित श्रोत्यांमधून काढलेल्या लकी ड्रॉमध्ये नंदलाल जैन, सदाशिव धुर्जड व विनायक पवार यांना बक्षिसे मिळाली.

## महत्त्वाचे ▶▶▶▶




### मनमाडला कामगार दिनानिमित्त भव्य रॅली

**मनमाड : प्रतिनिधी** जागतिक कामगार दिन व संयुक्त महाराष्ट्र दिनानिमित्त मनमाड सीटू कामगार संघटनेतर्फे सीटू कामगार भवन, भारतरत्न मौलाना आझाद हॉल येथून भव्य कामगार रॅली काढण्यात आली. मनमाड नगरपालिकेतील नॅशनल रेल्वे मजदूर युनियन, रेल्वे वर्कशॉपमधील कामगार, रेल्वे मालधक्का माथाडी कामगार, आशा स्वयंसेविका, रेल्वे सिलिपर कंपनी, गॅस बॉटलिंग कंपनी, बांधकाम कामगार यांसह कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकात्मता चौकात रॅलीचे सभेत रूपांतर झाले. यावेळी कॉ. अंबादास निकम, कॉ. विजय दराडे, कॉ. रमेश केदारे, कॉ. रामदास पगारे, कॉ. शबरीश नायर, कॉ. सतीश गांगुर्डे, कॉ. प्रवीण बागूल यांची भाषणे झाली. कॉ. कमलाकर पगारे, कॉ. अशोक आहिरे, कॉ. भाऊसाहेब गंभीरे, कॉ. दीपक खरे, कॉ. बलदीप परदेशी, कॉ. कांचन गायकवाड, नीलेश शिंदे, कॉ. अजय पगारे, कॉ. विजय कांबळे, कॉ. संजय सावंत, कॉ. अनिल जगताप, कॉ. अविनाश वानखेडे, कॉ. गोरख फोडसे, उषा उगलमुगले, मनीषा दराडे, नलिनी लोधे, सुनीता दिवे, पूनम दराडे, कॉ.काळू माळी, आशा गायकवाड, गीता कदम, दत्तू सुपनर, निवृत्ती शिंदे, इंतियाज मन्सुरी यांसह मनमाड सीटू संलग्न कामगार संघटनेचे कामगार सभासद उपस्थित होते.



### ओझरला जातनिहाय जनगणनेचे स्वागत

**ओझर : वार्ताहर** भारतीय जनता पार्टीतर्फे ओझर शहर मंडलामध्ये राजे श्री शिवछत्रपती चौक, अहिल्याबाई होळकर चौफुली, सायखेडा रोड, ओझर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जातनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली. या घोषणेचे स्वागत करून जल्लोष करण्यात आला. जनगणनेमुळे प्रलंबित असलेला प्रश्न निकाली काढण्यात आला. या गोष्टीचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात आले. ओझर भाजपातर्फेही जल्लोष व मिठाई वाटपाचा कार्यक्रम झाला. ओझर शहर मंडल अध्यक्ष संतोष सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. यावेळी ज्येष्ठ भाजपा नेते डॉ. एन. के. पाटील, लुटुरसिंग वर्मा, कैलास कोटकर, सचिन अग्रवाल, शरीफ खाटीक, संकेत फुलदेवरे, योगेश चौधरी, रावसाहेब शिंदे, रामनाथ पल्लाळ, रूपेश लुंगे, कुवरसिंग मौर्या, आशिष महाडिक, रवींद्र घोडके, राजेंद्र आहेर, ओझर शहर भारतीय जनता पार्टीचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

### एन्झोकेम विद्यालयात महाराष्ट्र दिन

**येवला : प्रतिनिधी** येथील सेनापती तात्या टोपे शिक्षण प्रसारक मंडळ संचालित एन्झोकेम विद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयाचे प्राचार्य दत्तकुमार उटवाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यालयाचे उपक्रमशील शिक्षक सतीश विसपुते यांना शिक्षकांसाठी उत्कृष्ट शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल संस्थेचे सरचिटणीस सुशील गुजराथी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सत्कार समारंभाचे वाचन व नियोजन विशाल कळमकर, आसावरी जोशी, रामेश्वरी शिंदे, पुष्पा कांबळे, सुनील कोटमे यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहासिनी शिंदे यांनी केले. शीतल शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी सतीश विसपुते, रमेश माळी, प्रकाश सोनवणे, सारिका चौधरी, सुरेखा गिरासे, सरस्वती नागपुरे, वीणा पराते, अंकुश ललवाणी, मारुती माळी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला उपप्राचार्य कैलास धनवटे, पर्यवेक्षक अनिल शेलार, उच्च माध्यमिक विभागप्रमुख कैलास पाटील उपस्थित होते.

## निधन वार्ता

### शंकर महाले



**देवळा : प्रतिनिधी** राज्य परिवहन महामंडळाचे सेवानिवृत्त कर्मचारी शंकर पोपट महाले (वय ६७) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. वाजगाव येथील हभप बाळासाहेब महाले यांचे ते बंधू, तर नाशिक येथील प्रवीण महाले, रवींद्र महाले यांचे वडील होत.

### निवृत्ती जुन्नरे



**नाशिक : प्रतिनिधी** जेल रोड येथील रहिवासी, सेवानिवृत्त प्राथमिक मुख्याध्यापक निवृत्ती बाबूराव जुन्नरे (वय ९५) यांच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, जावई, सुना, नातवंडे व पणतू असा परिवार आहे. सुनील व शेखर जुन्नरे यांचे ते वडील होत.

### राधाबाई भावसार



**नाशिक रोड : वार्ताहर** सिडकोतील वृंदावननगर येथील रहिवासी श्रीमती राधाबाई भावलाल भावसार (वय ९७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. भावसार क्षत्रिय समाज सिडको नाशिकचे सचिव राजेंद्र भावसार यांच्या त्या मातोश्री होत.

### उषा कुलथे



**नाशिक रोड : वार्ताहर** नाशिक रोड वृत्तपत्र विक्रेता सेवाभावी संस्थेचे ज्येष्ठ सदस्य अनिल कुलथे यांच्या पत्नी सौ. उषा कुलथे (वय ४६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, जावई, नात असा परिवार आहे.

### मधुकर पगार

**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे निवृत्त प्राचार्य



मधुकर संपत पगार (वय ७७) यांचे अल्प आजाराने निधन झाले. इंग्रजी विषयावर प्रभुत्व असलेले शिक्षक म्हणून त्यांची मविप्र शिक्षण संस्थेत व जिल्ह्यात ख्याती होती. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, जावई, सुना व नातवंडे, असा परिवार आहे.शिवसेना ग्रामीण उपजिल्हाप्रमुख जितेंद्र पगार व सामाजिक कार्यकर्ते धीरज पगार यांचे ते वडील होत.

### लताबाई पगार



**नाशिक: प्रतिनिधी** माजी जिल्हा पोलिस प्रासिक्युटर कै.पोपटराव पगार यांच्या पत्नी श्रीमती लताबाई पोपटराव पगार (८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.त्या सेवा निवृत्त डीशनल एस.पी.राजेंद्र पगार यांच्या मातोश्री आणि ख्यातनाम साखर तंत्रज्ञ वाळू आहेर यांच्या सासूबाई होत्या.

# वाडीवऱ्हे परिसरातील स्टील चोरी अड्ड्यावर छापा

## ८१ लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त



**इगतपुरी : प्रतिनिधी**

नाशिक-मुंबई महामार्गावरील वाडीवऱ्हे पोलीस ठाणे हद्दीतील असलेल्या हॉटेल ओम साई ढाबा प्युअर व्हेज फॅमिली रेस्टॉरंटच्या आडोशाला मोकळ्या जागेत अनधिकृतपणे कंटेनरमधून स्टील उतरवून काळ्या बाजारात विक्री केले जात होते. या काळ्या अवैध धंद्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांना होताच त्यांनी याठिकाणी कारवाई करण्यासाठी विशेष पोलीसपथक तयार केले.

या पोलीस पथकाने रात्री साडेनऊच्या सुमारास राजूर शिवारातील या अवैध धंद्यावर धाड टाकली. या धाडीत पोलिसांनी ८१ लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करत मोठी कारवाई केली. याप्रकरणीविशेष पोलीस पथकातील पोलीस हवालदार शुभम गुरव यांनी वाडीवऱ्हे पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

या धडक कारवाईत निसार अहमद इस्लाम खान (वय ५५, रा. अंबड लिंक रोड, नाशिक), साहेब आलम निसार अहमद खान (वय २६ वर्ष, रा. अंबड लिंक रोड, अजमेरीनगर नाशिक), हरिशंकर कनिकराम विश्वकर्मा (वय २१, रा. ग्राम रिंग्वा, तहसील डुमरियागंज, जिल्हा सिद्धार्थनगर, उत्तर प्रदेश), मोहम्मद जमाल रजा बाबुल्ला (वय १९, रा. छगडीवा, इटवा, जिल्हा सिद्धार्थनगर, उत्तर प्रदेश), सूरज रामभगेलू यादव (वय २३, रा. चनमडी, तहसील पट्टी, जिल्हा प्रतापगड, उत्तर प्रदेश), विश्वजित रामचंदर शर्मा (वय २८, रा. ग्राम बजेठी, तहसील लम्भूआ, जिल्हा सुलतानपूर, उत्तर प्रदेश) यांना अटक करण्यात आली.

या कारवाईमुळे वाडीवऱ्हे पोलीस ठाणे हद्दीतील महामार्गावर याठिकाणी अवैध काटा कोणाच्या आशीर्वादाने जोमाने सुरू होता असा प्रश्न विचारला जात आहे. याठिकाणी बाहेरून आलेल्या गाड्यांमधील स्टील व इतर धातू भरलेले असतात. चालक ते स्टील अवैध काटा असलेल्या ठिकाणी जुन्या शेडमध्ये उतरून घेऊन ते स्टील नाशिक येथे रात्री विकले जाते. सिन्नर येथून मुंबईकडे स्टीलच्या सळया घेऊन निघालेल्या कंटेनरमधून स्टील उतरवताना ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईत दहा लाख रुपये किमतीचा आयशर वाहन (MH १५-JW ०११३) १५ लाख रुपये किमतीचा, एक टाटा कंपनीचा (MH ४६- BB ३५५१) ट्रेलर, ३३ लाख ३३ हजार रुपये किमतीचे स्टीलचे रॉड, १३ लाख ९ हजार रुपये किमतीचे स्टील, ३ लाख ९ हजार रुपये किमतीचे आयशर वाहनातील स्टील, शिडी असा एकूण ८१ लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसपथक करीत आहे.

## संत निवृत्तिनाथ पालखी बैलजोड्यांची निवड निविदेद्वारे

**त्र्यंबकेश्वर :** संतश्रेष्ठ निवृत्तिनाथ महाराज श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर ते श्रीक्षेत्र पंढरपूर आषाढवारी पायी पालखी सोहळा प्रस्थान जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात होत आहे. संत निवृत्तिनाथ महाराज समाधी संस्थानच्या चांदीच्या रथाला जोडण्यासाठी दोन बैलजोडीची निवडप्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी यावर्षी विश्वस्त मंडळाने पारदर्शक पद्धत राबविण्याचे ठरवले आहे. त्याअनुषंगाने विश्वस्त मंडळाने बैलजोडी देण्यास इच्छुकांचे आवेदन मागवले असून, त्यामधून निवड करण्यात येणार आहे.

> संत निवृत्तिनाथांच्या पालखी रथाला जोडण्यासाठी आपल्या बैलजोडीला मान मिळावा, यासाठी सर्वांचीच इच्छा असते. मात्र, निवड करताना कोणावरही अन्याय होणार यासाठी पारदर्शक पद्धतीने निवड करण्यात येत आहे.
> **- ॲड. सोमनाथ घोटेकर,** अध्यक्ष, संत निवृत्तिनाथ संजीवन समाधी मंदिर संस्थान, त्र्यंबकेश्वर

दोन बैलजोडी निवडप्रक्रिया ४ मे रोजी सकाळी ९:०० वाजता संतश्रेष्ठ श्री निवृत्तिनाथ महाराज समाधी मंदिर परिसर, त्र्यंबकेश्वर येथे तज्ज्ञ निरीक्षक व विश्वस्त मंडळाच्या उपस्थितीत काढण्यात येईल. ३ मे रोजी संस्थान कार्यालयात रीतसर अर्ज दिलेल्या बैलजोडींना निवड प्रक्रियेत सहभागी होता येईल. बैलजोडी निवडीचा अंतिम निर्णय ५ मे रोजी सायंकाळी ५ वाजता जाहीर करण्यात येईल. बैलजोडी मालक व चालक हे वारकरी व नम्र असावे, असे आवाहन अध्यक्ष ॲड. सोमनाथ घोटेकर, सचिव श्रीपाद कुलकर्णी, पालखी सोहळा प्रमुख गोकुळ (नवनाथ) गांगुर्डे, श्री संत निवृत्तिनाथ महाराज समाधी संस्थान, त्र्यंबकेश्वर यांनी केले आहे.

संत निवृत्तिनाथ महाराज पालखी सोहळा त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर आणि तेथून पुन्हा त्र्यंबकेश्वर, असा एकूण ४५ दिवसांचा असतो.

संस्थानच्या चांदीच्या रथाला जोडण्यासाठी दोन बैलजोड्या आवश्यक असतात. दिवसेंदिवस बैलजोडी रथाला जोडण्यासाठी इच्छुकांची संख्या वाढते आहे. यावर्षी प्रतिसाद वाढला आहे. त्यादृष्टीने पारदर्शक पद्धतीने निवड करण्याचे विश्वस्त मंडळाने निश्चित केले आहे. पावसाळी दिवस आणि लांबचा पल्ला यासाठी सक्षम बैलजोडी असावी लागते. यासाठी सर्वानुमते निर्णय घेण्यात येणार आहे.



## चांदवड, वडनेरभैरव भाजप मंडळ अध्यक्षपदी नव्या चेहऱ्यांची निवड

**चांदवड : वार्ताहर**

भारतीय जनता पार्टीच्या चांदवड आणि वडनेरभैरव मंडळ अध्यक्षपदासाठी शनिवारी, दि.३ मे रोजी निवडप्रक्रिया पार पडली. चांदवड मंडळ अध्यक्षपदी मनोज शिंदे यांची, तर वडनेरभैरव मंडळ अध्यक्षपदी संदीप काळे यांची निवड करण्यात आली आहे.

निरीक्षक मोहन शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या निवडी करण्यात आल्या.

चांदवड मंडळ अध्यक्षपदासाठी संजय पाडवी (आदिवासी मोर्चा जिल्हाध्यक्ष) यांनी मनोज शिंदे यांच्या नावाची सूचना मांडली. त्यास विठ्ठल आवारे यांनी अनुमोदन दिले.

वडनेरभैरव मंडळ अध्यक्षपदासाठी योगेश ढोमसे यांनी संदीप काळे यांच्या नावाची सूचना केली. त्यास गणेश ठाकरे यांनी अनुमोदन दिले. निवडणूक अधिकारी मोहन शर्मा यांनी दोन्ही अध्यक्षांची नावे अधिकृतपणे घोषित केली. या निवडीच्या वेळी भूषण कासलीवाल, अशोक व्यवहारे, विलास ढोमसे, बाळासाहेब वाघ, निवृत्ती शिंदे, प्रा. सुरेश पाटील, बाळा पाडवी, बाजीराव वानखेडे, गणपत ठाकरे, महेश खंदारे, डॉ. नितीन गांगुर्डे, देवीदास आहेर, पिंटू भोईटे, वर्धमान पांडे, कृष्णा कोकणे, बाळासाहेब माळी, संतोष ढोमसे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## चांदवड कृउबा सभापती जाधव यांच्याविरोधात अविश्वास

**चांदवड : वार्ताहर**

चांदवड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय दगुजी जाधव यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. त्यांच्या विरोधात बाजार समितीच्या १८ पैकी १२ संचालकांनी अविश्वास ठराव दाखल केला आहे. यासंदर्भातील निवेदन नाशिक येथे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना सादर करण्यात आले.



संचालकांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सभापती संजय जाधव यांनी संचालक मंडळाला विश्वासात न घेता कामकाज केले. तसेच त्यांनी यापूर्वी सभापती पदाचा राजीनामा देण्याचा दिलेला शब्दही पाळला नाही, असा आरोप संचालकांनी केला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडे अविश्वास ठरावाचे पत्र सादर करणाऱ्या संचालकांमध्ये शिरीषकुमार कोतवाल, नितीन आहेर, डॉ. सयाजीराव गायकवाड, कारभारी आहेर, विद्यमान उपसभापती डॉ. वैशाली जाधव, मीनाताई शिरसाठ, डॉ. राजेंद्र दवंडे, योगेश ढोमसे, पंढरीनाथ खताळ, विक्रम मरकड, रवींद्र पवार आणि सचिन अग्रवाल यांचा समावेश आहे.

याबाबत बोलताना बाजार समितीचे ज्येष्ठ संचालक आणि माजी आमदार शिरीषकुमार कोतवाल म्हणाले की, बऱ्याच दिवसांपासून सभापती संजय जाधव संचालक मंडळाला विश्वासात घेत नव्हते. त्यांनी राजीनामा देण्याचा शब्द न पाळल्यामुळे नाइलाजाने आम्ही जिल्हाधिकाऱ्यांकडे अविश्वास ठरावाचे पत्र दिले आहे. आणखी काही संचालकही या ठरावाच्या बाजूने सही करतील आणि मतदान करतील. बाजार समितीच्या वर्तुळात येत्या सात दिवसांत या अविश्वास ठरावावर प्रत्यक्ष मतदान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

विधानसभा निवडणुकीत संजय जाधव यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देऊन काँग्रेसचे अधिकृत उमेदवार शिरीषकुमार कोतवाल यांच्या विरोधात प्रचार केला होता. यामुळेही सभापतिपदावर गदा येण्याची शक्यता चांदवडमध्ये चर्चिली जात आहे.

## धान्य व्यापाऱ्याची आठ लाखांची फसवणूक

**विंचूर : प्रतिनिधी**

येथील धान्य व्यापाऱ्याची सोयाबीन विक्री व्यवहारात सुमारे आठ लाख ३६ हजारांची फसवणूक झाल्याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात ठकबाजीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

येथील स्वराज्य ट्रेडर्सचे सुशांत पोपट खुटे यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, देशमाने (ता. येवला) येथील शुभम काळे यांनी त्याच्याकडील सोयाबीनचा ३९०० रुपये प्रतिक्विंटलप्रमाणे व्यवहार ठरला. शुभम काळे याने त्याचा मित्र योगेश जगतापच्या बँक खात्यावर आठ लाख ३६ हजार रुपये ऑनलाइन ट्रान्सफर करण्यास सांगितले. त्यानुसार धान्य व्यापाऱ्याने पैसे पाठविले. मात्र, त्यानंतर शुभम काळे यांनी कोणत्याही प्रकारचा माल न पाठवता उडवाउडवीची उत्तरे दिल्याने व्यापाऱ्याने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब हंडाळ करीत आहेत.

## हाय सिक्युरिटी नंबरप्लेट बसविण्यासाठी पैशाची मागणी

**निफाड : प्रतिनिधी**

राज्य शासनाने वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्यासाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यासाठी संगणकीय प्रणालीतून निर्धारित मूल्य अदा करत अर्ज केल्यावर नेमलेल्या तारखेला नंबरप्लेट वाहनांना बसविण्यात येते. मात्र, अशी नंबर प्लेट बसविण्याचे सर्व खर्च ऑनलाइन भरूनही फिटिंग चार्जेसच्या नावाखाली पैशांची मागणी करून वाहनधारकांची अडवणूक केली जात आहे.

राज्य शासनाने वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्यासाठी दिलेल्या मुदतीप्रमाणे अनेक वाहनधारकांनी त्यासाठीचे शुल्क भरून ऑनलाइन नोंदणी केली आहे. त्या शुल्कात नंबर प्लेट बनविण्याचा व वाहतुकीचा खर्च, तसेच फिटिंग खर्चाचादेखील अंतर्भाव आहे. तसे संगणकीय पावतीवर नमूद आहे. मात्र, तरीदेखील निफाड-नाशिक मार्गावरील अशा नंबर प्लेट वितरणासाठी अधिकृत असलेल्या गणेश होंडा येथील दालनात वाहनांना नंबर प्लेट बसविण्यासाठी आलेल्या वाहनधारकांकडून चारचाकी वाहनांसाठी शंभर, तर दुचाकी वाहनांसाठी पन्नास रुपये आकारले जात आहेत. याबाबत संबंधित वितरण प्रतिनिधीला विचारणा करता, शासनाला हजार रुपये भरतात. मात्र, आम्हाला शंभर रुपये द्यायला तयार नसतात.ऑनलाइन तक्रार करा, नाहीतर काहीही करा. आम्ही फिटिंगचा खर्च घेणारच, असे उत्तर दिले जाते. यामुळे वाहनधारकांत संताप व्यक्त केला जात असून. संबंधित हाय सिक्युरिटी नंबर प्लेट वितरकावर कारवाइची मागणी वाहनधारकांनी केली आहे.

## योगसाधना निरोगी जीवनाची गुरुकिल्ली : प्रा. येवला

**चांदवड : वार्ताहर**

शंभर दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम आणि आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष-२०२५ च्या पार्श्वभूमीवर सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चांदवड यांच्या वतीने सहकारी संस्थांचे पदाधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी चांदवड येथे एका दिवसीय योग शिबिर आयोजित करण्यात आले होते.

चांदवड तालुका देखरेख सहकारी संस्था मर्यादित मार्केट परिसरात झालेल्या या शिबिरात सुप्रसिद्ध योग प्रशिक्षक प्रा. राहुल येवला यांनी प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन केले.

येवला म्हणाले की, योगासने, प्राणायाम, ध्यान आणि मुद्रा यांसारख्या योगिक क्रिया शरीर आणि मन दोन्हीला बळकट करतात. याच्या नियमित सरावाने




रोगप्रतिकारकशक्ती वाढते आणि जीवनशैली अधिक आरोग्यदायी बनते.

शिबिरात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांकडून विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करून घेण्यात आले आणि त्यांना त्याचा सरावही करून घेण्यात आला. या उपक्रमात उपस्थितांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

यावेळी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चांदवड कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच चांदवड तालुक्यातील विविध सहकारी संस्थांचे सचिव, नागरी व ग्रामीण बिगरशेती आणि पगारदार सहकारी संस्थांचे व्यवस्थापक व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात सहाय्यक निबंधक सविता शेळके, नितीन पाटील, चेतन राणे, शुभांगी विसपुते या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. सचिव अरुण जाधव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. दीपक शिंदे यांनी आभार मानले. सहकारी संस्थेच्या कर्मचाऱ्यांनीही कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# आश्रमशाळेतील कन्या कावेरी विवाहबंधनात

**लासलगाव : वार्ताहर**

पिंपळगाव नजिक येथील जय जनार्दन अनाथ आश्रमाची १०६ वी कन्या कावेरी आणि ६९ वा पुत्र स्वप्नील यांचा विवाह अक्षयतृतीयेच्या पावन दिनी झाला. या भावनिक सोहळ्याला खासदार भास्कर भगरे यांनी हजेरी लावून नवदाम्पत्याचे कौतुक केले.

कावेरी ही कै. पोपटराव उगले (पिंपळगाव) यांची मुलगी असून, ती पहिलीत असताना आश्रमात दाखल झाली होती. आश्रमातच तिचे शिक्षण पूर्ण झाले. दुसरीकडे, स्वप्नील पाचवीत असताना आश्रमात दाखल झाला. बारावीनंतर त्याने तांत्रिक शिक्षण घेतले आणि सध्या लासलगाव एमएसईबीमध्ये वायरमन म्हणून कार्यरत आहे.

या दोघांचे संगोपन आणि शिक्षण आश्रमाचे संचालक दिलीप बाबूराव गुंजाळ आणि संगीता गुंजाळ यांनी आश्रमातच केले. दोघेही आता उपवर झाल्याने संस्थापक प. पू. स्वामी वासुदेवानंदगिरी मौनगिरी बहरूपी महाराज आणि माता संगीता गुंजाळ यांच्या आशीर्वादाने त्यांचा विवाह लावण्यात आला.



या विवाह सोहळ्यात लासलगाव-दिडोरी मतदारसंघाचे खासदार भास्करराव भगरे, ह.भ.प. श्याम महाराज गांगुर्डे यांच्यासह आश्रमातील इतर जावई, कन्या आणि वयोवृद्धही उपस्थित होते. याअगोदर आश्रमाने १०५ कन्यांचे आणि ६८ मुलांचे विवाह लावले आहेत.

जय जनार्दन अनाथ आश्रमाचा हा सामाजिक उपक्रम समाजासाठी दीपस्तंभ ठरावा. अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## महत्त्वाचे



### भाजप कामगार मोर्चातर्फे १५० सुरक्षा पेट्यांचे वितरण

**सिडको :** महाराष्ट्र आणि कामगार दिनाचे औचित्य साधत भाजप कामगार मोर्चा, नाशिक महानगरतर्फे माऊली लॉन्स येथे सेवाभावी उपक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात १५० बांधकाम कामगारांना सुरक्षा पेट्यांचे वाटप करण्यात आले. घरगुती महिलांना ओळखपत्राचे वाटप करण्यात आले. यासोबतच कामगारांना विविध शासकीय योजनांची माहिती व मार्गदर्शनही करण्यात आले. या कार्यक्रमात 'पाच लाख कामगार' अभियानाची सुरुवात करत आगामी वर्षभरात पाच लाख कामगारांपर्यंत पोहोचण्याचा संकल्प करण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन भाजप कामगार मोर्चा नाशिक जिल्हाध्यक्ष राहुल आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांनी कामगारांशी संवाद साधत नोंदणीपासून समन्वयापर्यंत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला भाजप प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, निमाचे अध्यक्ष आशिष नहार, भाजप नाशिक शहराध्यक्ष प्रशांत जाधव, सरचिटणीस नाना शिलेदार, युवा मोर्चा अध्यक्ष सागर शेलार आदी मान्यवर उपस्थित होते. प्रदेश उपाध्यक्ष डॉ. तुषार जगताप यांनी 'पाच लाख कामगार' अभियानाची रूपरेषा मांडली, तर शहराध्यक्ष हेमंत नेहेते यांनी अभियान राबवण्याचा संकल्प केला. या उपक्रमात प्रशांत जाधव यांच्या उपस्थितीत सचिन काठे, भावेश पवार, विजय गायकवाड आणि दीपक भागडे यांनी भाजप प्रवेश केला. किरण गाडे यांनी सूत्रसंचालन केले. मनीषा खंडीझोड यांनी आभार मानले.



**सिडको : जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते जिल्हा युवा पुरस्कार स्वीकारताना प्रतीक वडनेरे. सोबत सीमा हिरे.**

### जिल्हा युवा पुरस्काराने प्रतीक वडनेरे सन्मानित

**सिडको :** जागतिक कामगार दिन आणि महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात नाशिक जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते प्रतीक वडनेरे यांना जिल्हा युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रतीक वडनेरे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून असंघटित युवकांना संघटित करून त्यांना रोजगार, शिक्षण आणि सामाजिक सशक्तीकरणाच्या दृष्टीने योग्य दिशा देण्याचे कार्य सातत्याने केले आहे.



### सिडकोत कामगार दिन साजरा

**सिडको :** महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनानिमित्त नाशिकच्या सावतानगर (सिडको) येथे एकत्रित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात शिवसेना उपनेते सुधाकर बडगुजर आणि हर्षा बडगुजर प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सुधाकर बडगुजर यांच्या हस्ते ध्वजारोहण करून झाली. या कार्यक्रमाला गोपी गिलबिले, रवी शेट्टी, डॉ. महेश निकम, रमेश जावरे, बापू जगताप, विष्णू भुरे, नानासाहेब निकम, यशवंत गायकवाड, सुभाष अमृतकर, गंभीर पाटील, गोपीनाथ सोनवणे, सावता मंडलिक, विजय जाधव, अरुण गवते, श्याम महाजन, भरत गायकवाड, अंबादास जाधव, बापू बोरसे, पद्माकर विसपुते, राजेंद्र पवार, रामदास शिंदे, शरद वाघ, पांडुरंग सोनवणे, हरिभाऊ आढाव, भावराव निकम, गणपत ढबाले, साहेबराव पाटील, वसंत चौधरी, दत्तात्रेय पितळे आदी मान्यवर उपस्थित होते.



### 'एसएमआरके'च्या वर्षा आहिरे यांचे यश

**नाशिक :** राज्य शासन, शालेय शिक्षण विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांसाठी आयोजित दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत एसएमआरकेच्या अध्यापिका वर्षा आहिरे यांनी यश मिळविले. त्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. स्पर्धेचे पारितोषिक वितरण विभागीय सचिव अभिनव डोके, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नाशिकचे प्राचार्य अनिल गौतम, अधिव्याख्याता डॉ. सुनील बाविस्कर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या स्पर्धेत एसएमआरके महाविद्यालयातील कनिष्ठ विभागातील भूगोल विषयाच्या अध्यापिका वर्षा आहिरे यांनी इयत्ता अकरावी व बारावी सामाजिकशास्त्रे या गटात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व नऊ हजार रुपये रोख असे पारितोषिक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या यशाबद्दल गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सचिव डॉ. दीप्ती देशपांडे, प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर, उपप्राचार्य डॉ. नितीन सोनगीरकर, डॉ. सुरेश कानडे यांनी कौतुक केले.



### साईनाथनगरला महाराष्ट्र दिन

**वडाळागाव :** साईनाथनगर मित्रमंडळातर्फे साईनाथनगर येथील हनुमान मंदिराच्या पटांगणात महाराष्ट्र व कामगार दिन झाला. निवृत्त विभागीय वनाधिकारी नामदेव नवले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष सुधाकर चोपडे यांनी महाराष्ट्राच्या निर्मितीसंदर्भात माहिती दिली. यावेळी संतोष रेवगडे, शोहेब शेख, वसंतराव गोवर्धने, शब्बीर शेख, संजय बधान, इब्राहिम अत्तार, एकनाथ बाविस्कर, स्वानंद कामल, नितीन खैरनार, अहमद बेग, विद्या नवले, अनिल भगत, श्रद्धा कुलकर्णी, लीला बाविस्कर, तस्मीना शेख, नंदा जगताप, सुनीता क्षत्रिय, निर्मला शिरोळे, श्रेया कामत, मृण्मयी कुलकर्णी आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते. मुजफ्फर सय्यद यांनी स्वागत केले. पुष्पलता चोपडे यांनी सूत्रसंचालन केले. दीपक क्षत्रिय यांनी आभार मानले.

# मान्सूनपूर्व तयारीचा आराखडा सादर करा

## १ जूनपासून सुरू होणार मान्सून नियंत्रण कक्ष

**नाशिक : प्रतिनिधी**

**जून महिन्यात मान्सूनचे आगमन होण्याची शक्यता लक्षात घेता, जिल्हा प्रशासनाकडून संबंधित सर्व विभागांना मान्सून तयारी आराखडा सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.**



जिल्हा प्रशासनाकडून संबंधित विभागांना मान्सूनपूर्व तयारीचे सूक्ष्म नियोजन करत अलर्ट राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. तहसीलदार, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी यांनी प्रत्येक गावनिहाय व तालुकानिहाय आपत्ती व्यवस्थापन आराखडा व पूरप्रमाणित कार्यपद्धती तयार करून त्याची १५ मेपूर्वी आराखडा नमुना सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सर्व विभागांनी आपत्ती व पूर व्यवस्थापन, तसेच घडलेल्या घटनेविषयक अहवाल सादर करण्यासाठी सक्षम नोडल अधिकारी नियुक्त करावा.

१ जून २०२५ पासून २४ बाय ७ आपत्ती नियंत्रण कक्ष सुरू करावे. नियंत्रण कक्षात सक्षम कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे. सर्व विभागांनी विविध क्षेत्रांत मदतकार्य करणाऱ्या संस्थांची यादी तयार करून ठेवावी, पर्यटनस्थळे, धोकादायक ठिकाणे, धरण परिसर, गडकिल्ले यांसारख्या जोखमीच्या ठिकाणांवर आवश्यकतेनुसार नागरिकांसाठी सूचनाफलक, तसेच जाण्यास मज्जाव करणारे फलक लावण्यात यावेत. जाहिरात फलके, बॅनर्स यांचे संरचनात्मक परीक्षण करून धोकादायक फलक, होर्डिंग्ज, बॅनर्स तत्काळ हटविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

मान्सून कालावधीत कार्य करण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता भासते. त्याअनुषंगाने मान्सूनपूर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश तयार करून ठेवावेत. त्यांची जबाबदारी निश्चित करावी. आरोग्य विभागाने आपले अधिनस्त वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका व आवश्यक औषधसाठा याबाबतचे नियोजन करून ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

### धोकादायक वाड्यांवर होणार कारवाई

जिल्हा प्रशासनाकडून संबंधित विभागांना मान्सूनच्या पार्श्वभूमीवर पत्र पाठवत धोकादायक जुने वाडे, घर, इमारती आदींसंदर्भात नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अतिवृष्टीमुळे काझीगडी भाग कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी तेथे राहणाऱ्या नागरिकांचे स्थलांतर, व्यवस्थापन, योग्य त्या उपाययोजना मान्सूनपूर्व करण्यात याव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत.



## विहितगावला ग्रामाभिमान मंचचा स्नेहमेळावा उत्साहात

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

विहितगाव येथे ग्रामाभिमान मंचचा स्नेहमेळावा नुकताच पार पडला. समाजाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून असंख्य घटकांना आपलंसं करण्यात ग्रामाभिमान मंच यशस्वी ठरला याचा अभिमान असल्याचे प्रतिपादन विहितगाव सोसायटीचे चेअरमन शिवाजी हांडोरे यांनी यावेळी केले.

याप्रसंगी नाशिकरोड शिवजन्मोत्सव सोहळा समितीचे माजी अध्यक्ष शिवाजी हांडोरे, महाराष्ट्र माझा परिवाराचे धोंडीराम रायते, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष गणेश गायधनी, प्रा. हेमंत कांबळे, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष संतोष गायधनी, नाशिक पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सुनील पवार, रवींद्र गायधनी, प्रकाश गायधनी, निखिल सातपुते, मनोज गायधनी, ग्रामाभिमान मंचचे प्रवीण गायधनी, रोहित पगार, विकास गायधनी, लक्ष्मण जाधव, नानासाहेब सरोदे, प्रदीप गायधनी, राहुल फडोळ, गणेश आगळे, भास्कर चौधरी, सुनील गायधनी, प्रदीप ढेरिंगे, भारत टिळे, सोहम गायधनी, ओमकार गायधनी आदी सदस्य उपस्थित होते. सुनील आगळे यांनी प्रास्ताविक तर समाधान गायधनी यांनी सूत्रसंचालन केले. प्रमोद गायधनी यांनी आभार मानले.



## जि.प., एसएमबीटीतर्फे कर्करोग तपासणी शिबिर

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग, इंडियन कॅन्सर सोसायटी, एसएमबीटी वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पांढुर्ली प्राथमिक आरोग्य केंद्र येथे सतर्क अभियानांतर्गत गर्भाशयमुख, स्तनाचा कर्करोग, तोंडाचा कर्करोग तपासणी शिबिर घेण्यात आले.

सतर्क अभियान कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांच्या हस्ते ऑनलाइन करण्यात आले. यावेळी एसएमबीटी महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर यांनी महिलांमधील एचपीव्ही व्हॅक्सिनेशन काळाची गरज याबद्दल मार्गदर्शन केले. इंडियन कॅन्सर सोसायटीचे प्रमुख डॉ. प्रसाद राणे यांनी इंडियन कॅन्सर सोसायटीचे योगदान विशद केले. डॉ. अश्विनी देशमुख यांनी शिबिराचा ३० ते ६५ वयोगटातील महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले. एसएमबीटीचे सचिन बोरसे, सहाय्यक जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. दीपक लोणे, सिन्नर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोहन बच्छाव, पांढुर्लीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. लहू पाटील, डॉ. नीलेश बेडीस्कर उपस्थित होते.

## 'कलायतन'च्या कर्मचाऱ्यांचे बडगुजर यांना निवेदन

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

सातपूर येथील कलायतन कार्गो अँड लॉजिस्टिक प्रा. लि. कंपनीतील कर्मचाऱ्यांनी वेतनवाढ, सामूहिक विमा व पेन्शन योजनेच्या मागण्या घेऊन शिवसेना उपनेते सुधाकर बडगुजर यांची भेट घेतली. यावेळी मागण्यांचे निवेदन दिले.



कर्मचाऱ्यांनी निवेदनात वेतनवाढ करार तातडीने करावा, कंपनीने सामूहिक विमा उतरवावा, तसेच कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन योजना लागू करावी, अशा प्रमुख मागण्या केल्या आहेत. याविषयी सुधाकर बडगुजर यांनी सहानुभूतीपूर्वक विचार करत त्वरित कंपनी व्यवस्थापनाशी चर्चा करून योग्य तो तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

या निवेदनावर लहानू गुंबाडे, शांताराम भोई, बाबासाहेब बनसोडे, गौतम पजारे, संतोष घेगडमल, संपन सहाणे, नितीन भस्के, बाबू निपढुंगे, प्रल्हाद भरकर, कोंडाजी गावित, दिनकर बेझेकर, रामेश्वर काळदान, अमोल धादवड, दत्ता आचारी, उत्तम दरोगारे, सुभाष सोहळे, निवृत्ती बेंडकोळी, प्रकाश दिवे, संजय बेंडफोडी, लक्ष्मण रोपले, परशुराम महाले, भास्कर धापोडे, गोरख येलमामे, राजू देवकर, विलास जोनरखने, ज्ञानेश्वर चिल्लारे, श्रावण चहाळे, श्याम हिरे आदी कर्मचाऱ्यांच्या सह्या आहेत.

## गुणवंत कामगारांमुळे ग्राहकसेवेचा दर्जा वाढण्यास मदत : लटपटे

**नाशिक : प्रतिनिधी**



महावितरणच्या सर्व ग्राहकांना अखंडित व सुरळीत वीजपुरवठा देण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेले महावितरणचे तांत्रिक कामगार यांना गुणवंत कामगार म्हणून सन्मानित करताना आनंद वाटत आहे. पुरस्कारामुळे महावितरण व ग्राहकांच्यासुद्धा अपेक्षा वाढणार आहेत. यापुढील काळात ते आणखी गतीने व प्रामाणिकतेने कार्य करून ग्राहक सेवेचा दर्जा आणखी उंचावतील, अशी अपेक्षा मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनी व्यक्त केली. कामगारदिनी विद्युत भवन आवारात आयोजित गुणवंत कर्मचाऱ्यांच्या पुरस्कार वितरणप्रसंगी ते बोलत होते.

महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त नाशिक रोड येथील महावितरणच्या विद्युत भवनाच्या प्रांगणात मुख्य अभियंता लटपटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर नाशिक परिमंडळातील ७१ यंत्रचालक व तंत्रज्ञांचा गेल्या वर्षभरात त्यांनी केलेल्या कामगारांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्प देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सहाय्यक महाव्यवस्थापक महेश बुरंगे, कार्यकारी अभियंता योगेश निकम, राजाराम डोंगरे यांच्यासह अभियंते, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.




## स्टुडंट पोलीस कॅडेट प्रोग्राम उपक्रमांतर्गत शाळांचा सन्मान

**पंचवटी : वार्ताहर**

स्टुडंट पोलीस कॅडेट प्रोग्राम उपक्रमांतर्गत २१ विविध शाळांचे मूल्यमापन करून तीन शाळांची निवड करण्यात आली. त्या शाळांचा महाराष्ट्र दिनानिमित्त सन्मान करण्यात आला.

पोलीस आयुक्त कार्यालयात स्टुडंट पोलीस कॅडेट प्रोग्राम उपक्रमांतर्गत सरकारी शाळांतील इयत्ता आठवी व नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी पोलीस दलाच्या आधुनिकीकरणांतर्गत स्टुडंट पोलीस कॅडेट प्रोग्राम हा देशभरात शालेय शिक्षणासोबत राबविण्यात येत आहे. त्याचा उद्देश शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये चांगले नीतिमूल्य रुजवून जबाबदार नागरिक बनविणे आहे. गुन्ह्यांना प्रतिबंध, रस्ते सुरक्षा व वाहतूक जागरूकता, भ्रष्टाचार निर्मूलन, संवेदनशीलता व सहानुभूती, महिला व बालकांची सुरक्षितता, समाजाचा विकास, दुष्ट सामाजिक प्रकृती-प्रवृत्तीस आळा घालणे, नीतिमूल्य, शिस्त, आपत्ती व्यवस्थापन व स्वच्छता, बाह्यवर्ग प्रशिक्षण आदींचे प्रशिक्षण देण्यात येते.

या उपक्रमांतर्गत २१ शाळांचे मूल्यमापन करून मनपा शाळा क्रमांक ८७ मुले, पाथर्डीगाव, नाशिक-प्रथम. मनपा शाळा क्रमांक २८, सातपूर कॉलनी-द्वितीय. मनपा शाळा क्रमांक ७३ मुली, चुंचाळे-तृतीय. या शाळांची निवड करण्यात आली. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापकांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमासाठी पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव, मोनिका राऊत, सहाय्यक पोलीस आयुक्त संगीता निकम, सहाय्यक पोलीस आयुक्त पद्मजा बडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिवाणसिंग, पोलीस हवालदार सचिन जाधव, मुख्याध्यापक दीपक मानकर, मुख्याध्यापिका रेखा मोरे, छाया गोसावी, शिक्षक सुरेश खांडबहाले, निलांबरी वेदपाठक, पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

## बापू उपाध्ये स्मृती पुरस्कार लक्ष्मीकांत वाघवकर यांना प्रदान

**नाशिक : प्रतिनिधी**

बापू उपाध्ये स्मृती पुरस्काराने लक्ष्मीकांत वाघवकर यांचा नुकताच सन्मान करण्यात आला. मेरीच्या इंजि. पां. कृ. नगरकर सभागृहात हा कार्यक्रम झाला.



**बापू उपाध्ये पुरस्कार सोहळ्यात डॉ. संजय बेलसरे यांच्या हस्ते मानपत्र स्वीकारताना लक्ष्मीकांत वाघवकर. समवेत सुधा माळी, अविनाश लोखंडे, शहाजी सोमवंशी, वाघवकर कुटुंबीय, प्रकाश भामरे, राजेंद्र शुक्ला, देवगडे व विठ्ठल देशपांडे.**

बापूसाहेब उपाध्ये यांच्याकडून समाजपरिवर्तन केंद्राच्या माध्यमातून सुरू झालेल्या वाघाडवरील पाणी वापर संस्थेचे काम केवळ राज्यासाठीच नाही तर संपूर्ण देशासाठी उत्कृष्ट असा वस्तुपाठ आहे. त्यांच्या पश्चात भरत कावळे यांनी हे काम पुढे सुरू ठेवले होते. परंतु, त्यांच्या निधनानंतर लक्ष्मीकांत वाघवकर यांनी ती धुरा समर्थपणे पेलली, असे गौरवोद्गार जलसंपदा विभागाचे सचिव डॉ. संजय बेलसरे यांनी काढले.

लक्ष्मीकांत वाघवकर यांना रु. २१ हजार रुपये व मानपत्र, शाल, श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी रंजना वाघवकर यांचाही सन्मान करण्यात आला. जलसंपदा विभागाचे निवृत्त सचिव प्रकाश भामरे, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे निवृत्त कार्यकारी संचालक राजेंद्र शुक्ला यांनीही विचार व्यक्त केले. संस्थेचा परिचय कुमार औरंगाबादकर यांनी करून दिला. पुरस्काराविषयी भूमिका विठ्ठल देशपांडे यांनी विशद केली. अविनाश लोखंडे यांनी सूत्रसंचालन केले. सुधा माळी यांनी आभार मानले. कार्यक्रमास मेटाचे मुख्य अभियंता देवगडे, कडाचे निवृत्त अधीक्षक अभियंता महेंद्र आमले, वाघाडचे शहाजी सोमवंशी, रामनाथ वाबळे, पालखेड कालवा विभागाचे अभियंता भागवत, मुक्तेश्वर मुनशेट्टीवार उपस्थित होते.

# बाळासाहेब ठाकरे स्मृती पुरस्कारांचे शिवसेनेतर्फे वितरण

**नाशिक : प्रतिनिधी**

**शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचे वितरण नुकतेच करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना उपनेते विजय करंजकर होते.**



प्रमुख अतिथी म्हणून शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, खासदार भास्कर भगरे, शिक्षक आमदार किशोर दराडे, सहसंपर्कप्रमुख राजू लवटे, महानगरप्रमुख प्रवीण तिदमे, भगूरच्या माजी नगराध्यक्षा अनिता करंजकर, शिक्षक नेते शिवाजीराव निरगुडे, नानासाहेब देवरे उपस्थित होते. समितीतर्फे मान्यवरांचा शाल, बुके, पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. दिल्लीच्या मराठी साहित्य संमेलनात कविता सादर करणाऱ्या कवी राजेंद्र सोमवंशींचा सन्मान करण्यात आला.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास जिल्हाभरातून मुख्याध्यापक, संस्थाचालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, एनडीएसटीचे सर्व संचालक मंडळ, आश्रमशाळेचे कर्मचारी तसेच शिक्षक नेते बाळासाहेब ढोबळे, छोटू शिरसाठ, शांताराम देवरे, अनिल देवरे, विलास झोले, गुलाबराव भामरे, डी. यू. अहिरे, किशोर जाधव, एस. बी. शिरसाठ, नीलेश ठाकूर, बबनराव चव्हाण, रघुनाथ गायकवाड, रामदास गडकरी, संजय पाटील, एन. एन. खैरनार, समीर जाधव, रामराव बनकर, बी. आर.पाटील, एम. आर. जाधव, विलास जाधव, गंगाधर पवार, चंद्रशेखर सावंत, विजय पाटील, संजय मगर, दीपक ह्याळीज, दगडू तेलोरे उपस्थित होते. संदीप थाटश्रींगार यांनी स्वागतगीत सादर केले. प्रास्ताविक कार्यक्रमाचे संयोजक संग्राम करंजकर यांनी केले. साहेबराव कुटे यांनी आभार मानले.

### यांना मिळाले पुरस्कार

जीवन गौरव सुधाकर साळी, आदर्श संस्था निफाड तालुका एज्युकेशन सोसायटी पिंपळगाव बसवंत, उपक्रमशील मुख्याध्यापक ठगन पवार, गोरख निकम, निर्मला शिंदे, मनीषा विसपुते, विजय चव्हाण, परवेज अहमद अन्सारी, वंदना अरसुळे, तर इतर पुरस्कारांत प्रवीण गायकवाड, शैलेश पाटोळे, केदाभाऊ महिरे, विनायक लाड, ह.भ.प. रमेश सोनवणे, अरुण पवार, मोहिनी भगरे, दिलीप पागेरे, सुरेश सलादे, मुक्ता गायकर, संजय बच्छाव, संगीता वाणी, काशीनाथ अहिरे, किशोर राजगुरू, संजय जोशी, नवनाथ वाकचौरे, संगीता सोनार, प्रशांत जाधव, अरुण देवरे, विजय सोनार, संजय वाघ, ज्योती पाटील, गणेश गुजर, लियाकत खान पठाण, नितीन सोनवणे, संगीता पगार, राजेंद्र गिते, माणिक बागूल, राजेंद्र नहार, योगेश पगार, रंजना निकम, सुनीता सदगीर, बाळासाहेब बेरगळ, तर विशेष पुरस्कारांत महेंद्र पवार, हर्षदा सोनवणे, कीर्ती पाटील, सुवर्णा पगार, प्रा. केदा सोनवणे, कैलास अहिरे, राजेंद्र गांगोडे, अब्रार मणियार, चंद्रशेखर ओहोळ, गणेश चंद्रमोरे.



वाडीवऱ्हे परिसरातील स्टील चोरी अड्ड्यावर छापा
पान ६

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी



आश्रमशाळेतील कन्या कावेरी विवाहबंधनात पान ६

■ gavakari.in ■ gavkarinews.com
नाशिक, रविवार, दि. ४ मे २०२५

# सिंहस्थ कुंभमेळाप्रकरणी राज्य शासनाची उदासीनता

## विकासकामे कधी होणार : महंत भक्तिचरणदास यांचा सवाल

**नाशिक : प्रतिनिधी**

**सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाची राज्य शासनाने फक्त घोषणा केली. साधुग्राममध्ये जमिनीचे अधिग्रहण कायमस्वरूपी करण्याची गरज आहे. मात्र, याप्रकरणी राज्य शासन पुरते उदासीनता दिसत आहे, अशी नाराजी आखाडा परिषदेचे प्रवक्ता महंत भक्तिचरणदास महाराज यांनी केली आहे.**




नाशिक प्रशासनासमवेत बैठक झाली असता, त्यावेळी सिंहस्थासाठीची आवश्यक कामे तत्काळ करावीत. प्रशासनाच्या काय बैठका होत आहेत याबाबत काहीही माहीत नाही. मात्र, सिंहस्थासाठीचे काम कुठेही दिसत नाही. उज्जैन येथे नाशिकनंतर कुंभमेळा असून, तेथे आतापासूनच तेथील राज्य शासनाकडून जोरदार तयारी सुरू आहे. मात्र, नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्याबाबत राज्य शासनाचा कारभार ढिसाळ दिसत आहे. त्र्यंबकेश्वर व नाशिकमध्ये कुठल्याही हालचाली होताना दिसत नाही. मोठी विकासकामे असल्याने प्रशासनाने वेळेत ही कामे करण्याची आवश्यकता आहे, असे महंत भक्तिचरणदास यांनी म्हटले.

दरम्यान, शहरातील साधू-महंतांसमवेत महापालिकेत जिल्हाधिकारी जलज शर्मा व मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी बैठक घेत त्यांच्या मागण्या व सिंहस्थाबाबतचे मत जाणून घेतले होते. त्यावेळी आखाड्यांना योग्य जागा मिळावी, सर्व आखाडे, खालसे प्रमुख आणि सार्वजनिक संस्थांना यापूर्वीचा गर्दीचा अभ्यास करून नियमानुसार जागा उपलब्ध करून देणे. मंदिर परिसरात सुविधा, शहरातील सर्व मंदिरे परिसराजवळ कायमस्वरूपी स्वच्छतागृहे, कचरा व्यवस्थापनाकरिता डस्टबिन आणि साधूंसाठी निवासी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. सिंहस्थासाठी कायमस्वरूपी पाचशे एकरची जागा उपलब्ध करून द्यावी. सोबतच सिंहस्थ प्राधिकरणात साधू-महंतांचाही समावेश असावा, अशी मागणी विविध आखाड्यांच्या साधू-महंत, मंदिरांच्या विश्वस्तांनी महापालिका प्रशासनाकडे केली. पण याप्रकरणी अद्याप राज्य शासनाकडून कुठलीच हालचाल झाली नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. शासनाने तत्काळ सिंहस्थ आराखडा मंजूर करून सिंहस्थाची कामे करावीत.

> प्रयागराज येथे ६५ कोटी भाविकांनी उपस्थिती लावली. नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यात दहा ते पंधरा कोटी भाविक येण्याचा अंदाज आहे. त्यादृष्टीने शासनाने गर्दीचे नियोजन होणे अपेक्षित आहे. साधुग्रामसाठी कायमस्वरूपी जागा संपादित करण्याची अपेक्षा असून, याप्रश्नी कुठलाही निर्णय शासनाकडून होत नसून, तत्काळ यावर मार्ग काढावा.
>
> – **महंत भक्तिचरणदास महाराज,** प्रवक्ते, आखाडा परिषद

# चैत्रोत्सवात एसटीला सुमारे दोन कोटींचे उत्पन्न

## सप्तशृंगीदेवी पावली; चार लाख प्रवाशांनी केला प्रवास

**नाशिक : प्रतिनिधी**

चैत्र पौर्णिमेनिमित्त सप्तशृंगगड येथे मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी भेट देतात. राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागातर्फे भाविक प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून जादा बसेस सोडण्यात आल्या होत्या.

या यात्रोत्सव काळात ५ ते १३ एप्रिलदरम्यान २५० जादा बसेसचे नियोजन केले होते. यातून एक कोटी ८५ लाख ८ हजार ९०० रुपये उत्पन्न मिळाले आहे. तीन लाख ८४ हजार ३९४ प्रवाशांनी प्रवास केला. त्यात ज्येष्ठ नागरिक १६ हजार ९२६ होते. ३८ हजार १५५ महिला, तर लहान व प्रौढ १४ हजार २२६ जणांनी सवलतींसह प्रवास केला. २४८ बसेसद्वारे नऊ हजार ३३ फेऱ्या



करण्यात आल्या, अशी माहिती विभागीय वाहतूक अधिकारी किरण भोसले यांनी दिली. नाशिक ते सप्तशृंगगड, मनमाड ते सप्तशृंगगड, मालेगाव ते सप्तशृंगगड, नांदगाव ते सप्तशृंगगड (साधी सेवा) याप्रमाणे फेऱ्या मारण्यात आल्या. याशिवाय, नांदगाव ते सप्तशृंगगड मार्गावर १२० बसेस, तर नाशिक, मालेगाव, मनमाड व सटाणा येथून अनुक्रमे ६५, ४५, १५ व पाच बसेस सोडण्यात आल्या होत्या. यात्रोत्सव काळात प्रवाशांना सुविधा पुरविण्यात आल्या होत्या.



# जातनिहाय जनगणनेचे श्रेय राहुल गांधींना : छाजेड

## काँग्रेस ओबीसी विभागातर्फे जल्लोष

**नाशिक : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेचा जो निर्णय घेतला त्याचे संपूर्ण श्रेय काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे आहे, असे प्रतिपादन काँग्रेसचे शहराध्यक्ष ॲड. आकाश छाजेड यांनी केले.

काँग्रेस ओबीसी विभागातर्फे जातनिहाय जनगणनेच्या निर्णयाबद्दल जल्लोष करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. गेल्या काही वर्षांपासून खासदार राहुल गांधी यांनी जातनिहाय जनगणना व्हावी, अशी मागणी लावून धरली होती. या देशात ज्यांची जेवढी संख्या तेवढी त्यांची भागीदारी ही संकल्पना घेऊन राहुलजींनी संसदेतही व संसदबाहेर रस्त्यावरील लढाई लढली, असे छाजेड म्हणाले.

शहर काँग्रेस ओबीसी विभागाचे अध्यक्ष गौरव सोनार यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे भरून जल्लोष केला. याप्रसंगी माजी नगरसेवक शाहू खैरे, केशव पाटील, माजी नगरसेवक लक्ष्मण धोत्रे, संदीप शर्मा, मध्य नाशिक ब्लॉक अध्यक्ष बबलू खैरे, पंचवटी ब्लॉक अध्यक्ष उद्धव पवार, एनएसयूआयचे जिल्हाध्यक्ष अल्तमश शेख, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष तन्वीर तांबोळी, अनुसूचित जमातीचे अध्यक्ष संतोष ठाकूर, ज्ञानेश्वर चव्हाण, अण्णा मोरे, अनिल बेग, राजकुमार जेफ, डी. पी. बोडके, अब्दुल बावा, जावेद इब्राहिम, भालचंद्र पाटील, सिद्धार्थ गांगुर्डे उपस्थित होते.

# अंबड औद्योगिक वसाहतीत कंटेनरच्या टायरला आग

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

अंबड औद्योगिक वसाहतीतील पाटील ट्रान्सपोर्ट कार्यालयाजवळ आज दुपारी सुमारे बारा वाजण्याच्या सुमारास उभ्या असलेल्या एका मालवाहतूक कंटेनरच्या टायरला अचानक आग लागल्याची घटना घडली. या घटनेमुळे काही काळ परिसरात खळबळ उडाली, मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

आग ही केवळ टायरपुरती मर्यादित राहिल्याने मोठा अनर्थ टळला. आग लागल्याचे लक्षात येताच तातडीने अंबड औद्योगिक वसाहतीतील अग्निशमन विभागाला माहिती देण्यात आली. माहिती मिळताच अग्निशमन पथकाने घटनास्थळी तातडीने धाव घेतली आणि अवघ्या पाच ते दहा मिनिटांत आग आटोक्यात आणली. आग लागल्याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी शॉर्टसर्किट किंवा टायरच्या अतिउष्णतेमुळे ही घटना घडली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. आग कंटेनरच्या मुख्य भागापर्यंत पोहोचली नाही, त्यामुळे मोठ्या आर्थिक नुकसानीपासून बचाव झाला.



ही आग आटोक्यात आणण्यासाठी अंबड औद्योगिक अग्निशमन केंद्राचे सबफायर ऑफिसर सी. एस. पाटील यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तात्काळ आणि योग्य प्रतिसाद दिला. पथकात के. जी. गुघे, चालक एन. एम. सगर, आर. डी. नवगिरे, डी. आर. सोनवणे, पी. के. बहिरम, जी. यू. झोपे, व्ही. एम. भोसले या जवानांचा समावेश होता. त्यांच्या तात्काळ कार्यवाहीमुळे आगीवर नियंत्रण मिळवता आले. घटनेची माहिती संबंधित पोलीस व अग्निशमन अधिकाऱ्यांना देण्यात आली असून, आगीचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू आहे. सुदैवाने जीवितहानी टळल्याने स्थानिकांत दिलासा व्यक्त होत आहे.



# गुणवंत कामगार परिषदेतर्फे फळवाटप

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त काठे गल्ली येथील आश्रय वृद्धाश्रमातील वृद्धांसोबत गुणवंत कामगार कल्याण परिषदेने हितगूज साधून त्यांना फळवाटप करण्यात आले.

यावेळ आश्रय वृद्धाश्रमाचे संचालक चंद्रशेखर कुलकर्णी यांच्या उपस्थितीत गुणवंत कामगार कल्याण परिषदेचे अध्यक्ष देवराम सैंदाणे, सचिव पोपट देवरे, सहसचिव संजीव अहिरे, संजय पवार, सुनील औसरकर, योगेश कापडणीस, प्रशांत कापसे, विलास गोडसे, रामचंद्र शिंदे यांच्या हस्ते वृद्धाश्रमातील वृद्धांना फळवाटप करण्यात आले. गुणवंत कामगार कल्याण परिषदेच्या कार्याबद्दल येथील संचालक कुलकर्णी यांनी कौतुक केले.

# कोयत्याने गंभीर मारहाण प्रकरणातील फरारी आरोपी अटकेत

## गुन्हे शाखा युनिट- २ ची यशस्वी कामगिरी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

जुन्या वैमनस्यातून कोयत्याने गंभीर मारहाण करून दुखापत केल्याच्या गुन्ह्यातील फरारी आरोपीला गुन्हे शाखा युनिट- २ च्या पथकाने अटक केली. ही कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

२५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता सुमारास फिर्यादी हे त्यांच्या पत्नीसमवेत भगूर बसस्टॉपजवळून जात असताना, ओळखीच्या आरोपीने आपल्या साथीदारांसह जुन्या भांडणाच्या कारणावरून लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच आरोपीने जवळ असलेल्या कोयत्याने फिर्यादीच्या डोक्याला व उजव्या हाताला गंभीर दुखापत केली. याप्रकरणी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्यातील मुख्य आरोपी सुनील अशोक भालेराव (वय २३, रा. आनंद रोड, आंबेडकर सोसायटी, देवळाली कॅम्प) हा गुन्हा घडल्यानंतर फरारी होता. गुन्हे शाखा युनिट-२ चे सहाय्यक पोलिस निरीक्षक गुलाब सोनार यांना त्याच्या हालचालींबाबत गोपनीय माहिती मिळाल्यानंतर त्यांनी पथकासह सापळा रचून आरोपीस आनंद रोडवरील गोडसे कॉम्प्लेक्स परिसरातून अटक केली. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

ही कामगिरी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपायुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत तोडकर, सहाय्यक पोलिस निरीक्षक गुलाब



सोनार, पोलिस हवालदार सुनील आहेर, पोलिस अंमलदार प्रवीण वानखेडे, संजय पोटिंदे, प्रकाश महाजन आदींच्या पथकाने केली.

# गर्भवती, बाळ-बाळंतिणींच्या दिमतीला १६१ रुग्णवाहिका

## वर्षभरात ३० हजारांहून अधिक रुग्णांना घरपोच सेवा

**नाशिक : प्रतिनिधी**

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या जननी सुरक्षा कार्यक्रमांतर्गत गर्भवतींच्या सुविधेसाठी राष्ट्रीय रुग्णवाहिका सेवा हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी टोल फ्री क्रमांक १०२ वर संपर्क साधल्यावर रुग्णवाहिका त्वरित उपलब्ध होते. जिल्ह्यात गेल्या वर्षभरात तीस हजारांहून अधिक गर्भवती, बाळ-बाळंतिणींना रुग्णवाहिकांची मोठी मदत झाली आहे.**




एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत ३० हजार ८६९ रुग्णांना घरपोच सेवा देण्यात आली आहे. २१ हजार ५६५ प्राथमिक आरोग्य केंद्रांतील नऊ हजार ३०४ रुग्णांनी जिल्हा रुग्णालयाकडून सेवा घेतली आहे. प्रसूतीसाठी रुग्णालयात आणणे आणि प्रसूतीनंतर बाळ-बाळंतिणीला सुखरूप घरी सोडण्याची सुविधा १०२ या रुग्णवाहिकेमार्फत पुरवली जाते. जिल्ह्यात सध्या १०२ च्या ४९ व ११२ प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या १६१ रुग्णवाहिका उपलब्ध आहेत. जिल्हा रुग्णालयाकडून सर्व ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, महिला रुग्णालय मालेगाव, नाशिक जिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालय मालेगाव अंतर्गत ४९ रुग्णवाहिका आणि जिल्हा परिषद आरोग्य विभागांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रांतील ११२ रुग्णवाहिका कार्यरत आहेत.

जिल्हा रुग्णालय, जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडून जननी शिशु सुरक्षा विभागाकडून १०२ अंतर्गत प्रसूती माता व बालकांना ही मोफत सुविधा दिली जाते.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत निधी प्राप्त होतो. एफएमआर नंबर ५ याअंतर्गत येणाऱ्या निधीच्या माध्यमातून सरकारी रुग्णवाहिकांसाठी आवश्यक दुरुस्ती व सुविधा पुरविण्यात येतात. जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत आदिवासी गटांत नवजात बालकांसाठी शून्य ते एक वर्ष वयोगटातील रुग्णांसाठी २९ रुग्णवाहिकांची दुरुस्ती करण्यात आली आहे.

### रुग्णवाहिकांसाठी निधी मंजूर

एफएमआर क्रमांक ५ अंतर्गत शासनाने सरकारी रुग्णवाहिकांच्या किरकोळ दुरुस्तीसाठी निधी मंजूर केला आहे. एफएमआर क्रमांक २९ अंतर्गत जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत आदिवासी गटात नवजात बालकांसाठी वापरल्या जाणाऱ्या रुग्णवाहिकाच्या इंधनासाठीही निधी उपलब्ध करून दिला आहे. हे निर्णय विशेषत: शून्य ते एक वर्ष वयोगटातील बालकांसाठी रुग्णवाहिका सेवा अधिक प्रभावीपणे उपलब्ध व्हावी, या उद्देशाने घेण्यात आले आहेत. यामुळे ग्रामीण व आदिवासी भागात रुग्णवाहिका सेवा सक्षम होत माता व बालमृत्यू दर कमी करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

## महत्त्वाचे

### इफिशियंट कंपनीत ५.१० लाखांची ऑनलाइन फसवणूक

#### अकाउंट असिस्टंटविरुद्ध गुन्हा दाखल

**सिडको :** अंबड एमआयडीसी परिसरातील इफिशियंट मेथड कंपनीत काम करणाऱ्या अकाउंट असिस्टंटने तब्बल पाच लाख १० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी सध्या फरारी आहे. याप्रकरणी सुनील रामदास पवार (वय ५६, रा. अशोकनगर, सातपूर) यांनी अंबड पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, संशयित आरोपी रवींद्र मिस्तरी (रा. सिडको, नाशिक) याने कंपनीच्या अकाउंट विभागात काम करत असताना, दीप एन्टरप्रायजेस नावाची बनावट संस्था तयार केली. त्यानंतर कंपनीच्या बँक खात्यातून आपली स्वतःची एसबीआय व कोटक महिंद्रा बँकेतील खाती लाभार्थी म्हणून नोंदवून ऑनलाइन पद्धतीने रक्कम हस्तांतरित केली. हा प्रकार ५ ऑगस्ट २०२३ ते ६ ऑगस्ट २०२४ या कालावधीत सुरू होता, असे तपासात उघड झाले आहे. आरोपीने एकूण पाच लाख १० हजार रुपयांचा अपहार केल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी याप्रकरणी भारतीय दंड संहिता कलम ३१६(४), ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सध्या आरोपी फरारी असून, पोलीस निरीक्षक कांरडे व सहाय्यक पोलीस निरीक्षक मुगले यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे.



### अमृतधाम परिसरात महात्मा बसवेश्वर स्मारकाचा लोकार्पण सोहळा

**पंचवटी :** अमृतधाम परिसरातील महात्मा बसवेश्वर चौक येथे साकारण्यात आलेल्या महात्मा बसवेश्वरचे स्मारकाचे लोकार्पण आमदार ॲड. राहुल ढिकले यांच्या हस्ते करण्यात आले. शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने आयोजित महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त महात्मा बसवेश्वर स्मारकाचे लोकार्पण करण्यात आले. बाराव्या शतकात लोकशाहीचा जागर करून समतेचा संदेश देत माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवणाऱ्या महात्मा बसवेश्वरांचे विचार निरंतर जिवंत राहावेत, येणाऱ्या पिढीला त्याची जाणीव व्हावी म्हणून अशा स्मारकाची निर्मिती केल्याचे आमदार ढिकले यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य प्रमोद हिंगमिरे होते. याप्रसंगी माजी नगरसेवक रुची कुंभारकर, माजी नगरसेविका प्रियंका माने, पूनम सोनवणे, धनंजय माने, अरुण लद्दे, भरत गुळवे, प्रमोद हिंगमिरे यांनी मनोगत व्यक्त केले. विलास कारेगावकर यांनी सूत्रसंचालन केले. अनिल कोठुळे यांनी आभार मानले. कार्यक्रमास माजी नगरसेवक उद्धव निमसे, दिगंबर मोगरे, गौरव गोवर्धने, शशिकांत कोठुळे, किरण हिंगमिरे, विलास जंगम, सुनील कारेगावकर, आशिष हिंगमिरे, योगेश लोहारकर, योगेश वाळेकर, उमाकांत गवळी, अनिल नाईक, रवींद्र ज्ञाने, बाळासाहेब वाणी, पंकज वाणी, प्रवीण हिंगमिरे, संतोष प्रमाणे, डॉ. प्रा. अरविंद पाटील, बी. आर. गोरे, अशोक वारीकर, राहुल वाणी, उदय हिंगमिरे, दिगंबर शेटे, बाळकृष्ण लोहारकर, कैलास गिराम, महेश लोहारकर, संतोष कोठुळे आदी उपस्थित होते.

### आनंद नागरी पतसंस्थेचे व्यवस्थापक वर्मा सेवानिवृत्त

**नाशिक रोड :** आर्टिलरी सेंटर रोडवरील आनंद नागरी सहकारी



पतसंस्थेचे व्यवस्थापक दिलीप वर्मा तब्बल ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त झाले. ते पतसंस्थेतील अतिशय प्रामाणिक, कष्टाळू, मेहनती, कामावर नितांत प्रेम असलेले, सेवाभावी वृत्तीने काम करणारे व्यक्तिमत्त्व होते. आनंद नागरी पतसंस्थेच्या विकासात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. आपल्या स्पष्टवक्तेपणाने कामाशी काम व कायदेशीर काम करण्यात ते माहीर होते. त्यांच्या निवृत्तीमुळे संस्थेतील एक अभ्यासू मार्गदर्शक अधिकारी निवृत्त झाला, असे मनोगत आनंद नागरी पतसंस्थेचे चेअरमन महेंद्र धाडीवाल यांनी व्यक्त केले. यावेळी व्हा.चेअरमन मिलिंद चोपडा याच्यासह अजित संकलेचा, प्रकाश कोठारी, डॉ.राजेंद्र मंडलेचा, नंदलाल जैन, चांदमल कोचर, सतीश धाडीवाल, नामदेव आहिरे, इंदिरा वर्मा, प्रतिभा चोरडिया, शीतल शहा आदी संचालक उपस्थित होते.

# वैद्यकीय प्रवेशासाठी आज नीट

**नाशिक : प्रतिनिधी**

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या पदवी स्तरावर प्रवेशासाठी नॅशनल इलिजिबिलिटी कम एन्ट्रन्स टेस्ट (नीट यूजी) परीक्षा आज, दि. ४ मेस दुपारी दोन ते सायंकाळी पाच या वेळेत होणार आहे. वाढत्या तापमानात विद्यार्थ्यांची कसोटी लागणार आहे.


नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) यांच्यातर्फे नीट यूजी २०२५ या परीक्षेसाठी प्रवेशपत्र ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून दिले आहे. ऑफलाइन पद्धतीने पेन व पेपरवर आधारित ही परीक्षा नियोजीत वेळापत्रकानुसार आज होणार आहे. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांवर वेळेपूर्वी उपस्थित राहावयाचे आहे. प्रवेशद्वारावर दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

गेल्या वर्षीच्या पेपरफुटीच्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर यंदा अधिक दक्षता घेतली जात आहे. कोणतीही शंका, गैरप्रकार किंवा फसवणूक आढळल्यास, ती रविवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत अधिकृत संकेतस्थळावर कळविण्याचे आवाहन केले आहे. अशा तक्रारी गंभीरतेने घेण्यात येणार आहेत.दोषींवर पब्लिक एक्झामिनेशन ऑफ अनफेअर मिन्स ॲक्ट २०२४ अंतर्गत कारवाई केली जाणार आहे.

### विद्यार्थ्यांसाठी सूचना

ड्रेस कोडचे पालन करणे आवश्यक., कोणतेही गॅझेट्स, इलेक्ट्रॉनिक उपकरणे सोबत आणू नयेत. ओळखपत्र (जसे की आधारकार्ड, पॅनकार्ड) आणि प्रवेशपत्राची छायाप्रत बाळगावी. गरजेचे छायाचित्र व इतर साहित्य सोबत ठेवावे. उष्णतेपासून संरक्षणासाठी आवश्यक ती काळजी घ्यावी.
विद्यार्थ्यांनी पुरेसे पाणी पिणे, आरामदायक व हवेशीर कपडे परिधान करणे व आवश्यक असल्यास टोपी किंवा छत्री वापरणे, अशा उपाययोजना कराव्यात, असे आवाहनही आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे.

रविवार गांवकरी
# आस्वाद
रविवार, दि. ४ मे २०२५



# भारत-मालदीव संबंध पूर्वपदावर कधी येणार?

भारत आणि मालदीव यांचे संबंध प्राचीन आहे. समुद्री व्यापार आणि परस्पर हितसंबंधांवर आधारित आहेत. हिंद महासागर क्षेत्रात भारतासाठी मालदीवचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भारताच्या शेजारी प्रथम धोरणात मालदीवला विशेष स्थान आहे. परंतु, गेल्या काही महिन्यांमध्ये या संबंधांमध्ये खूप तणाव आला होता. आता नव्या घडामोडींमुळे मैत्रीचा एक नवा अध्याय सुरू होतोय, ही भारतासाठी आणि मालदीवकरिता एक सकारात्मक घडामोड मानली जात आहे.

२०२३ मध्ये मालदीवमध्ये राष्ट्राध्यक्ष निवडणुकीनंतर मुहम्मद मुईझ्झू यांचे सरकार सत्तेवर आले. त्यांच्या प्रचाराचा मुख्य मुद्दा म्हणजे 'India Out' मोहीम होता. मालदीवमधील भारतीय लष्कराच्या उपस्थितीला विरोध दर्शवून त्यांनी भारतीय सैनिकांना माघारी पाठवण्याची भूमिका घेतली. त्यानंतर भारत आणि मालदीवमधील संबंध तणावपूर्ण झाले. याला प्रतिउत्तर म्हणून भारतीय पर्यटकांनी मालदीव भेट स्वतःहून थांबवली आणि मालदीवच्या पर्यटनावर खोल परिणाम झाला तसेच भारतीय सैन्य तांत्रिक कर्मचाऱ्यांनी मालदीवमध्ये असलेल्या दोन हेलिकॉप्टर आणि एका छोट्या विमानाच्या देखभालीचे काम पाहिले होते. त्यांना माघारी बोलावण्याची मालदीवने मागणी केली. परिणामी, भारतानेही संयम दाखवत, मालदीवच्या इच्छेचा सन्मान करत हळूहळू लष्करी उपस्थिती कमी करण्याची प्रक्रिया सुरू केली होती. २६ एप्रिल २०२५ रोजी मालदीवचे परराष्ट्रमंत्री मोझामिल अहमद भारत भेटीवर आले. त्यांच्या या दौऱ्यात भारतीय परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्यासोबत महत्त्वाच्या चर्चासत्रांचे आयोजन झाले. या भेटीमध्ये संरक्षण सहकार्य, विकास भागीदारी, व्यापार, पर्यटन आणि सागरी सुरक्षा या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यावर भर देण्यात आला.

महत्त्वाचे म्हणजे, मालदीवच्या परराष्ट्रमंत्र्यांनी जाहीरपणे म्हटले की, भारत हा मालदीवचा सर्वांत विश्वासू आणि अपरिहार्य भागीदार आहे. त्यांनी असेही स्पष्ट केले की, भविष्यात भारतासोबतचे संबंध अधिकाधिक मजबूत करण्याचा मालदीवचा मानस आहे. ही भूमिका मागील सरकारच्या तुलनेत मोठी सकारात्मक बदलाची चिन्हे दर्शवते.

**भारताची भूमिका : संयम आणि हस्तक्षेप रहित राजकारण**

भारताने मालदीवच्या अंतर्गत राजकारणात थेट हस्तक्षेप केला नाही. त्यामुळे जागतिक पातळीवर भारताची प्रतिमा टिकून राहिली आणि भारताला त्याचा फायदा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर झाला आहे. भारताने मालदीवमध्ये अनेक विकास प्रकल्प सुरू ठेवले आहेत. उदाहरणार्थ, ग्रेटर माले कनेक्टिव्हिटी प्रकल्प - जो भारताच्या मदतीने उभारला जात आहे. हा मालदीवमधील आतापर्यंतचा सर्वांत मोठा पायाभूत सुविधा प्रकल्प ठरणार आहे. याव्यतिरिक्त, भारताने जलवाहतूक, आरोग्य सेवा, पाणीपुरवठा सुधारणा, सौरऊर्जेची वाढ इत्यादी क्षेत्रातही मदत पुरवली आहे. या प्रकल्पांद्वारे परस्परसंबंध वृद्धिंगत होत आहेत. त्याचबरोबर मालदीवच्या अंतर्गत विकासालाही मोठा हातभार लागत आहे. मालदीवचे स्थान हे त्याच्या समोर एक महत्त्व टिकून आहे.

**मंथन**
**समाधान कदम**

हिंद महासागरातील लहानसा द्वीपसमूह असला तरी मालदीवची भौगोलिक स्थिती अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक आंतरराष्ट्रीय सागरी वाहतूक मार्ग मालदीवच्या जवळून जातात.

जागतिक व्यापाराच्या मोठ्या टक्केवारीतून येणारी मालवाहतूक या मार्गावर अवलंबून आहे. त्यामुळेच या भागातील स्थिरता भारतासाठी अत्यावश्यक आहे. भारताचा व्यापाराचा मोठा हिस्सा याच मार्गातून आपला व्यापार करतो. चीनने मालदीवमध्ये वाढवलेली गुंतवणूक आणि कर्जयोजना भारतासाठी नेहमीच चिंतेचा विषय राहिली आहे. अशा परिस्थितीत भारताला मालदीवसोबत सामरिक सहकार्य अधिक बळकट करणे गरजेचे आहे, याची जाणीव भारताला आहे आणि यातूनच नवीन चर्चेद्वारे खुले करण्याचा प्रयत्न भारत सरकारद्वारे अनेक दिवसांपासून चालू होते आणि त्याला सध्या चांगले यश येताना दिसत आहे.

**सध्याच्या चर्चेतील प्रमुख मुद्दे :**

**१) संरक्षण सहकार्य :**

भारत मालदीवच्या सागरी सुरक्षा पायाभूत सुविधांच्या उभारणीत मदत करणार आहे. भारतीय नौदल आणि मालदीवच्या सागरी दलामध्ये संयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातील. याद्वारे दोन्ही देशांमध्ये संरक्षण सहकार्य वृद्धिंगत होण्यास मदत होईल.

**२) विकास सहकार्य :**

नवीन पाणीपुरवठा प्रकल्प, आरोग्यसेवा सुधारणा आणि स्मार्ट सिटी योजना यामध्ये भारत मालदीवला निधी व तांत्रिक सहाय्य देणार आहे. या सहकार्याची मालदीवला नितांत गरज आहे. याद्वारे मालदीवचा विकास होईल व भारत मालदीव संबंध जे खराब झाले आहेत, ते सुधारण्यास मदत होईल.

**पर्यटन आणि आर्थिक सहकार्य**

भारत हा मालदीवसाठी एक प्रमुख पर्यटन बाजार आहे. भारतातून हजारो पर्यटक दरवर्षी मालदीवला जातात; परंतु मालदीवच्या इंडिया आऊट कॅम्पिंगमुळे नाराज झालेल्या भारतीय लोकांनी पर्यटनास अन्य पर्याय शोधले. त्यामुळे मालदीवची पर्यटन अर्थव्यवस्था कोलमडीत आली होती आणि त्यामुळे मालदीवनेदेखील पर्यटन मैत्रीचे हात भारतासमोर पसरविले होते. त्यामुळे पुढील काळात पर्यटन क्षेत्रात संयुक्त विकास योजनेची आखणी केली जाणार आहे.

**सागरी अर्थव्यवस्था**

महासागर आधारित अर्थव्यवस्थेत मच्छीमार उद्योग, सागरी बायोटेक्नॉलॉजी, सागरी ऊर्जेची साधने आदी गोष्टींवरील सहकार्य वाढवण्यावर भर दिला जावा असा प्रयत्न केला जाणार आहे.

**५) सामरिक संवाद :**

द्विपक्षीय संरक्षण संवाद अधिक सशक्त करण्याचे ठरले आहे, जेणेकरून दोन्ही देशांच्या अंतर्गत सुरक्षिततेला कुठेही बाधा येणार नाही तसेच दोन्हीही राष्ट्र परस्परांच्या समप्रभुतेचा आदर राखतील अशा संरक्षण सहकार्याची परस्परांना अपेक्षा आहे.

**भविष्यातील आव्हाने आणि संधी**

मालदीवमध्ये राजकीय अस्थिरतेची शक्यता कायम असते. त्यामुळे भारताला येथे दीर्घकालीन हितसंबंध जपताना स्थानिक जनतेशीही विश्वासाचे नाते ठेवावे लागेल. त्याचप्रमाणे चीनच्या प्रभावाला केवळ सामरिक दृष्टीने नव्हे, तर आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरावरही प्रत्युत्तर देणे आवश्यक ठरेल. अंतर्गत अस्थिर सरकार जरी असले तरी भारताने मालदीवच्या लोकांशी प्रत्यक्ष भावनिक संबंध तयार करून त्याची जोपासना .../-२

**पहलगाम हल्ल्याच्या विरोधात काही कारवाई करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या बैठकांवर बैठका होत असतानाच, सरकारने अचानक देशात जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. ही जनगणना २०३१ मध्ये होण्याची शक्यता असली तरी त्यावर मोठे राजकारण सुरू झाले आहे. सरकारने बिहारच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हा निर्णय घाईघाईत घेतल्याचे काहींनी म्हटले आहे तर काहींनी पहलगाम हल्ल्याच्या विरोधातील कारवाईला सरकारने प्राधान्य द्यायला हवे होते, असा सूर लावला आहे.**



# जातनिहाय जनगणना राहुल गांधींचा विजय

**वेध**
**राजेश शिरभाते**
९८६९५७८७२९
८८५०६७९५८६



जातनिहाय जनगणनेची पहिली मागणी काँग्रेस खासदार व नेते राहुल गांधी यांनी केली. त्यांच्या भारत जोडो यात्रेदरम्यान त्यांनी देशवासीयांशी थेट संपर्क साधला तेव्हाच अशा प्रकारे सामाजिक न्याय देणे आवश्यक असल्याचे त्यांच्यातील सुजाण व विचारी नेत्याला दिसले. त्यानंतर त्यांनी ती आपल्या पक्षाचीही भूमिका तयार केली. लोकसभा निवडणूकही याच मुद्द्यावर त्यांनी लढली. त्या वेळी भाजपा व त्यांच्या भक्तांनी राहुल गांधी यांच्यावर टीका केली होती. पहलगाम हल्ल्यानंतर भाजपाची भूमिका बदलली. त्याला कारण बिहारची निवडणूक आहे, असे म्हटले जात आहे.

बिहारमधील निवडणुका या भाजपाला महत्त्वाच्या आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून पंतप्रधान भारतात परत आले. त्यांनी पाकिस्तानला आव्हान दिले, तेही बिहारच्या निवडणुकीच्या जाहीर सभेतून. त्यांनी विशेष करून इथे इंग्रजीत भाषण केले, जेणेकरून त्यांचा हा संदेश साऱ्या जगात जाईल. पंतप्रधानांच्या दूरदृष्टीचा तो एक परिचय होता. त्यांनी एकाच वेळेस जगालाही हे दाखवून दिले की, आम्ही आमच्यावर हल्ला झाल्यास काय करू शकतो व दुसरीकडे बिहारच्या निवडणुकीत बिहारी जनतेलाही आपल्या बाजूने वळवले. पंतप्रधानांच्या बिहारमधील ती व यापुढे होणाऱ्या सभांच्या जोरावर भाजपा पुन्हा बिहारमध्ये सहज विजय मिळवू शकेल.

पंतप्रधानांना आता बिहारच्या दृष्टीने तिसरा फटका मारायचा होता. तो त्यांनी जातीनिहाय जनगणनेच्या निर्णयामधून केला. बिहारच्या निवडणुकीत राहुल गांधी हा मुद्दा पुन्हा आणणार हे त्यांना माहीत होते. त्यामुळेच सरसंघचालकांची त्यांच्या घरी भेट झाली तेव्हाही हा मुद्दा चर्चेत असणारच. त्यामुळे राहुल गांधी यांच्या मागणीतील हवाच काढून टाकायचा डाव भाजपाने आखला. त्यानंतर लगोलग बिहारमध्ये पोस्टर लावून भाजपाने प्रचारात आघाडी घेतली. असे असले तरी सरकारला हा निर्णय घ्यायला भाग पाडण्यातच राहुल गांधी यांचा विजय आहे.

राहुल गांधींचा गेल्या काही वर्षांतील प्रवास पाहता, जर आपल्यामुळे नागरिकांचे भले होणार असेल तर ते निवडणुकांमधील जय-पराजयाची अधिक काळजी करत नाहीत. त्यांच्या घराण्याच्या संस्कारांमुळे त्यांचा सर्वसामान्यांशी संपर्कही चांगला असतो. आपणे जे बोलतो ते ते लगेच करूनही दाखवतात. जातनिहाय जनगणनेवर ते केवळ बोलून थांबले नाहीत. तेलंगणाचे राज्य त्यांच्या पक्षाच्या हातात आल्याबरोबर त्यांनी लागलीच तिथे त्याची अंमलबजावणीही केली.

तीही केवळ करायचे म्हणून करायचे या हेतूने नव्हे, तर त्याचा एक आदर्श असे मॉडेल तयार केले. त्याला विविध क्षेत्रांतील व खास करून आयटी क्षेत्रातील तज्ज्ञांचाही सहभाग करून घेतला. हे काम त्यांनी पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवूनही केला. समाजातील दुर्बल घटकांना न्याय देण्याच्या संदर्भातील त्यांचा प्रामाणिकपणा यानिमित्ताने दिसून आला. केंद्र सरकारनेही तेलंगणातील या कामाचा अभ्यास करावा व त्यानुसार एक सर्वसमावेशक असे सुलभ मॉडेल तयार करावे. त्याचा खरोखर लोकांना फायदा होईल असे काम करावे, अशी अपेक्षा आहे. या जनगणनेत खासगी उद्योगांचा जरी सहभाग करून घेतला तरी त्याचा अंतिम लाभ हा देशातील सर्वसामान्य जनतेला मिळावा, अशी धारणा ठेवली तरी हे राजकारण यशस्वी होऊ शकेल. राहुल गांधींच्या या मागणीवर आताच निर्णय घेऊन केंद्र सरकारने अनेक प्रश्न सोडवले आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर लागलीच हा निर्णय घेऊन त्यांनी एकाच वेळेस बिहारच्या निवडणुका, पश्चिम बंगालच्या निवडणुका यांच्या प्रचारात आघाडी तर घेतली आहेच; त्याचबरोबर पुढील लोकसभा निवडणुकीचाही एक मार्ग मोकळा केला आहे. सरसंघचालकांबरोबर याची चर्चा करून त्यांना त्यांचा योग्य तो सन्मान देऊन बिहारच्या निवडणुकीत संघाचा सहभागही निश्चित केला आहे. राहुल गांधी, लालू यादव यांचे राजद हे दुर्बल घटकांच्या पाठीशी आहेत. त्याऐवजी भाजपाने त्यांच्यासाठी इतका मोठा निर्णय घेतला हे दाखवण्यातही ते यशस्वी होतील. त्याचा फायदा त्यांना झालाच तर महानगरपालिका व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही होणार आहे. राहुल गांधींचा प्रचारातील एक मुद्दा जरी काढून टाकण्यात ते यशस्वी झाले असले तरी राहुल गांधी यांची स्थिती विन विन अशी आहे.

एक तर गेल्या काही महिन्यांमध्ये एक जबाबदार विरोधी पक्षनेत्याप्रमाणे सरकारवर दबाव टाकण्यात यशस्वी होत आहेत. लोकसभा निवडणुकीत संविधानाचा मुद्दा त्यांनी उचलून धरला होता. त्यावर पंतप्रधानांनाही संविधानाला सर्वोच्च स्थान असल्याचे विधान करावे लागले होते. त्यानंतर संविधानाची मंदिरे उभारण्याची घोषणा त्यांनी केली. महाराष्ट्रातील आयआयटीमध्येही संविधानाची मंदिरे करण्याची योजना त्यांनी आखली. आयटीआयमध्ये तांत्रिक शिक्षण देण्यात येते. सर्वसाधारण कुटुंबातील मुलांना अर्थार्जनासाठीचे कौशल्य प्रदान करणारे ते एकप्रकारचे मंदिरच आहे. आयटीआयमध्ये शिक्षण घेऊन पुढे चांगल्या नोकऱ्या किंवा स्वतःचा उद्योग सुरू करणारी अनेक मध्यमवयीन व्यक्ती आपण आपल्या अवतीभवती पाहतोच. आयटीआय हे लघुउद्योगांचा पायाही ठरला आहे. तिथे हे संविधानाचे मंदिर उभारण्याच्या घोषणेने सरकारने एकप्रकारे या संस्थेचा गौरवच केला आहे. त्यानंतर विविध प्रश्नांवर राहुल गांधी यांनी सरकारला आपले निर्णय बदलायला किंवा ते सौम्य करायलाही भाग पाडले. त्यांच्यासारख्या नेत्याचा सर्वसाधारण व्यक्तींबरोबर एक सहज संवाद साधणे हे भल्याभल्यांना जमत नाही. लहानसा पुढारीही आपले अतिविशिष्ट व्यक्ती असल्याचा प्रभाव पाडण्याच्या प्रयत्नात असताना कोणताही बडे जाव न साधता ते सामान्यांमध्ये मिसळतात. त्यांना बोलके करतात. त्यांच्या समस्या जाणून घेतात. त्यांच्या कामात रस घेतात. एका मोठ्या नेत्याचे सारे गुण त्यांच्यामध्ये आहे. जे आपल्या पक्षाच्या काळातही घडले नाही त्याची मागणी प्रामाणिकपणे करणे एक धाडसाचे व अहंकार नसल्याचे लक्षण आहे.

जातीय जनगणनेमुळे कदाचित जातीविरहित समाजरचनेच्या दृष्टीने एक पाऊल मागे गेल्यासारखे वाटेल; मात्र समाजातील दुर्बल घटकांना सक्षम घटकांनी बरोबरीला आणणे हेही एका समर्थ समाजाचे लक्षण आहे. त्या दृष्टीनेही पावले पडतील अशी आशा करूया. एका मोठ्या .../-२

**देशात जेव्हा न्यायाच्या वेटोळ्याचं गाठोडं अधिकाधिक गुंतत जाते, तेव्हा नागरिकांचा विश्वास केवळ संस्थांवरून ढळत नाही तर लोकशाहीच्या मुळावरच घाला येतो. इंडिया जस्टिस रिपोर्ट २०२५ ने सादर केलेला आरसा केवळ धक्का देणारा नाही तर शासनसंस्थांच्या कुंभकर्णी झोपेची साक्ष देणारा आहे. एका लोकशाही देशात जेव्हा निम्म्याहून अधिक प्रलंबित प्रकरणं दशकभराहून अधिक जुनी असतात, तेव्हा फक्त खटलेच नाहीत तर त्यामागचे माणसांचे आयुष्य, संघर्ष आणि अपेक्षाही कोर्टाच्या फायलीत गाळात रुतलेल्या गाडीसारख्या थांबलेल्या दिसतात.**



# न्याय हरवलेला देश

**जीवनगाणे**
**सीमाताई मराठे**
९०२८५५७७१८



या अहवालात स्पष्ट झालंय की, उच्च न्यायालयामध्ये ५०.७ टक्के प्रकरणं १० वर्षांपेक्षा जुनी आहेत. ही आकडेवारी केवळ आकड्यांची भर नाही; ही लाचारीची आणि दुर्लक्षित व्यवस्थेची कबुली आहे. हा आकडा सांगतो की, आपल्या देशात 'न्याय' ही संकल्पना कालबाह्य होत चालली आहे. म्हणजेच, आज दाखल झालेला खटला निकाली लागेपर्यंत पुढचं संपूर्ण दशक संपतो. एक पिढी वयात येते. एक सरकार येतं-जातं; परंतु न्यायाचा दरवाजा मात्र उघडत नाही.

कुठल्याही देशाची न्यायव्यवस्था ही त्याच्या लोकशाहीचं मापदंड असते. जर तीच व्यवस्था इतकी कुचकामी आणि विलंबित असेल तर मग जनतेने कुणाकडे पाहायचं? या यंत्रणांमधील कमतरतांचं जे विवेचन इंडिया जस्टिस रिपोर्ट २०२५ ने केले आहे, त्यात पोलिसांची मनुष्यबळ कमतरता, तुरुंगातील क्षमतेपेक्षा अधिक कैदी, कायदेशीर मदतीची अनुपलब्धता आणि मानवाधिकार आयोगांचा निष्क्रियपणा यांचा समावेश आहे. एकट्या पोलीस दलात २० लाख पदं रिकामी असणं हे केवळ भयानक नव्हे, तर सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीनेही अत्यंत चिंताजनक आहे.

या अहवालाने फक्त एक आरसा दाखवला आहे. पण आपण त्या आरशात पाहण्याचं धाडस केलं पाहिजे. न्यायालयांची क्षमता वाढवणं, न्यायमूर्तींच्या नियुक्त्या जलद करणे, ई-गव्हर्नन्सचा प्रभावी वापर, कायदेशीर मदतीचं बळकटीकरण आणि पोलीस सुधारणा हे सारे उपाय आहेत. पण त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती हवी. ती इच्छाशक्ती तयार होईल, पण त्यासाठी नागरिकांनी आवाज उठवला पाहिजे.

या सगळ्या ढासळलेल्या व्यवस्थेमुळे सामान्य माणसाच्या न्यायप्राप्तीची आशाच हरवत चालली आहे. आपल्याकडे 'न्याय' म्हणजे कायद्यानं दिलेला अधिकार नसून, सुदैवानं मिळालेली एखादी गोष्ट झाली आहे, असं लोकांच्या मनात खोलवर बिंबवलं आहे. एकीकडे 'न्याय मिळावा' यासाठी मरणापर्यंत धावणारे नागरिक आहेत, तर दुसरीकडे खटल्याच्या तारखा देत राहणारी आणि न्यायाचा गाभा विसरलेली व्यवस्था आहे.

पोलीस दलाचं काम केवळ गुन्हेगार पकडणं नाही तर नागरिकांचं विश्वासार्ह रक्षण करणंही आहे. पण जेव्हा पोलीस दलात पुरेसं मनुष्यबळ नसतं, प्रशिक्षण व दर्जा अभावात असतो, तेव्हा या संस्थेकडून न्यायाच्या वाटचालीची अपेक्षाच चूक ठरते. तुरुंग व्यवस्थेची स्थिती तर आणखीनही भीषण आहे. क्षमतेपेक्षा कैदी अधिक. वेळेवर खटल्याचा निकाल नाही. आणि मूलभूत सुविधांचा अभाव, ही परिस्थिती केवळ बंदिवानांचा नव्हे, तर संपूर्ण यंत्रणेचा अपमान करणारी आहे.

मानवाधिकार आयोगांची स्थिती तर केविलवाणी म्हणावी अशी आहे. सरकारकडून निधीचा अभाव, स्वायत्ततेचा संकोच आणि निर्णयक्षमतेचं दुर्बळ स्वरूप यामुळे हे आयोग केवळ घोषणाबाजीत अडकले आहेत. तेथून ना कारवाई होते. ना तातडीचा प्रतिसाद मिळतो.

ही सर्व परिस्थिती पाहता असं वाटतं की, आपल्याकडं 'न्याय' ही संकल्पना अजूनही सत्ताधीशांच्या कळपात अडकलेली आहे. गरीब, दुर्बल आणि मध्यमवर्गीयांसाठी कोर्टाच्या पायऱ्या चढणं म्हणजे आर्थिक, मानसिक आणि सामाजिक श्रमांनी थकून जायचं काम आहे. जेवढा खटला जुना होतो, तेवढा न्याय मिळवण्याचा विश्वास कमी होतो. आणि न्यायाच्या विश्वासाला गमावलेला समाज ही लोकशाहीसाठी एक गंभीर इशारा आहे.

कोर्टातील न्यायाधीशांच्या रिक्त जागा भरल्या जात नाहीत. सरकारी वकिलांचं प्रशिक्षण आणि गुणवत्ता याबाबत काहीच ठोस धोरणं नाहीत. ई-कोर्ट प्रणालीचा वापर अनेक ठिकाणी केवळ कागदोपत्रीत मर्यादित आहे. या सगळ्या गोष्टी एकत्रित केल्या तर आपल्याला हे स्पष्ट होतं की, आपण एक अशी न्याययंत्रणा उभारली आहे, जिला तिच्या मूळ उद्दिष्टाकडे पाहायला फुरसतच नाही.

या सगळ्या पार्श्वभूमीवर एक मोठा प्रश्न उभा राहतो, भारतात खरोखर न्याय मिळतो का?, की फक्त त्याचा आभास दिला जातो? आजच्या न्यायव्यवस्थेची अवस्था पाहता, हे उत्तर नकारात्मक आहे. 'न्याय उशिरा मिळाल्यास तो अन्याय असतो' ही ओळ आपण पाठ केली आहे. पण तिला शासनसंस्था आणि व्यवस्थेनं गंभीरपणे घेतलेलं दिसत नाही.

भारताला जर खऱ्या अर्थानं प्रगतीचं नाव द्यायचं असेल तर न्यायप्रणालीची ही गळती थांबवावी लागेल. केवळ गुन्हेगारांना शिक्षा देणं नव्हे तर सामान्य जनतेला वेळेत, प्रभावी, सुलभ आणि सुलभी न्यायव्यवस्था मिळवून देणे हीच खरी लोकशाही आहे. अन्यथा, फायलींमध्ये अडकलेले खटले आणि काळात हरवलेली माणसं हेच आपलं भविष्य ठरेल. आजच्या या रिपोर्टनं केवळ आकड्यांचा नाही, तर व्यवस्थेच्या अपयशाचा चीत्कार दिला आहे. हा चीत्कार जर सरकार, न्यायालयं आणि जनता यांच्यापर्यंत पोचला नाही तर उद्याचं भारत फक्त डिजिटल नाही तर निष्प्राण आणि न्यायविहीन भारत ठरेल.

**नव्या न्यायक्रांतीची गरज**

आजच्या भारताला गरज आहे एका नवी न्यायक्रांतीची. जी प्रत्येक सामान्य माणसाला हा आत्मविश्वास देईल की, हो, हा देश त्याचाही आहे आणि इथे त्यालाही वेळेत न्याय मिळू शकतो. ही लढाई केवळ वकिलांची, न्यायाधीशांची किंवा कायदेतज्ज्ञांची नाही. ही प्रत्येक सजग भारतीय नागरिकाची लढाई आहे. आणि ही लढाई आपण लढलीच पाहिजे; अन्यथा उद्याचा भारत फक्त बड्या लोकांचा नाट्यमंच राहील. ज्यात सामान्य माणूस प्रेक्षक म्हणूनही राहणार नाही.

# हास्यात रंगून जाऊया



**हास्याचे तुषार झेलूया**
**हास्यात रंगून जाऊया...**

आज मे महिन्यातील पहिला रविवार! आज संपूर्ण जगात हा दिवस 'जागतिक हास्य दिन' साजरा केला जात आहे. हसत हसत जगायचं असेल व तणावरहित, आरोग्यसंपन्न व्हायचं असेल तर दररोज सकाळी प्रसन्न वातावरणात सर्वांनी मिळून सामूहिक खळखळ मोकळेपणी हसलंच पाहिजे. 'हास्य' ही निरोगी जीवनासाठी एक 'संजीवनी' आहे, असं विज्ञानानंदेखील सिद्ध केलं आहे. 'हास्यावर' संशोधन पण झालं आहे.

हास्य महागुरू डॉ. मदन कटारिया यांनी १९९५ साली लावलेलं हे हास्याचं इवलंसं रोप ! याचा वेलू आज गगनावर तर गेला आहेच, परंतु हा वेलू आता हास्याच्या सुगंधित फुलांनी बहरलेला आहे. या हास्यफुलांचा सुगंध जगभरात दरवळत आहे. आज जगभरात शंभराहूनही अधिक देशांत हास्ययोग संघ स्थापन झाले आहेत व होत आहेत.ही हास्य चळवळ सर्व दूर पसरत आहे. अनेक हास्यप्रेमी याचा लाभ घेत आहेत, ही खरोखर अभिमानास्पद गोष्ट आहे.

हास्य ही एक जागतिक भाषा आहे. हास्य हे शरीर व मन स्वस्थ ठेवण्यासाठी एक रामबाण उपाय आहे. शरीराबरोबर मनाचंही आरोग्य राखणं तितकंच महत्त्वाचं आहे. कारण शरीर व मन एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मन स्वस्थ असेल तर शरीर स्वस्थ राहते. कारण निरोगी शरीरात निरोगी मन वास करत असते. खळखळून हसल्याने अंतरंग शुद्ध व स्वच्छ होते. अंतरंग बदलते. अंतरंगातील बदल हा बाह्य बदलाची चावी आहे. हसणे ही नैसर्गिक व संसर्गजन्य क्रिया आहे.

हास्ययोग संघात एक जण जरी हसायला लागला तरी सगळेच खळखळून हसायला लागतात. हास्य कृत्रिम असो वा नैसर्गिक, त्याचे फायदे शरीर व मनाला होतातच. दररोज खळखळून हसल्याने मेंदूमधील सुखद केंद्रे कार्यान्वित होण्याची प्रक्रिया सुरू होते. त्यामुळे दिवसभराची ऊर्जा मिळते व मन उत्साही व प्रसन्न राहते. हास्ययोग ताणतणाव कमी करणारा, प्रतिकारशक्ती बळकट करणारा आणि शरीरातील पेशीपर्यंत प्राणवायूचा पुरवठा करणारा अत्यंत सोपा व निःशुल्क असा व्यायाम आहे. जर तुम्ही अगदी नियमाने खळखळून हसलात तर तुम्ही सहजासहजी आजारी पडणार नाही किंवा अनेक रोगांच्या संसर्गापासून दूर राहाल. याचा अनुभव आम्ही हास्यप्रेमींनी कोरोनाकाळात घेतला आहे.

हास्य संघात आपण सर्व एक आहोत ही भावना प्रत्येकाच्या मनात असल्यामुळे इथे कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला थारा नसतो. लहान, मोठा, श्रीमंत, गरीब या गोष्टींपासून दूर असणारा असा हा हास्ययोग आहे. हास्यसंघ हे एक मुक्त व्यासपीठ आहे. इथं प्रत्येकाच्या गुणांचं कौतुकच होतं. सुप्तगुणांना वाव मिळतो. इथे कुणीच कुणाला हसत नाही किंवा नावं पण ठेवत नाही. प्रत्येक व्यक्तीला इथे प्रोत्साहनच मिळत असते.

उन्हातून चालत गेल्यानंतर थंडगार सावलीत बसायला मिळालं किंवा थंडगार पाणी प्यायला मिळालं की जे सुख मिळतं, जो आनंद मिळतो तोच आनंद सकाळी हास्ययोग केंद्रात गेलं की मिळतो. आपल्या समवयस्क मित्रमैत्रिणींसमवेत केलेले विविध हास्यप्रकार, प्राणायाम, टाळ्या वाजविणे, खेळकरपणे केलेली चेष्टा, मस्करी, एखादा विनोद यामुळं क्षणभर आपण आपल्या साऱ्या व्यथा, वेदना, राग, काळजी, चिंता सारं विसरून जातो व उत्साही मनाने घरी परततो. ही ऊर्जा दिवसभर आपल्याला आनंदी व उत्साही राहायला मिळत असते. म्हणूनच आम्ही सर्व हास्यप्रेमी म्हणतो..



**ललित**
**सविता एरंडे**

आधे घंटेकी हंसी हंसी ..दिनभरकी खुशी खुशी.

आज नाशिक शहरात जवळजवळ १०० पेक्षा जास्तच हास्ययोग संघ स्थापन झाले आहेत. त्याचा लाभ हास्यप्रेमी घेत आहेत. हास्य क्लबमध्ये शारीरिक व्यायामाबरोबरच अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. विविध सामाजिक संस्थांना भेटी देऊन त्यांना मदतीचा हात दिला जातो. गरजू लोकांना धान्य, पैसे, काही जीवनावश्यक वस्तू पुरविल्या जातात. इथे प्रत्येक सदस्याचे वाढदिवस साजरे करून त्याच्या गुणांचं कौतुक केलं जातं.सहली, हळदीकुंकू, सर्व राष्ट्रीय व सण समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम इ. उपक्रमांची रेलचेल हास्य संघात चालूच असते. त्यामुळं दररोज हास्य क्लबची ओढ प्रत्येक सदस्याला लागते. आज अनेक व्यक्ती कुटुंबात असूनही एकाकी जीवन जगताना दिसतात. बऱ्याच व्यक्तींच्या जीवनात नैराश्य येते. त्यामुळं कधी कधी जगणं नकोसं होतं. अशा व्यक्तींसाठी हास्य संघ हा एक जीवनाधार ठरत आहे. इथं नेहमीच आनंदी वातावरण, एकमेकांना आधार देणं, सुखदुःखात पाठीशी उभं राहणं यांसारखे संस्कार नकळतपणे होत असतात. निरनिराळ्या विषयांवर चर्चा, सल्ले, अनुभवांची देवाणघेवाण सतत होत असल्यानं एकमेकांमध्ये मैत्रीचं नातं अधिकाधिक दृढ होत जातं. सकारात्मक जीवन जगण्याचं टॉनिक इथं अनौपचारिकपणे मिळत असल्यानं 'आयुष्य सुंदर आहे' या भावनेनं जगणं सुसह्य व सुंदर होते आहे.

आज शहरात ठिकठिकाणी नवनवीन हास्य संघ स्थापन होत आहेत. आता या हास्य चळवळीत तरुण लोकदेखील सहभागी होत आहेत. ही खरोखर आनंदाची गोष्ट आहे. सामाजिक हास्य क्लब शिवाय विविध कंपन्या, संस्था, वृद्धाश्रम, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, हॉस्पिटल्स, फिटनेस सेंटर्स, शारीरिक व मानसिक विकलांग संस्था, कारागृहे इ. विविध ठिकाणी हास्ययोग केला जातो. त्याचा फायदा अनेकांना होत आहे. आनंद नावाचा झरा आपल्या अंतरंगातच हास्याच्या रूपाने सदैव वाहत असतो. 'हास्य योग' हे आपल्या मनोकायिक रुग्णांचे 'आउटलेट' आहे. कारण हास्य हे आनंदाचे व्यक्त स्वरूप आहे. हास्ययोगाचे ब्रीदवाक्य आहे, आम्ही आनंदी आहोत म्हणून आम्ही हसत नाही. तर आम्ही हसतो म्हणून आम्ही आनंदी आहोत. आपले हास्य महागुरू नेहमी म्हणतात, तुम्ही हसाल तर कुटुंब, समाज, देश, राज्य हसेल व सारे विश्व हसायला लागेल.

हास्ययोगातून विश्वशांती हे डॉ. कटारिया यांचं स्वप्न लवकरच साकार होईल. यासाठी आपण कटिबद्ध राहूया. चला तर मग सर्वजण उभे राहून आकाशाच्या दिशेने हात उंचावून एक मिनिट मनमोकळे खळखळून हसू या आणि आपली सकारात्मक स्पंदने, आनंद, हास्य व शांती जगभरात पसरवू या!

मग चला तर म्हणू या
**नको औषध नको गोळ्या**
**हसत हसत वाजवा टाळ्या हो हो हा**
हसा की, हसायला काय पैसे पडतात काय?

# हितगुज



**मनातलं**
**विशाखा बल्लाळ**

इतकी हुशार आहे ना मयुरी.... उगवत्या सूर्याला नमस्कार ही जग राहटी आहे गं... हे मलाही माहीत आहे... पण ही ना... अगदी सूर्य कुठून आज उगवणार हे ओळखून तो उगवण्याआधीच त्याच्या दिशेने अर्ध्य टाकायला सुरुवात करते....

नाही समजलं..... थांब मी समजून सांगते.... अग... काका ऑफिसर म्हणून होते.. तोवर त्यांचा रुबाब ही होता... त्यांनी तो टिकऊनही ठेवला.... त्यावेळेस बरोब्बर मयुरी..काका.. काका...म्हणून त्यांची आस्थेने चौकशी करायची. कधी मधीं... आईकडून मुद्दाम काकांना आवडती तशी मोदकाची आमटी करून आणायची... गरम गरम आल्याचा चहा ही करायची.... पण जसे जसे काका म्हातारे होऊ लागले तसं तसं... त्या घरातलं त्यांचं महत्व ही सरू लागलं... कुटुंब प्रमुख म्हणून आता तात्या ची उमेदवारी होती... की लागलीच हिने दल बदलला, पार्टी बदलली, पक्ष बदलला.... कोणताही शब्द वापर पण अर्थ तोच....

लगेच तात्या तात्या करणे सुरु झालें हिचे.... तात्याच्या आवडीनिवडी, त्याला हवे नको, त्याचा वाढदिवस, त्याला आवडतो तसा चांगल्या तुपाचा शिरा घरी येऊ लागला.... आणि काकांच्या अंगावरून ती बिन दिक्कत पणे तात्या कडे जाऊ येऊ लागली... तात्याच्या बायकोच्या केसांत वेणी माळून देऊ लागली.... तुम्हांला मी मदत करते महालक्ष्मी फराळाला... आहे काय आणि नाही काय.... कसं असं वागणं जमत ना एकेकाला....

अग, स्वार्थ असला की जमतं सर्व...

खरंच.... कधी कधी ना.. आई म्हणते ते अगदी पटत बघ... मयुरी म्हणजे उडत्या पाखराचे पंख मोजणारी आहे.

जिथे आपण उडत्या पाखरा कडे साधं पाहूही शकत नाही... तिथं ही बया त्याचे पंख ही मोजून येईल...

आता या घरांत कोणाला महत्व द्यायचे... कोणाच महत्व कसे वाढवायचे आणि कोणाला खाली कसे पाडायचे... हे चांगलं जाणून आहे ती...

पण इतकं स्वार्थी वागून रात्री निवांत झोप कशी येती... म्हणते मी...

झोप न यायला काय झालं... ती काही कुणाचा खून थोडीच करती....

अग हो... पण एखाद्याच्या भावनांशी खेळणं म्हणजे मानसिक खून किंवा खच्ची करण हाच उद्देश वाटतो ना तिचा...

हे बघ... आपल्याला तसं वाटत.... पण तिला त्याची जाणीवच नसते ना.... आणि शिवाय इतकं गोड बोलणं, गोड वागणं असतं ना तिचं की जीभ मधात बुडवूनच ती बोलते असं वाटतं अगदी...भुरळ पडते मग सर्वांना तिच्या वागण्याची...

तुला बरं लक्षांत आलं तिचं वागणं....

अरे.... मी तर रिसर्च केलाय तिच्या स्वभावावर...एकत्र कुटुंबातून आल्या मुळे कोणाला कसं हॅन्डल करायचं... कोणाच्या प्रेमळ स्वभावाचा कसा फायदा घ्यायचा... कोणाला पिन मारायची... कोणाला नुसतं स्तुती करून खुश करायचं... हे पक्क माहित आहे तिला......

परवा जेवायला उशीर होणार होता तर पटकन दोन करंज्या पदरात लपवून गच्चीत जाऊन खाऊन आली... आणि मोठ्या वहिनी मात्र ३वाजेपर्यंत उपाशीच बसल्या.....

शिवाय... मी वाढते.. मी वाढते... करून सर्वांच्या पुढे पुढे करून झालं.... आणि करंज्या पोटात गेल्यामुळे दमही राहिला ४वाजेपर्यंत...

जाऊ दे ना.... असतो एकेकाचा स्वभाव....

नाही नाही... मी जाऊ देणार नाही....लांब... दूर आहे तोपर्यंत ठीक... तिने तसंच राहावं... आणि



माझ्या वाट्याला तर मुळीच जाऊ नये... मी चांगली ओळखून आहे तिला...

अग... पण मी तर ऐकलंय... तुझ्या दादासाठी तिचं स्थळ सुचवलं आहे काकूंनी...

क्काय... आणि तू आत्ता मला सांगतीयेस हे...

मला वाटलं तुला माहित आहे....

नाही ग माहित.... पण काहीतरी करून हे थांबावायला पाहिजे.... नाहीतर आई म्हणते त्याप्रमाणे मिठी छुरी बनून ती माझ्या भोळ्या भाभड्या दादाचा गळा कापेल ग...

काय घडेल पुढे? होईल का ती धूर्त मुलगी हिच्या दादाची बायको....


लगावो... लगावो.... अपना दिमाग लगावो... और सोचो.... क्या होगा.... उस भोले भाले भैया का..... अगर उसकी शादी मिठी छुरी से हो गयी...

# वेगळाच निर्मळ बालानुभव देणारा काव्यसंग्रह

**पुस्तक परिचय**
**जनार्दन देवरे**
**९८२२६८३७९९**

ध्येयवेडा पत्रकार, सामाजिक व साहित्य-सांस्कृतिक चळवळीतला कार्यकर्ता, शिक्षकमित्र राजेंद्र दिघे यांचा पाखरांची गाणी हा बालकवितासंग्रह म्हणजे वाचन व छंदातून बालवाचकांसाठी एक अनोखा नजराणा आहे. लाडोबा प्रकाशन (पुणे) यांनी प्रकाशित केलेला हा काव्यसंग्रह ज्या रंगरूपात बालवाचकांसमोर आणला आहे ते रूप लक्षवेधकच. मुखपृष्ठापासून ते मलपृष्ठापर्यंत लाडोबा टीमची मेहनत पानोपानी चटकन जाणवते. सर्व पाने रंगीत आहेत.

सुप्रसिद्ध मुखपृष्ठकार चित्रकार सरदार जाधव यांची चित्रे व रेखाटने खास अनुभूती देणारीच. मुद्रण, मांडणी, छपाई या सर्वच आघाड्यांवर हा बालकाव्यसंग्रह मैलाचा दगड ठरलाय.




शिक्षक म्हणून यशस्वी झालेले, विद्यार्थ्यांमध्ये सतत हसतखेळत रममाण होणाऱ्या शिक्षकाने बालमनातील टिपलेले आनंदाचे क्षण, देश, समाज, परिसर, निसर्ग, शाळा याविषयीच्या बालकल्पना, बालबोलात या कवितांतून अत्यंत चपखलपणे व सहज स्वाभाविकरीत्या मांडल्या आहेत.

विद्यार्थ्यांना बोधाचे, सुविचारांचे डोस बालकवितांतून पाजण्याचा प्रयास, उद्योग हल्ली बरेच कवी, साहित्यिक करतात. तोही अस्वाभाविक कृत्रिमपणे. यामुळे मुले-मुली वाचनापासून दुरावतात. पण श्री. दिघे यांनी हे सार सहज टाळलंय. काही कवितांतून बोधही केलाय, पण अगदीच नाममात्र. कृत्रिम न वाटणारा. प्रासंगिक वगैरे प्रकारात तो आलाय. आनंद, ऊत्साह सहज आपल्या कवितातून येऊ दिला आहे. हे खासच आहे.

**पळा, पळा, पळा**
**कोण पुढे पळे**
**खेळता खेळता**
**आनंदच मिळे..!**
**उठा, उठा, उठा**
**गोलाकार बसा**
**बसता बसता**
**खुदकन हसा...**

सुट्टीची मजा, खाऊचे झाड, या मुलांनो, पाणी, झाड, मोती या कविता सहजसोपी बालगीतेच आहेत. त्याचा नाद आणि सूर बालवाचकांस भुरळ पाडतात. पाखरांची गाणी या बालकवितासंग्रहात एकूण २४ कविता आहेत. त्या वाचल्यानंतर या कवीमध्ये बालकविता लिहिण्याचे सामर्थ्य नक्कीच आहे, हे खात्रीपूर्वक वाचकाला जाणवतेच जाणवते.

शालेय परिसरात शिक्षकाच्या अवतीभवती रुंजी घालणाऱ्या पाखरांना वाचनाची गोडी लावण्यात कवी राजेंद्र दिघे यशस्वी झाले आहेत. अधिकाधिक उत्तमाचा ध्यास धरत त्यांनी त्यांची बालकविता जोजवत, जोपासत राहावी म्हणून ही पाखरांची गाणी वाचायला, गायला, अनुभवायला हवीतच.

**पाखरांची गाणी**
**(बालकवितासंग्रह)**
**कवी : राजेंद्र केवळबाई प्रल्हाद दिघे**
**प्रकाशक : घनःश्याम पाटील, लाडोबा प्रकाशन, पुणे**
**मुखपृष्ठ व आतील चित्रे : सरदार जाधव**
**मूल्य : १०० रुपये**

पान १ वरून

## जातीनिहाय जनगणना राहुल गांधींचा विजय

समाजपरिवर्तनाकडे संकुचित विचारांनी पाहिले नाही. तर आपण आपला समर्थ, सशक्त समाज सहज निर्माण करु शकू. समाजातील उच्च स्तराने जर समाजातील आर्थिक वा इतर बाबतीत असलेल्या निम्न वर्गाचा विचार करुन त्यांना सोबत घेतले तर उद्या हा देश अधिक सशक्त व अधिक सर्वसमावेशक होईल. त्याने इतर कोणत्याही देशाला आपल्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याआधी अनेकदा विचार करावा लागेल हे निश्चित. निवडणुका येतील जातील. देश मोठा होणे महत्त्वाचे.

## भारत–मालदीव संबंध पूर्वपदावर कधी येणार?

करावी जसे की अफगाणिस्तान मध्ये सत्ता परिवर्तन घडले तरी सामान्य जनतेचा विश्वास हा भारता प्रति नेहमी आदराचा राहिला आहे असे संबंध भारताने कितीही तयार करावे अशी अपेक्षा दोन्ही राष्ट्रातील जनतेला आहे सॉफ्ट पॉवर' - जसे की शैक्षणिक स्कॉलरशिप, वैद्यकीय मदत, आणि सांस्कृतिक देवाणघेवाण - यांच्या माध्यमातून भारत मालदीवमधील आपला सकारात्मक प्रभाव वाढवू शकतो.

भारत आणि मालदीव यांचे संबंध एका महत्त्वाच्या वळणावर आले आहेत. मागील काही महिन्यांतील तणावानंतर आता संबंध पुन्हा उबदारतेच्या दिशेने वळताना दिसत आहेत. मालदीवसाठी भारत हा फक्त एक व्यापारी किंवा सामरिक भागीदार नाही, तर एक विश्वासू मित्र आहे. भारताने संयम, मुत्सद्देगिरी आणि दीर्घकालीन दृष्टी ठेवल्यामुळे या संबंधांचे जतन आणि वृद्धी शक्य झाली आहे. भविष्यात, सागरी सुरक्षा, आर्थिक विकास, आणि बहुपक्षीय सहकार्य या क्षेत्रात भारत आणि मालदीव एकत्र काम करतील, तर हिंद महासागर क्षेत्रात भारताचा प्रभाव अधिक दृढ होईल. भारत-मालदीव मैत्री ही केवळ वर्तमानातील गरज नाही, तर भविष्यकालीन जागतिक सागरी धोरणाचा एक महत्त्वाचा स्तंभ ठरेल, यात शंका नाही म्हणून भारत मालदीव संबंध पुन्हा पूर्वपदावर येणे हे दोन्ही देशांच्या नवे तर संपूर्ण आशियाच्या शांततामय विकासासाठी गरजेचा आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य

**पुरुषोत्तम नाईक**

**दि. ४ ते १० मे २०२५**

### मेष : यशप्राप्ती होईल

या सप्ताहात बुध, गुरू अनुकूल आहे. रवी, मंगळ, शुक्र, राहू, केतू प्रतिकूल आहेत. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. खर्च वाढतील. पैशांची आवक वाढेल. आर्थिक दिलासा मिळेल. नोकरदारांचे मनसुबे अडचणीत येतील. व्यापारी, व्यावसायिकांचे निर्णय चुकतील. शासकीय कोर्टकचेरीच्या कामात यशप्राप्ती होईल.

### वृषभ : अनुकूलता मिळेल

या सप्ताहात शुक्र, शनि, राहू, केतू अनुकूल आहेत. गुरू संमिश्र आहे. बुध, मंगळ, रवी प्रतिकुल आहे. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. खर्च वाढतील. प्रवास लाभदायी ठरतील. नवीन मित्रमैत्रिणी भेटतील. नोकरदारांवर वरिष्ठ खूष राहतील. व्यापारी, व्यावसायिकांची आर्थिक प्रगती होईल.

### मिथुन : आर्थिक समृद्धी

या सप्ताहात बुध, शुक्र, शनि अनुकूल आहेत. रवी, मंगळ, गुरू, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक अडचणी दूर होतील. धनचिंता मिटतील. नोकरदारांना अडचणीतून मार्ग काढावा लागेल. व्यापारी, व्यावसायिकांनी कुणावर विसंबून निर्णय घेणे टाळावे. आरोग्याकडे लक्ष द्या.

### कर्क : गैरसमज होतील

या सप्ताहात बुध, गुरू, शुक्र, शनि, राहू, केतू अनुकूल आहेत. रवी, मंगळ प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च आटोक्यात राहतील. नोकरदारांबाबत वरिष्ठांचे गैरसमज होतील. व्यापारी, व्यावसायिकांचा भाग्योदय होईल. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. आरोग्य सांभाळा.

### सिंह : पैसे मिळतील

या सप्ताहात बुध अनुकूल आहे. गुरू संमिश्र आहे. मंगळ, शुक्र, शनि, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली रांहील. अपेक्षित पैसे मिळतील. नोकरदारांवर कामाचा बोजा पडेल. व्यापारी, व्यावसायिकांना अडचणी सतावतील. आरोग्यप्रश्न सतावतील. काळजी घ्या.

### कन्या : अडचणी वाढतील

या सप्ताहात बुध, गुरू, शुक्र, शनि, राहू अनुकूल आहेत. रवी, मंगळ, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च वाढतील. धनचिंतांना उतार पडेल. नोकरदारांच्या कामातील अडचणी वाढतील. व्यापारी, व्यावसायिकांना कठोर परिणाम घ्यावे लागतील. आनंदवार्ता कळतील. प्रकृती जपा.

### तूळ : जोरदार आगेकूच

या सप्ताहात बुध अनुकूल आहे. रवी, मंगळ, गुरू, शुक्र, शनि, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. खर्च वाढतील. नोकरदारांचे वरिष्ठांशी वितुष्ट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. व्यापारी, व्यावसायिकांना फारच हुशारीने व्यवहार करावे लागतील. प्रकृती जपा.

### वृश्चिक : विवाह जमतील

या सप्ताहात बुध, गुरू, शुक्र, शनि, राहू, केतू अनुकूल आहेत. मंगळ प्रतिकुल आहे. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च आटोक्यात राहील. विवाहेच्छुकांचे विवाह जमण्याची शक्यता आहे. नोकरदारांना विरोधक त्रस्त करतील. व्यापारी, व्यावसायिकांना सुखवार्ता कळतील. प्रकृती चांगली राहील.

### धनु : आर्थिक सुधारणा

या सप्ताहात बुध, शुक्र अनुकूल आहेत. गुरू संमिश्र आहे. मंगळ, शनि, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे प्रतिकुल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थितीत सुधारणा होतील. खर्च वाढतील. प्रवास टाळा, वाहन जपून चालवा. बांधकाम व्यावसायिकांनी सतर्क राहावे. विरोधक षडयंत्र रचतील. आरोग्याची काळजी घ्या.

### मकर : सुखवार्ता कळतील

या सप्ताहात बुध, गुरू, शुक्र, शनि, राहू, केतू अनुकूल आहेत. रवी, मंगळ प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च नियंत्रणात राहतील. नोकरदारांना आनंदवार्ता कळतील. व्यापारी, व्यावसायिकांची व्यवसायवृध्दी होईल. शासकीय, कोर्ट कचेरीच्या कामात यशपाप्ती होईल. आरोग्याची काळजी घ्या.

### कुंभ : सावध रहा

या सप्ताहात बुध, शुक्र अनुकूल आहेत. शनिची साडेसाती, मंगळ, गुरू, राहू, केतू प्रतिकुल आहेत.चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च वाढतील. नोकरदारांना सावध रहावे लागेल. व्यापारी, व्यावसायिकांना धनलाभ होईल. खर्च वाढतील. आरोग्याची काळजी घ्या.

### मीन : आर्थिक उन्नती होईल

या सप्ताहात रवी, बुध, शुक्र अनुकूल आहेत. शनिची साडेसाती गुरू संमिश्र राहील. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक अडचणींवर मात कराल. खर्च वाढतील. नोकरदारांवर कामाचा ताण पडेल. व्यापारी, व्यावसायिकांच्या इच्छा पूर्ण होतील. कौटुंबिक वाद सामंजस्याने सोडवा. प्रकृतीची काळजी घ्या.

गांवकरी
शब्द तुमचे-आमचे
रविवार विशेष

**जोडोनियां धन उत्तम वव्हारें । उदास विचारें वेच करी।। जगद्गुरू संत तुकाराम महाराजांनी या अभंगातून उत्तम व्यवहाराद्वारे धन कमावून त्याचा विनियोग चांगल्या कामासाठी करावा, त्यातूनच उत्तम गती मिळेल. जगद्गुरूंचा हा संदेश आध्यात्मिकवाद्यांसाठीच नव्हे, तर समस्त मानवजातीसाठी आहे, परंतु आपल्याकडे याच्या उलट कारभार आहे. येथे महापालिकेच्या प्रशासकीय राजवटीचे तंतोतंत उदाहरण बसेल. सद्यःस्थितीत महापालिकेत उत्तम व्यवहाराला बगल देऊन खाबुगिरीतच धन्यता मानली जात आहे का? असा प्रश्न नाशिककरांना नक्कीच पडला आहे. प्रशासकीय राजवटीच्या काळात गोदावरीतून बरेच पाणी वाहून गेले. लोकोपयोगीऐवजी वादग्रस्त निर्णयांनी महापालिकेचा कारभार चर्चेत आहे. म्हसरूळ परिसरातील शंभर कोटींचा टीडीआर असो किंवा रातोरात ५५ कोटींचे धनादेश काढण्याचे फर्मान. या प्रकारामुळे महापालिकेच्या प्रतिमेवर मलिनतेचा शिक्का बसलाय. याचे मात्र कोणासही देणे-घेणे नाही. तत्कालीन आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांनी ५५ कोटींच्या भूसंपादनाचा निर्णय घेतला, परंतु पाच प्रकरणांत चुकीच्या पद्धतीने भूसंपादनाचा मोबदला दिला जात असल्याचे शासनाने नेमलेल्या चौकशी समितीला आढळल्याने तब्बल ३७ कोटी रुपये रोखण्यात आले. चौकशी समितीने हा मोबदला रोखल्याने एकप्रकारे तत्कालीन प्रमुखांच्या गैरकारभाराला मारलेली चपराकच म्हणावी लागेल.**

# गैरकारभाराला चपराक!



महापालिकेत लोकप्रतिनिधींची सत्ता असताना राजकीय पदाधिकारी मोकळेपणाने काम करू देत नाही, असा आरोप अधिकारी अनेकदा खासगीत बोलून दाखवत. लोकहितार्थ निर्णयांत अडवणूक होत असल्याची कुरबुर केली जायची. अधिकाऱ्यांच्या नशिबाने पुढे लोकप्रतिनिधींची सत्ता संपुष्टात आल्यानंतर प्रशासक राजवटीत नगरसेवकांचे अधिकार संपुष्टात आले. महापालिकेतील सर्वाधिकार मनपा आयुक्त व अधिकाऱ्यांच्या हातात आले. प्रशासकीय राजवटीत नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सुविधा व महत्त्वाचे निर्णय मार्गी लागतील अशी भाबडी अपेक्षा नागरिकांची असेल. मात्र, ही अपेक्षा सपशेल फोल ठरली. चांगले काम व निर्णय होण्याऐवजी टक्केवारीसाठी महापालिकेत स्पर्धा लागली. एखादा ठेका पदरात पाडून घ्यायचा असेल, तर टक्केवारी वाढवण्यात आली. विशिष्ट ठेकेदारांची रिंग आधीच होती. ती प्रशासकीय राजवटीत अधिक घट्ट झाली. यातूनच अधिकारी व ठेकेदारांच्या गट्टीतून खाबुगिरी वाढली, असा थेट आरोप नागरिक करू लागले.

नुकत्याच झालेल्या विधिमंडळ अधिवेशनात तर महापालिकेच्या शिक्षण, आरोग्य, अतिक्रमण, नगररचना, मिळकत या विभागांवर गंभीर आरोप केले गेले. तत्कालीन शिक्षणाधिकारी बी. टी. पाटील यांच्यावर शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी भ्रष्टाचाराचे आरोप केले. मनपा आयुक्तांनी त्यानंतर पाटील यांच्याकडील पदभार काढून घेतला. आरोग्य विभागाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. तानाजी चव्हाण व सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत शेटे यांच्यावर एका गर्भनिदान करणाऱ्या रुग्णालयाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केल्याचा आरोप आमदार मनीषा कायंदे यांनी केला. याप्रकरणी चौकशी समिती नेमली असता, सहायक आरोग्य अधिकारी डॉ. शेटे यांची महापालिका मुख्यालयातून उचलबांगडी केली.

अतिक्रमणचे तत्कालीन उपायुक्त मयूर पाटील यांच्यावरील लक्षवेधी येतायेता राहिली. यापेक्षा गंभीर आरोप भाजपचे आमदार राहुल ढिकले यांनी पंचावन्न कोटींचे भूसंपादन व म्हसरूळ टीडीआरप्रकरणी गंभीर आरोप विधिमंडळात केले. तत्कालीन आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांचा प्रशासकीय कार्यकाळ वेगवेगळ्या वादांनी गाजला. करंजकरांनी न्यायालयीन आदेशाच्या नावाखाली शहरातील २७१ पैकी मोजक्या ११ भूसंपादनाच्या प्रकरणांत ५५ कोटी रुपये अदा करण्याचा निर्णय घेतला. या विरोधात आमदार ढिकले यांनी शासनाकडे तक्रार केली. त्याची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेऊन नगरविकास विभागाकडून अहवाल मागविले असता, त्यावेळी अधिकाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणल्याचे दिसले. प्रशासकीय राजवटीत चुकीची कामे होत असल्याचा आरोप माजी नगरसेवक वारंवार करत आहेत. त्याचाच भाग म्हणून की काय, ५५ कोटींचे भूसंपादन होय. न्यायालयात सुरू असलेल्या



लक्ष्यवेध
|| गोरख काळे
९५४५६१५३५५

प्रकरणांते व्याज लागू होत असलेल्या प्रकरणांना मोबदला देण्याचे आदेशित केले असून, अशी २७१ प्रकरणे आहेत. मात्र, यात प्राधान्यक्रम ठरविणे आवश्यक असताना प्रशासनाकडून संशयितरीत्या ११ प्रकरणांत भूसंपादनाचा मोबदला देण्याचा निर्णय झाला. मात्र, शासनाने नेमलेल्या चौकशी समितीत चुकीच्या पद्धतीने म्हणजेच आवश्यक नसताना पाच प्रकरणांत भूसंपादनाचा मोबदला देण्याचा अट्टहास केल्याचे समोर आले. चौकशी समितीने अहवाल सादर केल्यानंतर साडेसदतीस कोटींचा मोबदला रोखल्याने काहींच्या पायाखालची जमीन सरकली आहे.

डॉ. करंजकर यांनीच भूसंपादनाचे दिव्य पार पाडले. भूसंपादनच नव्हे, तर त्यांचे इतरही निर्णय संशयास्पद होते. त्यांच्याच काळात जिल्हा रुग्णालयासमोरून जाणाऱ्या मुख्य वाहतुकीच्या रस्त्याशेजारी १४ कोटींचा अनावश्यक सायकल ट्रॅक नाशिककरांवर लादण्यात आला. मुळात जेथून सायकलच जाऊ शकत नाही, सायकल चालवता येईल अशी जागाही नाही. मात्र, ठेकेदाराचे लाड पुरविण्यासाठी आणि खाबुगिरीसाठीच हा निर्णय घेतल्याचा आरोप आजही होत आहे. एकीकडे नाशिककर घरपट्टी, पाणीपट्टीतून कोट्यवधी रुपये महापालिकेच्या झोळीत टाकतात. दुसऱ्या बाजूला मात्र ज्यांना शहराची कसलीही माहिती नाही त्यांच्याकडून फक्त टक्केवारीसाठी व ठेकेदारांना खूश करण्यासाठी नाशिककरांच्या कोट्यवधींची नासाडी सुरू आहे.

धक्कादायक म्हणजे, सायकल ट्रॅक करण्यापूर्वी तेथे कोणतेही सर्वेक्षण झाले नाही. येथून खरोखरच सायकल जाईल का? हे न तपासताच ठेकेदाराच्या हितासाठी १४ कोटींची उधळण केली गेली. प्रशासकीय राजवटीत कुठलीही बंधने नसताना पारदर्शक कारभार करून एक आदर्श नागरिकांसमोर घालून देण्याची संधी महापालिका प्रशासनाला असताना त्यांनी तो विश्वास गमावला आहे, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

**अवगुणाचे हाती ।**
**आहे अवघीच फजिती।।**

याप्रमाणे शहराची अवस्था झाली आहे. लोकप्रतिनिधींची सत्ता असतानाही नागरिकांना चांगला अनुभव नव्हता. तेव्हाही चांगले रस्ते, पाणी, पथदीप, स्वच्छता या पायाभूत सुविधांसाठी झगडावे लागत होते. आताही तीच परिस्थिती आहे. मुख्यत: प्रशासक राजवटीत आपले कोणी काहीही करू शकत नाही एवढे आत्मबल महापालिकेतील काही अधिकाऱ्यांच्या अंगी आले आहे.

आयुक्त मनीषा खत्री यांनी महापालिकेचा पदभार हाती घेतल्यानंतर त्या शिस्त लावण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, नुकत्याच झालेल्या विधिमंडळात महापालिकेच्या कारभाराची लक्तरे टांगली गेली. हे नाशिककरांसाठी नक्कीच भूषणावह नाही. खत्री यांना त्यांच्या पूर्वसुरींनी केलेल्या चुका दुरुस्त करून महापालिकेचा कारभार सुधरविण्याचे आव्हान असेल. तरच सामान्य नाशिककरांचा महापालिका प्रशासनावर विश्वास कायम राहील.




# काँग्रेसला अंतर्गत सद्भावनेची गरज

**काँग्रेसला राज्यात लोकसभा निवडणुकीत मोठे यश मिळाले. त्यामुळे हवेत गेलेल्या महाविकास आघाडीच्या मंडळींना विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांनीच जमिनीवर आणले. पराभवातून बोध घेत, सावरत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने राज्यातील विरोधी पक्ष पावले उचलताना दिसत आहेत. काँग्रेसने विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर नाना पटोले यांच्याकडून प्रदेशाध्यक्षपद काढून घेत ते हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे दिले. सपकाळदेखील प्रदेशाध्यक्षपदाची धुरा हाती घेतल्यानंतर झपाटल्यागत कामाला लागले आहेत. राज्य पिंजून काढत निपचित पडलेल्या काँग्रेसला ॲक्टिव्ह करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. कधी महायुती, तर कधी केंद्र सरकारवर शाब्दिक हल्ले चढवत विरोधक संपलेला नाही, हे दाखवून देताना दिसत आहेत. मात्र, राजा खिंड लढवत असताना सैन्यानेदेखील रणांगणात उतरणे आवश्यक आहे. महायुती सरकारच्या अनेक धोरणाविरुद्ध आंदोलन करत राळ उठवण्याची काँग्रेसला संधी आहे. मात्र, अंतर्गत गटबाजीमुळे काँग्रेसकडून राज्यपातळीवर आंदोलन होताना दिसत नाही. काँग्रेसमध्ये राज्यपातळीपासून स्थानिक स्तरापर्यंत गटबाजीचा नायटा झालेल्या काँग्रेसला उभारी देण्याच्या सपकाळ यांच्या प्रयत्नांना यश मिळणार का? याबाबत साशंकता आहे.**

राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या छप्परफाड यशामुळे विरोधी पक्षांचा सुपडा साफ झाला. हे कसे झाले? या धक्क्यातून अजूनही काही जण सावरलेले नाहीत. तथापि, कालाय तस्मै नमः म्हणत विरोधक आता कामाला लागले आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना तरी फायदा व्हावा, ही भावना त्यामागे आहे. त्यादृष्टीने पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. विधानसभेतील पराभवानंतर महाविकास आघाडीतील मित्रपक्षांत दुरावा आल्याचे चित्र आहे. ठाकरे गट महापालिका निवडणुका स्वबळावर अथवा मनसेसोबत युती करत लढविण्याच्या मूडमध्ये दिसत आहे. त्यातच ठाकरे बंधूंनी जर एकमेकांना टाळी दिली तर महाविकास आघाडीचे काय होणार? याबाबतही आता वेगवेगळ्या चर्चांचे पेव फुटत आहे.

शिवसेना ठाकरे गट आणि मनसेची युती झाली तर ठाकरे गट महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याची शक्यता आहे. असे झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि काँग्रेसची पारंपरिक आघाडी राहील. दोन्ही पक्ष एकत्रितरीत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सामोरे जातील. मात्र, नाशिक शहरात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची ताकद अगदीच तोळामासा आहे. अशा स्थितीत महायुतीसारख्या तगड्या विरोधकांना आव्हान देताना काँग्रेसला संघर्ष करावा लागणार आहे. त्यासाठी जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठविण्यासोबतच मजबूत संघटनात्मक बांधणीची आवश्यकता आहे.

लोकशाही टिकविण्यासाठी प्रबळ विरोधी पक्षाची आवश्यकता असल्याची जनभावना आहे. तथापि, राज्यात महायुती सरकारच्या धोरणांविरुद्ध विरोधी पक्षांकडून जोरदार आवाज उठवला जात नसल्याचे चित्र आहे. त्याला कारणेही तशीच आहेत. पाच वर्षे विरोधात राहून काहीच फायदा नाही. त्यामुळे अनेक मंडळी कुंपणावर आहेत. ते कधीही उड्या मारू शकतात. मग विरोध कशासाठी करायचा? अशीही मानसिकता यामागे आहे. त्यामुळेच विरोधकांचा कोणताही कार्यक्रम, आंदोलन जर पाहिले तर कार्यकर्ते केवळ शरीराने हजर असतात. नाशिक शहराचेच जर चित्र बघितले तर काँग्रेसची शहरातील अवस्था अतिशय दुबळी असूनही गटातटाच्या राजकारणामुळे पक्ष रसातळाला चालला आहे, पण त्याचे कुणालाच सोयरसूतक नाही.

नाशिक शहरात विविध आंदोलने करताना प्रशासनाला निवेदन देताना काँग्रेसची मंडळी काहीशी ॲक्टिव्ह झाली आहे. जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवताना दिसते. काँग्रेसने गेल्या काही दिवसांत अनेक आंदोलने केली, ही काँग्रेस पक्षासाठी सकारात्मक बाब असली, तरी या आंदोलनाच्या वेळीही एकजिनसीपणा जाणवत नाही. विधानसभा निवडणुकीत नाशिक मध्यची जागा काँग्रेसला मिळावी म्हणून डॉ. हेमलता पाटील यांनी खूप प्रयत्न केले. मात्र, ती जागा



करंट इश्यू
अश्विनी पांडे

महाविकास आघाडीत शिवसेना ठाकरे गटाच्या वाटेला गेली. अर्थात, ही जागा काँग्रेसला मिळू नये यासाठी काँग्रेसचाच एक गट कमालीचा सक्रिय होता, हा भाग अलहिदा! त्यानंतर नाराज झालेल्या हेमलता पाटील यांनी निवडणुकीनंतर काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली. त्यामुळे काँग्रेसमधील गटबाजीची चर्चा रंगली. त्याचप्रमाणे महिला काँग्रेसच्या जिल्हाप्रमुख वंदना पाटील यांनीदेखील शिवसेनेत प्रवेश केला.

एकीकडे काँग्रेसमधून नेते बाहेर पडत असताना राज्यपातळीवरील नेत्यांच्या दौऱ्याच्या निमित्ताने शहरात वातावरणनिर्मिती करत नवचैतन्य निर्माण करण्याची काँग्रेसला खरेतर चांगली संधी होती. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महिनाभरात दोन वेळा नाशिक दौरा केला. माजी खासदार हुसेन दलवाई हेही सातपीर दर्ग्याची पाहणी करण्यासाठी नाशिक दौऱ्यावर येऊन गेले. राज्यपातळीवरील बड्या नेत्यांचे दौरे होत असताना त्याचा स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांना उभारी मिळण्यासाठी चांगला उपयोग झाला असता. मात्र, काँग्रेसने या दौऱ्यातही गटातटाचेच प्रदर्शन घडविले.

गेल्या आठवड्यात काँग्रेसने सरकारच्या धोरणाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी संविधान सद्भावना यात्रेला नाशिकपासून प्रारंभ केला. खासदार राहुल गांधी यांनी काढलेल्या भारत जोडो यात्रेच्या निमित्ताने चांगली वातावरणनिर्मिती होऊन त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला फायदा झाला होता.

काँग्रेसची सद्भावना रॅली ही त्याच धर्तीवर असल्याने त्यादृष्टीने स्थानिक पातळीवरील नेत्यांनी तशी वातावरणनिर्मिती करणे आवश्यक होते. मात्र, गटबाजीचे प्रतिबिंब संविधान सद्भावना रॅलीत उमटले. काँग्रेसचा राज्यपातळीवर नेता शहरात रॅली काढत असताना त्यासाठी मोठी गर्दी जमविण्याची संधीही स्थानिक मंडळींना साधता आली नाही. या यात्रेच्या माध्यमातून काँग्रेसने एकात्मतेचा संदेश देण्याचा प्रयत्न केला. मात्र, काँग्रेसलाच पक्षांतर्गत एकात्मतेची खऱ्या अर्थाने गरज अधोरेखित झाली आहे.

आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सामोरे जाण्याच्या आधी काँग्रेसला पक्षांतर्गत पातळीवरील एकात्मता टिकवत पक्षसंघटना मजबूत करावी लागणार आहे. निवडणुकीत यश मिळवायचे असल्यास विरोधकांचा सामना करण्याआधी गटातटाच्या भिंती पाडून टाकाव्या लागणार आहेत.

ही गटबाजी मिटली नाही तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत काँग्रेसचा कपाळमोक्ष अटळ आहे. त्यासाठी संविधान सद्भावना रॅली काढत असताना पक्षांतर्गत सद्भावना निर्माण करण्यासाठी आता वरिष्ठांना लक्ष घालावे लागणार आहे. अंतर्गत सद्भावना, एकात्मता निर्माण झाली तरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेसचा काही प्रमाणात का होईना टिकाव लागू शकतो. नाहीतर काँग्रेसला कुणीच वाचवू शकणार नाही. ही बाब सर्वांनीच गांभीर्याने घेण्याची गरज आहे.


# नेमका विकास कुठे?

**सध्या वेगवेगळे पक्ष सामाजिक विकासाच्या मोठमोठ्या गप्पा मारत फिरत आहेत. देश का विकासच्या नावाखाली स्वतःची पोटं तुडुंब भरता आहेत. जर देशाचा विकास खरंच होत असेल तर मग शहरातील रस्त्यारस्त्यांवर, चौकाचौकांत भिकाऱ्यांची संख्या का कमी होत नाही? त्यांच्यासाठी सरकारने कोणती योजना बाहेर आणली? त्यांचा विकास कुठे दिसतो? अनाथ आश्रमांची संख्या कमी होण्याऐवजी दररोज वाढत आहे. धर्माच्या नावाखाली राजकारण करणे आता बंद झाले पाहिजे. जातीपातीचे राजकारण करून सर्वसामान्य माणसाला वेड्यात काढण्याचे धंदे नेस्तनाबूत झाले पाहिजेत. अनाथांना ना धर्म असतो, ना जातपात. त्यांना आईवडील माहीत नसतात. कुठून आले हे त्यांना माहीत नसते.**

खेड्यातला एखाद्या गरीबघरचा पोरगा आयपीएस अधिकारी होत असतो तो जातीचे, धर्माचे राजकारण न करता मेरिटने पुढे येत असतो. मेरिट हा प्रकार काही शाखेसाठी खरोखर गरजेचा आहे. उदा. डॉक्टरसारख्या व्यवसायात आज एखादा मुलगा ६० टक्क्यांवर डॉक्टर होतो, तर दुसरा ९० टक्के गुण मिळवून डॉक्टर होतो. मग खरा डॉक्टर कोण? त्यांच्या गुणवत्तेचा उपयोग कोण चांगल्या पद्धतीने करत असेल, असे प्रसिद्ध डॉ. नीतू मांडके म्हणतात. जिथे मेरिटची गरज आहे तिथे त्याच प्रकारच्या गुणवत्तेची खरंच गरज आहे. याचा विचार होणे गरजेचे वाटते. एकीकडे देश का विकास मोठ्या आवाजात म्हणायचे आणि दुसरीकडे दुर्गम भागात आजही महिलांना विहिरीत उतरून पाणी आणावे लागते. इतकी शोकांतिका आजही आहे. आजही दुर्गम भागातल्या खेड्यांत हीच अवस्था आहे. पाण्यासाठी मरमर मरणाऱ्या महिलांसाठी सरकारने कोणती योजना आणली? सरकारचे अजिबात न ऐकणारे अधिकारी स्वतःचे काम मनापासून करत आहेत का? याचे उत्तर अजिबात नाहीत. आयएएस झालेले अधिकारी नोकरीला लागताना मोठमोठ्या गप्पा मारतात, पण नोकरी सुरू झाली की, तेही इतरांसारखे वागू लागतात. एखादा तुकाराम मुंडेंसारखा अधिकारी प्रामाणिकपणे काम करतो. त्याला सरकार व्यवस्थित काम करू देत नाहीत. याला कारण सरकारलाच हे होऊ द्यायचे नाही. लुटणे हा एकच मार्ग सरकारच्या योजनेत समाविष्ट आहे. अधिकाऱ्यांना पगाराव्यतिरिक्त पैशांची हाव असते. कारण त्यांना वर द्यावे लागतात, हेच त्यांचे उत्तर असते. विशेष म्हणजे नागरिक त्यांच्याविरोधात वारंवार तक्रार करूनही लोकप्रतिनिधी, मंत्री त्याची दखल घेत नाहीत. त्यामुळे अधिकारी



उन्मत्त व भ्रष्टाचारी होत आहेत. नागरिकांच्या प्रश्नांना उत्तरे देण्याची लोकप्रतिनिधींमध्ये हिंमत नाही. सामान्य नागरिकांनी प्रश्नच विचारू नयेत का? याला खरंतर सामान्य नागरिकच जबाबदार आहेत. निवडणूक काळात पैसे घेऊन मतदान करण्याची प्रवृत्ती त्याला कारणीभूत आहे. नंतर बोलून काहीच उपयोग नाही. ते म्हणतात, तुम्ही कुठे आम्हाला फुकट निवडून दिलेत? मग बसा पाच वर्षे बोंबलत, अशी परिस्थिती नेहमीची झाली आहे. यासाठी सुशिक्षित नागरिक, भ्रष्टाचारविरोधी लढा देणारे नागरिक, सामान्य कर्मचारी यांनी एकजूट केली पाहिजे. बदल घडवायचाच असेल तर पैसे घ्या, पण पैसे देणारा पाडून टाका, हे सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचले पाहिजे. लाखो युवक नोकरीच्या शोधात आहेत. अनेक जण कंत्राटी पद्धतीने नोकरी करत आहेत. सुशिक्षित मुले सामान्य नोकऱ्या करत आहेत. कुठे आहे देशाचा विकास? मोठमोठे रस्ते, विमानतळ, मंदिरे हा आहे का देशाचा विकास? जिथे सामान्य नागरिकाचे जगणे कठीण आहे. त्याला देशाचा विकास म्हणता येईल का? महागाई, बेरोजगारी, इंधन, गॅस यांची दरवाढ जेव्हा कमी होईल, तेव्हा देशाचा विकास होईल. तो कधी होईल, याची उत्तरे शासनाकडे नाहीत. या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून सरकार धर्म, जातपात या मुद्द्यांकडे नागरिकांना नेत आहे आणि लोक वेड्यासारखे ते प्रश्न पुढे घेऊन भांडत आहेत, हेच आपले दुर्दैव आहे. आजपर्यंतच्या दहशतवादी घटना बघितल्या तर त्या कुणाच्या काळात घडल्या? का घडल्या? याचा विचार सर्वसामान्यांनी स्वतः ला विचारला पाहिजे. राजकारण समोर ठेवून या घटना घडवल्या जातात का? सर्वसामान्य माणसाने आपले दुखणे समजावून घेतले पाहिजे. नुसता देश का विकास बोलून चालणार नाही. अमृता करवंदे नावाची एक अनाथ तरुणी म्हणते की, तुम्ही मुख्यमंत्री असा किंवा नसा, माझी काय चूक आहे? की मी अनाथ आहे. मला जात नाही, पात नाही, धर्म नाही. आई-वडील नाहीत. मला कोणीतरी अनाथ आश्रमात टाकले. १८ वर्षांनंतर अनाथ आश्रम मला सांगते, तुम्ही आता आश्रम सोडा. त्यांची काहीच चूक नाही, पण मी आत्ता जाणार कुठे, हा माझा सरकारला प्रश्न आहे. तुम्हा सर्वांना मुलं-मुली आहेत. मुख्यमंत्र्यांनाही मुलगी आहे. त्यामुळे तुम्हाला त्याची जाणीव नसेल, पण मला मायबापच नाहीत. आम्ही जायचं कुठं? आमच्यासारखी मुलं कुठेतरी रेल्वे स्टेशनवर शौचालये धुऊन एमपीएससीच्या परीक्षा उत्तीर्ण झालो आहोत, तर त्यांना तुम्ही विचारता, तुझ्याकडं जातीचा दाखला आहे का? तुझ्याकडे आधार कार्ड कुठे आहे? असे नियम तुम्ही दाखवता? तिने कुठून आणायचे हे? हा देश का विकास तुमचा? माझ्या एवढ्या परिश्रमाला, बुद्धिमत्तेला काहीच किंमत नाही? मग शिकायचे तरी कशासाठी? हे तिचे ऐकून मुख्यमंत्र्यांनी वेळेवर जी खटपट केली तो तिच्या आयुष्यातला कलाटणी देणारा क्षण ठरला. पण इतरांचे काय? अशी अनेक मुले-मुली आहेत की, त्यांच्याकडे या गोष्टी उपलब्ध नाहीत. देशाचा विकास सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय कुठेच दिसत नाही. फक्त राजकीय विकास मात्र, दिवसेंदिवस वाढला आहे. त्याचा परिणाम पैसा फेको, पद संभालो एवढा मात्र नक्कीच झाला आहे. लोक मात्र निवडणुकीत अजूनही सुधारत नाहीत. हा बदलाचा विकास कधी होईल? देशातला शेतकरी समस्यांनी ग्रस्त आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, अशा योजनांवर सरकार सध्या चालत आहे. नव्या नोकऱ्या कुठेच दिसत नाहीत.शिकलेली मुले घरी बसून आहेत. त्यांच्या योग्यतेनुसार नोकऱ्या नाहीत.



कटाक्ष
के. के. अहिरे
९९६०६०३१८२

दहावी-बारावी झालेली मुले कुठेतरी कंत्राटी पद्धतीने नोकरी करतात, पण शिकलेली मुले राजकारण्यांचे बॉडीगार्ड म्हणून काळ्या गणवेशात रुबाबात फिरत आहेत. यासाठीच आई-वडिलांनी परिश्रम घेतले का? चुकून काही घडले तर ही तरुण पिढी जेलची हवा खाते. त्यावेळी मात्र त्यांना सोडवायला कुणी राजकारणी पुढे येत नाही. हाच आहे का देशाचा विकास? आई-वडिलांना वाटतं मुलगा काहीतरी कमावतो आहे, पण त्यांना माहीत नाही की, हा राजकारण्यांनी वसूल केलेली खंडणी, कमिशनचे पैसे पगार म्हणून घरात आणतो आहे. ही आजची वास्तवता आहे. दरवर्षी लाखो पदवीधरांची भर पडत आहे.नोकरीच्या शोधातील मुले-मुली वाढत आहेत. तंत्रज्ञान बदलल्याने बऱ्याच कंपन्या बंद पडत आहेत.परिणामी मुलं घरी येत आहेत. मग देशाचा विकास नेमका कुठे झाला?

# ती एक मनोरुग्ण



मनमोकळे
अंजली रहाणे-थेटे



एका संध्याकाळी अंगणातल्या तुळशी वृंदावनाचं निरखून निरीक्षण करत शांत बसलेली असताना आठवडे बाजारातून भाजीपाला घेऊन जाणाऱ्या महिला कुजबुज करत रस्त्यावर बोलत उभ्या राहिल्या आणि गावात घडलेला चित्र विचित्र प्रसंग बोलण्याच्या विषयात रंगवू लागल्या. नकळत तो सारा प्रसंग माझ्या कानी अधोरेखित झाला. कान मात्र सुन्न झाले. सारं काही ऐकून काळजात खोलवर दबलेला आवाज आरडाओरडा करू लागला. ऐकलेला प्रसंग किती वास्तव अन् किती काल्पनिक ही बाब महत्त्वाची नसून, इथे प्रसंगाचं गांभीर्य लक्षात घ्यायला हवे. आणि तो प्रसंग असा की, ती एक मनोरुग्ण आहे आणि तिचं मानसिक संतुलन पूर्णपणे बिघडलेले.. गावभर फक्त भटकत दिसायची.. अंगावर निरनिराळे अस्वच्छ कपडे लोकांनी फेकून दिलेले तेच कपडे ती अंगभर गुंडाळून हिंडायची. कधी खुप शहाण्यासारख तर कधी तीचा वेडपटपणा दिसायचा, कारण शेवटी ती एक मनोरुग्ण आहे. रोज ये-जा करताना तिच्या वेडसर वृत्तीचा लोकं अनेकदा फायदा घ्यायचे. कुणी काहीही बोलून तिला चिडवायचे तर टिंगलटवाळी करायचे. .. लहान मुलं दगड मारायचे तर कधी टपका मारुन पळून जायचे...ती मुळात रुग्ण त्यामुळे ती त्याच प्रकारे समाजात वावर करायची पण अशा वेळी कधीतरी मनात हेच आले की नक्की वेड कोण... ती मानसिक रुग्ण वेडी की या समाजातले स्वतःला समाजशील म्हणवणारे माणसं...

हो, हेच वरील वाक्य जे त्या पद्धतीने वागतात त्यांना बोलले तर कदाचित एका क्षणी मलाही एक मानसिक रुग्ण आहे. यामध्ये गणतील. परंतु मनापासून जेव्हा एक स्त्री अशा अवहेलनेतून जाते तेव्हा तिच्या वेदना एक स्त्री या नात्याने काळजाला लागतात. नेहमीच दृष्टीस दिसणारी ती..एक दिवस तिच्याबद्दल अचानक काहीतरी ऐकायला आले आणि मन सुन्न होऊन गेलं. कारण जे ऐकलं ते विचित्र होत. जी स्त्री मुळात मानसिक रुग्ण आहे. तिचा कोणताही ठावठिकाणा नसतो.. काहीही खाते, कुठेही झोपते, कशीही जगते. ती साधारण तीन -चार महिन्यांची गर्भवती आहे हे कळतं. तेव्हा माणूसपणाची अक्षरशः किळस येते. ज्या व्यक्तीने तिच्यावर अतिप्रसंग केला असेल तो नक्कीच सज्ञान असेल. कारण त्याला निदान कळत असेल परंतु शारीरिक भूक भागविण्यासाठी त्याने अशा पद्धतीने कृत्य करून माणूसपणाचा घाणेरडा कळस गाठला, कारण त्यानंतर नऊ महिने त्या स्त्रीला हेही कळत नव्हते की आपण एका बाळाला जन्म देणार आहोत आणि कळणार ही कसे ना?? ती एक मानसिक रुग्ण..

थोड्या दिवसांपूर्वी पुन्हा एक बातमी कळते की, सरकारी रुग्णालयात ती बाळंत झाली. गोंडस बाळाला जन्मही दिला. आईपणाच्या कळा सोसून असंख्य वेदना तिलाही झाल्या असतीलच ना..एका नॉर्मल महिलेला ज्या प्रसंगातून जावं लागतं हे तिच्याबाबत घडले असेलच ना..रक्तस्राव असेल किंवा बाळंत होताना होणाऱ्या असह्य वेदना तिलाही झाल्याचं असतील ना...ऐकून खूप कळवळा हृदयात दाटून येत होता, परंतु तिला यातलं समजत नव्हतं पण सगळं जाणवलं असेलच ना. ती लगेचच बाळंत झाल्यानंतर म्हणे दुसऱ्याच दिवशी पुन्हा भटकंती करू लागली गावभर... योगायोगाने अशी ही माहिती मिळाली की, ते बाळ कुणीतरी दत्तक घेतले. ज्या गोष्टीची चिंता होती की, बाळ कसं सांभाळेल ती तर बाळ ही आता रांगीजुपी लागले. आता इथे प्रश्न बाळाचा नाहीच मुळी.. इथे महत्त्वाचा मुद्दा हाच की, काही महिन्यांपूर्वी होणारी ही घटना लोकांनी चर्चेचा विषय करून सोडून दिली, परंतु गांभीर्याने विचार केला तर पुन्हा ती आणि तिच्यासारख्या अनेक मानसिक रुग्णांचा वापर करून पिसाळलेले कुत्रे लोचके तोडून निघून जातील आणि आपण ज्या समाजात राहतो तिथं हया ही कृत्याचा कालांतरानं सत्कार करत विषय बाजुला सारतील. हे सगळं जाणून घेऊन विचार कोणीतरी करायला हवा गावाचं प्रशासन अथवा इतर समाजहितासाठी झटणाऱ्या बांधवांनी...

ती मनोरुग्ण.. शारीरिकरीत्या ही रुग्ण होत जाईल आणि वेदनेलाही बळी पडेल. शेवटी मनोरुग्ण जरी असेल तरी संवेदना.. भावना आणि वेदना तिलाही जाणवत असतील ना हा विचार का करत नाही कुणीही.. लेख लिहिला कारण तिला आणि तिच्यासारख्या असंख्य मनोरुग्णाचा फायदा घेऊन समाजातले सांड मोकाट फिरतात. आणि यावर कोणत्याही प्रकारे आक्षेप घेतला नाही तर असे सांड अजून माजतील... म्हणून हा एक स्त्री म्हणून एका स्त्रीच्या वतीने आक्रोश आणि आवाज... जरा कर्कशता असेल शब्दांमध्ये परंतु कृत्य ही कलंकित करणारे आहे ना!!!? तिला एखाद्या मानसिक रुग्णालयात दाखल करा अथवा तिच्यावर अतिप्रसंग करणाऱ्या कुत्र्याचा शोध घेऊन वेळीच या अनिष्ट घडणाऱ्या घटनांची पायमुळं नष्ट करा... कानावर आलेला हा प्रसंग ऐकून इतका त्रास होत असेल तर नक्कीच या काल्पनिक कथेसारखेच वास्तवात घडलं असेल किंवा समाजात असे प्रसंग घडत असतील तर एक लेखक या नात्याने आवाहन प्रशासन आणि लोकप्रतिनिधी तसेच समस्त महिला आयोगाला की अशा बाबतीत ही गावोगावी आढावे घेत जा. ठिकठिकाणी अशा निराधार मनोरुग्णाची व्यवस्था करा. ती एक मनोरुग्ण आहे याउलट एक दिवस ती एक पीडित मनोरुग्ण होता कामा नये.

# अल्पसंख्याक समूहातील विद्यार्थ्यांना परदेश शिक्षणाची संधी

विशेष
श्रद्धा मेश्राम
सहायक संचालक
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

विविधतेत एकता असलेला भारत देश हा अनेक जाती समूहांचा एकसंध देश आहे. याची संस्कृती आणि एकता अबाधित राहण्यासाठी सर्व वर्गातील लोकांच्या विकासाबरोबरच अल्पसंख्याक समुदायाच्या विकासासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात राहता यावे यासाठी केंद्र सरकार आणि राज्य शासन विविध सामाजिक आणि शैक्षणिक, आर्थिक योजना राबवितात. भारतात राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग कायद्यांतर्गत मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन आणि झोरोस्ट्रियन (पारशी) या सहा धार्मिक समुदाय अल्पसंख्याक म्हणून ओळखले जातात.

**परदेश शिष्यवृत्ती योजना**

अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता असूनही आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित असलेल्या होतकरू व गुणवत्ताधारक मुलांना व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळवून देण्यासाठी त्यांना परदेश शिष्यवृत्ती योजना प्रदान करण्यात येते.

२०२५ - २६ या आर्थिक वर्षाकरिता १५.१५ कोटी रुपये आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर पदवी परीक्षेत किमान ५५ टक्के गुण असणे आवश्यक आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्यांची कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे आणि पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्यांची कमाल वयोमर्यादा ४० वर्षे आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न आठ लाखापेक्षा जास्त नाही, तसेच एकाच कुटुंबातील किमान दोन विद्यार्थ्यांनाच या शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येतो. ७५ विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्याने इतर कोणत्याही राज्य शासनाची अथवा केंद्र शासनाची अथवा अन्य संस्थांकडून परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती घेतलेली नसावी. प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पूर्ण वेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा तसेच अभ्यासक्रमाचा कालावधी कमीत कमी दोन वर्षांचा असावा. एक्झिक्युटिव्ह पदव्युत्तर पदवी किंवा एक्झिक्युटिव्ह पदव्युत्तर पदविका व अर्धवेळ अभ्यासक्रमांत प्रवेशित विद्यार्थी या योजनेस पात्र असणार नाहीत.

धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थीबहुल शासनमान्य खासगी अनुदानित कायम अथवा विनाअनुदानित अथवा विनाअनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व दिव्यांग शाळांमध्ये पायाभूत सोयीसुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येतात. सदर योजनेअंतर्गत २०२४-२५ या आर्थिक वर्षात २४५ शाळांमध्ये ही योजना राबविण्यात आली आहे.

अल्पसंख्यांक समाजातील होतकरू व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च व व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी प्रेरित करण्यासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. ८ लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटूंबातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय व अर्धवैद्यकीय अभ्यासक्रम, तांत्रिक व व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी ५० हजार किंवा शैक्षणिक शुल्क तसेच १२ वी नंतरचे कला, वाणिज्य, विज्ञान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ५ हजार रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते.

राज्यातील अल्पसंख्याकबहुल क्षेत्रात मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिकांना २० लाख, अ वर्ग नगरपालिकांना १५ लाख तर ब व क वर्ग नगरपालिकांना १० लाखांपर्यंत अनुदान देण्यात येते.

राज्यातील अल्पसंख्याकांना शिक्षण, आरोग्य, निवास सुविधा, रोजगार, पतपुरवठा व इतर मूलभूत सुविधा प्राप्त करण्यासाठी सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या विविध प्रश्नांबाबत संशोधन करून त्यावर उपाययोजना करणे. यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख व्यावसायिक शिक्षण देणे. मुंबईतील मांडवी, उपनगरमधील चांदिवली येथे व राज्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि वसतीगृहात विद्यार्थ्यांसाठी दुसऱ्या/तिसऱ्या पाळीत अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहे. ४४१६ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. तसेच शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये दुसऱ्या पाळीत अभ्यासक्रम सुरू करून विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शिक्षण देण्यात येते.

अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आहारासाठी ०.४० कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रमांतर्गत वसतीगृह, शाळा इमारत, इत्यादी संस्थांद्वारे अल्पसंख्याकबहुल जिल्ह्यातील लोकांच्या एकंदर राहणीमानाचा दर्जा उंचावणे, मूलभूत सुविधा उपलब्ध करून त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तरात सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. यासाठी राज्य हिस्सा ८० कोटी, केंद्र हिस्सा १२० कोटीची निधीची तरतूद करण्यात आली आहे.

उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीसाठी वसतिगृह योजनेंतर्गत मुलींसाठी वसतिगृहाची सोय उपलब्ध करून मुलींच्या उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी ३ कोटी निधीची तरतूद करण्यात आली. २५ जिल्ह्यांमधील ४३ शहरे अल्पसंख्याकबहुल क्षेत्रे घोषित केली आहेत. अशा २५ जिल्ह्यांमध्ये प्राधान्याने वसतिगृह उभारण्यात येणार आहेत. राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत अल्पसंख्याक उमेदवारांसाठी शासकीय सेवा भरती पूर्व परीक्षा प्रशिक्षण वर्ग तसेच मराठी भाषा फाउंडेशन वर्ग चालविले जातात. तसेच आयोग आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सहाय्याने अल्पसंख्याक महिलांचे मागासलेपण दूर करण्यासाठी स्वयंसहाय्यता गटांकरिता अनुदान देण्यात येते.

डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेंतर्गत २०२४-२५ या आर्थिक वर्षात १९० पात्र मदरशांना एकूण ११.५५ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला. १६५ मदरशांमध्ये विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दु या विषयांचे शिक्षण देण्यात येते.

राज्यात उर्दू भाषेची वाङ्मयीन प्रगती, मराठी व उर्दू भाषेमधील लेखक, कवी, विचारवंत यामध्ये सर्जनशील विचारांची देवाणघेवाण होऊन उर्दू भाषेचा वाङ्.मयीन विकास व्हावा यासाठी उर्दू घर नांदेड, मालेगाव, सोलापूर येथे कार्यान्वित असून नागपूर येथे काम सुरू आहे.

याचबरोबर अल्पसंख्यांक लोकसमूहाकरिता धर्मक्षेत्र व परिसर विकास आराखडा योजना, महिला बचत गटातील सदस्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे, महिला व युवकांना कौशल्य प्रशिक्षण देणे, पोलीस भरती पूर्व परीक्षा पूर्व प्रशिक्षण देण्याकरिता अल्पसंख्याक विभागाच्या वतीने योजना राबविण्यात येतात.

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्याची संधी मिळणे ही केवळ त्यांच्या वैयक्तिक प्रगतीची बाब नाही तर ती संपूर्ण समाजाच्या विकासाची दिशा आहे. त्यामुळे अल्पसंख्याक समूहातील विद्यार्थ्यांनी शासनाच्या परदेश शिक्षणाच्या योजनेचा लाभ घेऊन आपल्या जीवनाला नवी दिशा द्यावी.

# परिवर्तनाची दिशा दाखविणारी कलाकृती – नाही गिरवता येत कुठलीच लिपी

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ येथील कवयित्री डॉ. सौ. स्मिता पाटील लिखित 'नाही गिरवता येत कुठलीच लिपी' हा कवितासंग्रह नुकताच वाचण्यात आला. अतिशय अर्थपूर्ण आणि स्त्रीजीवनाचे व्यवस्थेने मोडकळीस आणलेले संदर्भ विविध मुक्तछंदातील कवितांमधून अत्यंत चपखलपणे योग्य ठिकाणी योग्य प्रतिमांना तोल सांभाळत केलेली गुंफण दिसून आली. कवयित्री डॉ. सौ. पाटील यांनी आपल्या कवितांमधून अनादिकाळापासून स्त्री स्वातंत्र्याची झालेली पडझड आणि त्यातून उभारी घेऊन व्यवस्थेला परिवर्तनाची दिशा दाखवली आहे.


समाजामध्ये स्त्री पुरुष समानतेचे केवळ कागदोपत्री घोडे नाचवले जात आहे.. स्त्री स्वतंत्र झाली, स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने हक्क मिळाले पाहिजे अशी भूमिका मांडली जाते मात्र प्रत्यक्षात पाहिले तर तसे होत नाही हे एका स्त्रीने प्रातिनिधिक स्वरुपात स्त्री पुरुषातील फरक दाखवून दिला आहे. शिक्षण घेतांना स्त्री पुरुषाला अ आईचाच शिकवला जातो मात्र समाजात वावरतांना अ आईचा रहात नाही तर स्त्रीसाठी तो ब- बाईचा होतो ही शब्दातील दरी कमी व्हायला हवी म्हणून सौ पाटील आपल्या ब - बाईचा या कवितेत मांडतात की -

**दोघेही शिकतात अ - आईचा**
**पण वळण घेतो (अदृश्य)**
**तोच काना, रफार वेगळेच**
**लिहिताना ब- बाईचा.**

या रूढी परंपरेने चालत आलेल्या स्त्री पुरुष विषमतेच्या व्यवस्थेला (लिपीला) कोणतीच लिपी बदलू शकत नाही या अर्थाने शीर्षक - नाही गिरवता येत कुठलीच लिपी या कलाकृतीला दिले असावे असे मला वाटते.

सौ पाटील या परिवर्तनाच्या वाटेवर प्रवास करणाऱ्या कवयित्री आहेत, अनादिकाळापासून स्त्री ही संशयाच्या भोवऱ्यात सापडलेली आहे, परंपरेच्या जोखडात मान अडकवून सामाजिक रुढीच्या बंधनात गुंतलेल्या स्त्रीला मोकळे करण्याची भाषा त्यांच्या कवितांमधून दिसून येते. या व्यवस्थेबद्दलची मनात प्रचंड चीड आहे ही चीड समाजासमोर व्यक्त करतांना कवयित्री विस्तव या कवितेत लिहतात की -

**कधी कधी वाटतं...**
**आपणच फुलावं रसरसीत विस्तव होऊन**
**भाजून टाकावं परंपरेच्या भाकरीला,**




**गिळून टाकावं रुढींच्या शिळ्या कढीला**

नाही गिरवता येत कुठलीच लिपी या कवितासंग्रहातील कविता अत्यंत गर्भित अर्थाने आलेल्या आहेत, मुक्तछंदातून अत्यंत प्रभावीपणे स्त्रीवादी जीवनाचे प्रखर वास्तव त्यांनी मांडले आहे. स्त्री ही केवळ चूल आणि मुल, रांधा वाढा आणि उष्टी काढा, मुलांना जन्म देणे यातच गुरफटलेली आहे. तिला तिचं स्वतःच अस्तित्व आहे हे ती विसरून गेली आहे. स्त्रीला तिच्या वास्तवाची जाणीव करून देताना बांगडी या कवितेत कवयित्री म्हणतात की -

**पणती, चिमणी, केरसुणी, सुपली साऱ्या**
**तिच्या सख्या सोबती !**
**भूक, झोप, पालवी तिच्या प्रतिकृती, ती**
**स्वतः तर मोहिनी**
**आरसा शृंगार तिची युद्धभूमी**
**तीही भुलून गेलेली, म्हणूनच तिला दिसत**
**नाही, काचत गेलेली बांगडी आणि तिचं**
**रक्तबंबाळ मनगट !**

परिचय
प्रशांत वाघ
७७७३९२५०००



आणि म्हणूनच ही व्यवस्था (लिपी) कितीही केले तरी बदलू शकत नाही (गिरवता येत नाही) या अर्थाने शीर्षक दिले असावे असे मला वाटते.

समाजात हा कनिष्ठ, हा उच्चवर्णीय असा उच्च नीच भेदभाव पेरला जातो, त्यातून सामाजिक सलोखा बिघडून समाजात जातीय तेढ निर्माण होतो, भूतलावर केवळ एकच जात आहे ती म्हणजे मानवतेची. बुद्धांपासून तर चार्वाक, संत तुकोबा, महात्मा जोतिबा फुले, डा. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवतेच्या कल्याणासाठी विश्वकल्याणाचे, समतेचे, समानतेचे विचार मनामनात पेरले ... मात्र पुराणकाळापासून वेदांमधून दिलेली शिकवण समता बंधुता आणि यांना छेद देणारी आहे. माणसामाणसात व्दंद्व निर्माण करणारी आहे असे कवयित्रीला वाटते आणि म्हणूनच कवयित्री या रूढी परंपरांचे बंधन घालून देणाऱ्या वेदशास्त्राला का महत्व द्यायचे असा प्रश्न समस्त मानव समाजाला विचारत आहे. त्यांच्या फुटू दे आभाळ या कवितेत प्रश्न विचातात की-

**हेच सांगणार असतील वेद**
**आर्य किती श्रेष्ठ आणि अनार्य केवढे**
**घृणास्पद, असे वेद पूजावे तरी का ?**

अतिशय परखड आणि परिवर्तनाची नांदी असलेला प्रश्न या कवितेतून विचारला गेला आहे.

नाही गिरवता येत कुठलीच लिपी या संग्रहात एकूण ७३ कविता असून सर्व कविता स्त्रीपात्राच्या भोवती घिरट्या घालतांना दिसतात. केंद्रस्थानी स्त्री घेऊन कवयित्रीने रूढी-परंपरेत अडकलेल्या स्त्रीला परिवर्तनाची दिशा दाखवली आहे.

या संग्रहासाठी प्रसिद्ध साहित्यिक डॉ. महेंद्र कदम यांनी पाठराखण केली असून अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा डॉ श्रीपाल सबनीस, साहित्यिक मा. रवींद्र ठाकूर, डॉ. फुला बागुल, मा. महावीर जोंधळे, मा. दा. गो. काळे, मा. एकनाथ पगार, डॉ. शंकर विभूते, डॉ. श्रीकांत पाटील, मा. चांगदेव काळे, मा. पी. विठ्ठल अशा दिग्गज साहित्यिकांनी कौतुकाची थाप टाकून कवयित्री सौ. पाटील यांच्या लेखनीला उभारी दिली आहे.

मुंबईचे प्रसिद्ध प्रकाशक ग्रंथाली प्रकाशन यांनी प्रकाशन करून या कलाकृतीला वाचकांच्या हवाली केले आहे. प्रसिद्ध मुखपृष्ठचित्रकार शिरीष घाटे यांनी कुंचल्याने कवितांचा अचूक वेध घेऊन मुखपृष्ठ सजवून एक वेगळी ओळख करून दिली आहे.

**कलाकृती - नाही गिरवता येत कुठलीच लिपी**
**कवयित्री - डॉ. सौ. स्मिता पाटील, सोलापूर**
**संपर्क क्रमांक - ९८६०९३२२७०**
**प्रकाशक : ग्रंथाली प्रकाशन, मुंबई**
**मुखपृष्ठचित्रकार - शिरीष घाटे, सोलापूर**

# हास्य योगा क्लब काळाची गरज



हास्य दिन
रमेश आहेर
अध्यक्ष, शिवगिरी हास्ययोग क्लब

मित्रहा, मी शिवगिरी हास्ययोग क्लबचा गेले १० वर्षांपासून सभासद आहे. मी आमच्या हास्य क्लबचे फायदे अनुभवत आहे व त्या अनुभवातूनच हे लिहीत आहे. हास्य हे माणसाला निसर्गाकडून मिळालेलं जास्तीचं वरदान आहे. जे दुसऱ्या कोणत्याही सजीव प्राण्याला मिळालेलं नाही. निरोगी व आनंदी राहण्यासाठी उत्तम गोष्टींपैकी एक म्हणजे हसणे व त्यासाठी हास्य क्लबला सामील होणे. हास्य क्लब केवळ आपल्या शरीराचे आरोग्य सुधारण्यास मदत करत नाहीत तर निखळ आनंदसुद्धा देते. आजकाल अधिकाधिक लोक दैनंदिन जीवनातील ताणतणावांचा सामना करण्यासाठी, अधिक आनंदी आणि समाधानी जगण्याचा मार्ग शोधत आहेत. हसणे व त्यासाठी हास्य क्लबला जाणे हा यावर उत्तम पर्याय आहे. हास्य क्लब आपल्याला दिवसभरातील आव्हानांना सकारात्मकतेने सामोरे जाण्यास मदत करू शकते. जर आपल्याला आपल्या रोजच्या जगण्यात हसण्याचा सोपा मार्ग सापडला तर आपण अधिक आशावादी व आनंदी आयुष्य जगू शकता. म्हणूनच तूम्ही अशा लोकांबरोबर राहा जे आपल्याला आनंदी, मजेदार आणि खेळकर वाटतात आणि हे सर्व साध्य करण्यासाठी, मिळवण्यासाठी हास्य क्लबला सामिल होणे हा उत्तम उपाय आहे.

**हास्य क्लबचे काही फायदे पुढीलप्रमाणे सांगता येतील**

१. नियमित हसणे हा एक चांगला व्यायाम आहे. हसण्याने व्यायाम तो कसा काय? तर जोरात हसण्याने कॅलरी बर्न्स होतात. खरं तर, हसणे हा आतल्या आत होणारा जॉगिंगचा एक प्रकार आहे.

२. हसण्याने हार्ट अटॅक आणि रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी मदत होते.

३. हसणे मेंदूचे कार्य वेगवान करते - हसण्यामुळे स्नायूंचा ताण आणि मानसिक तणाव कमी होतो. मेंदू ताजातवाना राहतो. मानसिक आरोग्यास चालना देणारे हास्य हे एक औषधच आहे.

४. हसणे आपली फुफ्फुसे शुद्ध करते वारंवार नियमितपणे केलेल्या हास्ययोगामुळे आपल्या फुफ्फुसांचे कार्य सुरळीत होते.

५. हसणे आपली रोगप्रतिकार शक्ती वाढविते. निरोगी ठणठणीत राहण्यासाठी दररोज जोरात हसण्याचा प्रयत्न करा.

६. सर्वांनाच महागडे जिम्स, क्लबला जाणं आर्थिक दृष्ट्या परवडत नाही. त्यामुळे आपल्याला विनाशुल्क व आरोग्यासाठी लाभदायक असे हास्यक्लब जिथे विविध वयोगटातील तसेच क्षेत्रातील मान्यवर असतात. हास्य क्लब आज जागोजागी कार्यरत आहेत.

७. हास्य क्लबमुळे आपले सामाजिक जीवन सुधारण्यासाठी खुप मदत होते तसेच सांघिक भावना वाढीस लागते.

८. हसणे वेदना कमी करते. हास्य क्लब मधील सदस्यांच्या चेहऱ्यावर फुलणारे हास्य त्यांना वेदना विसरायला लावते किंवा कमी करते.

९. हास्य हे शरीर व मन दोन्हींचे टॉनिक आहे, उपकारक आहे, आरोग्यकारक आहे. हसत असलेला रोगी बरा करणे सोपे असते. जसं आपण किती चाललो, किती झोपलो याची जशी नोंद ठेवतो तसंच आपण किती हसलो याची पण नोंद ठेवावी कारण निरोगी आयुष्यासाठी हसणं खुप आवश्यक आहे. पुर्वीच्या काळी म्हणायचे हसा आणि लठ्ठ व्हा. परंतु आज आपण म्हणू शकतो की हास्य क्लबला जा आणि निरोगी राहा.

१०. हसण्याने तुम्हाला चांगले वाटते. हास्य क्लब आपल्याला इतर लोकांशी जोडतात आणि आपली जगण्यासाठी ची उर्जा पुन्हा ताजी आणि पूर्वीसारखी राहते. हास्य क्लबमध्ये सदस्यांचे वाढदिवस, क्लबचा वर्धापनदिन, याबरोबरच इतरही अनेक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. त्यामुळे सदस्यांमध्ये एकोप्याची भावना निर्माण होते.

११. हास्य क्लबमुळे आपले मानसिक स्वास्थ्य चांगले राहते. आमच्या हास्य क्लब मधील शारीरिक व मानसिक व्याधी असलेल्या काही मित्रांना तर हास्य क्लबचे खूपच चांगले अनुभव आलेले आहेत व फायदेही झालेले आहेत.

शेवटी मी असं म्हणेन की, तुम्ही हास्य क्लब ला नियमितपणे जात जा, सातत्य ठेवा काही दिवसांतच तुम्ही स्वतःच तुमच्यात झालेला बदल ओळखाल. हास्य योग क्लब तुमचे दुःख, आजार पूर्णपणे बरे नाही करणार पण ते कमी करण्यासाठी तुम्हाला प्रेरणा, आत्मविश्वास व शक्ती नक्कीच देतील. २५/२६ वर्षांपूर्वी अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतकेच हास्य क्लब आपल्या नाशिक शहराच्या ठराविक भागातच कार्यरत होते. परंतु आज १२५ पेक्षाही जास्त हास्य क्लब शहराच्या विविध भागात कार्यरत आहेत व आजही नवीन नवीन हास्य क्लब चालू होण्याचं सत्र थांबलेलं नाही यावरून हास्यक्लबचे महत्व लक्षात येईल.

म्हणूनच सांगावंसं वाटतं की, हास्य क्लबला का जायचं? तर टेन्शन फ्री, निरोगी व आनंदी जीवन जगण्यासाठी हेच उत्तर आहे. आज ४ मे म्हणजेच जागतिक हास्य दिन. चला आपण सर्वजण नियमितपणे हास्य क्लबला जाण्याचा सकल्प करूया.

# पीक फेरपालट






## कृषिसाधन

सोनाली कदम
कृषी सहाय्यक

वारंवार एकाच प्रकारच्या पीक लागवडीमुळे पीक उत्पादनात घट होतच आहे, पण सोबतच मातीतील सेंद्रिय आणि उपयुक्त घटकांचा ऱ्हास होऊन मातीचे आरोग्यदेखील धोक्यात येत आहे. पिकाचे शाश्वत उत्पन्न आणि मातीचे आरोग्य या दोन्ही गोष्टी जपायच्या असतील तर आपल्याला शाश्वत पर्याय शेतीमध्ये अवलंबणे काळाची गरज आहे.

**पीक फेरपालट - मातीच्या आरोग्यासाठी शाश्वत पर्याय**

पीक फेरपालट म्हणजे एकाच जमिनीत विविध हंगामामध्ये विविध पिके पेरण्याची किंवा लागवडीची प्रक्रिया. यामध्ये विशिष्ट कालावधीत एकच पीक वारंवार न घेता विविध पिकांची फेरपालट केली जाते. या पीक फेरपालट पद्धतीचा उद्देश जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणे, तण आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी करणे आणि शेतीचे एकूण आरोग्य सुधारणे हाच आहे.

**पिकांची फेरपालट म्हणजे काय?**

पिकांची फेरपालट म्हणजे एका शेतात सलगपणे एकाच प्रकारचे पीक न घेता, विविध कालखंडात वेगवेगळ्या प्रकारची पिके घेणे. उदाहरणार्थ, एका हंगामात कडधान्याचे पीक घेतल्यानंतर दुसऱ्या हंगामात तंतूपिक किंवा धान्याचे पीक घेणे. यामध्ये पिकांचे वर्गीकरण खालील प्रकारे करता येते :

धान्यपिके - गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी

कडधान्ये - हरभरा, उडीद, मूग, तूर

तेलबियांचे पिके - भुईमूग, तीळ, सोयाबीन

तंतूपिके - कापूस, अळशी

भाजीपाला व फळपिके - टोमॅटो, वांगी, दोडका, पपई.

**पिक फेरपालटीचे मातीला होणारे फायदे**

१. मातीतील पोषणतत्त्वांचे संतुलन राखते- प्रत्येक पीक मातीतील विशिष्ट पोषकतत्त्वांचा वापर करते. एकाच पीक पुन्हा पुन्हा घेतल्यास विशिष्ट पोषक घटक कमी होतात. पण जर पीक फेरपालट केली तर प्रत्येक पीक वेगवेगळ्या पोषणतत्त्वांचा वापर करते, ज्यामुळे मातीतील तत्त्वांचे संतुलन टिकते.

२. नत्र स्थिरीकरणास मदत- कडधान्य पिके (मूग, उडीद, हरभरा) जमिनीत नत्र स्थिर करण्याचे काम करतात. जर या कडधान्यांचे पीक अन्य पिकांमधून घेतले गेले, तर मातीतील नत्राचे प्रमाण नैसर्गिकरीत्या वाढते.

३. रोग आणि किडींचा प्रादुर्भाव कमी होतो- एकाच पीक सतत घेतल्यास त्या पिकावर अवलंबून असलेल्या रोगजंतू व कीटकांची संख्या वाढते. परंतु पीक फेरपालट केल्यास त्यांची जीवनचक्र खंडित होते आणि रोगप्रतिकारक्षमता वाढते. पिके फेरपालट केल्याने कीटक आणि रोगप्रसारकांचे जीवनचक्र विस्कळीत होते, त्यांची लोकसंख्या कमी होते आणि रोगाचा प्रादुर्भाव होण्याचा धोका कमी होतो. याव्यतिरिक्त, काही पिके नैसर्गिकरीत्या तण, सुत्रकृमी आणि इतर हानिकारक जीवांना दाबू शकतात, ज्यामुळे मातीचे आरोग्य आणि पीक उत्पादन आणखी वाढते.

४. मातीची रचना सुधारते- भिन्न प्रकारची पिके घेतल्यास जमिनीची भौतिक रचना सुधारते. काही पिकांची मुळे खोलवर जातात आणि माती हलकी होण्यास मदत होते, तर काही पिके मातीच्या वरच्या थरात कार्य करतात. पीक फेरपालटीमुळे मातीतील पोषक तत्त्वांचा समतोल राखला जातो.

**पीक फेरपालटाचे आर्थिक फायदे**

१.उत्पन्नात सातत्य : वेगवेगळ्या पिकांचे बाजारमूल्य भिन्न असल्यामुळे शेतकऱ्याला प्रत्येक हंगामात वेगवेगळ्या उत्पन्नाचे स्रोत मिळतात.

२. खते व कीटकनाशकांचा खर्च कमी : नैसर्गिकरीत्या माती सुपीक राहिल्याने रासायनिक खतांचा वापर कमी होतो. रोगप्रतिकारशक्ती वाढल्याने कीटकनाशकांवरील खर्चही घटतो.

३. शाश्वत शेतीस चालना : दीर्घकालीन दृष्टीने पाहता, ही पद्धत मातीच्या आरोग्यासाठी फायदेशीर असून, माती टिकाऊ बनते.

पिक फेरपालट कशी करावी.

- पिकांचे वर्गीकरण : एकाच वर्गातील पिकांची पुनरावृत्ती टाळावी.
- मुळे व पोषण गरजा : खोल मुळे असलेले पीक घेतल्यानंतर पृष्ठभागी मुळे असलेले पीक घ्यावे.
- कडधान्यांचे नियोजन : दर २-३ वर्षांनी कडधान्य पीक घेणे आवश्यक आहे.
- हंगामाचे नियोजन : खरीप, रब्बी आणि उन्हाळी हंगाम यांच्यानुसार पीक फेरपालट ठरवावी.

# मूनकोट..





## तरंग

मनीषा कुलकर्णी–आष्टीकर
९५११८७५३५३

कपाटात ठेवलेल्या सनकोटकडे राधा एकटक पाहत होती. मनात नसतानाही मैत्रिणींच्या आग्रहाखातर तिने तो घेतला होता. राधाच्या काळवंडलेल्या हाताकडे पाहत काळजीच्या स्वरात रत्ना म्हणाली होती, अगं राधा रोजचा प्रवास तुला.घराबाहेर पडताना सनकोट घालत जा. ऊन वाढलंय गं. राधाने उगीच मान डोलावली. कापसासारखी दिसायचीस राधा!उन्हामुळे कृष्णकळा चढलीय बघ तुझ्यावर. विनोदी मूडमध्ये सुलेखा म्हणाली. राधाला असे कुठलेच कोट आवडायचे नाहीत जे तिला जीवनाच्या उन्हापासून दूर नेतील...कोटाच्या आठवणीने तिच्या मनातील भूतकाळाचे एक एक पान उकलत गेले...

दारात टाळ वाजवत सकाळी सकाळी येणाऱ्या वासुदेवाच्या अंगावर मी पहिल्यांदा कोट पाहिला होता. फारच सुंदर गाणी म्हणायचा तो!!! 'राहशील कुठंवरी चिमणी माझे माहेरी'अप्रतिम गायचा तो. चिमणीच्या उल्लेखाने ही चिमणी त्याच्याकडे पुन्हा हेच गाणं म्हणा असा तगादा लावायची!साऱ्या चिल्यापिल्यांचा गराडा त्याच्याभोवती! त्याच्या कोटाचा स्पर्श त्याच्या डोक्यावर दिमाखात डोलणाऱ्या मोरपिसाएवढाच मुलायम भासायचा! जीवनाच्या रणांगणावर जगण्यासाठी चार पैसे, धान्य मिळेल या आशेने दारोदार फिरणाऱ्या कोटधारी वासुदेवात राजाचे दर्शन घडायचे!पावसाळ्यात जिथे छत्रीचेच चुकून दर्शन व्हायचे तिथे 'रेनकोट' खूप दूरची गोष्ट...घरकामाला असणारे गडी पोत्याची मस्त कुंची करून द्यायचे... शाळेला जाताना अर्ध्या रस्त्यात गेल्यावर मी ती गुंडाळून दप्तरात कोंबायचे अन् पावसात चिंब चिंब भिजायचे! वर्गातल्या काही पोरी रंगीबेरंगी छत्र्या...सुंदर नक्षी असलेले रेनकोट घालून थाटात समोरून जायच्या...क्षणासाठी रेनकोटाची मनास भुरळ पडायची...पण पावसाच्या सरीपासून दूर ठेवणारा असा कुठलाच कोट मला नको होता!!!

शाळा तपासण्यासाठी मधूनमधून'नाजरसाहेब'यायचे... वर्गातील आम्ही चार पाच पोरं पोरी घोकंपट्टी करू करू बेजार व्हायचो...ठरलेल्या दिवशी मात्र प्रश्नांची उत्तरे देण्यापेक्षा साहेबांच्या कोटाकडेच माझे लक्ष जास्त असायचे!!!ते गेल्यावर गुरूजी आम्हाला प्रेमाने जवळ घ्यायचे...कौतुकाने पाठीवरून हात फिरवायचे...त्यांचा वर्ग साहेबांना आवडल्याचे समाधान त्यांच्या स्पर्शातून व्यक्त व्हायचे!!!या साऱ्या सुखद क्षणांना आठवून राधा जरा बिछान्यावर विसावली.

गवाक्षातून दूरवर नजर टाकली...सूर्य आग ओकत होता... गरम हवेच्या लहरींचे मधूनमधून येणे जाणे चालूच होते... सनकोट...कशाला बरं घालायचा? काय होणार त्याने? उन्हापासून रक्षण करण्यासाठी?आयुष्यातील उन्हाचे काय करू मग? त्यापासून कोण रक्षण करणार? मला नकोय कोट... नियतीने राधाच्या जीवनाचा पार गुंता केला होता...कुणाकडेच नव्हती तक्रार तिची...ना स्वत:साठी काही मागायचे होते!!! आपलं आयुष्य एका चाकोरीत बंद केलं होतं...एका प्रवासासाठी!!!

काही काही नाही मागणार कधी...पण त्या चंद्रराजाची किरणे पिऊन बनवलेल्या मलमली वस्त्राचा एक सुंदरसा 'मूनकोट' घालायला मिळाला तर जीवन सार्थकी लागेल...रजनीशाचा स्पर्श होताच विसरून जाईल हा उन्हाचा दाह... त्याची किरणे माझ्या जीवनावर प्रकाश फिरवतील तेव्हा कुठल्या सनकोटची गरजच नाही भासायची. शशी, हिमकर, राकेश, हिमांशु, मयंक, विधु सुधाकर, कलानिधी, निशापती, शशांक, चंद्रमा, सोम, इंदू, सुधांशु, रजनीनाथ, नक्षत्रेश, शुक्षांशु अशी अगणित नावे तुला!!! किती पुकारू रे तुला राजा? तुझ्यासारखा शुभ्र...शीतल...सतेज कोट या जीवाची काहिली नक्कीच शमवेल रे!!! जीवनाच्या अंधारलेल्या वाटेवर तुझा प्रेममयी प्रकाश अंगावर पडता मज उणीव ती कोणती? कुणाला सांगणारही नाही...कुणाला देणारही नाही!!! मनाच्या नभात उगवलेल्या मूनकोटाच्या साऱ्या कहाण्या मोरपिसासारख्या जीवापाड जपेल ना!!!कोट घालूनी ही चांदणी गुंफेल एखादे गीत...

**उगवला चंद्र पुनवेचा,**
**मम हृदयी दरिया उसळला प्रितीचा।**
**पान जागे फूल जागे**
**भाव नयनी जागला...चंद्र आहे साक्षीला।**
**शुक्रतारा मंद वारा चांदणे पाण्यातुनी**
**चंद्र आहे स्वप्न वाहे धुंद या गाण्यातूनी।**
**हात तुझा हातात अन् धुंद ही हवा**
**रोजचाच चंद्र आज भासतो नवा नवा।**

एखादे का? तुझ्या तर असंख्य गीतांचा पसारा मनात जपलेला!!! कसा चंद्र...कसे वय...कशी तुझी चांदण सय... कसा निघेल इथून पाय...वेड लागेल नाहीतर काय!!!

खरंच वेड लागण्याआधी मूनकोटातून बाहेर ये गं राधा स्वत:शीच बोलत होती बाला!!!चक्रव्यूहात शिरणे तर शिकले... पण शेवटचा श्वास घेतल्यावरच बाहेर पडेल...राधा...राधा.. तुझीच राधा!

# अमृतवाहिनी



## आठवण

श्रेयस लहामगे

ही प्रवरा नदी, माझं बालपण जिच्या काठी गेलं तीच ही प्रवरा... हिचा संस्कार मला जन्मतः प्राप्त झाला... असं म्हणलं तरी वावगं ठरणार नाही... कारण माझं आजोळ म्हणजे माझ्या मामाचं गाव हे प्रवरा काठाचे आणि मूळ गावही प्रवरा तीराचेच... त्यामुळं आई आणि वडील दोघेही हिच्या संस्कारात, हिच्या परिसरात खेळले, बागडले आणि हिच्या काठीच वाढले... तसंच योगायोगाने माझा जन्म, माझ बालपण हिच्या जवळपासच गेलं हिच्या सान्निध्यात लहानसा मोठा झालो...हिच्याच आजूबाजूच्या परिसरात पाटीवर अंक गिरवायला आणि बाराखडी लिहायला शिकलो...ते कसं हे पुढं सांगतो...माझ्या आजोळी म्हणजे मामाच्या घरासमोरच रेल्वे स्टेशन...त्यामुळं आयुष्याच्या प्रवासाची सुरवात ही रेल्वेनेच झाली... आणि आतापर्यंत सर्वांत जास्त प्रवास देखील रेल्वेनेच केलेला... लहानपणी अनेकदा पढेगाव म्हणजे माझ्या आजोळी येणं जाणं असायचं ते पण रेल्वेनं... तेव्हा रेल्वेच्या खिडकीतून पळणारी झाडं, जाणारी गावं, दिसणारी मोठी मोठी विजेची खांब, कधी कधी विजेच्या तारावर बसणारी चिमणी पाखरं हे माझ्या प्रवासाचे जोडीदार असायचे... त्याच बरोबर येणारी स्थानकं मला दर्शवायची, संकेत द्यायची की पढेगाव जवळ येत आहे म्हणून... विळदवरून बसल्यानंतर देहरे सोडल्यानंतर... सर्वांत आधी यायचं आणि डोळे शोधायचे त्या शंकरपाळी आकाराच्या पांढऱ्या फलकाला तसंच त्याच्यावर लिहलेल्या वांबोरी या नावाला... खरंतर त्यावेळी लिहता वाचता येत नव्हतं... हो, पण बोलता मात्र येत होतं... रेल्वेत बसल्यानंतर आईला दर पाच मिनिटांनंतर एक प्रश्न हमखास असायचा तो म्हणजे कधी येणार पढेगाव? किती वेळात येणार पढेगाव? तेव्हा एकदा आईनं पढेगाव प्रवासातले चार टप्पे सांगितले होते... पहिला टप्पा वांबोरी स्टेशन, त्यानंतर लगेचच येणारा दुसरा टप्पा म्हणजे मुळा नदी आणि त्यानंतर येणारा तिसरा महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजेच ही प्रवरा नदी आणि त्यानंतर मग शेवटी पढेगाव... उन्हाळ्यात जरा कमी पाणी असणारी मुळा, प्रवरा आणि पावसाळ्यात ओसंडून वाहणारी मुळा, प्रवरा मी पाहिली आहे...या प्रवासात कोणत्या नदीला जास्त पाणी आहे याचा अंदाज मी दर प्रवासात घ्यायचो... अगदी दोन्ही बाजूंच्या खिडकीतून... पण का कोणास ठाऊक प्रवरेत थेंबभर का होईना जास्त पाणी वाटायचं... त्यावेळी हा प्रश्न पडायचा? पण उत्तर मिळत नव्हतं... जसं जसं वय वाढतंय तसं तसं आता जरास उमगायला लागलंय, माझ्या शरीरात, नसानसांत जितकं रक्त वाहतं... तितकीच ही प्रवराही... अगदी मुळा पोषण करत असली तरीही...कारण या नदीनं संस्कार, संस्कृती, जीवन, यांसारख्या गोष्टी दिल्या... पाटी, पेन्सिल, खडूचा आणि माझा संबंध आला तो प्रवराकाठीच... कसा ते सांगतो, माझी आजी म्हणजे माझ्या आईची आई ही मुख्याध्यापिका होती... तीची शाळा ही पढेगाव पासून काही अंतरावर भेर्डापूर या गावात होती... आजोळी गेल्यानंतर अनेकदा आजी बरोबर शाळेत जायचो... खूप धमाल करायचो.. चॉकलेट, बिस्किटं, लेमन गोळ्या, श्रीखंड गोळ्या नुसती मजा असायची... कितीही मोठा मुलगा असू मी त्याला मारायचो आणि विशेष तो मार खायचा ( बिचारा बबल्या) कारण मी मुख्याध्यापिका बाईंचा नातू होतो... वयानं मोठ्या असणाऱ्या मुली मला कडेवर घ्यायच्या, काही मुली माझी पप्पी घ्यायच्या... पण मला पप्पी घेतलेलं आवडत नव्हतं... मी झटकन गालावरुन हात फिरवून ती पुसून टाकायचो... जर कधी त्याकाळी कळलं असतं भविष्यात पुढं या गोष्टीचा सर्वात मोठा दुष्काळ पडणार आहे... तर मी त्या पप्प्या कधीच पुसल्या नसत्या... त्याकाळी जे मुलं मुली माझ्यासोबत खेळले... आज त्यांची लग्न होऊन त्याकाळी मी ज्या वयाचा होतो... त्या वयाची आज त्यांना मुल असतील... त्याच शाळेत बसून आजीनं मला अंक अक्षरांची ओळख करुन दिली... व अंक, बाराखडी लिहायला शिकवली... ही सर्व धमाल, मस्ती, गंमत, जंमत आणि अंक अक्षरांची ओळख झाली ती प्रवरेच्या साक्षीनं तिच्याच तीरावर... आजोळी गेल्यावर सायंकाळी आजी हरिपाठ म्हणायची... तीच्या मागं मागं आम्हीही म्हणायचा प्रयत्न करायचो...

प्रत्येक अभंग झाल्यावर एक चरण आम्ही हमखास म्हणायचो ते म्हणजे हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा पुण्याची गणना कोण करी... कदाचित याच प्रवरेनं पुढं चंद्रभागा आणि इंद्रायणीशी ओळख करून दिली आणि अध्यात्माची पक्की गाठ हृदयात बांधली... याची प्रचीती आता मागच्या वर्षी पंढरपूरला जाण्यासाठी बसमध्ये बसलो तेव्हा आली... सकाळी पावणे सहा, सहाची वेळ ठिकाण माळीवाडा बस स्टॅण्ड... खिडकीतून बाहेर बघत असताना अचानक हृदयात धडधड झाली आणि मनात चार ओळी अवतरल्या... त्या ओळी अश्या होत्या की....

प्रवरेला ओढ
चंद्रभागा तीराची
जशी कृष्णा प्रती
आस मिराची...

पुन्हा प्रश्न पडला मनाला की, प्रवराच का आली? मुळा का नाही, सीना का नाही, किंवा गोदा का नाही आली?... कारण या नद्यांचही माझ्या जीवनात योगदान आहे... मुळा कित्येक वर्षांपासून तहान भागवतेय, पोषण करतेय... सीनेकाठी कित्येक वर्षांपासून असणारं वास्तव्य... गोदा काठी चार वर्षे शिक्षण घेतलंय... तरीसुद्धा प्रवराच आली याच उत्तर अचानक उमगलं जे लहानपणी बोबड्या आवाजात हरी मुखे म्हणा,हरी मुखे म्हणा म्हटलं ते प्रवरा काठीच आणि भक्तीची गोडी सुद्धा लावली ती प्रवरेनेच... अशा असंख्य अमृताहूनही मधुर अशा आठवणी आणि वात्सल्य माया देणारी प्रवरामाईच... म्हणूनच हिला अमृतवाहिनी प्रवरा म्हणतात आणि खरोखरच प्रवरामाई ही अमृतवाहिनीच आहे...

# 'टिकली'च टिकली!



## प्रतिबिंब

‖सुजाता येवले



**(पूर्वार्ध)**

आमच्या शेजारच्या छोट्याशा छकुलीला एक खोड आहे, ज्या बाईकडे ती जाईल तिच्या कपाळाच्या टिकलीशी ती खेळत असते. भुवयांच्या मधून काढून चेहऱ्यावर भलतीकडे चिकटवणे किंवा स्वतःच्या कपाळाला चिकटवून घेणे, इकडेतिकडे फेकणे किंवा कपाटाला भिंतीला, दाराला चिकटवणे. रोजच घरात सात आठ टिकल्या कचऱ्यात निघतातच.

हल्ली कुठल्याही सौंदर्यप्रसाधनांच्या दुकानात जावे तर दारापाशीच टिकल्यांच्या पाकिटांच्या माळा हारीने टांगलेल्या असतात. एका पुठ्ठ्याच्या पाकिटात सात-आठ किंवा जास्तीत जास्त बारा टिकल्या एका छोट्याशा प्लास्टिकच्या कागदा मागे निगुतीने चिकटवलेल्या असतात. रंगीबेरंगी किंवा लाल रंगांच्या विविध आकार प्रकाराच्या टिकल्यांवर पांढरे किंवा विविध रंगांचे खडे चिकटवलेले असतात. टिकल्यांचे आकार तरी किती वेगवेगळे, कधी गोल, कधी उभट, अंडाकृती, त्रिकोणी, चौकोनी तर अगदी कधी कधी प्रश्नचिन्हासारख्या सुद्धा, कधी खसखशीच्या दाण्याएवढ्या तर कधी रुपयाएवढ्या. कधी चंद्रकोरी सारख्या, तर कधी लहान-मोठ्या चांदण्या कधी शांत तर कधी चमचमणाऱ्या, नवरीच्या कपाळी भुवयांच्यावर बारीकसारीक लाल, सफेद, चंदेरी, सोनेरी तर नवरदेवाच्या कपाळावर लांबट अंडाकृती कधी गोल तर कधी बदामा कृती लाल पांढऱ्या खड्यांनी सजवलेल्या. किंमत विचारण्याची हिंमत नाही केली कधी, पण भावाच्या, नवऱ्याच्या लग्नातल्या टिकल्या मात्र सांभाळून ठेवल्या आहेत.

पुठ्ठ्यावर चिकटवलेल्या टिकल्यांसोबत एका गोल डबीतही जवळजवळ पन्नास टिकल्या असतात. नंबरप्रमाणे त्यांचे आकार बदलतात झिरोपासून पाच नंबर पर्यंतची मोठाली टिकलीची डबी दुकानात पुढच्या शेल्फच्या काचेखाली व्यवस्थित रचलेल्या असतात. लाल, चॉकलेटी, तपकिरी, डाळिंबी, काळी किंवा विविध रंगांच्या साड्यांना मॅचिंग टिकल्या सगळ्याच दुकानांमध्ये व्हेलेबल असतात. अशी ही छोटुकली डबी पर्समध्ये व्यवस्थित मावते.

स्त्रीचे सौंदर्य शतपटींनी वाढवणाऱ्या टिकल्यांना खरंतर अगदीच 'हॅट्स ऑफ' आहे. हिंदू धर्माप्रमाणे सौभाग्य लक्षण म्हणजे कपाळाला कुंकू लावणे. दोन्ही भुवयांच्या मध्ये थोडे वरती रुपयाएवढे किंवा छोट्या सुपारीच्या आकाराचे कुंकू हे सामान्य स्त्रीसाठी अभिमानाचे आणि स्वत्वाच्या ओळखीसाठी असायचे. कपाळाला लाल भडक कुंकू लावलेल्या गरत्या स्त्रीला छेडायला तर कोणीही घाबरायचे. पूर्वी बालविवाह प्रथेमध्ये तर कपाळावर आणि भांगेमध्ये भरलेले कुंकू हे स्त्रीला बालपणापासूनच शरीराचा एक अविभाज्य अंग असल्यासारखे असायचे. सकाळी आंघोळ झाल्यावर कुंकू लावल्याशिवाय कुठलाही पदार्थाला हात लावणे हा ती स्वतःच गुन्हा मानायची. काही विशिष्ट जातींमध्ये लग्नानंतर स्त्रिया कपाळावर आडवी कुंकवाची रेघ म्हणजे चिरी ओढत असत. कपाळावर गोंदणाच्या वर ओढलेली चिरी त्या स्त्रियांच्या सौंदर्यात भरच घालायची. तर काही जातींमध्ये कपाळावर अर्धी चंद्रकोर लावली जायची. तिचा आकारही काही जातीनुसार किंवा आवड सवडीनुसार बदलायचा, लहान मोठा खोलगट उथळ असायचा. दिवसभराच्या कामाच्या धबडग्यात किंवा चुलीपाशी बसून अतिव घामामुळे कुंकू कपाळावर पसरायचे किंवा नदीवरून किंवा कुठूनही बाहेरून येत असताना घामाच्या ओघळाबरोबर कुंकू पसरायचे; त्या वेळेला ती बिचारी स्त्री डोक्यावरचा पदर अगदी हनुवटीपर्यंत ओढून मग घरी परत येत असे. घरी मात्र सासू किंवा आईच्या दटावणीमुळे सवाष्णी परत तोंड धुवून पदराला कोरडे पुसून परत कपाळावर मेण पसरवून त्यावर ठसठशीत कुंकू लावायच्या 'अक्षी लक्ष्मीवाणी' दिसायच्या. मग जेवताना आजी म्हणायची आता लक्ष्मी अन्नपूर्णेची जोडी छान जमेल. कुंकू कपाळावर घट्ट चिकटून राहावे म्हणून त्याखाली मेण लावायची पद्धत होती. हे मेण मधमाशांचे पोळे उठवल्यानंतर, पोळ्यातून मध गाळल्यानंतर उरलेला चोथा हवे तर थोडी हळद मिक्स करून पाण्यात उकळवला जायचा. नंतर वस्त्रगाळ करून डबीत भरला जायचा. डबी पुरेपूर गार झाल्यानंतर ती डबी बंद करून करंडा फणीच्या डब्यात विसावायची. शक्यतोवर स्टिलची छोटी डबी असायची. पुर्वीची खास शिसवी लाकडी डबी सुद्धा कुठल्यातरी म्युझियम मध्ये बघितली आहे. या मेणाचा उपयोग कधी कधी किंचित चटका बसल्यावर किंवा थोडेसे खरचटल्यानंतर सुद्धा व्हायचा. खुपदा तर पायाच्या भेगांनाही लावले जायचे. क्रॅक भेगाक्रीमला तर बाजारातही घुसु देत नव्हते म्हणे.

एकोणिसाव्या शतकात माजघरातली स्त्री सौंदर्यप्रति जागरूक झाली. पूर्वी नव्हती असे नव्हे. पण बाजारू सौंदर्यप्रसाधनांचा माफक असा उपयोग करायला लागली. त्यात स्नो पावडर लाली टिकली यांचा वापर नवरा आणि घरच्यांच्या धाकाच्या विषमप्रमाणात कमी जास्त असा होऊ लागला. वारकरी संप्रदायाचे मूळ सर्वच समाजात घट्ट रुजू लागले. आणि विठ्ठलाला आवडणारा बुक्का सर्वांनाच आवडू लागला. बायकांच्या चंद्रकोरीखाली, चीरीच्या रेघे खाली रुपया एवढ्या कुंकवाखाली, हळदीच्या पिटुकल्या थेंबाखाली, इटुकला बुक्क्याचा ठिपका सौंदर्य अधोरेखित करू लागला, स्त्रीच्या सौंदर्याला चार चांद लावू लागला. कधी कधी ठसठशीत कुंकवाखाली एक अनामिकेच्या बोटा इतकी हळद आणि त्याखाली बुक्क्याची नाजूक पिटुकली रेघ नजाकतीने रेखली जाऊ लागली. सौभाग्याच्या आदरात विठू भक्तीची ही भर पडली.

खरोखर आजी, आत्या, काकू, मामी, मावशी कपाळावर कुंकू मेण रेखत त्यावेळेला भान हरपून मी त्यांच्याकडे बघत बसायचे. मामाच्या गावाला वारकऱ्यांची प्रथा चार पिढ्यांपासून पाळली जाते. त्यांचे स्वतः चेच विठ्ठल मंदिर आहे. त्यांच्या घरातले अबालवृद्ध अगदी मोठे डॉक्टर्स, इंजिनिअर्स, प्रतिष्ठित व्यावसायिक, ते एक वर्षाच्या प्रिशा, श्रीशा, अद्विका कपाळाला बुक्का लावल्याशिवाय घराबाहेर पडत नाही.

बाकी टिकल्यांचा शोध कोणी लावला कधी आणि कसा हे सांगता येणार नाही, मला माहितही नाही. जाणूनही घ्यायचे नाही. (पण एक नक्की सांगते हा शोध शंभर टक्के एका पुरुषानेच लावला असावा).

पण आमच्या लहानपणी दुकानात पंचिंग मशीनच्या टिकल्या गोळा करून त्याला स्केच पेन, खडूच्या रंगांनी किंवा वॉटर कलरने रंगवून त्याच्या टिकल्या आम्ही पाडायचो आणि तो ओला करून कपाळावर लावून मिरवायचो. वयाच्या चार-पाच वर्षांपर्यंत आई कपाळावर गोल, उभट, अंडाकृती असा लाल गंध लावायची. कधी कधी चांदणी, अर्धचंद्र, शंकरपाळीआकृती अशी कलाकुसर पण करायची. **(क्रमशः)**




**डॉक्टरांकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन हा आदरयुक्त अन् देवमाणूस. त्यांचे ज्ञान, सेवा, समर्पण, कर्तृत्व, दातृत्व यांचे अनेक उदाहरणे आपण देत असतो; परंतु हेच डॉक्टर आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेत स्वतःला संपवितात, तेव्हा समाजाच्या हानीसह कुटुंबाचीही वाताहत होते. कारण डॉक्टरकीचे शिक्षण म्हणावे तेवढे सोपे नाही. तल्लख बुद्धिमत्ता, आकलन, आर्थिक नियोजन, प्रॅक्टिस, समाजोपयोगी कर्तृत्व, सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्व. एका आत्महत्येने नष्ट होऊन न भरून येणारी पोकळी निर्माण होते. प्रथितयश डॉक्टर किंवा डॉक्टरकीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी डॉक्टरांच्या मानसिक अवस्थेकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.**

## शिकलेले प्रतिष्ठित... तरीही एकटे अन् खचलेले!



**प्रतिबिंब**
**देवयानी सोनार**

सोलापुरातील नामांकित डॉक्टर शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येने समाजमन ढवळून निघाले आहे. दुसऱ्याचा जीव वाचविणारा देवमाणूस एवढा हतबल का झाला असावा की, त्याला त्याच्या जिवाचेही ओझे वाटावे? असा विचार मनात आल्याशिवाय राहत नाही.

नॅशनल क्राइम ब्युरोच्या २०२२ च्या अहवालानुसार भारतात १८ महिला व १२ पुरुष डॉक्टरांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. २०१८ ते २०२३ भारतातील स्थिती राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या(एनएमसी) माहितीनुसार गेल्या पाच वर्षांत १२२ वैद्यकीय विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यात ६४ एमबीबीएस व ५८ पदव्युत्तर विद्यार्थी होते. या कालावधीत एक हजार २७० वैद्यकीय विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम सोडला. यात एक हजार ११७ पदव्युत्तर विद्यार्थी होते.

महाराष्ट्रातील २०१८ ते २०२३ या पाच वर्षांत १४ वैद्यकीय विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. यात तीन एमबीबीएस आणि ११ पदव्युत्तर विद्यार्थी होते. या कालावधीत ८५ पदव्युत्तर वैद्यकीय विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम सोडला; परंतु या आकड्यांवर विश्वास ठेवणे कठीण आहे. अनेकदा अशा घटनांची नोंद केली जात नाही.

प्रसिद्ध न्यूरोलॉजिस्ट डॉ. शिरीष वळसंगकर यांनी राहत्या घरी स्वतःच्या परवानाधारक रिव्हॉल्व्हरने डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली. उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या आत्महत्येमागे रुग्णालयातील प्रशासकीय अधिकारी महिलेचा सहभाग असल्याचे त्यांनी लिहिलेल्या चिठ्ठीद्वारे उलगडा झाला आहे. अर्थात, अजून तपासात पुढे काय येते हेदेखील पाहणे गरजेचे आहे.

उच्चशिक्षित डॉक्टर, वकील, पोलिस, अधिकारी, समाजातील लोकप्रिय व्यक्तिमत्त्व, अभिनेत, खेळाडू, अभियंता अशा उच्चभ्रू समाजातील महिला-पुरुषांनी आत्महत्येसारखे पाऊल उचलण्याइतके काय कारणे असावीत, असा प्रश्न पडल्यावाचून राहत नाही. एकवेळ गरिबी, कर्ज, कौटुंबिक समस्या, संशय, पूर्ववैमनस्य, गुन्हेगारी प्रवृत्ती, भांडणे, प्रॉपर्टी वाद, अनैतिक संबंध आदींतून केल्या जाणाऱ्या आत्महत्यांना कारणे, पार्श्वभूमी असते. त्यामुळे जीवन संपवून त्या प्रश्नाना पूर्णविराम दिला जातो.अर्थात, आत्महत्या करण्यासाठीही धाडस लागते,परंतु समाजातील उच्चभ्रू लोकांकडे पाहिल्यावर यांना कसली चिंता असणार? आर्थिकदृष्ट्या सर्व गोष्टी भरभरून मिळाल्यावर कशासाठी धडपड करायची. ते जीवन मौजमजा करीत व्यतीत करायचे, असा विचार या लोकांकडे पाहून येतो. डॉक्टरांसारख्या उच्चभ्रू व्यक्तीने आत्महत्या करावी, हे खूप गंभीर आणि संवेदनशील आहे. डॉक्टरकी शिकलेले आर्थिकदृष्ट्या स्थिर, सामाजिकदृष्ट्या प्रतिष्ठित लोक आत्महत्येसारखा विचार करतात, तेव्हा आपण त्यांच्या मानसिक अवस्थेकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक ठरते.

आज अनेक डॉक्टरदेखील विविध समस्यांचा सामना करताना दिसतात. सततचे काम, अचानक रुग्णांचे विविध प्रसंग, कुटुंबापासून दूर राहणे, वाढत्या अपेक्षा, वाढलेली व्यावसायिक स्पर्धा, समाजात प्रथितयश म्हणून नावारूपाला येण्याची चढाओढ, स्थैर्य आदी सर्व कारणांमुळे मानसिक आरोग्य ढासळण्याचे प्रमाण वाढते आहे.

डॉक्टर म्हटले की, सर्व परिस्थितीत खंबीर राहण्याची अपेक्षा केली जाते. त्यामुळे सतत अ‍ॅंग्झायटी, डिप्रेशन अशा भावना असूनही त्या व्यक्त करता येत नाहीत. मन मोकळे करण्यासाठी जागा नसते. इतर डॉक्टरांकडूनच डॉक्टर असून तुम्हाला कसले नैराश्य? असे बोलून अवहेलना केली जाते.

डॉक्टर म्हणजे परिपूर्ण(च) असावा, अशी अपेक्षा केली जाते. ही गोष्ट प्रत्येक शिकलेले, प्रतिष्ठित, पेशा कोणताही असो, सर्वांनाच लागू होतो. डॉक्टरही आजारी पडतात, हे मान्य(च) केले जात नाही. अगदी स्वतः डॉक्टरसुद्धा आपल्याला नैराश्य, मानसिक आजार असू शकतो, हे मान्य करायला, स्वीकारायला घाबरतात. मानसिक आजारावर उपचार घेणे म्हणजे कमजोरी वाटते. त्यामुळे अजूनही अनेक डॉक्टर वा इतर शिकलेले प्रतिष्ठित मदतीपासून दूर राहतात.

यासाठी मोकळेपणाची जागा निर्माण करणे, मानसिक आजारावर उपचार घेणे, उपचारक्षम स्थिती आहे हे सांगणे गरजेचे आहे. डॉक्टरांसाठी विशेष समुपदेशन आणि सपोर्ट ग्रुप सुरू करणे, कामाचे तास, ब्रेक, शिफ्ट रोटेशन यात सुधारणा करून ताण कमी करणे, असे उपाय केले जाऊ शकतात. वेळेचे नियोजन, कुटुंबातील संवादही तितकाच महत्त्वाचा आहे.


जीवन संपवणे हा निर्णय एखाद्याच्या आयुष्यातील वेदनादायक टप्पा असतो. जेव्हा एखादी व्यक्ती सततचा एकटेपणा आणि असहायतेत जगते, तेव्हा तिला मृत्यू हाच एक पर्याय सुटकेचा वाटू लागतो. म्हणून डॉक्टर असो वा शिकलेले प्रतिष्ठित, प्रत्येकाची मानसिक अवस्था समजून घेणे, ऐकून घेणे आणि साथ देणे आपल्या हातात आहे.

---

**कांदा हा पाकिस्तान बॉर्डर किंवा कर्नाटक सीमाप्रश्नासारखा गहन विषय होत आहे. खरे बोलायचे तर कृषिमंत्री माणिकराव कोकाटे मंत्री झाल्यानंतर काहींच्या मते वारंवार वादग्रस्त बोलले, पण ते खरे होते तेच बोलले. शेतकरी एखाद्या पिकाला दर वाढला तर तेच पीक घेतात. उत्पादन जास्त मागणी कमी झाल्यावर दर कोसळतात. हेच कांद्याबाबत बोलले होते. माझ्यासह अनेकांच्या मते त्यात काहीच चूक नव्हती.**

## कांदा कधी शाप, कधी वरदान !





**मनातलं**
**अशोक थोरात**
**लखमापूर (बागलाण)**
**७५८८०४०३६३**

पूर्वी लहान मोटेने पाणी भरणारा शेतकरी कांदा लावत असे व बैलगाडीवर थोडा थोडा कांदा मार्केटला विकत असे, तेव्हा दर खूप वाढत नव्हते व कोसळतपण नव्हते. कधीतरी कांदा अचानक महाग झाला व कांदा बस दुसरे पीकच नाही, अशी मानसिकता तयार झाली व दहा-वीस गुंठे लागला जाणारा कांदा पन्नास-शंभर एकर म्हणजे पाणी असेल तर ९० टक्के क्षेत्रात कांदा. गहू, तांदूळ रेशनचा खाणार. बाजरी विकतची खाणार, पण सर्वत्र कांदाच लावणार. मोठमोठ्या स्वतःच्या चाळी, व्यापाऱ्यांचे शेड नाफेडसह सरकारची कांदा साठवायची व्यवस्था, मग काय कांदाच कांदा.

निसर्ग कोपला व कांदा खराब झाला तरच बरा दर मिळू लागला व मस्त पीक आल्यावर दर कोसळतात. फार पूर्वी म्हणजे ३० वर्षांपूर्वी लासलगाव हेच मुख्य मार्केट होते. तेथील चांगले-वाईट अनुभव आठवल्यावर कांदा शाप व वरदानच ठरतो. हळूहळू कांद्याची गोडी वाढत गेली. क्षेत्र वाढत गेले. अगदी स्वस्तात जाणाऱ्या कांद्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी आणले.

कांद्याला योग्य दर मिळावा, यासाठी शरद जोशी नावाचे वादळ अवतरले. या वादळाने शेतकरी खडबडून जागे केले. शरद जोशी, माधवराव मोरे, प्रल्हाद पाटील कऱ्हाड, राजू शेट्टी, अनिल गोटे, रामचंद्रबापू पाटील, नरेंद्र अहिरे यांसारखे हजारो नेते शेतकरी संघटनेत कार्यरत झाले. रस्ता रोको, रेल रोको सर्वच यशस्वी होत गेले व तेव्हाच एकाधिकारशाहीच्या काँग्रेसला हादरे बसायला सुरुवात झाली व सरकार कांद्याची दखल घेऊ लागले, पण याचा फायदा राजकीय लोकांनीच घेतला. हळूहळू चळवळ थांबली व परत शेतकरी वाऱ्यावर झाले. अनेक नेत्यांनी शरद जोशींची संघटना तोडून स्वतःची संघटना काढली. हेवेदावे सुरू झाले. शेतकऱ्यांच्या ताकदीचे तुकडे झाले व परत जैसे थे सुरू झाले. राजू शेट्टी राजकारणात आले, तसेच सदाभाऊ खोतपण आमदार, मंत्री होताहोता शेतकरी बाजूला पडला.

पूर्वी लासलगावला आठ-दहा दिवस मुक्काम करून कांदा विकावा लागत होता. त्या दिवसांत शेतकरी कांदा सांभाळून लिलावाच्या नंबरची वाट बघत असत. आंघोळ नाही. कसेतरी दोन घास खायचे व मार्केटच्या धुळीत रात्रंदिवस थांबायचे व लिलावानंतर हाती भोपळा, असे अनेक वेळा घडत होते. पण अशा घटना घडून कांदाप्रेम कमी झाले नाही. हळूहळू निसर्गाने झटके द्यायला सुरुवात केली. आता अचानक भाव वाढतात व हळूहळू कोसळतात. नाशवंत माल असल्याने हमीभाव देणे अवघडच आहे. तरी पाच वर्षांची सरासरी काढल्यावर एकत्र हिशेब करता चांगला पैसा मिळतो, पण भाव वाढले ते बोलायचे नाही, पण कोसळले तर हल्लाबोल हे नेहमीचेच झाले आहे.

जो पक्ष विरोधात तो कांदा उत्पादकांचा समर्थक व सत्तेवर येताच कांदा उत्पादकांचा प्रश्न दुर्लक्षीत करणार. भाव कोसळले व लोकसभेत भाजपाला फटका बसला विधान सभेत कांद्याला प्रचंड दर लाडक्या बहिणी, पीक विम्याचे पैसे मग भाजपा शंभर नंबरी सोनं समजून मतांचा पाऊस पाडला व पाशवी बहुमत मिळून लोकसभेत विमानात बसलेले आघाडीतील पक्ष जोरात आपटले.

कांद्याचा खेळ सोपा नाही. सरकारी कांदा खरेदीत हात मारल्याने जेलवारी भोगलेले अनेक आहेत. वसाकावर शरद पवार केंद्रात कृषिमंत्री असताना त्यांना कांदा प्रसाद मिळाला होता. अशा अनेक गमतीजमती कांदापुराणात आहेत.

यावर्षी खरीप, रब्बी, उन्हाळी तिन्ही वेळच्या कांद्यात उत्पादनात कमालीची घट झाली. रब्बीत दर मिळाल्याने कसर भरून निघाली, पण उन्हाळी कांद्यासाठी दोन वेळा बियाणे घ्यावे लागले. पहिले पावसाने संपवले. दुसरे लेट झाले व उत्पादनात प्रचंड घट झाली. सरासरी एकरात दोनशे क्विंटल कांदा निघतो, पण यावर्षी सरासरी शंभरच क्विंटल एकरी आला. म्हणजे लाखाचा कांदा व वाढत्या मजुरीमुळे सत्तर हजार रुपये खर्च. एवढ्या मेहनतीतून एकरी तीस हजार रुपये म्हणजे मोठा फटकाच. आता यंदाचा खतरनाक उन्हाळा व कांदा लेट निघाला. चाळीत टिकतो का नाही हेही अवघडच आहे. नाफेड कांदा खरेदीत सरकारी व राजकीय दलाल प्रचंड हात मारतात, हे सर्वांच्या लक्षात आले आहे. सरकारी खरेदी मार्केटमध्ये व्यापाऱ्यांप्रमाणे व्हावी, ही शेतकऱ्यांची रास्त अपेक्षा आहे.

---

**गेल्या काही दशकांपासून विवाह सोहळ्याचे स्वरूप बदललेले दिसत आहे. पूर्वी घरापुढे मंडप टाकून होणारे विवाह आता काळानुरूप मंगल कार्यालये, लॉन्स आणि आता बँक्वेट हॉलपर्यंत आले आहेत. संबळ, सनईच्या सुरात होणारे विवाह आता पुनश्च एकदा गायकांच्या साथीने बँडपर्यंत येऊन ठेपले आहेत. हा बदल हळूहळू होत गेला असला, तरी पूर्वी विवाह सोहळ्यात असणारी नातलगांची आपुलकी आणि लग्नघरी महिनाभर पाहुण्यांच्या असणारी गर्दी केव्हाच कमी झाली आहे. साहजिकच धावपळीच्या जीवनात विवाहाचे स्वरूपदेखील बदलल्याचे दिसत आहे. असे विवाह सोहळे अधिक खर्चिक होत असल्याने अनेक वधूपक्षाकडील मंडळींना कर्ज काढून असे सोहळे करावे लागत आहेत.**

## विवाह सोहळे झाले खर्चिक हॉल, लॉन्सला पसंती




**दृष्टिक्षेप**
**आनंदा जाधव**
**निफाड**

पूर्वी विवाह म्हटला की, नवऱ्या मुलीच्या घरी एक महिना अगोदर धावपळ सुरू असे.शेजारीपाजारी आपल्या घरातील लग्न समजून कामात स्वतःला झोकून देत असत. एकमेकाला मदत करण्याची त्याकाळी पद्धत होती. जागरण -गोंधळ, हळद फोडणे, पुऱ्या करणे, आंब्याच्या डहाळ्याचा मांडव टाकणे, तर हळदीच्या दिवशीच घरापुढे मंडप टाकला जायचा. पाहुणे मंडळी महिनाभर आधीच काम करू लागण्यासाठी दाखल व्हायची. सनई व संबळच्या आवाजात विवाह सोहळे संपन्न व्हायचे. त्याकाळी पवित्रा चाल फेमस होती. वयोवृद्ध आणि तरुण पोरंदेखील या चालीवर ठेका धरायची. मात्र, काळानुरूप विवाह सोहळ्यात बदल होत गेले. घरापुढे होणाऱ्या विवाह सोहळ्याची जागा मंगल कार्यालयाने घेतली. त्यामुळे माणसांचा राबता कमी झाला. संबळ, सनई जाऊन बँडपथक आले.हिंदी गाण्यांचा जमाना आला. या गीतांबरोबरच काही मराठी गाणीदेखील फेमस झाली. पुढे बँडच्या जोडीला झक्का आला. त्यानंतर ढोलीबाजा. बँजो पार्टी. त्यानंतर डीजे आणि आता बँड नव्या ढंगात म्हणजेच गायकाच्या आणि डान्सरच्या साथीने धुमाकूळ घालत आहेत. बँड गाडीच्या टपावर स्टेज करीत त्यांचेच पथकातील तरुण मुली डान्स करीत तरुणाईला भुरळ घालत आहेत.

मंगल कार्यालयात डेकोरेशन पद्धत उदयास आली अन् हजारात होणारे लग्न काही लाखांत जाऊन पोहोचले. पूर्वी वऱ्हाड बैलगाडीने नेले जायचे. त्यानंतर ट्रॅक्टर आले. नंतर ट्रकचा जमाना आला अन् आता आलिशान बसगाड्या अन् फोर व्हीलरचा वापर केला जाऊ लागला. त्यातही विवाह सोहळे प्रामुख्याने सुट्टीचा कालावधी पाहून ठेवले जाऊ लागले. म्हणजे घरातील मुले-मुली यांची सुट्टी. चाकरमानी यांच्यासाठी शनिवार-रविवार या दिवसाला महत्त्व दिले जाऊ लागले. विशेषतः मे महिन्याला सर्वाधिक पसंती मिळत असली, तरी या महिन्यात उन्हाची तीव्रता बघता सायंकाळचा मुहूर्त निवडला जात आहे. साखरपुडा कार्यक्रमदेखील सायंकाळीच ठेवण्याची पद्धत रूढ होऊ लागली आहे. विवाहप्रसंगी परिधान करावयाची साडी केव्हाच गायब होऊन त्यातही शालू. त्यानंतर पैठणी आणि आता घागरा याला सर्वाधिक पसंती मिळत आहे. त्यामुळे या घागऱ्याची किंमत पन्नास हजारांपर्यंत पोहोचली आहे. हळदी समारंभातदेखील नऊवारी, पेशवाई. नवऱ्या मुलाचा शर्ट-पॅन्ट गायब होऊन सफारी ड्रेस. त्यानंतर कोट. जोधपुरी आणि आता इंडो-वेस्टर्न. अनारकली शेरवानी, स्ट्रेट शेरवानी, पठाणी आदी पोशाखास महत्त्व दिले जात आहे. अलंकाराचे नानाविध महागडे प्रकार बाजारात उपलब्ध झाल्याने खर्चात अधिकच भर पडत असतानाच भोजनावळीच्या पदार्थांतदेखील बदल होत आहेत. शिरा, भात, कढीचा जमाना जाऊन बुंदी आली. मात्र, ती थोड्याच दिवसांची सोबती ठरली. साहजिकच आता गुलाबजामून, खोबरा बर्फी, श्रीखंड, आमरस, मठ्ठा यांना महत्त्व आले. त्याच्या जोडीला पनीर भाजीचे विविध प्रकार. पुरी, पोळी, जिरा राइस, सुकी भाजी, पापड, चटणी, व्हेज पुलाव, असे एकसे बढकर एक पदार्थ जेवणात आले. याबरोबरच खुर्चीवरचे जेवण आणि जागेवरच पाणी बॉटल.प्रत्येक पक्तीला ठराविकच वाढपी. तेदेखील गणवेशात. त्यामुळे वर्षागणिक विवाह सोहळ्याचे स्वरूप बदलताना दिसत आहे.त्यातच यावर्षीची उन्हाची तीव्रता बघता वध- वर पक्षाकडून एअर कंडिशन हॉलची मागणी होऊ लागल्याने लॉन्सधारकांनी एसी हॉल बनवून घेतले आहेत.

सध्या मे महिना असल्याने एकाच दिवशी जवळच्या नातेवाइकांचे अनेक विवाह सोहळे असल्याने वऱ्हाडी मंडळींची दमछाक होताना दिसते. त्यासाठी सोशल मीडियाच्या जमान्यात लग्नपत्रिका केव्हाच गायब झाल्याने व्हॉट्सॲपवर पत्रिका बनवून टाकली जात असून, त्याद्वारेच लग्नाला येण्याचे आमंत्रण दिले जाऊ लागल्याने माणसामाणसांतील भेटीगाठीचा दुरावा वाढत चालला आहे. साहजिकच विवाह सोहळे खर्चिक होत असतानाच प्रेम, जिव्हाळा कमी होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे आगामी काळात कमी खर्चात विवाह सोहळे कसे संपन्न होतील याबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती करणे गरजेचे आहे.

---



## मामाचं गाव...

**दृष्टिक्षेप**
**बालाजी नाईकवाडी**
**९९२२७६४३५०**

मुलांना सहज विचारले की, सुट्टी लागणार, मग तुम्ही कुठे जाणार? तर मुलांचे उत्तर येत असे मामाच्या गावाला. उन्हाळी सुट्टी लागली की, मामाच्या गावाला जायचे वेध लागायचे. मला एक गाणे आठवते..

**'झुक झुक झुक आगीनगाडी**
**धुरांच्या रेषा हवेत सोडी**
**पळती झाडे पाहूया**
**मामाच्या गावाला जाऊया...'**

ही कविता शाळांना सुट्टी लागली की प्रत्येक मुलांना आठवते. मुले लगेच मामाचे गाव गाठायचे.

मामाच्या घरी आजी, आजोबा, मावशी, बहिणी, भावंडे, आत्या, जावा, दाजी सारा गोतावळा गोळा व्हायचा. त्यामुळे सर्वांना याचे खूप कुतूहल असायचे. ग्रामीण भागामध्ये असणाऱ्या चौसोपी वाड्यामध्ये, पडवीत, मोठमोठ्या घरांमध्ये नातेवाइकांनी एकत्र जमणे आणि विशेषतः बच्चेमंडळींनी सुट्टीच्या निमित्ताने भरपूर दंगा करणे, धिंगाणा, गाणी हे सुट्टीचे मुख्य आकर्षण होते. आपल्या कुटुंबातील विविध नातेवाइकांची,नातेसंबंधाची, भावंडांची ओळख होणे, त्यांच्या स्वभावांचा परिचय, प्रेम, आत्मीयता, माया, ओढ याची अनोखी अनुभूती होत होती.

ग्रामीण जीवन पद्धतीचा परिचय होणे, गावातील मंदिरे, देऊळ, बागा, शेते, डोंगर यातून भटकणे, रानमेवा असणारी फळे आंबे, चिंचा, उसाचा रस, करवंदे, टरबूज, खरबूज खाणे.

त्याचप्रमाणे ग्रामीण खेळ खेळणे. लपाछपी, आबाधाबी, लंगडी, गोट्या खेळणे, कबड्डी, विंचवाची नांगी, अम्पल-चप्पल, राजा-राणी, सूरपारंब्या, आट्यापाट्या, कोया खेळणे, गजगे खेळणे, ताईचा रुमाल हरवला ओळखा पाहू? सागरगोटे, पत्ते, कॅरम, भेंड्या, गाणी, बैठे खेळ, बैलगाडीत बसून फिरावे-हिंडावे, पोहणे, वासरासोबत खेळणे, अंगणामध्ये रात्रभर आजी-आजोबांशी गप्पा मारणे, गोष्टी, अभंग, आरती, बाहेर झोपून तारे मोजणे यांसारख्या कितीतरी प्रकारांनी सुट्टीचा मनमुराद आनंद घेतला जात होता. आजीने फरताळ व शिकाळ्यामध्ये ठेवलेल्या दही, दूध, लोणचे इत्यादी जपून ठेवलेल्या खाऊची मज्जा तर औरच असायची.

जो तो एकमेकाशी प्रेमाने, जिव्हाळ्याने, एकोप्याने वागत होता. धार्मिक संस्कार, प्रेमळपणा, धीटपणा मामाच्या घरात सर्वांमुळे मिळत होता. लहान मुलावर अप्रत्यक्षरीत्या विविध प्रकारचे चांगले संस्कार होताना दिसत होते.त्यामुळेच मामाचे गाव संस्काराचे माहेरघर असायचे.

आई-वडिलांव्यतिरिक्त आपली काळजी घेणारे, आपल्याला आधार देणारे, आपल्याशी सुरक्षित भावनेने वागणारे, आपला आत्मविश्वास वाढवणारे नातेवाईक आहेत म्हणून जीवन मनमोकळे जगण्याची कला मुलांमध्ये रुजत होती.

हल्ली विभक्त कुटुंबपद्धतीमुळे, नोकरी व व्यवसायामुळे नातेसंबंध आकुंचन पावल्यामुळे बरेच नाती संकुचित झाली आहेत. मी व माझे कुटुंब याच्या नादातच आपला सगळा जीवनातील आनंद घालवून बसलेलो आहोत. शहरी व गतिमान जीवनामुळे मुलांचे बालपण नष्ट होत आहे. मुलांचा मानसिक, भावनिक व शारीरिक विकासाचा कोंडमारा होत आहे.आई-वडिलांना वेळ नाही, भावंडं नाही, मित्र नाहीत, ओळखीचे नाही. अशा वेळेस सतत एक असुरक्षिततेची व एकटेपणाची भावना त्यांच्या मनात सतावते. त्याचा दुष्परिणाम आपणाला मुले व्यसनाधीनकडे जाताना दिसत आहे. यामुळेच कितीतरी भयानक घटना आपण पाहत असतो. त्यामुळे मुलांतील सुसंस्कार कमी होताना आपण पाहतो. मुले मामाच्या गावाला जाण्यापेक्षा विविध ठिकाणी फिरायला जाणे, मोबाईल, टीव्ही, संगणक, गेम्स यातच गुंतले असल्यामुळे मामाचे गाव फक्त गाण्यातच राहिले आहे.

शेवटी मला सांगावे वाटते, आपण परत एकदा ग्लोबल टू लोकल जीवन जगण्याचा संकल्प करूया. इंटरनेटच्या आभासी जीवनापेक्षाही आपलं ग्रामीण भागातील जीवनमान उंच होते, हे दाखवूया.



समाजभान
अनिल उदावंत
ज्येष्ठ प्रशिक्षक, समुपदेशक व साहित्यिक
९७६६६६८२९५

# माझं काही चुकलंय का?

**दुसऱ्याच्या डोळ्यांतलं कुसळ दिसतं; पण स्वतःच्या डोळ्यांतलं मुसळ मात्र दिसत नाही! ही मराठीतली म्हण अगदी सर्वपरिचित आहे. या म्हणीत एक नैसर्गिक सत्य सांगितलं आहे; पण त्याकडे आपण फारसं गांभीर्यानं पाहत नाही. त्यामुळे त्याचा किंचितसा विचारही आपल्या मनाला शिवत नाही. माणसाला दुसऱ्याचे दोष दिसतात, पण स्वतःचे दोष मात्र दिसत नाहीत हे स्पष्ट करण्यासाठी वरील म्हणीचा आपण सर्रास वापर करीत असतो.**

मुळात मी इतरांपेक्षा सरस आहे, उजवा आहे. मी हुशार आहे. माझ्याकडे इतरांपेक्षा अधिक ज्ञान आहे, जास्तीची माहिती आहे. मी सर्वगुणसंपन्न नसलो तरी इतरांपेक्षा अधिक गुणसंपन्न आहे. अशी काही अपवाद वगळता प्रत्येक माणसाची धारणा असते. मी बरोबरच आहे. मी नेहमीच बरोबर असतो. मी कधीच चूकत नाही, मी चुकू शकत नाही कारण माझ्यात कोणताच दोष नाही. ही याच धारणेची दुसरी बाजू असते. याचमुळे दुसऱ्याच्या डोळ्यांतल कुसळ दिसतं; पण स्वतःच्या डोळ्यांतलं मुसळ मात्र दिसत नाही! ही म्हण प्रचलित झाली असावी असं मानण्याला भरपूर वाव आहे.

टू एरर इज अ ह्यूमन बीइंग अशी एक इंग्रजी म्हण आहे. त्याचा अर्थ चुकणे हे माणसाचे लक्षण आहे असा होतो. माणूस चुकतो. माणूस चुकू शकतो. यंत्र चुकत नाहीत. यंत्राला कमांड देणारा माणूस मात्र चुकू शकतो. आपण माणूस आहोत, यंत्र नव्हे! या पार्श्वभूमीवर कधीतरी आपणही चुकू शकतो हे माणसानं समजून घ्यायला हवं.

आपल्या दैनंदिन जीवनात आपण कळत-नकळतपणे अनेक चुका करीत असतो. कधी काही चूका जाणीवपूर्वक केल्या जातात, तर कधी काही चुका अजाणतेपणी म्हणजे आपल्या अज्ञानातून होत असतात. कधी एखाद्या घटना- प्रसंगाचा अर्थ लावण्यात चूक होते. कधी एखाद्या व्यक्तीला समजून घेताना चूक होते. कधी एखादा शब्द आपल्याला कळत नाही म्हणून चूक होते. कधी घाईमुळे चूक होते तर कधी उशीर झाल्याने चूक होते. कधी हेतूविषयी आपली गल्लत होते. अशा कोणत्याही प्रकारे आपल्या हातून झालेल्या चुकीचे परिणाम आपल्याल्या चुकवता येत नाहीत.

निसर्ग कुणाचीही कोणतीही चूक कधीच माफ करीत नाही! निसर्गाचा तो नियमच आहे. माणूस हा निसर्गाचा अविभाज्य आणि महत्त्वाचा घटक असूनसुद्धा निसर्गाच्या या नियमाला तो जुमानत नाही. या निसर्ग नियमाचं उल्लंघन करण्याचा जमेल तेवढा प्रयत्न करण्याकडे माणसाचा अधिक कल असतो. आपल्या कल्पना व विचारशक्तीला बुद्धीची जोड देत निसर्गावर मात करण्याचा माणसाला जणू छंदच लागला आहे असं वाटावं एवढ्या सहजतेनं माणसं आपल्या चुकांवर पांघरुण घालीत असतात; नव्हे माणसांचा तो स्वभाव बनला आहे.

वास्तविक आपण माणूस आहोत त्यामुळे आपण कधीतरी चुकू शकतो हे सत्य माणसानं प्रथम स्वीकारायला हवं. त्यामुळे चूक झाली हे मान्य करायला माणसाला फार कष्ट पडणार नाहीत. आपली चूक मान्य करताना माणसाला लाज, शरम, भय, चिंता, काळजी किंवा संकोच वाटतो असं वरवर पाहाता दिसत असलं तरी बहुतांश माणसं आपली चूक मान्य न करण्यामागे अहंकार हे खरं आणि मुख्य कारण असतं! मी चुकलो! असं म्हणताना माझं ज्ञान, माझं कौशल्य, माझा अनुभव, माझी क्षमता, माझं शहाणपण इतरांपेक्षा कमी आहे हे सिद्ध होईल. त्यामुळे मला न्यूनत्व येईल. माझं श्रेष्ठत्व, माझं मोठेपण केवळ बेगडी आहे हेच प्रसिद्ध होईल असं वाटल्यानं माणसं आपली चूक कबूल करायला, मान्य करायला, तिची जबाबदारी स्वीकारायला कचरतात आणि इथून पुढे त्यांची फसगत सुरु होते.

वास्तविक, आपली चूक कबूल केली, मान्य केली आणि तिची जबाबदारी स्वीकारली तर त्याच क्षणी ती चूक सुधारण्याच्या दिशेने माणसाचं पहिलं पाऊलं पडलेलं असतं! बेटर लेट दॅन नेव्हर असं म्हणत माणसं आपली चूक सुधारून उशीरा का होईना पण यशस्वी होऊ शकतात. जी माणसं आपली चूक कबूल करीत नाहीत अशी माणसं सुधारणेला आणि पर्यायाने आपल्याच यशस्वी होण्याला नाकारत असतात! परिणामी असे लोक अयशस्वी ठरतात. अशी माणसं कुणालाच आवडत नाहीत. अशा लोकांना इतरांकडून टाळलं जातं. कधी थेटपणे नाकारलंही जातं. ही माणसं अपरिहार्यपणे दुःखी होतात. काही वेळा दुःखातिरेकाने ही माणसं नैराश्याच्या खोल गर्तेत ढकलली जाऊ शकतात. अगदी आपलं स्वतःचं कुटूंब, शाळा, कॉलेज, कार्यालय, उद्योग, व्यवसाय अशा सर्व ठिकाणी हा असाच अनुभव येत असतो.

असं दुःख किंवा नैराश्य आपल्या वाट्याला येऊ नये असं वाटणाऱ्या प्रत्येक माणसानं आपली चूक निःसंकोचपणे मान्य करायला हवी. आपल्याकडून झालेल्या चुकीचं लंगडं समर्थन करायचं टाळून त्या चुकीची जबाबदारी माणसानं स्वीकारली पाहिजे. असं केल्यानं तुमच्या मनावरचा ताण हलका होईल. इतरांकडून तुम्हाला सहानुभूति किंवा समानुभूतिचा अनुभव मिळु शकेल.



निसर्गानं समस्त सृष्टीसाठी आपल्या निसर्ग नियमांना अधीन असणाऱ्या हवा, पाणी, अंधार, उजेड, वारा, रात्र, दिवस, ऋतूकाळ, जन्म, वाढ, विकास आणि मृत्यू यासारख्या विविध व्यवस्था निर्माण करून दिलेल्या आहेत. कल्पना, विचार व बुद्धिचा वापर करून माणसानं स्वतःच वाढवून ठेवलेल्या आपल्या गरजा भागविण्यासाठी देव, दानव, जात, धर्म, राष्ट्र, समाज, विवाह, आरोग्य, शिक्षण, रोजगार, उद्योग न्याय, बाजार यासारख्या आणखी काही नव्या व्यवस्था निर्माण केल्या आहेत.

तथाकथित प्रगतीच्या किंवा विकासाच्या नावाखाली माणसानं सगळ्या निसर्गदत्त व्यवस्थांकडे अक्षम्य असं दुर्लक्ष करून त्यानं आपलं सगळं लक्ष केवळ मानवनिर्मित व्यवस्थांवर केंद्रित केलं आहे. ही माणसाच्या हातून घडलेली मोठी आणि अक्षम्य अशी घोडचूक आहे. दुर्दैवानं माणसाला आपली ती चूक कळलेली असली तरी मुळीच वळलेली नाही. ही घोडचूक मान्य करून त्यात सुधारणा करण्याऐवजी माणूस त्या घोडचूकीवर पांघरुण घालण्याच्या नादात रोज नव्या चूका करीत आहे. त्याचा परिणाम माणसाचं आयुष्य दुःख आणि निराशेचं आगर झालं आहे, होत आहे आणि ते तसंच होत राहणार आहे!

या पार्श्वभूमीवर तुमची चूक सुधारण्याचा एक चांगला प्रयत्न तुम्हाला नक्कीच करता येईल. तुम्ही तुमची चूक सुधारण्याची ही जी भूमिका घ्याल त्या तुमच्या भूमिकेचं इतरांकडून स्वागतही होईल आणि तुम्हाला तुमची चूक सुधारण्यासाठी लागणारी मदत किंवा आवश्यक ते सर्व सहकार्यसुद्धा मिळु शकेल! अर्थात यासाठी एकच पूर्वअट आहे ती ही की, तुम्ही दरवेळी स्वतःला हे आवर्जून विचारायला हवे- माझं काही चुकलंय का? अशा रितीनं माझं काही चुकलंय का? असं स्वतःला विचारणं म्हणजे आपल्या उक्ती आणि कृतीचं मूल्यमापन करणं आहे. आपल्या जगण्याचं अशा प्रकारचं मूल्यमापन आपण नियमितपणे करायला हवं.

## मृगजळ

भेट त्याची नी तिची अशाच
एका अनोळखी वळणावर..
हळूहळू फुलत गेली प्रित
हृदयाचे स्पंदन होतेच वाढत...
अशाच एका संध्याकाळी..
दूर एकांतात....
प्रेमाची कबुली देताना
निसर्गानं देखील त्यांच्या प्रेमाचा
जणू उत्सव केला साजरा
एका झाडाने अलगद स्वतःला खाली झोकून मांडली बैठक...
बैठकीवर त्या दोघे होते विसावले जणू
तिने कितीतरी वेळ त्याच्या खांद्यावर डोके ठेवून अनुभवली शांतता...आणि त्याला ही झालीच होती जबाबदारीची जाणीव..
कुठून अचानक पावसाच्या सरी आल्या...आणि प्रेमाने चिंब भिजलेल्या दोघांना सुखद गारवा ही गेल्या देऊन...
त्या गारव्यात कोण जाणे दूरवर
शेकोटी पेटवत जणू दोघांना
डोळ्यात डोळे घालून बघता यावे म्हणून प्रकाश असावे पाठवत....
सारी सृष्टी जणू त्यांच्या प्रेमाचं
साजिरे रूप साजरे करत होती...
आज हे सारं सारं तिच्या ती जागा
बघून
डोळ्यासमोरून
जणू फिरत
होते...
आज मात्र
पाऊस नुसताच
पडत होता...बैठक ही ओसाड वाटत होती जणू ...
आणि त्या शेकोटीच्या प्रकाशाचा नुसताच डोळ्यांना त्रास...
आणि त्या सरी डोळ्यातील अश्रू घेऊन सोबत जात होत्या तोच काय तो त्यांचा आधार..
तो गारवा तो तर विनाकारण होता बोचत...
आज ती एकटीच तर उरली या सर्वांसोबत ..
.तो मात्र धावतोय कुठेतरी मृगजळामागे...ती मात्र तिथेच अगदी स्थितप्रज्ञ...



मायमराठी समूह
शीतल कुयटे

## शब्दकोडे

**मित्रानो,**

आपण पाहतो, कधी कधी अशा काही घटना घडतात की, त्या घटनेत कुणाचा तरी मृत्यू होतो. एखाद्या अपघातात जनावर दगावले जाते, माणसे दगावली जातात याला हिंदीत एक म्हण आहे - होनी को कौन टाल सकता है, मात्र काही काही घटना अशा घडतात की साक्षात मृत्यू समोर उभा असतो, काळजाचा थरकाप होईल अशी घटना घडते आणि त्यात ती व्यक्ती किंवा जनावर बचावले जातात. आणि सहज तोंडातून शब्द बाहेर पडतात, काय बलवान नशीब आहे. म्हणजे मृत्युच्या दाढेतून परत येणे यालाच आपण परमेश्वरची कृपा म्हणतो. देवाची कृपा असेल तर मृत्यू देखील येत नाही या अर्थाची म्हण *देव तारी त्याला कोण मारी* हे आपल्या कोडे क्र. ५२ चे उत्तर होते.

**आजचे कोडे क्र. ५३**

१ ते १० - या अक्षरात एक म्हण लपली आहे
१, २ - या शब्दात प्रथम, सुरुवातीला असा बोध होतो
३, ४ - या अक्षरातील वस्तू अक्षय्य तुतीयाला पुजली जाते
५, ७ - या अक्षरात वहन क्षमता आहे.
६, ७ - या अक्षरात नंतर, थोड्या वेळाने असा बोध होतो.
१, ७ - या अक्षरात जाळ, अग्नी आहे
९, ४ - या अक्षरात पावसात पडणारे हिमनग
३ ,२ - या अक्षरात केव्हा हा प्रश्न आहे
४, ६ - या अक्षरात एका मुलाचे नाव आहे
७, ४ - या अक्षरात रवा आहे
८, ९, १० - या अक्षरात माहिती कथन करावी अशी विनंती आहे.

**- प्रशांत वाघ**

(उत्तर पुढील अंकात)

# पाणी म्हणजेच जीवन




सध्या उन्हाळा आहे ..आपण सर्व जाणतोच.

परवा काय झालं नात शाळेतून आली व तिच्या पाण्याच्या बाटलीतील पाणी सायंकाळी समोरील बगिच्यातील झाडांना घालू लागली! मी पाहून जरासा अचंबित ही झालो! आणि बऱ्यापैकी जुन्या घटनांचा धांडोळा समोर चित्रफितीसारखा समोर यायला लागला : उन्हाळ्यामुळे गावोगावी पाण्याचं दुर्भिक्ष्य आहे व तशा बातम्या आपण दरवर्षी वाचतो, ऐकतो व छोट्या गावात तरी अनुभवत असतो.

थोडक्यात पाण्याचे महत्त्व जाणा आणि पाणी जपून वापरले, त्याचे योग्य नियोजन केले तर ज्यांना पाणी मिळत नाही, अशा व्यक्तींच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकतो हे लक्षात आपण घ्यायला हवे.आपण काही प्रमाणात (अल्प) घेत ही असतो !असो.

पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे, हे आपल्या कानीकपाळी ओरडून सांगितले जात असले, तरी अजूनही पाण्याचे महत्त्व आपल्या लक्षात आलेले नाही असे वाटते. घरात २४ तास पाणी आहे, म्हणून पाणी भसाभस वापरले जाते. पण, एक दिवस नळाचे पाणी गेले, तरी तोंडचे पाणी पळते. मग महिनोनमहिने दुष्काळी परिस्थितीशी झुंजत असलेल्या, पाण्यासाठी अक्षरशः दाहीदिशा फिरणाऱ्या लोकांना त्याचे किती महत्त्व असेल. हे समजून घेऊया !म्हणूनच पाणी जपून वापरले, त्याचे योग्य नियोजन केले तर ज्यांना पाणी मिळत नाही, अशा व्यक्तींच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकतो हे लक्षात येईल असं वाटतं !

माझे आतापर्यंतचे बरेचसे आयुष्य मध्यम गावात व्यतीत झाले. यात अगदी बालपण भुसावळ, जळगाव, नोकरी डिफेन्स फॅक्टरी नंतर नाशिक व पुणे.

सांगायचं कारण भुसावळमध्ये सुरुवातीची वर्षे ५५ -६० दरम्यानची! पाण्याचं अतिशय दुर्भिक्ष्य, नळ नाहीच ! जवळच एक दत्तमंदिरात विहीर, घरातील वहिनी, बहिणी वगैरे वरिष्ठ, विहिरीवरून पाणी उपसून घरी आणायच्या. बऱ्याचदा पाणी कमी पडलं तर रु. ५/-per डब्बा या दराने नंबर लावून पाणी मागवायचे असे एकत्र कुटुंबातील ऊन्हाळ्यातले दिवस असायचे! का कुणास ठाऊक ते दिवस नंतर बदलत गेले ..

भुसावळीनंतर सरकारी क्वार्टरमधे रहायला गेलो ..तेथे पाण्याची मात्र मुबलगता ..आणि जवळच आवडती तापी नदी व परिसर .. जळगावी जरा बऱ्यापैकी पाणी व त्याच्या संचयात होतो. बाकी सगळ्याच ठिकाणी पाणी मुबलकता होती .. जळगावी मात्र खालच्या मजल्यावरून ठरावीक वेळी पाणी आणून साठवावे लागायचे.

कवडसा
अनिल देशपांडे

रोज पाणी आणायचे काम बहुदा माझ्याकडेच असायचे ..त्यामुळे मी एकदा वैतागुन,चिडलो आणि विचारता झालो .. या पाण्याची expiry date काही असते का ?... ( तेव्हा आम्ही ७ वी ८ वीत असू!) आणि घरातील थोरा मोठ्यांना आम्हाला शिंगे फुटली! असा भासही जाणवू लागला होता ! मला असं वाटायचं. इथे तर रोज नळाला पाणी येते, आणि सकाळ झाली की हेच साठवलेलं पाणी रोज शिळे कसं काय होत होते? आणि रोज ओतून ही दिल जात होतं म्हणजे expiry date १ दिवसाची की काय ?

यातला माझा अंतःस्थ हेतू पाणी भरण्याचे काम टाळणे हाच असायचा!

नंतर शिक्षण व अनुभवांती काही गोष्टी समजायला व लक्षात यायला लागल्या :

जिथे दिवसाआड पाणी येते तिथे पाणी दिवसाआड expire होते आणि ओतून दिले जाते ?

जिथे आठ दिवसांनी पाणी येते तिथे ते आठ दिवसांनी expire होते?

लग्न कार्यात किंवा एखाद्या कार्यक्रमात, आपल्या समोर बिस्लरी समोर आली की हातातील पाण्याची अर्धी असलेली बाटली expiry होते आणि फेकून दिली जाते. नाही का ?

वाळवंटात प्रवास करताना जोपर्यंत पाणी दिसत नाही तोपर्यंत जवळचे पाणी चालते होय ना ..

धरणातील पाणी ही पुढच्या पावसाळ्यापर्यंत चालून जाते..

जर दष्काळ परिस्थिती आली तर दोन तीन वर्षे ही चालते नव्हे सुखावते..

जिथे ५० फूट बोअरवेलमधून पाणी काढले जाते तिथे ते जमिनी खाली शेकडो वर्षे जुने असते म्हणजे शेकडो वर्षे झालेले पाणी पिण्यास चालते आणि expiry date शेकडो वर्षे जिथे पाणी ४०० ते ५०० फुटांवर पाणी बोरवेल खोदून काढले जातात तिथे ते हजारो वर्षांपूर्वी भूगर्भात साठलेले असते तरीही ते चालते.. expiry date ?

एकूणच पाण्याची expiry ही आपल्या कमकुवत बुद्धीमतेवर ठरवली जाते...असं मला तरी वाटतं

(अजुन एक सांगावेसे वाटते माझा फॅक्टरीतील साधारण ३५ वर्षांच्या कालखंडात पाणीपुरवठा खाते माझ्याच अधिपत्याखाली असल्याने, शिळे पाणी म्हणजे नेमके काय? याची मला रोज जाणीव पण होत होती.)

थोडक्यात हेच सांगावसं वाटतं पाणी जपून वापरा, नाहीतर आपले विचारच आपला घात करतील.. आणि पाण्याला expiry Date नसते ! भले पाण्याच्या बाटलीवर ती ळिर्पी केलेली का असेना!

खरंतर त्या पाण्याच्या बाटली वरील तारीख त्या पाण्याची नसून, बाटलीची असते एवढंच!



संस्कार
नेहा कुलकर्णी
-जोशी

# उन्हाळी सुट्टी तेव्हाची आणि आत्ताची

उन्हाळी सुट्टी म्हणजे सर्वांसाठी एक पर्वणीच असते. वर्षभर शाळा आणि क्लासेस करून विद्यार्थी पुरता थकून गेलेला असतो. त्याचा कंटाळा जाऊन नवीन उत्साह संचारित होण्यासाठी उन्हाळ्याची सुट्टी कामी येते. पूर्वी आम्ही लहान असताना उन्हाळ्याच्या सुट्टीत मामाच्या गावाला जायचो. खूप खेळायचो, बागडायचो रात्री बाहेर खाट टाकून तारे मोजण्यात जी मजा यायची त्याला तोडच नव्हती. मस्त आमरस पुरीचा बेत करणे, बरोबरच्या मुलांबरोबर खेळणे. दिवसभर उन्हात खेळूनही कधी चेहरा काळा पडला नाही कि काही त्रास झाला नाही.. अर्थात तेव्हाच वातावरण ही शुद्ध होतं. एक वेगळाच उत्साह असायचा. नात्यांविषयी एक ओढ, आपुलकी, सखे, चुलत, मावस भावंडं इतकं घट्ट नातं होतं की सख्खे, चुलत हे ओळखणेदेखील कठीण होतं.. त्यामुळे आम्ही पैसा जरी गरजेपुरता/ चैनीपुरता कमवत असलो तरी आमच्या जवळ नात्यांची श्रीमंती खूप जास्त होती. जी पैसे देऊनही घेता आली नसती.. आजकालच्या मुलांकडे पाहिलं की खरोखर वाईट वाटतं.. त्यांना लहान वयात सगळ्या गोष्टी अगदी हातात आहेत, परंतु तरीही त्यांच्या चेहऱ्यावर एक निराशा जाणवते. अर्थात जो प्रकर्षाने पाहतो त्यालाच ही गोष्ट जाणवते.. मोबाईल हे कारण आहेच परंतु त्याचे महत्त्वही आहे व्यवहारात त्यामुळे एकट्याने ह्याच गोष्टीला दोष देऊनही उपयोग नाही. मग याच्यावर उपाय म्हणून जशी मुलांना शाळेला उन्हाळी सुट्टी असते. तसेच शालेय वयातील ज्या मुलांकडे मोबाइल आहे, त्या मोबाइललाही सुट्टी द्या म्हणजे त्यांचा दिनक्रम ठरवा. मोबाइल शक्यतो पालकांनी स्वतःकडे ठेवा. त्यालाही थोडी विश्रांती मिळेल. मुलांना एकाग्रतेने स्वतःची आवड जाणून घेण्यासाठी वेळ द्या. त्यांना स्वतःचे मनन करण्यास सांगा आणि संध्याकाळी त्याविषयी आढावा घ्या.. त्यासाठी त्यांना एखादी उपयुक्त वस्तू भेट म्हणून द्या म्हणजे मुलं ऐकतील आणि सांगितलेली कृती करतील.. जगात अशी कोणतीही गोष्ट नाही की त्याला पर्याय नाही, पर्याय



आहे फक्त तो आपण जाणून कृती केली तर निश्चितच अपेक्षित कृती घडण्यास मदत होईल.. मुलांना वारंवार किती मोबाइल बघतो हेच वाक्य वर्षानुवर्ष म्हणण्यापेक्षा त्यांच्या मनात अलगद शिरून तो मोबाइल त्यांच्याच हाताने त्यांना साईडला ठेवायला भाग पाडा.

पूर्वीची उन्हाळी सुट्टी आणि आत्ताची उन्हाळी सुट्टी यात जरी निश्चितच मोठा फरक असला तरीही जशी आपल्या आई-वडिलांनी आपल्याला त्यांच्या क्षमतेनुसार उन्हाळी सुट्टीत आनंद घ्यायला शिकवले. आणि वर्षानुवर्षे जसा तोच पायंडा पुढे चालत राहिला.. तसेच आत्ताच्या आई-वडिलांनी त्यांच्या क्षमतेनुसार आणि मुलांच्या हिताचा विचार करून योग्य मार्गाचा अवलंब करीत उन्हाळी सुट्टीचा पायंडा शिर्ी केला तर निश्चितच तो पुढे निरंतर राहील यात शंका नाही.. प्रयत्न करा सकारात्मक विचारांना यशाची १०० टक्के जोड असते. आनंदी राहा आनंदाने आयुष्य जगा!

## गांवकरी काव्यांगण



### गुलमोहर

मनमोहक भासे हा गुलमोहर
ग्रिष्मात असे त्याला गच्च बहर

लाललाल रंगाची उधळण फार
लगडला फुलांचा शेंडा
झुबकेदार

बारीक खोडाचा पसारा डेरेदार
मधुनच डोकावते शेंग
हिरवीगार

झाडाखाली बसता हवा येई
गार
इटुकली चपळाई करी बघा
खार

बारीक पाने फांदीस नाजुक भार
उन्हाळ्यात असे निसर्ग
चमत्कार

गुलमोहरा रंगरूप जगी दिसे
चार
देवानेच बनवलाय हा
किमयागार!

**- वैशाली जाधव शिंदे, पिंपळगाव बसवंत**

### बहावा

चैत्रातला पिवळाधमक बहावा
ग्रीष्मातही रोज पहात रहावा

सोनपिवळे झुंबर लटकलेले
जणू सुवर्ण फूले ते कानातले

पिवळ्या फुलांचा नाजुक
सडा
निसर्गाचा सृष्टीस सुंगंधी वेढा

ग्रीष्मातही हा मनोहर बहावा
डोळ्यांना देई शीतल गारवा

रस्त्याच्या कडेला उभे दाटीने
नवचैतन्याचे तेज हरीत
पिवळाईने

हळदुल्या रंगांची ही उधळण
धरा करते आनंदाची पखरण

सृजनाचा बहर पानोपानी
दाटला
नववधूचा शृंगार साज नटला

शालू पिवळा सृष्टी नेसते
दान सौख्याचे वसुंधरा देते

झाड बहाव्याचे किंवा
अमलताशाचे
हसरे- आनंदी झाड हे
पीतफुलांचे

गुच्छ पाहूनी जाई मग थकवा
खरच उपयुक्त, बहुगुणी
बहावा तो पहावा!

**- योगिनी पैठणकर**



### माझे अश्रू एकदा

माझे अश्रु एकदा
माझ्यावर रुसले
चारचौघात कधी
ते कुणा नाही
दिसले???

अश्रुंनी केला प्रश्न
माझ्यावर जरा
चिडून!!!
का ठेवलंय आम्हाला
तुझ्या डोळ्यात तू कैद
करून???

का तु दिले फक्त
आम्हांला
तुझ्या एकांतात
स्थान???
आम्ही कुणा समोर
आल्यास जाते का
तुझी खाली मान???

धीर धरून मग
मनाला माझ्या
सांगितले मी काढावी
आता आपल्याच
अश्रूंची समजूत...

का लपवते अनमोल,
अश्रूंना उतरवावं यांच्या
डोक्यावरचं विचित्र अन्
जगावेगळं भुतं!!!!

काढते आता
तुम्हाला माझ्या
लोचनातुन बाहेर
आहे का हे मान्य???

हार मानून आता
पत्करते शरणागती
निराशेसमोर मगच व्हाल
का तुम्ही धन्य ???

माझं बोलणं ऐकून मग
अश्रूंनी त्यांची रडत रडत
तक्रार घेतली मागे...

अश्रूंना आवरेना मग रडू
मी विचारला पुन्हा
प्रश्न!!!
आता तुम्ही सांगा कुठे
तुमची खरी जागा???

अश्रू म्हणाले कर तर्पण
परमेश्वराच्या चरणी
ती तुझी अन् आमची
हक्काची जागा!!!
लढण्याचं मिळेल बळ
अन् टळेल संकटांची
बाधा!!!


**- श्रद्धा जाधव बोरसे**



## सापेक्ष

वासवदत्ता अग्निहोत्री





# पथ प्रदर्शक

प्रत्येकाला आपले मत व्यक्त करण्याची मुभा असते. आणि प्रत्येकाची मतंही वेगळी असू शकतात. प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व एकसारखे नसते, परिस्थितीत अंतर असते, राहणीमान आणि स्वभाव सर्वच भिन्न असतात.

कधी विचार केलाय की, जेव्हा रस्ते नव्हते तेव्हा लोक कसे वाटचाल करत असतील? गावांची नावं नव्हती, शहर तर नव्हतेच म्हणा, पण एका गावातून दुसऱ्या गावी कसे जावे? कारण वाहतुकीची काहीच साधने उपलब्ध नव्हती. बैलगाडी किंवा घोडा. सर्वदूर रानं, जंगल, दगडधोंडे वाहत्या नद्या, दऱ्या, डोंगर, त्यात हिंस्र श्वापदं केव्हा आपला शिकार करतील याची भीती आणि रस्ता नाहीच. पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर आणि दिशासूचक यंत्रदेखील नाही. खगोलीय नियमानुसार आपले यात्रेचे बेत ठरवणे. एकदा का कुणी बाहेरगावी जाण्यास निघाले की परतीची शाश्वती नसायचीच. कशा प्रकाराचे कशा स्वभावाचे लोक, कुठे वस्ती करून रहात आहेत हे सुद्धा ध्यानीमनी नव्हते. पाठीवर बिऱ्हाड घेऊन निघायचे आणि गंमत म्हणजे अशीच फिरस्ती मंडळी, अनेक वर्षे फिरून फिरून अनेक स्थानांचे शोध लावत होती. वाटा नसताना, नद्या, सागर, डोंगराळ भाग, वाळवंट या सर्वांची माहिती आज आपल्याला आहे ती सर्वांत आधी ज्यांनी काढली असेल त्याला काय अमाप कष्ट पडले असतील. जे वाहतुकीला मिळेल ते साधन वापरणे, जिथे काहीच संभाव्य नसेल तिथे पायी चालत जाणे, वहाणांच्या नावावर जे मिळेल ते पायांना गुंडाळून, पायांचे रक्षण करणे. हिंस्र पशू, विषारी कीटक यांच्यापासून स्वतःला वाचवणे. वेळ पडल्यास त्यांच्याशी लढा घेणे. जे मिळेल ते खाणे, जिथे पिण्यायोग्य पाणी मिळेल तिथे पिणे त्यातही पाण्याच्या हिंस्र जीवांपासून आपले संरक्षण करणे. ऋतूंचे परिवर्तन सतत झेलणे अबब!!काय केले असेल आणि काय नाही पण आज आपण राजरोस पणे ह्या रस्त्यावरून धावतो आहोत. प्रत्येक शहराचे अंतर, नाव सर्व आपल्याला ठाऊक आहे आणि आता तर जी पी एस मुळे खूपच सोपे झाले आहे.

किती थोर वाटाडे होते पूर्वी, ज्यांनी गावं शोधले, देश शोधले, सभ्यता कुठे होत्या त्यांची संस्कृती कशी काय होती, रहाणीमान आणि परंपरा कशा होऊ शकत होत्या ह्यांची अनुमाने लावली आणि ही सर्व नोंद इतिहासात करून आपल्या साठी जपून ठेवली. आपण आज खरोखरच भाग्यवंत आहोत. कितीक विकसित जीवन आपण जगत आहोत या सर्वांचे श्रेय, त्या कष्टाळू लोकांना आहे ज्यांनी आपल्या जीवाची पर्वा केली नाही आणि येणाऱ्या सर्वच लोकांचा उद्धार केला.

**वास्कोडिगामा :** १४९८ मधे याने आफ्रिकेच्या पूर्वेकडील मार्गाने भारताला, समुद्र मार्गाने शोधले.

**क्रिस्टोफर कोलंबस :** १४९२ मध्ये याने अमेरिकेचा शोध लावला.

**जॅक कार्टियर :** १६व्या शतकात याने कॅनडा येथील सेंट लॉरेंस नदीचा शोध लावला.

याव्यतिरिक्त, अनेक भारतीय, अरब,चीनी हे नवीन मार्ग आणि नव्या संस्कृतींचा शोध लावतच होते.

हे खरे योग्य मार्गदर्शक होते. ह्यांच्या मनात सर्वांच्याच साठी जिव्हाळा होता.भविष्याची काहीच कल्पना ते करत नसावेत पण त्यांचा शौक त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. सतत फिरस्तीवर राहण्यातच त्यांना जीवनाचा आनंद होत होता.

गावातून आजही पायवाट आढळून येते. नदीकडे जाणारी, एखाद्या विहिरीवर जाणारी, परत येकाच्या घराकडे, देवळाकडे जाणारी... थोडक्यात, जिथे जिथे लोक सारखी ये-जा करतात तिथे मानव पदांमुळे पाऊलवाट आपोआप निर्माण होते. तिथे वनस्पती उगवत नाहीत आणि ती वाट मोकळी होते. तसेच गावातून बैलगाड्या ज्या रस्त्यावरून जा-ये करतात तिथेही बैलगाडीच्या चाकांमुळे दोन समानांतर रेषा आढळतात. ज्या त्यावरून सतत चाकं गेल्याने रस्त्यावर उमटतात. आता तर विकासामुळे, खूप रस्ते निर्माण झाले आहेत. हाय वे, फोर लेन, सिक्स लेन, वन वे, टू वे, सर्विस रोड,ओव्हर रोड आणि त्यावर अतोनात वाहने सातत्याने वाटचाल करीत आहेत. जितके हवे तितके पथ निर्मित झाले आहेत पण या निर्माणात अनेक जबाबदार लोकांची मतं सहभागी आहेत. त्याशिवाय रस्त्याचे प्लान, इंजिनिअरिंग, आखणी हे करण्यास बरेच विद्वान लोक एकत्र मिळून काम करतात. रस्त्याची मोजणी, त्यावर लागणारे खडी, डांबरीकरण, मजूरवर्ग इत्यादीचे इस्टिमेट काढून मगच त्यावर कागद कार्य तयार होते आणि मग सरकारकडून पैसा अनुमोदन वगैरे मिळाल्यावर काम सुरू होते. रस्ता निर्माण पोरखेळ नव्हे. त्यातही पावसाळ्यात रस्ता उखडला की निर्माते कात्रीत सापडतात. आपण आपल्या वाहनातून जाताना खराब रस्ता लागला की सरकार आणि ठेकेदार दोघांवर भरपूर तोंडसुख घेतो.

आयुष्यात ही असे बरेच मुलंमुली दिसतात जे एकटेच खूप फिरतात. त्यांना फिरून जग बघायची इच्छा असते. त्यासाठी ते पैसे कमावतात, वाचवतात आणि मग फिरतात. त्यांना 'सोलो ट्रॅव्हलर' असे म्हणतात. आपण ही खूप फिरतो आणि फिरण्यास साथ शोधतो, अवसर शोधतो आणि मिळाल्यावर नक्कीच फिरतो.

पूर्वी वाटाडे फिरत होते ते काही नवीनाच्या शोधात फिरत होते, पण आता जेव्हापासून देश, विदेशात भरपूर फिरण्याच्या जागा माहीत आहेत तेव्हा फिरणे खूप सोपे झाले आहे. वृत्तपत्रात, मासिकातून फिरायला जाण्या अगोदर काय काय वस्तू, सामन न्यावे हे खूप सविस्तर अहवाल तयार मिळतो. कुठे फिरायला जात आहात तसे कपडे वगैरे घेऊन जाण्याबद्दल ही माहिती असते.

असो. आयुष्यात ही पुढे आणि महत्वाची वाटचाल करण्यास आपल्यालाही मार्गदर्शन लागते. स्वतःच्या जीवनात अनेक अनुभव घेतलेले आपले वरिष्ठ आप्तेष्ट आपल्याला मार्गदर्शन करतात. जगण्यास मदत होईल असे सल्ले देतात त्यामुळेच आपली आयुष्याची वाटचाल सोपी होते. आपल्याला ठाऊक नसलेल्या अनेक गोष्टीत, आपल्याला योग्य मार्गदर्शन मिळाले की आपले निर्णय चुकत नाहीत. आपले कुटुंब, आपले शिक्षक आपले वरिष्ठ जन हेच आपले मार्गदर्शक असतात. पथ प्रदर्शक असतात. पण ते त्यांच्या अनुभवाने आपल्याला सल्ले देतात. फार पूर्वीपासून ज्यांनी देश शोधले, सभ्यता शोधल्या त्यांना कुणाचेच मार्गदर्शन मिळाले नव्हते अशा अनेक महान व्यक्तिमत्त्वांना मानाचा मुजरा!! आज त्यांच्यामुळेच आपण इतके प्रगतिशील झालो आहोत.



## सहजच

मनीषा चौधरी

# हसण्यासाठी जन्म आपुला

मनमोकळं, खळखळून हसलं की कसं प्रसन्न वाटतं ना! असा हसणारा चेहरा बघून किमान स्मित हास्य आल्याशिवाय रहाणार नाही. माझ्या वर्गात हास्याच्या कारंजा कायम फुलत असतात. कारण लहान सहान गोष्टीत आनंद आणी हास्य शोधणारे चिमुकले विद्यार्थी वर्गात बसलेले असतात. आणी खळखळून हसण्याची एकही संधी आम्ही सोडत नाही. कधीतरी पडल्या चेहऱ्याने वर्गात गेलेच तर टीचर आज तुम्ही हसत का नाहीत म्हणत हक्काने विचारपूस करणारे बालमित्र माझ्या सारख्या प्रत्येक शिक्षकाला लाभतात. आणी पुन्हा एकदा चेहऱ्यावर हसण्याची लकेर उमटवितात. जणू दररोज हसण्याचा डोस च या चिमुकल्यांकरवी मला मिळत असतो.

म्हणूनच मनमोकळ हसणं मला फार आवडतं. खळखळून हास्यामागे काहीतरी दुःख किंवा सल दडलेलं असते, असे म्हटले जात असले तरीही हास्य हे ताणतणाव निवळण्यावरील प्रभावी औषध आहे. अनेक जबाबदाऱ्या पेलताना ताण हा येतोच. रोजचा दिवस नवा टास्क घेऊनच समोर येत असतो. आता तो कसा पेलायचा हे व्यक्तीच्या स्वभावावर अवलंबून असते. खचलो, रडलो तरी जे टाळताच येणार नाही ते सहन करतच जगावे लागते. अशावेळी

हे ही दिवस जातील म्हणत, स्वतः ला व इतरांना बळ देत जगण्याची धडपड सुरुच ठेवत असतो. कुठल्याही बदलाने निसर्गचक्र थांबत नसते. तरिही माणूस पारखा होतो तो हसण्याला. हरवत चालतो तो आनंद, हास्य.

हास्य ही एक नैसर्गिक भावना आहे. हास्य म्हणजे निरपेक्ष आनंद . त्याशिवाय जगण्याची कल्पनाच न केलेली बरी. हास्य ही मानवाला लाभलेली देणगी आहे. खळखळून हसता येणे हे सुदैवी माणसाचे जिवंतपणाचे लक्षण आहे. हास्याची स्वतः ची एक भाषा असते. जगातील कोणत्याही कान्याकोपर्यात एका स्मितहास्याने तुम्ही कुणाशीही सहज मैत्री करू शकता.

हास्याचे विविध प्रकार आहेत. स्मितहास्य, खळखळून हसणे, मंद हास्य, गडगडाटी हास्य. प्रत्येक हास्याची तऱ्हा वेगळी असली तरी परिणाम हा एकच असतो तो म्हणजे तणावमुक्ती.लहान बाळाचे खदखदने असो की, एखाद्या ललनेचे मंद हसणे असो, हसरा चेहरा आपला वेगळा प्रभाव समोरच्या व्यक्ती वर पाडतोचं.

आजच्या काळात मनमोकळे हसू शकणारे खरेतर नशीबवानच म्हणायला हवे. अगदी न कळत्या वयापासून ते आयुष्याच्या उत्तरार्धापर्यंत माणसाच्या अपेक्षा या कधीहि न संपणार्या अशाच आहेत. त्या हव्यासापोटी तणाव जणू प्रत्येकाला बोनस मिळाला आहे. अभ्यास, मार्क्स, स्पर्धा , नोकरी , घर, गाडी प्रसिद्धी, ही यादी न संपणारी आहे. यात भरडताना हसणंच हरवून बसलोय आपण. लहानपणी खळखळून हसणारी मुले मोठेपणी जणू हसणं विसरतात की काय? हसणं गमावलेल्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो. पुन्हा ते मिळवण्यासाठी हास्यक्लब जॉंईन करुन उसने अवसान आणून गडगडाटी हसू मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. त्यापेक्षा



आयुष्यातील या मौल्यवान हास्याला आपण वेळीच गोळा करुन आपल्या सवयीच्या कप्प्यात आग्रक्रमावर ठेवायला हवे. दिवसभराच्या अनेक नित्याच्या सवयीत या खळखळून हसण्याला प्राधान्य द्यायला हवे. हास्यामुळे शरीराला उर्जा मिळते. नैराश्य, ताण कमी होण्यास मदत होते. रोगप्रतिकारक शक्ती वाढते. हास्यामुळे चेहरा टवटवीत रहातो. मनात सकारात्मक विचार येतात. हास्यामुळे मैत्रीपूर्ण संबंध निर्माण होतात. हसणारी व्यक्ती आपल्या भोवतालच्या वातावरण उत्साहपूर्ण बनवते.

पूर्वी लाईट गेली किंवा रात्री च्या जेवणानंतर कुटुंबात, शेजारीपाजारी गप्पांच्या मैफीली जमत. चुटकुले, गमती सांगण्याची चढाओढ लागायची. हास्यांचे कारंजे फुलायचे. अगदी पोटदुखेपर्यंत लोळून हसणे व्हायचे. परंतु स्पर्धात्मक युगामुळे व समाजमाध्यमांच्या आभासी दुनियेमुळे माणसाचे तणावग्रस्त जगणे वाढले आहे.. वाढते नैराश्य चिंताजनक विषय झालाय.अगदी लहान मुले ही त्याला अपवाद नाहीत. हातातील फोन मधे वेगवेगळे जोक, विनोदी रिल बघताना त्यातून वेगवेगळ्या आवाजातील हास्याच प्रकार ऐकायला येतात. पण तणावग्रस्त माणसाच्या चेहऱ्यावर ते विचित्र हास्य ऐकूनही हसू उमटत नाही. हास्य हरवलेला माणूस तणावमुक्त जगणं विसरत चाललाय. त्यामुळे हास्य कमावणे व ते टिकवणे हे सुद्धा आनंदि जीवनासाठी महत्त्वाचे आहे. मे महिन्याचा पहिला रविवार जागतिक हास्य दिन या निमित्ताने प्रत्येकाने आपले हास्य जपण्याचा संकल्प करुन तो टिकवायला हवा. हसणे हे कुत्सित नसावे तर मनमोकळे असावे. चला तर मग छानसे हास्य चेहऱ्यावर खुलूच द्या.

# शून्यापासून सुरुवात

**महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती ।**

या तुकाराम महाराजांच्या ओळीचा अर्थ समजला म्हणजे जीवनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नेमकं काय करावं ते कळते.

कोणत्याही गोष्टीची सुरुवात ही शून्यापासून म्हणजेच सूक्ष्मापासूनच होते. जसे फक्त परीक्षेच्या दिवशी वर्षभराचा अभ्यास करायचा म्हटला तर चांगले यश मिळणे शक्य नाही. चांगले यश मिळवायचे असेल तर रोज थोडा-थोडा अभ्यास करत राहिला पाहिजे त्यामुळे परीक्षेच्या दिवशी जास्त अभ्यास करायची गरज राहत नाही आणि परीक्षेचा ताणही येत नाही. यशही चांगले मिळते. माझ्या लक्षातच राहत नाही, आमची परिस्थिती नव्हती म्हणून आम्हाला नाही शिकता आले अशी लंगडी कारण सांगणाऱ्यांना मुळातच काही करण्याची इच्छा नसते. या सर्वांना मला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी किती प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले हे सांगावेसे वाटते. या संदर्भात अजून एक वाक्य सांगावेसे वाटते शांततेच्या काळात जर जास्त घाम गाळला तर युद्धाच्या काळात कमी रक्त सांडावे लागते म्हणजेच आपल्या जीवनाची उद्दिष्टे साध्य करायची असतील तर आज हातात असलेला कोणताही वेळ वाया घालवू नये. मित्रांनो छत्रपती शिवबांनी सुद्धा आपल्या बाल सवंगड्यांसह रायरेश्वराच्या मंदिरात हिंदवी स्वराज्य निर्मितीचा संकल्प केला तेव्हाचे त्याचे क्षेत्र फार लहान होते. पण पुढील शंभर वर्षांत त्याचे साम्राज्यात रूपांतर झाले. शिवचरित्राचा अभ्यास केला तर आपल्या सहज लक्षात येतं की, महाराजांवर केवढी मोठी संकटे आली, ती सर्व पार करत त्यांनी प्रचंड मोठे यश मिळवले त्या तुलनेने खरंतर आपल्यासमोर काहीच समस्या नसतात. तरी आपण अनेक लंगडी कारणे सांगण्यात आनंद मानतो. थोडक्यात काय तर 'नाचता येईना अंगण वाकडे' ही म्हण अशी माणसे सार्थ करून जातात. आज मोठमोठे उद्योग समूह किंवा उद्योजक हे एका दिवसात किंवा एका रात्रीत मोठे होत नाहीत, त्यांची सुरुवात अगदी लहान उद्योगापासून झालेली दिसून येते. कधी कधी ती शून्यापासून झालेली असते. अशी अनेक उदाहरणे आपल्याला दिसतात की ज्यांनी सुरुवात लघुतेपासून केली आणि आपल्याच आयुष्यात विश्वभरात आपला उद्योग पोहोचवण्यात ते यशस्वी झाले. जसे धीरूभाई अंबानी. थेंबे थेंबे तळे साचे या पद्धतीने आपण कोणतेही काम केले तर निश्चित चांगले यश मिळते हे सदैव लक्षात ठेवावे. काही व्यक्ती निवृत्तीनंतर किंवा वयाच्या साठी नंतर आपल्या आवडत्या क्षेत्रात काम करण्यास सुरुवात करतात आणि पुढील पाच-दहा वर्षातच जगभर जाऊन पोचतात अशी अनेक उदाहरणे समाजात दिसतात. त्यामुळे आता वय झाले हो, आता नाही शक्य, कर्तबगारीचेही एक वय असते अशी कारण देणाऱ्यांनी वरील उदाहरण लक्षात घ्यावे. एक दुसरे उदाहरण म्हणून सांगतो कधी कधी पायवाट म्हणून सुरू झालेला रस्ता भविष्यात महामार्ग होऊन जातो.



## मंथन

प्रा. प्रशांत शिरुडे
९९६७८१७८७६

यश किंवा अपयश मिळत असताना इतरांशी स्वतःची तुलना अजिबात करता कामा नये. तुलना करायचीच असेल तर ती केवळ स्वतःशी करायची म्हणजे मागच्या वेळी आपण केलेली कामगिरी आणि आताची कामगिरी यात किती प्रगती किंवा अधोगती झाली याचाच विचार करावा. दुसऱ्याशी तुलना केल्यास नैराश्य येण्याची दाट शक्यता असते. स्वतःशीच तुलना केल्यास उभारी येते. आधीच्या चुका पुन्हा होत नाहीत. योग्य दिशेने केलेला अभ्यास आणि त्याचा व्यासंग हा माणसाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जातो.



## शब्द फुलोरा

वैशाली जाधव-शिंदे
९३७११८५७९१

# चितांग



(भाग १)

रात्रीची निरव शांतता पसरली होती. रातकिडे किर्र किर्र असा आवाज करत होते. मध्येच कुठेतरी कुत्र्यांचं भुंकणं कानावर पडत होतं. एखादं वटवाघूळ पंख फडफडत झाडाला उलटं लोंबकळत होतं. सगळी वस्ती निद्रा मातेच्या अधीन झाली होती. केशवला काही केल्या झोप लागत नव्हती. कुशी बदलत सकाळ होण्याची वाट बघत होता. आई सारजाबाई आपल्या अंथरुणावरूनच हे सगळं पाहत होती. आईला कळत नव्हतं.

आपले लेकरू असं का करतंय? असं का वागतं? नुकतीच बी.ए.ची परीक्षा देऊन घरी आलेला केशव थोडा विचित्रच वागत होता. कोणाला काही कळत नव्हतं. पोरगं हुशार, कर्तृत्ववान आणि समजदार आहे, पण असं काय झालेय याचा शोध लावलाच पाहिजे, असं सारजा मनात म्हणत होती. सारजाबाई सकाळी उठून सडासंमार्जन करून, स्नानादी कामे उरकून, तिने झटपट स्वयंपाक करून घेतला आणि केशवला हाक मारली,

केशव, अरे केशव, ऐकतोय का? आपण जरा माळावर जाऊन येऊ ! मला सोबत होईल तुझी आणि मळ्यात काय कामधंदे चालू आहे हे पाहून येऊ!

अगं, आज नको, मला जरा बरं नाहीये, अंग अंग दुखतंय! उद्या गेलो तर चालेल ना आई !

बरं, बाबा! तू म्हणतोस तर उद्या जाऊयात! सारजा म्हणाली.

पण आता जरा आंघोळ वगैरे करून घे, दोन घास खाऊन घे, तुला थोडा बरं वाटेल !

मग आळस देत केशव उठला आणि पाठमोऱ्या आईला गरम पाणी करून देण्यासाठी सांगू लागला.

तशी आई लगबगीनी उठली आणि चुलीला दोन तीन लाकडं लावली. धूर निघत होता, चूल फुंकत असतानाच तिला जोराचा ठसका आला.

तसा केशव धावत धावत आला व तिची पाट चोळत म्हणाला, किती काळजी करशील! माझी, आप्पांची, आजीची, स्वतः कडे बघ जरा!

तशी सारजाबाई म्हणाली, नाही रे बाळा, हे कायमच आहे! धुरामुळे होत असणार असंच! पूर्व परंपरागत चालत आलं आहे, हे चूल आणि मुल चुकलं का कोणत्याही बाईला!

पाणी तापलं तसं पाण्याचे तपेले घेऊन तो मोरीत गेल्यावर आंघोळ करू लागला. तशी सारजाबाई चहाचं आंधण ठेवू लागली.

तेवढ्यात किसनराव म्हणजे केशवचे वडील बाहेर आले.

काय चाललंय, माय लेकाचं?

जरा बरं नाही हो त्याला!

जरा बरं वाटत नाही ना मग मळ्यातून फेरफटका मारून येऊ, असं म्हणत होते! चहाचा आंधण ठेवत सारजा बाई म्हणाली.

आम्हालाही पाजा की तुमच्या हातचे अमृत ! किसनराव म्हणाले.

हो, ठेवलाय दोघांचा चहा पाठवते.

चहा कपात ओतून तांब्याभर पाणी भरून चहाचा कप घेऊन ओसरीत गेल्या.

इकडे केशवची अंघोळ झाली, तोही टॉवेल गुंडाळून ओसरीत आला.

तशातच सारजाबाई केशवला म्हणाली तुलाही चहा घे. बापलेक झुरके मारत चहाचा आनंद घेत होते.

केशव म्हणाला, आप्पा आता शेतात काय लावलं आहे आपल्या?, चला आपण बघून येऊ या जरा! बरं.

असं किसनराव सुस्कारा सोडत म्हणाले.

सकाळची न्याहरी सोबत घेत केशव आणि आप्पा म्हणजेच किसनराव आपल्या शेतात गेले.

जणू काही त्यांचे शेत शिवार छोट्या मालकाची वाटच पाहत होते! मुलाने खूप शिकावं, मोठं व्हावं, हे आप्पांचे स्वप्न होतं, म्हणून आप्पांनी व आईने आपल्याला शहरात शिकायला पाठवले होते.

पण म्हातारे आई-वडील एकटे सोडून राहणं शहरांमध्ये केशवला काही पटेना, म्हणून तो शिक्षण आटोपून पटकन आपल्या गावी परतला होता. आपल्या डोंगरगावला!

डोंगरगाव जसं नाव तसंच! ते डोंगराच्या कुशीत विस्तिर्णपणे पहुडलेले होतं. सगळीकडेच डोंगराच्या रांगा, उंच सखोल टेकडीच्या मधोमध डोंगरगाव विसावलेले. तेथील जमीन थोडी खडकाळ, थोडी मुरमाड, दगडगोटे मिश्रित होती. त्यामुळे पिकेही जेमतेम निघायची. पण शेतकरी कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे तेवढेच साधन नाही का! म्हणून आप्पा शेती करायचे.

त्यांच्या उत्पन्नात म्हातारी आई व स्वत, बायको, मुलगा हे कुटुंब सांभाळताना त्यांची तारांबळ उडत. लहानपणापासूनच पित्याचे छत्र हरवलेले आप्पा मात्र कधीही बेचैन व्हायचे. माझ्या वाट्याला असं पोरकेपण आलं, तसं माझ्या लेकराला येऊ नये, असं त्यांना मनोमन वाटायचं. ते नेहमी बायकोला बोलून दाखवायचे. मी खूप सोसले, ते माझ्या मुलाच्या वाट्याला येऊ नये! म्हणून त्यांनं खूप शिकावं , खूप मोठं व्हावं, साहेब व्हावं व आपले गरिबी चे दिवस त्याने पालटावे! असं नेहमी सांगत असायचे सुखाचे दिवस कधीतरी येतील, आपण असं हात पाय गाळले तर पोराच्या मनावर परिणाम होईल. अशी मनाला दोघेही आकळ घालत असतं.

शेतावर आता कांद्याचे पीक लावले होते, पीक जोमात होतं, मागचे कर्ज फिटून, बायकोच्या अंगावर एखादा दागिना घालायची इच्छा किसनरावांना होती. ते दोघेही आपल्या शेतात काबाडकष्ट करीत होते. त्यांच्या जोडीला आता केशव ही आला होता. तिघे मिळून सर्व शेतीची कामे करू लागली. मशागतीसाठी कष्ट घेऊ लागली. शेताची, पिकांची काळजी घेऊ लागली. पिकांच्या पाहणीनुसार त्याला खतपाणी देत असत. सावकाराचे कर्ज फिटेल, आईला बरं वाटेल, म्हणून केशव ही शेतीच्या कामात मन लावून सगळं काही करू लागला होता. कांद्याच्या पिकाने जोम धरला होता. तसं आता हायसे वाटू लागलं होतं.

महावितरण कंपनीने ग्रामीण व शहरी भागामध्ये विजेचे वेळापत्रक बदलले, तेव्हा, तीन दिवस रात्रीची तर तीन दिवस, दिवसाची वीज मिळत होती. रात्र पहाट करून पिकाला पाणी देणे, जरा जिकिरीचं होतं! त्याच्यात जानेवारी महिना आल्यामुळे विहिरीनेही तळ गाठला होता. **(क्रमशः)**

## महत्त्वाचे

### सोनांबेच्या माजी सरपंचावर बलात्काराचा गुन्हा दाखल

**सिन्नर :** तालुक्यातील सोनांबे येथील माजी सरपंचावर २४ वर्षीय महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिस सूत्रांनी दिलेली माहिती अशी की, सोनांबे येथील जनार्दन लक्ष्मण पवार व पीडित महिला एकाच गावातील रहिवासी असून, शुक्रवारी (दि.१) सकाळी १०.१५ वाजेच्या सुमारास पीडित महिला घरात एकटी असताना जनार्दन पवार हा पाठीमागील दरवाजातून पीडितेच्या घरात घुसला व पीडितेस, तू मला फार आवडते, माझ्याशी संबंध ठेव असे म्हणाला. पीडितेने त्यास नकार दिला असता, पवार याने पीडित महिलेला धक्का देऊन भिंतीवर पाडून उजव्या डोळ्यास दुखापत करून बळजबरीने बलात्कार केला व याची वाच्यता केल्यास तुझ्या नवऱ्याला तो दिसेल तेथे मारून टाकील, असा दम देत पाठीमागील दरवाजातून निघून गेला. पीडित महिलेने सिन्नर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी जनार्दन लक्ष्मण पवार याच्याविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल केला असून, याप्रकरणी अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शिरसाठ करीत आहेत.

### नारायण देव बाबा मंडळाकडून निषेध

**सिन्नर :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम बार्शियन खोरे येथे पर्यटनासाठी आलेल्या निष्पाप निरापराध, निशस्त्र हिंदू पर्यटकांवर मंगळवारी (दि.२२) झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा शिवसेना प्रणीत सिद्ध नारायण देव बाबा मित्रमंडळाच्या वतीने येथील बारागावपिंप्री रस्त्यावर निषेध करण्यात आला. पाक पुरस्कृत आतंकवादी संघटना टीआरएफने पहलगाम बार्शियन खोरे येथे पर्यटनासाठी आलेल्या हिंदू पर्यटकांना त्यांचे नाव व धर्म विचारत त्यांच्यावर जो भ्याड हल्ला व अंदाधुंद गोळीबार केला. हा हल्ला मानवतेला काळिमा फासणारेच कृत्य आहे. त्याचा जाहीर निषेध करण्यासाठी व या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झालेल्या हिंदू पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शिवसेना तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर गाडे, पिराजी पवार यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला. यावेळी लक्की तुपे, सचिन बारे, प्रवीण गडाख, शंकर पवार, नितीन कराळे, विकास गायकवाड, बाळू आहिरे, आकाश आहिरे, विकी वरंदळ, नीलेश लोणारे, अनिकेत खिची, शरद चव्हाणके, अमोल खिची, वणेश सोनवणे, अनिल म्हस्के, विकी आहिरे, हरिभाऊ लोंढे, सार्थक पवार, रूपेश देवरे, सुनील शिंदे, शांताराम कुऱ्हाडे, सार्थक गायकवाड, धनंजय सोनवणे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### ठाणगाव विद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा

**ठाणगाव :** तालुक्यातील ठाणगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या पुंजाजी रामजी भोर विद्यालय व डॉ. अण्णासाहेब शिंदे कनिष्ठ महाविद्यालयात ६६ वा महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक के. एल. तळपाडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमात व्यासपीठावर स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य नामदेव शिंदे, डी. एम. आव्हाड, अरुण केदार, ज्ञानेश्वर शिरसाठ, उपसरपंच विलास मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यालयातील इयत्ता ५ वी ते ९ वी व ११ वीमधून प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थिनी तेजस्विनी सचिन ठुबे व आराध्या सागर भोर या विद्यार्थिनींच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शिष्यवृत्ती पात्र इ. ५ वी व इ.८ वीच्या विद्यार्थ्यांसह विभागप्रमुख व विषय शिक्षक यांचाही सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन एस. बी. ठुबे यांनी केले. तर आभार पर्यवेक्षक बी. एस. भांगरे यांनी मानले.



### 'सीटू'तर्फे कामगार दिन साजरा

**सिन्नर :** येथील हुतात्मा स्मारकात सीटूच्या वतीने जागतिक कामगार दिन व मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शहीद झालेल्या योद्ध्यांना आदरांजली वाहण्यात आली, तसेच पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध करून, हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना आदरांजली अर्पण करण्यात आली. हरिभाऊ तांबे, संतोष कुलकर्णी, महामित्र दत्ता वायचळे, वृक्षमित्र वाघ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी गल्वी इंजिनिअरिंग, अव्हेलॉन कॉस्मेटिक, रिंग प्लस ॲक्वा, बेलोटा, सिप्रा इंजिनिअरिंग, श्री सूर्या कोटिंग, हिंदुस्थान युनी लिव्हर, फूड्स ॲड इन्स, मार्को केबल, आरडी इंजिनिअरिंग, एफडी सी व नगरपालिका साफसफाई कामगार यांच्यासह अनेक कंपन्यांतील कामगार प्रतिनिधी उपस्थित होते.



### एस.जी. प्राथमिकमध्ये विद्यार्थ्यांना गुणपत्रकासोबत रोपांची भेट

**सिन्नर :** येथील एस. जी. पब्लिक स्कूलच्या प्राथमिक विभागात महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांचे वार्षिक प्रगतीप्रत्रक वाटप करण्यात आले. गुणपत्रकासोबतच शनया स्वाती राजेश गडाख हिच्या ९ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून पालक व विद्यार्थ्यांना देशी प्रजातीचे एक रोप भेट म्हणून देण्यात आले. यावेळी व्यासपिठावर संस्थेचे सेक्रेटरी राजेश सूर्यभान गडाख, ज्येष्ठ संचालक ताराचंद खिवंसरा, सुनीतानानी गडाख, स्वातीताई राजेश गडाख, सूर्यांश राजेश गडाख, मुख्याध्यापक उदय कुदळे, व्यवस्थापक सोमनाथ थेटे आदी मान्यवर उपस्थित होते. वाढते तापमान व उष्णता बघून भविष्यातील धोका आपण समजून घ्यायला हवा. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. माझे वडील स्व. नानासाहेब गडाख हे देखील पर्यावरणावर प्रचंड प्रेम करायचे. एस. जी. पब्लिक स्कूलमध्ये सुमारे ३५०-४०० झाडे त्यांनी स्वतः लावलेली व जतन केलेली आहे. आज माझी मुलगी शनाया हिच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मी आज शाळेतील प्रत्येक पालकांना एक झाड भेट म्हणून दिले आहे. विद्यार्थी व पालक यांना दिलेले वृक्षाचे संगोपन करावे, असे आवाहन राजेश गडाख यांनी केले. सोबतच झाडाचे जतन केल्यास वर्षाच्या शेवटी विद्यार्थ्यांना त्याचे गुण द्यावेत, अशी सूचना त्यांनी केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# 'वैतरणा'तून मुंबईला जाणारे पाणी रोखण्याचा प्रयत्न

## एल्गार कष्टकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांचे आंदोलन

**इगतपुरी : प्रतिनिधी**

इगतपुरी - त्र्यंबकेश्वर तालुक्यातील जलजीवन योजनेची कामे फक्त ठेकेदार आणि अधिकारी यांच्या आर्थिक फायद्यासाठीच आहे का? असा सवाल उपस्थित करून १ मे महाराष्ट्र दिनी वैतरणा धरणातून मुंबईला जाणारे पाणी रोखणार, असा इशारा एल्गार कष्टकरी संघटनेचे अध्यक्ष भगवान मधे यांनी दिला होता.

एल्गार कष्टकरी संघटनेने १ मे रोजी आंदोलन करत पाणी रोखले. वैतरणा धरणावर एल्गार कष्टकरी संघटनेने जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या योजनेची चौकशी करण्यासाठी व वाड्यापाड्यांवर टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, या मागणीसाठी आक्रमक होत आंदोलनात्मक पवित्रा घेत मुंबईला जाणारे पाणी रोखण्यासाठी आंदोलन करीत जोरदार घोषणाबाजी केली. वैतरणा धरणावर १ मे रोजी एक आक्रमक आणि थरारक आंदोलन



घडून आलं.

मुंबईला होणारा पाणीपुरवठा रोखण्यासाठी एल्गार कष्टकरी संघटनेचे पदाधिकारी आणि महिलांनी धरण परिसरात जोरदार आंदोलन छेडले. आंदोलनात महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असलेलं हे आंदोलन अचानक तीव्र झालं, जेव्हा संघटनेच्या महिला आणि कार्यकर्त्यांनी थेट वैतरणा धरणाच्या मुंबईकडे जाणाऱ्या कॅनॉलमध्ये उड्या मारल्या. हा धक्कादायक प्रकार घडताच प्रशासनालाही भान आलं आणि जलसंपदा विभाग व पाणीपुरवठा अधिकाऱ्यांनी तत्काळ कॅनॉलमधून मुंबईकडे जाणारा पाणीपुरवठा थांबवण्याचा निर्णय घेतला.

केंद्र सरकारकडून राबविण्यात येत असलेली एक चांगली योजना जलजीवन योजना सध्या राज्यात सर्वच ठिकाणी या योजनेतून कामे सुरू आहेत. मात्र, ती कामे कासव गतीने सुरू आहेत. जी कामे शासन निर्णयानुसार ग्रामीण भागातील सर्व कुटुंबाला सन-२०२४ पर्यंत 'हर घर नल से जल'प्रमाणे पाणीपुरवठा करण्यात येईल असे अपेक्षित होते. नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, नाशिक, पेठ, सुरगाणा व इतर तालुक्यांतील अनेक कामे अपूर्ण आहेत. अशा सर्व कामाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, या मागणीसाठी एल्गार संघटनेने हंडा मोर्चा काढला होता, मात्र दिलेले आश्वासन पाळले नाही म्हणून १ मे रोजी वैतरणा धरणातून मुंबईला जाणारे पाणी बंद करून आंदोलन करण्यात आले, अशी माहिती यावेळी एल्गार संघटनेचे अध्यक्ष भगवान मधे यांनी दिली.

या आंदोलनात संतू ठोंबरे, तानाजी कुंदे, वसंत इरते, सुरेखा मधे, मंगल खडके, मथुरा भगत, मीना लोणे, काळू निरगुडे, तुषार देहाडे, समाधान सदगीर, ढवळू गोहिरे, राजेंद्र आव्हाटे, संदीप झुगरे, गणेश गोहिरे, संतू पादिर, हनुमंत सराई, कविता पुंजारे, संजय पारधी, हनुमंत वारे, शिवाजी दोरे, रामदास सावंत, शांताराम बेंडकोळी, काळू बेंडकोळी, कृष्णा वारे, पदू गांगड, बाळू गांगड, मनोज दिवे, भीमाबाई बांगारे, धोंडाबाई लोते, पिंटू गांगड, नामदेव लचके, नामदेव पारधी आदी सहभागी झाले होते.



# येवला येथील प्रशासकीय संकुलात महाराष्ट्र दिन साजरा

## आ. पंकज भुजबळ यांच्या हस्ते ध्वजारोहण

**येवला : प्रतिनिधी**

येथील प्रशासकीय संकुलात महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिन विविध उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा आमदार पंकज भुजबळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानिमित्ताने प्रशासकीय संकुलात आ. पंकज भुजबळ, प्रांताधिकारी बाबासाहेब गाढवे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रांताधिकारी बाबासाहेब गाढवे, तहसीलदार आबा महाजन, नगरपालिकेचे मुख्याधिकारी तुषार आहेर, शहर पोलीस निरीक्षक धीरज महाजन, तालुका पोलीस निरीक्षक संदीप मंडलिक, नगरपालिकेचे मुख्याधिकारी तुषार आहेर, नायब तहसीलदार पंकज मगर, निरंजना पराते, पुरवठा निरीक्षक हावळे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राधाकिसन सोनवणे, माजी नगराध्यक्ष बंडू क्षीरसागर, माजी नगरसेवक दत्ता निकम, छाया क्षीरसागर, शिवसेना नेते किशोर सोनवणे, युवा नेते सचिन सोनवणे, मुस्ताक शेख आदींसह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, शहरातील हुतात्मा स्मारक येथेही महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने या मान्यवरांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

# ठाणगावला ३५ वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांची भरली शाळा

**ठाणगाव : वार्ताहर**

तालुक्यातील ठाणगाव येथील पुंजाजी रामजी भोर व अण्णासाहेब शिंदे कनिष्ठ महाविद्यालयात सन १९९० मधील दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात झाला.

विद्यालयाचे मुख्याध्यापक काशीनाथ तळपाडे अध्यक्षस्थानी होते. ३५ वर्षांपूर्वीचे असलेले शिक्षक एस. यू. भुरट, सुरेश मुळे, मुरलीधर घमे, एस. डब्ल्यू. सोनवणे, एन. व्ही. जाधव, आर. डी. भोसले आदी शिक्षक उपस्थित होते. तब्बल ३५ वर्षांनंतर जुने बाल सवंगडी एकत्र आल्याने प्रत्येकाच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य होते. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी भोर विद्यालयाबाबत ऋण व्यक्त केले.

यावेळी या बॅचने ५३ हजारांचे साउंड सिस्टिम शाळेला भेट दिली. भोर विद्यालयाचे आमच्यावर मोठे ऋण आहे. या ऋणातून उतराई होण्यासाठी स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना शाळेच्या विविध कार्यक्रमांसाठी ही सिस्टिम उपयोगी येईल, असे माजी विद्यार्थी शांताराम भालेराव, दिलीप काकड व नामदेव शिंदे, विजय बोराडे यांनी सांगितले. विद्यालय शिक्षणाचे मंदिर आहे. या मंदिराचा कळस बांधण्यासाठी आपल्या विद्यालयाला जास्तीत जास्त मदत करावी, असे आवाहन मुख्याध्यापक तळपाडे यांनी केले. यावेळी सर्व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. बाळासाहेब आव्हाड यांनी सूत्रसंचालन व प्रास्ताविक केले. आभार सचिन ठुबे यांनी मानले. कार्यक्रमास ४० ते ४५ माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राजेंद्र उघडे, वाळीबा गुंड, दीपक पानसरे, भास्कर काळे, अशोक मंडोळे, मीरा जाधव, सुमन शिंदे, तारा शिंदे, इंदिरा शिंदे, भाऊसाहेब शिंदे, दीपक शिरसाट, भगवान वाघ, मुरलीधर गुंड आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# सिन्नर वकील संघावर विकास पॅनलचे वर्चस्व

## विकासला ७ तर ॲड. पगार यांच्या 'परिर्वतन'ला ३ जागा

**सिन्नर : प्रतिनिधी**

सिन्नर वकील संघाच्या निवडणुकीत विद्यमान अध्यक्ष ॲड. जयसिंह सांगळे यांच्या नेतृत्वाखाली विकास पॅनलने वर्चस्व राखत अध्यक्षपदासह ७ जागांवर विजय मिळवला तर ॲड. विलास पगार यांच्या नेतृत्वाखालील परिवर्तन पॅनलला उपाध्यक्षपदासह सदस्यपदाच्या तीन जागांवर समाधान मानावे लागले.



सिन्नर वकील संघाच्या निवडणुकीत विद्यमान अध्यक्ष ॲड. जयसिंग सांगळे यांच्या नेतृत्वाखालील विकास पॅनल व ॲड. विलास पगार यांच्या नेतृत्वाखालील परिवर्तन पॅनलमध्ये चुरशीची लढत झाली. १३४ वकील सभासदांपैकी १३३ मतदारांनी आपला हक्क बजावला.

अध्यक्षपदी ॲड. जयसिंह सांगळे यांनी ७४ मते मिळवून विजय संपादन केला. परिवर्तन पॅनलचे नेते ॲड. विलास पगार यांना ५७ मते मिळाली. उपाध्यक्षपदी परिवर्तन पॅनलचे अनिल पालवे (५६) यांनी विकास पॅनलचे ॲड. धीरज रहाटळ यांचा (५५) अवघ्या एका मताने पराभव केला. अपक्ष ॲड. संदीप शेळके यांना २० मते मिळाली. सचिवपदावर विकास पॅनलचे रमेश काळे (६३) विजयी झाले. परिवर्तन पॅनलचे सचिन घोरपडे यांना ५९ मते मिळाली. सहसचिवपदी विकास पॅनलचे प्रवीण गायकवाड (७३) विजयी झाले. परिवर्तनचे ॲड. संकेत भालेराव (५९) पराभूत झाले. खजिनदारपदी विकास पॅनलचे ॲड. अनिल उगले (७३) यांनी परिवर्तन पॅनलचे ॲड. शंकर शिंदे (५६) यांचा पराभव केला. महिला राखीव सदस्यपदी परिवर्तन पॅनलच्या ॲड. शिवानी जेऊघाले (बोऱ्हाडे) ७४ मते मिळवून विजयी झाल्या. विकास पॅनलच्या ॲड. प्रियंका शिरसाठ यांना ५७ मते मिळाली.

सदस्यपदावर विकास पॅनलचे ॲड. गणेश लहामगे सर्वाधिक ९१ मते मिळवून विजयी झाले. याशिवाय, सदस्यपदी ॲड. महेंद्र गायकवाड, ॲड. संदेश देशमुख, ॲड. संतोष पवार व परिवर्तन पॅनलचे ॲड. अनिरुद्ध हिरे, ॲड. कुणाल सोनवणे विजयी झाले. विकास पॅनलचे ॲड. भगवान जाधव, परिवर्तन पॅनलचे ॲड. पंकज नागरे, ॲड. अनिकेत पाचपाटील यांना पराभवाचे धनी व्हावे लागले.

दरम्यान, दोन्ही पॅनलमध्ये चुरशीचा सामना रंगल्याने मतमोजणीवेळी उपाध्यक्ष, सचिव व सहसचिवपदासाठी फेरमतमोजणी करण्यात आली. निकाल जाहीर झाल्यानंतर विजयी उमेदवारांनी समर्थकांसह विजयोत्सव साजरा केला.

# समृद्धी महामार्गावर कारची ट्रकला धडक

## एक ठार, तीन जखमी

**सिन्नर : प्रतिनिधी**

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर वावी शिवारात कारवरील चालकाचे नियंत्रण सुटून पुढे जाणाऱ्या ट्रकला धडक दिल्याने एक जण ठार तर तिघे जखमी झाल्याची घटना काल (दि.३) दुपारी ४.२५ वाजेच्या सुमारास घडली. वैभव गाडेकर असे मृताचे नाव असून, जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे समजते.

समृद्धी महामार्गावर वैजापूरकडून सिन्नरच्या दिशेने टाटा ट्रक (क्र. एमएच- १६ बीए-५१३३) येत असताना वावी शिवारात चॅनल नंबर ५३६.७ मुंबई कॉरिडॉर परिसरात पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या स्विफ्ट डिझायर कारवरील (क्र. एमएच-०६, बीई-१८८३) चालकाचे नियंत्रण सुटल्याने पुढे



जाणाऱ्या ट्रकला धडक दिली.

या अपघातात कारमधील वैभव गाडेकर गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाला तर कारचालक सावन चव्हाण व सिंधू गाडेकर गंभीर जखमी झाले तर खुशी ऐकडे किरकोळ जखमी झाली. अपघाताची माहिती समृद्धी कंट्रोलला मिळाल्यानंतर एसएसपी-पीएसआय उगले, एमएसएफ - आकाश सानप, मनोज कोटकर, डीबीएल टीम गोंदे फाटा, ॲम्ब्युलन्स, क्यूआरव्ही शिर्डी टीम यांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना उपचारार्थ रुग्णालयात हलविले तर मृत वैभव गाडेकरचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. अपघाताची माहिती वावी पोलीस ठाण्यात देण्यात आली असून, वावी पोलिसांनी अपघाताची नोंद केली आहे.

# सिन्नरला आर्ट ऑफ लिव्हिंगतर्फे ७ मेपासून ६ दिवस 'हॅपिनेस प्रोग्राम'

**सिन्नर : प्रतिनिधी**

व्ही. राजे ग्रुप सिन्नर व दी आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार सिन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील सिन्नर सार्वजनिक वाचनालयात दि. ७ ते १२ मेदरम्यान योग व प्राणायाम शिबिर तथा 'हॅपिनेस प्रोग्राम'चे आयोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे १३ मे रोजी गुरुदेवांच्या जन्मोत्सवानिमित्त गुरुपूजन व सत्संग सोहळा होणार आहे.

या शिबिरात सलग सहा दिवस सकाळी ६ ते ९ या वेळेत एकाग्रता, पंचप्राण ज्ञानेंद्रिये पंचतत्त्व अष्टांग यम - नियम - आसन - प्राणायाम - प्रत्याहार - धारणा - ध्यान - समाधी ही अष्टांग योग तसेच पंचकोश याबाबतची महत्त्वाची माहिती प्रात्यक्षिकाद्वारे देण्यात येणार आहे. प्रत्येक दिवसाचा आनंद घेण्यासाठी प्रत्येकालाच शारीरिक आणि मानसिकरीत्या सक्षम असणे खूप गरजेचे असते. बदलत्या जीवनशैलीमुळे रोगांचा प्रादुर्भाव खूप वाढत असल्याचे दिसून येत आहे. यावर रामबाण उपाय म्हणजे योग व प्राणायाम नियमित करणे हाच आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आनंदी व समाधानी, निरोगी राहण्यासाठी योग, प्राणायाम शिबिराचे आयोजन केले असल्याचे आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार, सिन्नर यांच्या वतीने सांगण्यात आले आहे. श्री श्री रविशंकर गुरुदेव यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या हॅपिनेस प्रोग्राम अर्थात आनंद अनुभूती शिबिरात वरिष्ठ प्रशिक्षक सागर आहेर, विजय सातपुते व नंदकिशोर कुलकर्णी हे विश्वविख्यात सुदर्शन क्रिया, योग, प्राणायाम, ध्यान, अमूल्य ज्ञान शिकवणार आहेत. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी तणावमुक्त जीवन, आरोग्य सुधार, अधिक आनंद उत्साह, उत्कृष्ट कार्य क्षमता, निद्रानाश, चिंता भीतीपासून मुक्ती, विविध रोगांवर नियंत्रण, आत्मविश्वास वाढ, एकाग्रतेत वाढ अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहे. शहरातील पालकांनी व विद्यार्थ्यांनी या हॅपिनेस प्रोग्रॅम अर्थात आनंद अनुभूती शिबिरात सहभागी होण्यासाठी सर्जेराव उगले, विजय सातपुते, भाऊसाहेब उगले, संजय चांडोले, भैया गवळी, नंदकिशोर कुलकर्णी, प्रमोद ढमाले, आनंद गुंजाळ, संदीप गुजराती, सोनल लहामगे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# माळेगाव एमआयडीसीत लवकरच पाहणी दौरा

## सकारात्मक चर्चा : सिमा पदाधिकाऱ्यांनी घेतली प्रादेशिक अधिकाऱ्यांची भेट

**सिन्नर : प्रतिनिधी**

माळेगाव औद्योगिक वसाहतीतील रस्ते, ड्रेनेजसह अन्य सोयीसुविधांबाबतचा आढावा घेण्यासाठी लवकरच पाहणी दौरा केला जाईल, असे आश्वासन एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी दीपक पाटील यांनी सिमा पदाधिकाऱ्यांना दिले. यावेळी झालेल्या सकारात्मक चर्चेत उद्योजकांच्या प्रश्नांवर तत्काळ तोडगा काढण्याचे एमआयडीसीचे धोरण असून, त्यादृष्टीने कार्यपद्धती अवलंबविली जात असल्याचेही प्रादेशिक अधिकारी पाटील यांनी स्पष्ट केले.

सिमा पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी (दि.२) प्रादेशिक अधिकारी दीपक पाटील यांची भेट घेत, सिन्नर - माळेगाव औद्योगिक वसाहतीतील विविध प्रश्नांवर चर्चा केली. मागील



### उद्योजकांचे काम प्रलंबित राहणार नाही

उद्योजकांचे प्रश्न जलदगतीने मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी पहिल्या दिवसापासून फायलींचा निपटारा करण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. उद्योजक महत्त्वाचा घटक असून, त्याचे कोणतेही काम प्रलंबित राहाता कामा नये.

**–दीपक पाटील,** प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी

काही वर्षांपासून रस्ते आणि ड्रेनेजच्या समस्या आहेत. तसेच घंटागाडीची व्यवस्था नसल्याने कचरा संकलनाचा मोठा प्रश्न आहे. याशिवाय, ट्रक टर्मिनलचाही प्रश्न प्रलंबित असून, त्यावर तोडगा काढला जावा, अशी मागणी सिमा पदाधिकाऱ्यांनी केली. प्रादेशिक अधिकारी पाटील यांनी, 'उद्योजकांना सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यास आमचा प्राधान्यक्रम आहे. विशेषतः ग्रामीण भागातील उद्योजकांचे प्रश्न तत्काळ निकाली कसे लावता येतील, यादृष्टीने प्रयत्न केले जाणार आहेत.

सिन्नर-माळेगाव औद्योगिक वसाहतीत मागील काही वर्षांपासून प्रलंबित प्रश्नांवर नक्कीच तोडगा काढला जाईल. त्यासाठी लवकरच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी दौरा केला जाणार असल्याचे सांगितले. दरम्यान, फायलींचा निपटारा केला जात नसल्याची सिमा पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केलेली खंत विनासंवादात व्यक्त केल्याचे यावेळी झालेल्या चर्चेअंती स्पष्ट केले गेले. याप्रसंगी सिमाचे सचिव बबन वाजे, विश्वस्त रतन पडवळ, संचालक मुकेश देशमुख, शरद टर्ले आदी उपस्थित होते.

# कारची काच फोडून ७४ हजार रुपयांचा ऐवज लांबविला

**सिन्नर : प्रतिनिधी**

ह्युंदाई कंपनीच्या क्रेटा कारची पाठीमागील काच फोडून डिकीत ठेवलेली ४२ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम, ३० हजार रुपयांचा टॅब्लेट पीसी आणि इतर कपड्यांच्या बॅगा मिळून ७४,५०० रुपयांच्या ऐवजावर अज्ञात चोरट्याने डल्ला मारल्याची घटना तालुक्यातील नांदूरशिंगोटे येथे घडली. या संदर्भात कारमालक अमेय मोहन हरडे (३१, रा. गोविंदनगर, मुंबई) यांनी वावी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमेय हरडे हे आपल्या मालकीची ह्युंदाई क्रेटा कार (एमएच -४७, एबी -५४२६) घेऊन कामानिमित्त नांदूरशिंगोटे येथे आले होते. १ मे महाराष्ट्र दिनी त्यांनी आपली कार नांदूरशिंगोटे येथील इंद्रायणी लॉन्सच्या पार्किंगमध्ये उभी केली होती. कार उभी करून ते लॉन्समध्ये गेले. त्यानंतर तासाभराने ते परत पुन्हा गाडीजवळ आले. त्यावेळी त्यांच्या कारची पाठीमागील काच फुटलेली असल्याचे निदर्शनास आले. कारच्या डिकीत ४२,५०० रुपयांची रोकड त्यांनी ठेवली होती. याशिवाय, ३० हजार रुपयांचा टॅब्लेट पीसीही होता. शिवाय, चार वेगवेगळ्या बॅगांमध्ये त्यांनी आपले किमती गणवेशही ठेवले होते. एका बॅगेमध्ये एटीएम कार्ड, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड असे दस्तही होते. अज्ञात चोरट्याने या सर्व बॅगा काच फोडून लंपास केल्याने हरडे यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# नांदगाव तालुक्यात पाणीटंचाईचे चटके

## १४ गावे, ५३ वाड्या-वस्त्यांना १५ टँकरद्वारे पुरवठा

**नांदगाव : महेंद्र पगार**



नांदगाव तालुक्याला दुष्काळाच्या झळा जाणवण्यास सुरुवात झाली आहे. पाणीटंचाईचे चटके बसू लागले आहेत. तालुक्यातील १४ गावे, ५३ वाड्या-वस्त्यांना १५ टँकरने ३१ फेऱ्यांच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात आहे. आठ गावांतील एकूण खाजगी मालकीच्या असलेल्या १३ विहिरी अधिग्रहीत केल्या आहेत. अन्य गावांना नाग्या-साक्या धरणातून पाणीपुरवठा केला जात आहे.

तालुक्यातील बाणगाव बुद्रुक, गोंडेगाव, जवळकी, खिर्डी, बोलठाण, मल्हारवाडी, मोरझर, वडाळी बुद्रुक, करी, अनकवाडे, धोटाणे खुर्द, बेजगाव, टाकळी खुर्द, बाणगाव खुर्द, अशा १४ गावांना, तसेच सुमारे ५३ वाड्या-वस्त्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पंधरा गावांत पाण्याचे टँकर सुरू करून पाणीपुरवठा करावा, यासाठी नवीन प्रस्ताव पंचायत समितीकडे प्राप्त झाले आहेत, अशी माहिती पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी संदीप दळवी यांनी दिली.

सटाणे, माळेगाव (क), पानेवाडी, नवसारी, क्रांतीनगर, जळगाव बुद्रुक, सोयगाव, हिरेनगर, भवरी, बोयेगाव, धनेर, दहेगाव, लक्ष्मीनगर, टाकळी बुद्रुक या गावांनाही टंचाई जाणवू लागली आहे. पंचायत समिती कार्यालयाकडे आणखी १५ प्रस्ताव मिळाले आहेत. संबंधित प्रस्ताव वरिष्ठ स्तरावर मंजुरीसाठी पाठविले आहेत.

टँकर मंजुरीसाठी गावांचे प्रस्ताव : सटाणे, माळेगाव (क), पानेवाडी, नवसारी, क्रांतीनगर, जळगाव बुद्रुक, सोयगाव, हिरेनगर, भवरी, बोयेगाव, धनेर, दहेगाव, लक्ष्मीनगर, टाकळी बुद्रुक.

विहीर अधिग्रहीत केलेली गावे व कंसात विहिरींची संख्या : क्रांतीनगर (१), फुलेनगर (१), बोलठाण (३), चिंचविहीर (२), पळाशी (१), जातेगाव (२), लोढरे (२), एकवही (१).

- टँकर सुरू असलेल्या गावांची संख्या : १४
- वाड्या-वस्त्यांची संख्या : ५३
- लोकसंख्या : २५,८६०
- टँकरची संख्या : १५
- एकूण दिवसभरातील टँकर फेऱ्यांची संख्या : ३१

तालुक्यातील ज्या गावांत पाणीटंचाई निर्माण झाली आहे, त्या गावांचे प्रस्ताव पंचायत समितीला मिळाले. ते वरिष्ठस्तरावर मंजुरीसाठी पाठविण्यात आले होते. ते मंजूर झाले आहेत. १४ गावे व ५३ वाड्या-वस्त्यांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. १५ गावांचे टँकर मागणीचे प्रस्ताव नुकतेच प्राप्त झाले. तेही वरिष्ठस्तरावर मंजुरीसाठी पाठविले आहेत. ते मंजूर झाल्यावर त्या ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा केला जाईल. त्यासाठी अजून काही खाजगी विहिरी अधिग्रहीत करण्याची वेळ आली, तर तेही करण्यात येईल.

**- संदीप दळवी,** प्रभारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगाव


## महत्त्वाचे



### वाढत्या तापमानामुळे शीतपेयांना पसंती

**लासलगाव : वार्ताहर** गेल्या काही दिवसांपासून शहरात तापमानाचा पारा कमालीचा वाढल्याने लासलगावकर हैराण झाले आहेत. वाढलेल्या तापमानापासून बचावासाठी व घशाला थंडावा मिळण्यासाठी विविध प्रकारच्या शीतपेयांना पसंती दिली जात आहे. त्यामुळे त्यांना मागणी वाढली आहे. येथील मेन रोडसह शहरातील विविध भागांत रसवंतिगृह, ज्यूस बार, लिंबू सरबत, लस्सी, मठ्ठा, सोडा, आइस्क्रीम पार्लर आदी शीतपेयांच्या दुकानांत गर्दी दिसते. उसाचा रस व लिंबू सरबत शरीराला पोषक असल्याने नागरिक त्यास अधिक पसंती देत आहेत. उसाच्या रसाच्या तुलनेत गल्लीबोळातील बच्चेकंपनी बर्फाच्या गोळ्याला, तर महाविद्यालयीन तरुण लेमन सोडा, जिरा सोडा, स्प्रिंग पेय आदींना अधिक पसंती देत आहेत. दरम्यान, उन्हाचा कडाका वाढल्याने उष्माघातासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात, हे लक्षात घेऊन नागरिकांनी आरोग्याची काळजी घेताना सैल, हलके, सुती कपडे परिधान करावेत. हलका आहार घ्यावा. फळे खावीत. पुरेसे पाणी प्यावे. उन्हापासून बचाव करण्यासाठी गॉगल, छत्री, टोपी घालूनच घराबाहेर पडावे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

### हज यात्रेनिमित्त अनिस तांबोळींचा सत्कार



**लासलगाव : वार्ताहर** येथील भूमिपुत्र अनिस हाजी रमजू तांबोळी रविवारी (ता. ४) मुस्लिम धर्मीयांच्या पवित्र अशा हज यात्रेला मक्का व मदिना येथे विमानाने रवाना होणार आहेत. त्यानिमित्त त्यांचा येथे मुस्लिम समाजातर्फे सत्कार करण्यात आला. त्यांना हज यात्रेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. अनिस तांबोळी यांचे वडील मरहुम हाजी रमजू बाबा तांबोळी यांनी १९८५ मध्ये हज यात्रा केली होती. यावर्षी त्यांचे पुत्र अनिस तांबोळी हज यात्रेला जाणार आहेत. प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे संघटक सचिव युनूस तांबोळी यांचे अनिस तांबोळी धाकटे बंधू आहेत. यंदा भारतातून एक लाख ७५ हजार मुस्लिमबांधव हज यात्रेसाठी जाणार आहेत. हज यात्रा ४ ते ९ जूनदरम्यान होण्याची शक्यता आहे.



### क. का. वाघ महाविद्यालयात ध्वजारोहण

**पिंपळगाव बसवंत :** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या पिंपळगाव बसवंत येथील कर्मवीर काकासाहेब वाघ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात महाराष्ट्र दिन उत्साहात झाला. प्रा. (डॉ.) सुरेश जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी स्थानिक व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रा. रवींद्र मोरे, पुंडलिक निरगुडे, भीमराव मोरे, जयवंत निरगुडे, उपप्राचार्य प्रा. दिलीप माळोदे, प्रा. हेमंत पाटील, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित होते. प्रा. रवींद्र मोरे यांनी महाराष्ट्र व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



### एचएएल हायस्कूलमध्ये देशभक्तिपर गीते

**ओझर :** येथील एचएएल हायस्कूल(मराठी माध्यम)मध्ये महाराष्ट्र व कामगार दिन उत्साहात झाला. मुख्याध्यापक एस. पी. मैन व कनिष्ठ लिपिक पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व राज्यगीत म्हटले. नीलम मोंढे यांनी देशभक्तिपर गीत सादर केले. मानसी पवारने मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापक मैन यांनी महाराष्ट्र दिनाविषयी माहिती दिली. मोंढे यांनी सूत्रसंचालन केले. एस. एन. कर्पे यांनी आभार मानले. याप्रसंगी शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# शेतकरी हिताचे निर्णय अन् व्यापक कामगिरी

## मुख्यमंत्र्यांच्या शंभर दिवसांच्या चाचणीत कृषी विभाग तिसरा

**सिन्नर : प्रतिनिधी**



महायुतीचे सरकार पुन्हा एकदा सत्तेत आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासनाच्या सर्व विभागांसाठी १०० दिवसांचा धोरणात्मक कार्यक्रम हाती घेतला होता. मुख्यमंत्र्यांच्या या चाचणीत कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्या कृषी विभागाने सर्वोत्तम कामगिरी करत तिसरा क्रमांक पटकावला.

या शंभर दिवसांच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून अनेक योजना, विकासाची कामे, अनेक प्रकल्प मार्गी लावण्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने शंभर दिवसांच्या कृती आराखड्याची संकल्पना मांडली होती. आता या १०० दिवसांच्या कामांचा अहवाल राज्य सरकारने सादर केला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी एक्सवर (ट्विटर) यासंदर्भातील माहिती दिली आहे. यात कोणत्या विभागाला १०० पैकी किती गुण मिळाले, याचीही माहिती दिली आहे. यात प्रथम क्रमांक महिला व बालविकास विभाग (८० टक्के), द्वितीय- सार्वजनिक बांधकाम विभाग(७७.९५ टक्के), तर कृषी विभागाने (६६.१५ टक्के) गुण मिळवत तिसरा क्रमांक पटकावला.

मंत्री कोकाटे यांनी कृषी खात्याचा पदभार स्वीकारल्यानंतरच्या या शंभर दिवसांच्या कालावधीत, शेतकरीहित आणि महाराष्ट्राचे समृद्ध भविष्य केंद्रस्थानी ठेवून प्रत्येक निर्णय, पाऊल हे बळीराजाच्या भल्यासाठी आणि शाश्वत शेतीच्या वाटचालीसाठी टाकले आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना, नव्या योजनांची अंमलबजावणी, पारदर्शकता, नवकल्पना, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर या बाबींवर त्यांनी विशेष भर दिला.

स्वसंकल्पनेतून विभागीय परिसंवाद दौरा करत पहिल्यांदाच शेतकऱ्यांना थेट कृषिमंत्री, कृषी सचिव व इतर अधिकाऱ्यांशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून दिली. महाराष्ट्रातील पहिली कृषी अधिकारी व कर्मचारी कार्यशाळा यशस्वीरीत्या आयोजित केली. मंत्री कोकाटे लसूण संशोधन केंद्रास भेट देणारे राज्यातील दुसरे कृषिमंत्री ठरले. देवळा तालुक्यात चुकीच्या तणनाशकामुळे शेतीचे नुकसान झालेल्या ८४ शेतकऱ्यांना ६२ लाखांची नुकसानभरपाई मिळवून दिली. विशेष म्हणजे, पहिल्यांदाच एवढ्या जलदगतीने शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळाली.

बियाणे, खते, कीटकनाशके उत्पादक कंपन्या आणि विक्रेते संघटनांसोबत गुणवत्तेची खात्री, बाजारातील उपलब्धता आणि संभाव्य समस्या यावर सविस्तर चर्चा घडवून आणली. शेतकरी आयडी उपक्रम राबवत त्याद्वारे सर्व योजनांचा लाभ एकाच ओळखीद्वारे मिळणार आहे. शेतकऱ्यांची खरी संख्या व माहिती अचूकपणे उपलब्ध होईल. राज्यात ९२ लाख शेतकरी ओळखपत्र तयार झाले असून, शेतकरी डेटाचा मजबूत आधार तयार झाला आहे.

शेतकरी विमा योजनेतील पारदर्शकता साधारण चार लाख बोगस विमा बाद केला. विमा दावे प्रक्रियेत अधिक स्पष्टता आणणे, शेतकऱ्यांना दाव्याची स्थिती ऑनलाइन पाहता येणे, विमा कंपन्यांची जबाबदारी निश्चित करणे, एक खिडकी सेवा उपक्रमांतर्गत सर्व कृषी योजना, सेवा आणि माहिती एका प्लॅटफॉर्मवर, शेतकऱ्यांसाठी अर्ज, ट्रॅकिंग आणि तक्रार निवारण एकाच ठिकाणी ॲप व वेबपोर्टलच्या माध्यमातून सेवा प्रदान होण्यासाठी प्रयत्न सुरू केले.



# न्या. रानडे बहुआयामी व्यक्तिमत्त्व

## डॉ. शास्त्री : ज्येष्ठ नागरिक संघातर्फे अक्षय व्याख्यानमाला

**मालेगाव :**

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे उदारमतवादी, समाजसुधारक, धर्मसुधारक, राजनीतीज्ञ, अर्थशास्त्रज्ञ आणि द्रष्टे पुरुष होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. ते भारतातील मुंबई विद्यापीठाचे पहिले पदवीधर होते. न्यायमूर्ती रानडे मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होते. त्यांनी अनेक संस्था स्थापन केल्या व त्यांचे संवर्धन केले. न्या. रानडे सर्वज्ञ होते, असे प्रतिपादन डॉ. योगेश शास्त्री यांनी केले.

येथील कॅम्प भागातील ज्येष्ठ नागरिक संघातर्फे आयोजित पुरुषोत्तम फुलाजी ठाकूर गुरुजी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अक्षय व्याख्यानमालेत दुसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते. व्यासपीठावर संस्थेचे खजिनदार शिवराम मोरे, सल्लागार निंबाजी सूर्यवंशी, अध्यक्ष डी. आर. हिरे, सचिव देवीदास वाल्हे उपस्थित होते. गोपीनाथ सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक केले. निंबाजी सूर्यवंशी यांनी मान्यवरांचा सत्कार केला.

डॉ. शास्त्री यांनी न्या. रानडे यांचे विविध क्षेत्रांतील योगदान विशद केले. जगदीश निकम यांनी आभार मानले. या कार्यक्रमास ॲड. एल. के. निकम, वसंतराव भुसे, डॉ. सुरेश शास्त्री, डॉ. सयाजी पगार, सुरेंद्र टिपरे, शिवाजी पवार, रमेश भावसार, के. आर. देवरे, पोपट कोठावदे, संजय पाठक, संजय पाटील, संजय पांडे, राजेंद्र पवार, सुपडू वाघ, उत्तम गांगुर्डे, रामभाऊ मोरे, शकुंतला गवांदे, सिंधू सोनवणे, नलिनी पाटील आदी उपस्थित होते.

# परसुल-बोपाणे शिवारात बिबट्याचा धुमाकूळ, चार बकऱ्या फस्त!

**चांदवड : वार्ताहर**

चांदवड तालुक्यातील परसुल शिवारातील अर्जुन सोनवणे यांच्या शेत गट नंबर ४६१ मध्ये शुक्रवारी (दि. २ मे २०२५) दुपारी साडेअकरा ते बाराच्या सुमारास एका बिबट्याने धुमाकूळ घातला. शेतात बांधलेल्या त्यांच्या मालकीच्या चार बकऱ्यांवर हल्ला करून बिबट्याने त्यांना ठार मारले आणि घटनास्थळावरून फरार झाला.

या घटनेची माहिती तात्काळ शेतकरी अर्जुन विष्णू सोनवणे यांनी वन विभागाला दिली. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे पी. पी. सोमवंशी, चालक अशोक शिंदे व वन कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि पाहणी केली.

अर्जुन सोनवणे यांनी मृत बकऱ्यांचे पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून शवविच्छेदन करून त्यांची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावली. या नुकसानीसाठी शासनाकडून योग्य मदत मिळावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, चांदवड परिसरात बिबट्यांची वाढती दहशत दिसून येत आहे. अनेक ठिकाणी बिबट्यांचा वावर नागरिकांना जाणवत असून, पाळीव प्राणी आणि बकऱ्यांवर हल्ले करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वन विभागाने या बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# कारसूळला विकासकामांचे भूमिपूजन, लोकार्पण

## सामाजिक, शैक्षणिक, सार्वजनिक जीवनमान उंचावण्यास मदत

**पिंपळगाव बसवंत : वार्ताहर**



कारसूळ ग्रामपंचायतीतर्फे सामाजिक, शैक्षणिक व सार्वजनिक जीवनमान उंचावणाऱ्या विविध विकासकामांचे भूमिपूजन, तसेच लोकार्पण उत्साहात झाले. सुमारे ६५ लाखांच्या कामांना सुरुवात करून ग्रामविकासाच्या दिशेने पाऊल उचलण्यात आले.

या कार्यक्रमात दशक्रिया विधीस्थळी सभामंडप व स्वतंत्र बैठकव्यवस्था, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रवेशद्वारावर आकर्षक कमान, डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर येथे रस्त्याचे काँक्रिटीकरण व सभामंडप, वाल्मीकीनगर व इंदिरानगर येथे सौर ऊर्जेवर चालणारे पथदिवे, तसेच गावातील तरुण पिढीसाठी अत्यावश्यक व्यायामशाळा आदींचा प्रारंभ झाला. यामुळे गावाच्या सर्वांगीण प्रगतीला नवी चालना मिळेल.

यावेळी माजी सरपंच स्वाती काजळे, उपसरपंच शामराव शंकपाळ, सदस्य देवेंद्र काजळे, अमोल ताकाटे, मनीषा काजळे, उज्ज्वला गांगुर्डे, आशा ताकाटे, पूनम पगार, भाऊसाहेब कंक, शिपाई नंदू गांगुर्डे, कर्मचारी युवराज गांगुर्डे, रोजगार सेवक गोरख गुंबाडे व ग्रामस्थ भाऊसाहेब शंखपाळ, सीताराम जाधव, मधुकर ताकाटे, तुकाराम काजळे, चंद्रभान गाडे, खंडेराव काजळे, बाळासाहेब ताकाटे, काशीनाथ ताकाटे, धोंडिराम काजळे, विष्णुपंत उगले, दत्तात्रय काजळे, गोविंदराव जाधव, नंदकुमार बैरागी, बाळासाहेब मु. ताकाटे, दीपक कडपे, साहेबराव पगार, जयराम बस्ते, सचिन वाघचौरे, रमेश जाधव, काका जाधव, प्रभाकर वागळे, दिलीप कोपटे, सुरेश जाधव, मधुकर जाधव, सोमनाथ गांगुर्डे, संदीप काजळे, रामचंद्र पवार, ज्ञानेश्वर जाधव, सुनील शंखपाळ, शंकर काजळे, सुभाष ताकाटे, अर्जुन शंखपाळ, नामदेव पगार व ठेकेदार अजर शेख आदी उपस्थित होते.

# येवला येथील आत्मा मालिक गुरुकुलात महाराष्ट्र दिन



**येवला : प्रतिनिधी**

येथील विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट कोकमठाण संचालित आत्मा मालिक इंग्लिश मीडियम गुरुकुल येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी उपाध्यक्ष हेमंत शाह, प्राचार्य तुषार कापसे व संत चरणदास महाराज यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले आणि राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात आली. सूत्रसंचालन सोनाली घोडके यांनी केले. कामगार दिन व महाराष्ट्र दिन याविषयी मोनाली सोनवणे यांनी माहिती सांगितली. उपाध्यक्ष हेमंत शाह यांनी सर्वांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तुषार कापसे यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले. भाग्यश्री खानापुरे यांनी आभार मानले.

# जलपर्णी हटवताना तहसीलदार बालपणात हरवले

## चांदोरी परिसरात विठ्ठलवाडीतील चिंचेच्या झाडाखाली आठवणींची सावली

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

चांदोरी (ता. निफाड) येथील विठ्ठलवाडी परिसरात गोदावरी नदी जलपर्णीच्या अतिक्रमणामुळे संथ झाली आहे. परिणामी परिसरातील जलनिचरा व जैवविविधतेवर गंभीर परिणाम होत आहे. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने यंत्रसामग्रीच्या सहाय्याने जलपर्णी हटवण्याची मोहीम हाती घेतली. मात्र, या शासकीय मोहिमेदरम्यान अनपेक्षित भावनिक क्षण घडला. तहसीलदार विशाल नाईकवाडे विलायती चिंचेच्या झाडासमोर थांबले आणि आठवणींच्या सावलीत हरवून गेले.

### आठवणी अन् हरवलेलं बालपण

जलपर्णी हटविण्याच्या कार्यवाहीचा आढावा घेताना तहसीलदार नाईकवाडे यांच्या नजरेला जुनं, रेखीव पसरलेलं विलायती चिंचेचं झाड पडलं. काही क्षण ते तिथंच थबकले. 'विलायती चिंचा आहेत...' असे हळूच पुटपुटत ते त्या झाडाकडे एकटक पाहू लागले.

चेहऱ्यावर हसू उमटलं आणि डोळ्यांत आठवणींचं पाणी चमकलं. 'लहानपणी आम्ही मित्रांबरोबर आकडी घेऊन चिंचेच्या झाडावर दगड मारायचो. चिंचा पडल्या की वाटून खायचो. कुणी जास्त खाल्ल्या की भांडणं व्हायची... आणि काही मिनिटांतच पुन्हा सगळं विसरून हसत बसायचो. किती निरागस काळ होता तो!' नाईकवाडेंनी आठवणींत रंगून जात सांगितलं. त्यांच्याजवळ उभा असलेला एक सहकारी भावुक होत म्हणाला, ''सर, खरंच तिथूनच तर आमचं बालपण सुरू झालं होतं!'



विठ्ठलवाडीत जलपर्णी हटविण्याच्या मोहिमेदरम्यान विलायती चिंचेच्या झाडाखाली बालपणीच्या आठवणींत रमलेले तहसीलदार विशाल नाईकवाडे.

### नदी मोकळी अन् मनही हलकं

प्रशासनाच्या या उपक्रमामुळे गोदावरीचा प्रवाह पूर्ववत करण्यासाठी मदत होणार आहे. जलपर्णीमुक्त झालेली नदी म्हणजे परिसराच्या नवजीवनाची सुरुवात असेल. मात्र, या मोहिमेने तहसीलदारांच्या आठवणींना नवसंजीवनी दिली आणि त्या झाडाखाली क्षणभर उभं राहून सर्वांनी भावनिक प्रवास अनुभवला.

झाडं म्हणजे केवळ निसर्ग नाही, तर आठवणींचं जिवंत प्रतीक आहेत. चिंचेचं झाड फक्त झाडच नाही, तर ते काळाची साक्ष आहे. झाडं ही केवळ निसर्गाची देणगी नसून, ती अनेकांच्या आयुष्याची आठवण, एक जिवंत इतिहास असते. चिंचेसारखी झाडं केवळ सावली देत नाहीत, ती आपलं भूतकाळ जपतात. ती माणसांची, आठवणींची, नात्यांची साक्षीदार असतात.

**- विशाल नाईकवाडे,** तहसीलदार, निफाड

नदी मोकळी झालीच पाहिजे, पण अशी झाडं आणि त्यांच्याशी जोडलेल्या आठवणीही जपल्या पाहिजेत. कारण ही झाडं केवळ निसर्गाचं प्रतीक नाहीत, तर आपल्या संस्कृतीचा आणि आठवणींचा भाग आहेत. झाडं म्हणजे निसर्गाची देणगीच नाहीत, तर आपल्या जीवनाचा भाग आहेत.

**- सागर आहेर,** ग्रामस्थ, चांदोरी